
## ॥ प. पु. श्री वासुदेवानंद सरस्वति टेंबे स्वामी महाराज ॥



जन्मकाल : श्रावण कृ. ५, शके १७७६

समाधिकाल : आषाढ शु. १, शके १८३६

## ॥अध्याय पहिला ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ श्रीलक्ष्मीव्यंकटेशाय नमः ॥ ॐ नमो गुरु गणेशा ॥ मन बुद्धिंद्रिय गणाच्याईशा। स्वानंदघना अविनाशा नमो परेशा निजात्म-भावें ॥१ ॥ गुरुकृपा वागीश्वरी। परापश्यंतिमध्यमा वैखरी। त्याचहू वाचेची प्रकाशकर्ती। नमो तुज सुंदरीशारदे ॥२ ॥ आता नमूं संत सज्जन। जे परमात्मयाचें अवयव पूर्ण। ज्यांचे वाचूनि त्याची खूण। नलगे तूर्ण ज्ञानियाही ॥३ ॥ जन्मलो जियेचे कुशी। त्या यशोदा मातेसी। महादेव नामक पितयासी। अत्यादरेशी वंदितों ॥४ ॥ माझें उपास्यदैवत। अत्रि अनसूयेचा सुत। ज्याला म्हणती श्रीदत्त। असे सर्वातीत जो ॥५ ॥ इंद्रादिक सुरवर। सिद्धमुनीयोगीश्वर। ज्याला ध्याती निरंतर। जगदाधार जो असे ॥६ ॥ जो निर्गुण निराकार। भक्तांकरितां साकार। रूपधरी मनोहर। विश्वसूत्रधार जो ॥७ ॥ जो भक्त जनांचे ध्येय। श्रुतिगणातें गेय। अजअजित अप्रमेय। रुप कमनीय जयाचें ॥८ ॥ शंख चक्र त्रिशूळ। डमरू आणि अक्षमाल। कमंडलू हीं करी सोज्वळ। गंगाजळ पूरित जो ॥९ ॥ जयांसी पाहिजे मुक्ति। तयांनीं आदरावी तद्भक्ती। इहलोकीं संतती संपत्ती। दत्त तयांप्रती देतसे ॥१० ॥ दीपकें श्रवण भक्ती करून। चुकविलें जन्म मरण। वेदधर्में केले कीर्तन। दत्ता प्रसन्न करावया ॥११ ॥ कार्तवीर्य सहस्त्रार्जुन। तेणें स्मरण भक्ती केली पूर्ण। चुकविलें पुनरावर्तन। पावला सदन मोक्षाचे ॥१२ ॥ विष्णूदत्तें सेवा भक्ति। करुनि हृदयीं दत्तमूर्ति। सांठविली तेणें तो मुक्ति। पावला

अंती निश्चयें ॥१३॥ अर्चनभक्तीनें यदुरायें। वंदनें मदालसा तनयें। आयुराजानें दास्यें। दत्तात्रेया तोषविलें ॥१४॥ पांचवा अवतार जो प्रख्य। जेणें क्षत्रिय निवटिले असंख्य। त्या परशुरामें सख्य। भक्ति मुख्य आदरिली ॥१५॥ नववी आत्म निवेदन। भक्ति करूनि ऊद्धरुन। गेले अनेक भक्तजन। त्यांची गणना कोण करी ॥१६॥ नव द्वाराच्या शरिरा मी। म्हणता वाढली अहंकार ऊर्मि। ती समूळ नष्ट करितां नवमी। भक्तीनामी घडे तया ॥१७॥ काया वाचा मन। दत्त चरणीं केलें अर्पण। तया तेंचि आत्मनिवेदन। भक्ति पूर्ण घडतसे ॥१८॥ ऐंसी नवविध भक्ती करितां। देतसे मुक्ति सलोकता। समीपता सरूपता। सायुज्यताही निजदासा ॥१९॥ तो मज चित्रविचित्र। लीलाकारी परम पवित्र। लिहावया श्रीगुरूचरित्र। हो सर्वत्र बुद्धिदाता ॥२०॥ बहुजन्माच्या अंती। वासुदेवः सर्वमिति। ऐंशी स्थिती ज्ञानियाप्रति। बाणे भगवदूक्ती हे ॥२१॥ ऐंसा सद्गुरु वासुदेव। व्यापूनि असें सर्व ठाव। तच्चरित्र वर्णनीं हाव। जीवेंभावें घेतली ॥२२॥ तोचि मज बुद्धिदाता। तोचि मज चाळविता। त्याचे सत्ते मी चालता। कर्ताभोक्ता जाणपां ॥२३॥ त्याचें वंदू चरणांबुज। जो स्फूर्ति देऊनि निज। चरित्र लिहावया मज। अकुंठित सहज बुद्धिदे ॥२४॥ सह्याद्रीच्या पश्चिमेस। सुंदरवाडी नामें विशेष। राजधानी असे खास। सावंता भिध नृपाची ॥२५॥ त्या सुंदरवाडी पासून। समीपची निर्मला तीरीं जाण। माणगांव नामे जनस्थान। तपोवना योग्य जें ॥२६॥ बट औदुंबर अश्वत्थ। बकूळ कळंब कांचनच्युत। देवधार चंपक कपित्थ। वृक्षगण शोभत नानापरी ॥२७॥ जाई जुई चमेली।

ठायींठायीं पुष्पवेली। पारिजातक पाटली। करविरदि शोभती ॥२८॥ केळी आणि नारळी। पनस जंबू जांभुळी। दाडिंब निंबे पोफळी। वरी नागवेली शोभती।।२९॥ सदा वाहे पाट पाणी। तेणें शीतलता तयेस्थानीं। तरणी तोहीनिज किरणीं। ताप देऊं शकेना ॥३०॥ ऐंशा त्या माणगावांत। धार्मिक श्रद्धालू जन बहूत। वस्ती करूनि राहत। सुखें नांदत प्रपंचीं ॥३१॥ वेद वेदांत कुशल। विप्रही रहाती सुशील। जयांची मनें अति विमळ। प्रेमळ रत ईश भजनी ॥३२॥ गाय नसे गोठ्यात। अथवा तुलसी वृंदावन द्वारांत। अतिथि अभ्यागता अवमानित। ऐंसे एकही गृह न जेथें ॥३३॥ तेथें हरिभट्टजी नामें जाण। अत्रि गोत्री सदाचार संपन्न। वैदिक याज्ञिकीं प्रवीण। ब्राह्मण एक नांदतसें ॥३४॥ टेंभे उपनाम तयांचें। भक्ति प्रवण अंतर ज्यांचे। गणेश भट्ट उदरीं त्यांचे। सिद्ध पुरुष जन्मले ॥३५॥ कां म्हणावें तया सिद्ध। ऐंसे म्हणाल तरीं प्रसिद्ध। सांगतों तुम्हां नाहीं विरुद्ध। ऐका शुद्ध मानसें ॥३६॥ जेणें जन्माचें सार्थक शुद्ध। केले कुळ पावन प्रसिद्ध। ज्याचा पुत्र जगद्वंद्य। तया सिद्ध कां न म्हणावे ॥३७॥ ऐंसाच जन्मावा पुत्र। साधून दे जो इहपरत्र। काय करावें विचित्र। असती सर्वत्र घरोघरीं ॥३८॥ हीन सेवा रात्रंदिन। करूनि करिती ऊदरं भरण। स्वप्निही नाठविती ईश चरण। सांठविती धन अति लोभें ॥३९॥ विषयीं वाहिली बुद्धि। हीन संगती आवडे आधीं। संत संग नावडे कधी। तो काय सुधी म्हणावा ॥४०॥ त्यानें जरी पूजिला देव। देव नव्हे ती देवघेव। म्हणें देवा मला पाव। नवस अभिनव मी करितों ॥४१॥ नवसा जरी

देव पावला। तरी तो देवावरी संतोषला। एरवीं कोण पुसें तयाला। जो नवसाला पावेना ॥४२॥ आपण करीतसे गमजा। पैसा लावीतसें व्याजा। पुरवितां कांतेच्या काजा। लाजलज्या न धरी जो ॥४३॥ कर्म नाहीं धर्म नाहीं। विधि नाहीं निषेध नाहीं। आचार नाहीं। विचार नाहीं। नर त्या कायीं म्हणावें ॥४४॥ ऐंसे पुत्र किती जन्मले। आणि किती जगी मेलें। मातेला मात्र शिणविलें। भार झालें भूमीला ॥४५॥ असो गणेश भट्टजी दत्तभक्त। गुरू भजनी सदारत। प्रपंची असती विरक्त। अनासक्त वर्तती ॥४६॥ परान्न प्रतीग्रहाचा कंटाळा। दत्त भजनाचा लागला लळा। वाचिती गुरू चरित्र अवलीळा। कंठी दत्त नाम माळा घालिती ॥४७॥ नित्य नैमित्तिक कर्म। जाणून तयाचें वर्म। गृहस्थाश्रमाचें जे धर्म। ते सप्रेम आचरिती ॥४८॥ त्यांची भार्या पतीव्रता। रमाबाई नामें ख्याता। परम अनुकूल पतीच्या चित्ता। जी माता अतिथींची ॥४९॥ श्रीगुरू चरित्रा प्रदक्षिणा। अष्टोत्तर शत गणना। पति आज्ञेनें करी जाणा। नित्य उपासना दत्ताची ॥५०॥ ब्राह्मणाची मुख्य दीक्षा। मागितली पाहिजे भिक्षा। ॐ भवति या पक्षा। सांभाळिलें पाहिजे ॥५१॥ ऐंसे समर्थांचे वचन। त्याच परी करिती वर्तन। गणेश भटजी ग्रामीं जाऊन। नित्य भिक्षा धान्य आणिती ॥५२॥ जे मिळे प्रारब्ध योगें। निर्वाह करिती त्याचे निभोगें। श्रीदत्त पदानुरागें। काळ सत्संगे कंठिती ॥५३॥ ऐंशी उभयतांची भक्ती। पाहूनि श्रद्धाविरक्ती। अंतरी तोषला श्रीपती। जया प्रीती भक्तांची ॥५४॥ गणेश भटजींच्या मनीं। संन्यास घेणेचे आलें म्हणूनी। ते निजग्रामाहुनी। गाणगा भुवनीं

पातलें ॥५५ ॥ श्रीपादुकेसी नमन। करितां श्रवतीं प्रेमें नयन। म्हणती हे पतीत पावन। तोडी भव बंधन लवकरी ॥५६ ॥ माझ्या मनींची कामना। पुरवावी गा अत्रिनंदना। जन्म मरणाच्या मूळ वासना। तच्छेदना करी दत्ता ॥५७ ॥ माझ्या मनींची आस। कीं आतां करावा संन्यास। दृढ जो हा भवपाश। तोडावा खास वैराग्य शस्त्रें ॥५८ ॥ ऐंसी प्रार्थना करून। श्री चरणातें वंदून। गृहीं येऊन करितां शयन। देखिलें स्वप्न तयांनीं ॥५९ ॥ एक अवधूत संन्यासी। म्हणे जगद्वंद्य पुत्र तुजसी। होईल जाण निश्चयेसीं। भवा भीतोसी काय बापा ॥६० ॥ तूं माझा होऊनि भक्त। प्रपंचासी अससी भीत। माझिया भक्तां न उरत। संसार चिंता तिळभरी ॥६१ ॥ ऐंसे स्वप्न पाहतां। जागृत झालें अवचिता। भटजी म्हणती तत्वतां। काय आतां करावें ॥६२ ॥ संन्यास करावयाचा हेत। परी स्वप्न भलतेंचि सांगत। असो पाहूं स्वप्न प्रचीत। म्हणूनि बेत रहित केला ॥६३ ॥ मग आले माणग्रामीं। येवूनि रतले ब्रह्मकर्मीं। तैं नृसिंह सरस्वती स्वामी। कृपा करिती अलोलिक ॥६४ ॥ रमाबाई गर्भवती। झाली पाहूनि यथापद्धती। भटजी संस्कार करिती। बोलावूनि विप्रवर्गा ॥६५ ॥ तदनंतर एकें दिवशीं। एकांतीं निजगृहिणिसी। भटजी पुसती डोहळयासी। काय इच्छिसी सांग वेगें ॥६६ ॥ ऐंसे ऐकतांचि पति वचन। रमा बाई बोले गर्जून। मी नित्य शुद्ध बुद्ध पूर्ण। विश्व व्यापूनि उरलोंसे ॥६७ ॥ मज इच्छा कायसी। मी निर्विकार निर्गुण परियेसी। माझ्याचि मायापाशीं। गुंती जीवासी पडलीसें ॥६८ ॥ यारे यारे भाविक जन। कराभावें दत्त भजन। दत्त नाम संकीर्तन।

करा पूजन नियमानें ॥६९॥ ऐंसे स्त्री मुखीचें वचन। ऐकूनि भटजीचें मन। आश्चर्य चकित होऊन। म्हणती विलक्षण काय हें ॥७०॥ आज इजला काय झालें। भुतें कीं असे झडपिलें। किंवा वायूनें उन्मादिलें। म्हणूनि बोले शब्द ऐंसे ॥७१॥ विचार करूनि पुन्हः पुन्हा। पाहती स्त्रियेच्या वदना। तो ती संन्याशी रूप जाणा। त्यांच्या नयना दिसतसे ॥७२॥ दिव्य काषा यांबर धारी। भस्मचर्चिलेसें शरीरीं। दंड कमंडलू शोभें करी। तेज मुखावरी झळकतसें ॥७३॥ तें सन्यास रूप पाहूनि। गणेश भटजी घाबरूनी। नेत्र घेती झांकूनी। म्हणती मनीं हे काय दुजें ॥७४॥ ऐंसे चिंतूनि मानसीं। निरखूनि पाहती स्त्री मुखांसी। तो रमाबाई पतीसी। सत्कारेंसी वचन वदे ॥७५॥ म्हणे कोण्या कारणें। स्वामींनीं केलें येणें। तें सांगूनि मज कारणें। संतोषविणें ये समयीं ॥७६॥ भटजी म्हणती स्त्रियेप्रती। मी आलो सहजगती। विशेष कारण तुजप्रती। यावया निश्चितीं नसें पां ॥७७॥ मग निद्राकाळीं देवासी। वंदुनी पहुडले शय्येसी। विचार करिती मानसीं। काय ह्या स्थितीसी म्हणावें ॥७८॥ ही कधीं नाहीं कडकडली। न रागें ऐंशी बडबडली। इच्या बोलें गडबडली। वृत्ती भली माझी कीं ॥७९॥ ऐंसा विचार करित। भटजी झाले निद्रिस्त। तों त्यांणीं स्वप्नांत। एक अवधूत देखिला ॥८०॥ त्यांसी साष्टांग नमन। करितां तो बोले वचन। तूं ईश्वर भक्त पूर्ण। अससी जाणद्विजवरा ॥८१॥ तुझ्या स्त्रियेच्या पोटीं श्रीदत्त। प्रसादे जन्मेल महाभक्त। त्याचि छायें तिचें चित्त। ब्रह्मानंदीं सक्त झाले सें ॥८२॥ ऐंसे स्वप्न अकस्मांत। देखूनि भटजी झालें जागृत। आनंद भरित

त्यांचें चित्त। वंदन करिती देवातें ॥८३॥ चिंता सर्व हारपली। आनंदमय वृत्ती झाली। म्हणती दत्ता तूं माऊली। कृपा साउली केली त्वां॥८४॥ जैसें तूं ठेविसी मज। तैसेचि तव चरणां बुज। ध्याऊनि राहीन सहज। या परतें गुज न दिसें॥८५॥ असो पुढें नऊ मास भरतां पूर्ण। सत्राशें शहात्तरीं जाण। आनंद संवत्सरीं श्रावण। मासीं कृष्ण पंचमी॥८६॥ रविवार नक्षत्र अश्विनी। गुरूग्रह धनलग्नीं। सव्वीस घटी भरतां शुभलक्षणीं। पुत्रमणी प्रसवली॥८७॥ धन्य धन्य तो सुदीन। श्रीदत्त कृपापात्र पूर्ण। तदंशेंचि जन्मला जाण। भाविक जन उद्धराया॥८८॥ गणेश भटजी आनंदलें। सद्विप्रां बोलाविलें। पुत्राचें जात कर्म केलें। दक्षिणें तोषविलें ब्राह्मणां॥८९॥ ज्योतिषी सांगती लवलाही। हा तुझा पुत्र नोहें पाही। धर्ममूर्ति तुझ्या गेहीं। अवतरली ही साक्षांत॥९०॥ हा वेदवेदांग पारंगत। होईल जाण बहु विख्यांत। ब्रह्मकर्मीं निष्ठावंत। होईल विरक्त ब्रह्मवेत्ता।।९१॥ याच्या दर्शनें पतीत। जन होतील पुनीत।आमुचें वचन हें सत्य।जाणं निश्चित गणेशा॥९२॥ ऐंसे पुत्र भविष्य ऐकतां। आनंद मातापित्याच्या चित्तां। ज्योतिषां दक्षणा देऊनि समस्तां॥ तोषविलें तत्वतां यथाशक्ती॥९३॥ बारावें दिवशीं वासुदेव। पुत्राचें ठेविलें नांव। नरनारी जमवूनि अपूर्व। पुत्रोत्सव करिताती॥९४॥ ऐंसे श्रीगुरू जन्माख्यान। कथिलेसें पुण्य पावन। संत चरणीं लोटांगण। गोपाळ दीन करितसें॥९५॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृते गोपाळ बुवा विरचिते सद्गुरू वासुदेव जन्म कथनं नाम प्रथमोध्याय संपूर्णं। श्री दत्तात्रेयार्पणमस्तु॥ श्री गुरुदेव दत्त॥

## ॥ अध्याय दुसरा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ ऐका श्रोते सावधान। सांगतो श्रीगुरूचरित्र पावन। श्रवण मनन निदिध्यासन। करितां निर्वाणपद लाभे ॥१॥ वाढू लागला वासुदेव। खेळ खेळे स्वयमेव। त्याची लीला अभिनव। पाहतां जीव सुखावे ॥२॥ चौल कर्मादि विचार। करूनि व्रतबंध संस्कार। केला भटजींनीं साचार। हर्ष निर्भर होऊनि ॥३॥ आणिकही दोन पुत्र भले। गणेश भटजीस लाधले। एका दत्ताराम नाम ठेविलें। दुजीयासी सीताराम ॥४॥ द्विज जन्म लाधल्यावरी। व्रतबंध झालिया उपरी। ब्रह्मचर्य व्रतें गुरुगृहिं निर्धारीं। रहावे विद्यार्जना कारणें ॥५॥ प्रपंच कैसा साधावा। व्यवहार कैंसा करावा। धनार्जनें धर्म संपादावा। कवण्या रिती ॥६॥ हें गुरुगृहीं शिकावें। परोक्ष ज्ञान मिळवावें। मग अपरोक्ष संपादावें। साधनाभ्यासें ॥७॥ ब्रह्मचर्य व्रत नियम। शास्त्राधारें गुर्वाज्ञें उत्तम। पाळोनि मनो निग्रह परम। करावा इंद्रिय निग्रह हीं ॥८॥ ग्राम्य जनाच्या सहवासें। मानसा लागे विषय पिसें। तें टळे गुरुगृहवासें। वनीं एकांती राहतां ॥९॥ यास्तव प्राचीन काळीं। याज्ञ वल्क्यादि मुनी सकळी। रहात होतें वनस्थळीं। रम्य नदी तटाकीं ॥१०॥ पूर्व यौवनाचा काळ। रमणीय वनश्री युक्त स्थळ। स्नाना पाना निर्मळ। सरिता जळ सदोदीत ॥११॥ शीतोदकें प्रातःस्नान। निग्रहपूर्वक अनुष्ठान। श्रीगुरुचा सहवास पूर्ण। कर्माचरण वेदोक्त ॥१२॥ ऐंसे करितां प्रज्ञाबळ। आरोग्य आयुष्य मेधा प्रबळ। वाढूनि वीर्यवंत होय निश्चळ। ऐंशी प्राचीन पद्धती ॥१३॥

पद्धतीस त्या अनुसरून। गणेश भटजीचें वर्तन। वासुदेवासी लाविती वळण। वारंवार शिक्षण देवूनि ॥१४॥ माणग्राम शोभा अनुपम। सह्याद्रि वनश्री अतिरम्य। निर्मला नदी जल उत्तम। गणेश भटजींचा आश्रम तेथें ॥१५॥ पुरुषसूक्त रुद्र पवमान। संहिता छंद ज्योतिष जाण। निरुक्त निघंट व्याकरण। पठण करविती वासुदेवा ॥१६॥ सर्व ब्रह्मकर्म शिकवूनि। पितृकर्तव्या करूनि। त्याग केला भटजींनीं। क्षण भंगुर देहाचा ॥१७॥ माता दुःखी होय अनिवार। वासुदेव शांतवी वारंवार। म्हणे हा मृत्यूलोकचि साचार। सुखा थार नाहीं येथे ॥१८॥ ऐंसे समजावी माते प्रती। पितयांचे अंत्यकर्म करीरीतीं। संसार भारें कष्टेना चित्तीं। स्थिरमती रहातसें ॥१९॥ पंधरा सर्ग आद्य काव्याचे। शिकतां अर्थ सांगे श्लोकाचें। अष्टादशादि पुराणाचें। भारत भागवताचेंही ॥२०॥ ग्रामींच्या विप्र पुत्रांप्रती। जमवूनि वेदशास्त्र शिकविती। दत्त चरणीं ठेवूनि भक्ती। भजन करिती सप्रेमें ॥२१॥ पुढें तया वासुदेवा। म्हणूं लागले शास्त्रीबुवा। दशग्रंथी विप्र माणगांवा। माजी असावा तरी हाच ॥२२॥ शूचीनां श्रीमतां गेहे। ऐंशी श्रीकृष्णाची वैखरी वाहे। योग भ्रष्टांचा जन्म होयें। शुचिर्भुत कुळांत ॥२३॥ पूर्वजन्मीं योग संपादिला। परी प्रारब्धवशें सिद्धिं न गेला। देहांतीं तो पुण्य लोकाला। जावूनि दिव्य भोग भोगीं ॥२४॥ तेथूनि पुण्यशील श्रीमंत। कुळांत तो जन्म घेत। अथवा योगियाच्या कुळीं धीमंत। जन्मे पुण्योत्कृष्ट वशें ॥२५॥ धीमंत योगियाचें कुळीं। जन्म होणें सुनिर्मळीं। हे अत्यंत दुर्लभ मनुष्य मेळीं। ऐंसे श्रीकृष्ण बोलतसें ॥२६॥ मग तो

योगीभ्यास वशें। पुढील मार्ग आक्रमीतसें। अभ्यास बळें पावतसें। मोक्षधामा ॥२७॥ ऐंशाचि परी शास्त्रीबुवा। लाविती आध्यात्म मार्गीं सुहावा। अष्टांग योगाच्या उपावा। निश्चयेंसी आदरती ॥२८॥ गावा पासून एक कोस। सिद्धपर्वतीं गुहा विशेष। तेथें जाती योगाभ्यास। करावया सिद्ध समाधी ॥२९॥ गुहें माजीं सिद्धांसन। घालूनि समाधीचें साधन। कराया बसली षण्मास पूर्ण। प्राणायाम पूर्वक एकांती ॥३०॥ प्राण जय होणें कठिण। पदोपदीं विघ्नें दारूण। परीध्यान बळें श्रीदत्त चरण। चिंतितां योग साधला ॥३१॥ सिद्ध जाहली समाधी। तेणें सहजची प्राप्तरिद्धिसिद्धि। परी शास्त्रीबुवांची बुद्धी। त्यांच्या नादीं न लागली ॥३२॥ रिद्धि सिद्धिचीया नादीं। लागली ज्या योग्याची बुद्धी। तया आत्मस्वरूप सिद्धी। नोहें कधीं सत्य सत्य ॥३३॥ ते शुद्ध आचारपूर्वक। पंचायतन पूजा करिती चोख। कर्में नित्य नैमित्तिक। करूनि ब्रह्मार्पण करिती ॥३४॥ अंगीं वसें भूतदया। परोपकारीं लाविली काया। ऐंशी सात्विक तपश्चर्या। पाहूनि सज्जन सुखावती ॥३५॥ करूनि जपतप अनुष्ठान। साधिली मंत्रसिद्धी पूर्ण। शांती वैराग्य ब्रह्मतेज तूर्ण। त्यांच्या अंगी बाणलें ॥३६।. त्यांना पितृ गुरूनें वळण। लाविलें होतें प्रथमपासून। ब्रह्मकर्म श्रेष्ठपूर्ण। शिकविलें होतें ॥३७॥ आचरणें पाप मलाचें क्षालन। झालें सच्छक्तीचें स्फुरण। आनंदाचें प्रस्त्रवण। दिवसेंदिवस होतसें ॥३८॥ ब्रह्मकर्मांचें हेंचि फळ। चित्तशुद्धि होय निर्मळ। जळावरील जातां शेवाळ। प्रगट जळ दृष्टीं पडे ॥३९॥ ब्रह्मप्राप्ती साधे जेणें। त्यासची ब्रह्मकर्म म्हणणें। भ्रमप्राप्ती घडे जयानें। तें ब्रह्मकर्म

नव्हें ॥४० ॥ ब्रह्मकर्म आचरितों म्हणती। परी देहोहं भ्रम वाढें चित्तीं। तो जावया सगुण ब्रह्माची उपास्ती। करणें लागें कर्मार्पणें ॥४१ ॥ यथासांग कर्म करणें। तें ईश्वरासी समर्पणें। तेणें तत्कृपा लाभणें। कृपेनें अलभ्यही लाभे त्वरें ॥४२ ॥ शास्त्रिबुवा कर्मनिष्ठ। तैंसेचि होते भक्त श्रेष्ठ। त्यामुळेंचि ब्रह्मविद्वरिष्ठ। जाहले अति त्वरेनें ॥४३ ॥ सगुण मूर्तिं बोलूं लागली। मंत्र सिद्धी प्राप्त झाली। ती त्यांनीं परोपकारा लाविली। ख्याती पसरली जनांत ॥४४ ॥ कोणी रोगें बहुत पीडिलें। अगदोपचार करूनि थकलें। ते शास्त्रिवांशी शरण आले। रोगमुक्त झाले तीर्थानें ॥४५ ॥ कोणासी पिशाच्च बाधा जहाली। तीही सोडवणूक होऊं लागली। कीर्तिपरिसूनि लोटली जनांची मांदी ॥४६ ॥ ऐंसे असतां राजकुलांतील एक। तरुण रूपवती स्त्री देख। जिला मुंजाचा होता धाक। तेणें अपार दुःख भोगीतसे ॥४७ ॥ शास्त्रिबुवांची मंत्रसिद्धी। शांति विरक्ती परोपकार बुद्धी। जाणूनि करावया आत्मशुद्धीं। ती सुधी तेथ पातली ॥४८ ॥ येऊनि रमाबाईपाशीं। साध्यंत वर्तामान सांगेतिशीं। म्हणे मज दहा पंधरा दिवशीं। विपरीत स्थिती प्राप्त होतें ॥४९ ॥ माते मुंजाचा संचार। होवूनि माझें सर्व शरीर। श्रमतें गात्रें होती चूर। दुःख अपार होतें मज ॥५० ॥ अनेक उपाय केलें। परी सर्वही वायां गेले। तुमच्या पुत्राचें नांव ऐकिलें। म्हणूनि आले मी येथें ॥५१ ॥ तुमचें धरितें मी पाय। या दुःखासी सांगा उपाय। तुमचा पुत्र माझा अपाय। चुकवील खास वाटतें ॥५२ ॥ त्यासी माझें वृत्त कळवा। उपाय करावया चित्त वळवा। माझी कोणासी येईल कणवा। तुम्हां

वांचूनि सांगा हो ॥५३॥ ऐकूनि तिची करूणा वाणी। रमाबाई तत्क्षणीं। शास्त्रिबूवा लागूनि। सांगे तिचा वृत्तांत ॥५४॥ मग ते त्या बाई प्रती। एक यंत्र लिहूनि देती। मुंजाची बाधा न होय पुढती। निश्चये सांगती तिये तें ॥५५॥ ती त्यांच्या वचनीं विश्वासूनि। ते यंत्र पेटी माजीं घालूनिं। ठेवी निज मंदिरीं जपूनि। भक्तिभावें जाणपां ॥५६॥ त्या यंत्र सामर्थ्ये करून। मुंज्याची बाधा कमी होऊन। दिवसेंदिवस समाधान। प्राप्त झालें तियेतें ॥५७॥ बाधा सर्व हारपली। काया आरोग्य जाहली। तेणें तिची भक्ती जडली। शास्त्रिबुवांच्या चरणीं ॥५८॥ परी शास्त्रिबुवा निद्रिस्त। असतां एके रात्रीं अकस्मांत। कोणी हृदयावरी बसूनि चेंपित। ऐंसे तयां भासलें ॥५९॥ म्हणूनि दत्त नाम घ्यावयाचा। विचार करिती मनींसाचा। परी उमटेना वाचा। क्षणभरी जीव घाबरला ॥६०॥ समई उशाशीं मंद जळत। तेणें प्रकाश पडलासे घरांत। उठोनिया सावचित्त। दत्त स्मरण करिती तें ॥६१॥ झोंप न लागे ती निशीं। सरतां उठती प्रातः स्नानासी। स्नान करूनि नित्य कर्मासी। आटोपिती शास्त्रिबुवा ॥६२॥ मग घालूनिया योगासना। करिती श्रीदत्त चिंतना। रात्रीं झालिया गोष्टिची विचारणा। करितां ध्यानीं मुंजा दिसें ॥६३॥ त्या पुसती तूं कोण। कां आलास कोठून। मजपाशीं यावयाचें कारण। सांग झडकरी म्हणताती ॥६४॥ तो म्हणें मीं मागील जन्मीं। होतो ब्रह्मचारी स्वामीं। वासना जडली विषय कामीं। ती अतृप्त राहिली ॥६५॥ तेणें मज मिळाला जन्म। पिशाच्च योनींत मुंजा परम। माझें अंतःकरण निष्काम। नाहीं झालें अद्यापी ॥६६॥

मी पाहत होतो सुंदर। युवती भोगावया सुकुमार। ज्या बाईस तुम्हीं दिधलें यंत्र। ती मज अंतरीं मानवली ॥६७॥ आजवरी मी तिचा संग। करूनि भोगिला विषय भोग। तें माझें झाड होतें चांग। स्वामींनीं स्वांगें नष्ट केलें ॥६८॥ म्हणूनि मी स्वामीपाशीं। आलो असें परियेसी। मज आज्ञा होईल जैंशी। तैशा परी वागेन ॥६९॥ इतुकें ऐकूनि मुंजाचें वचन। शास्त्रिबुवा तयां लागून। सांगती त्या बाईकडे ढुंकून। पाहूं नको या उपरी ॥७०॥ तुज सद्गती होईल प्राप्त। हें वचन ऐकें नेमस्त। आतां येथें राहूं नको निश्चित। येथूनि त्वरित गमन करी ॥७१॥ त्या वेळेंपासून। मुंज्याचें निष्काम अंतःकरण। होऊनि सद्गती पावला तूर्ण। ऐंसे सामर्थ्य स्वामीचें ॥७२॥ इति श्रीमत् प. पु श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें गोपाळ बुवा विरचितें पिशाच्च पीडा हरणं नाम द्वितीयोध्याय गोडहा। श्री गुरुदेव दत्त॥ एकूण ओळी ॥१६७॥

* * *

## ।अध्याय तिसरा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ श्रीगुरु चरित्र पीयूष। सेवितां न धाय मानस। गोडी उपजे बहुवस। भववव्यथा खास निवारी ॥१ ॥ शास्त्रिबुवांची मंत्रसिद्धी। परोपकारीरत बुद्धि। पाहूनि जनीं प्रसिद्धी। झाली सत्वर सहजची ॥२ ॥ गुरुद्वादशीच्या उत्सवास प्रतिवर्षि नृसिंहवाडीस। येवूनि श्रीदत्त चरणांस। नमस्कारिती भावेसी ॥३ ॥ तया नृसिंहवाडींत। ब्रह्मनिष्ठयति नांदत। तयांची नामें असती प्रख्यांत। श्रीदत्त कृपा पात्रजें ॥४ ॥ एका म्हणती मौनी स्वामी। दुजे गोविंद यति निष्कामी। जयांची मती दत्तारामीं। आराम पावली सर्वदा ॥५ ॥ ते उभयही यती। शास्त्रिबुवासी मानिती। शास्त्रिबुवांची ही भक्ती। त्याच्या चरणीं सप्रेम ॥६ ॥ गोविंद यति पासून। उपनिषदार्थ घेती जाणून। विनवूनिया कर जोडून। मंत्रोपदेश मागती ॥७ ॥ नमस्कारून गोविंद स्वामींस। म्हणती मज द्या मंत्रोपदेश। शिष्य करावा हा दास। तुमच्या चरणीं विश्वासला ॥८ ॥ स्वामीं म्हणती शास्त्रिबुवा। तुम्हां समान शिष्य मिळावा। ऐंसा अधिकार कैंसा यावा। आम्हां मानवां लागि जाणा ॥९ ॥ तुचे गुरू श्रीदत्त। हें वचन ऐका निश्चित। तेंचि तुमचे मनोरथ। पूर्ण नेमस्त करतील ॥१० ॥ पुढें शास्त्रिबुवा वाडीहुनी। माणगांवा आले परतूनि। रमाबाईनें आग्रह करुनी। लग्नाची भीड घातली ॥॥११ ॥ मातेची आज्ञा प्रमाण। मानूनि गृहस्थांश्रमीं झाले जाण। स्त्रीसुशील सुलक्षण। जिचें नाम अन्नपूर्णा ॥१२ ॥ अन्वर्थक नाम जियेचें। कडकडीत पतीव्रत साचें। पाहूनि मन तयांचे। समाधान पावलें ॥१३ ॥ त्यांचा नित्यनेम

बरवा। धरूनि मनीं सद्भावा। करिती श्रीदत्त सेवा। झाली जनीं वाहवा तेणें ॥१४॥। करावें अतिथीपूजन। तैंसेच करणें ज्ञानार्जन। विद्येला द्यावें उत्तेजन। सत्यव्रत पाळावें ॥१५॥ प्राणीमात्रा विषयीं प्रेम। वाढवावा सदाचार सद्धर्म। प्रपंच परमार्थ स्वतः उत्तम। साधूनि इतरां शिक्षण देणें ॥१६॥ संत साधू सज्जन। असती ज्ञान निष्ठपूर्ण। तैंसेचि कर्तव्य परायण। वैराग्य परिपूर्ण अंगी ज्यांच्या ॥१७॥ व्यवहारात राहून। प्रसंगाप्रमाणें वागून। धर्माला साधून। कैंसे वर्तन ठेवावे ॥१८॥ याचा गृहस्थाश्रमांत। अनुभव येतसें निश्चित। मायाबद्ध व्यवहारांत। कैंसे ठेवावें सदाचरण ॥१९॥ सत्याला आणि धर्माला। साधावें कैंसे हे शिकण्याला। गृहस्थाश्रम हीच शाळा। धर्मशास्त्र सांगतसें ॥२०॥ असो ते प्रतिवर्षि वारी। करिती श्रीनृसिंह क्षेत्री। त्याही वर्षि नियमानुसारीं। आलें श्रींच्या दर्शनार्थ ॥२१॥ तयाक्षेत्रां माझारीं॥ वास करिती तीन रात्रीं। तितुक्यांत शास्त्रिबुवावरी। कैशापरी कृपा जाहली ॥२२॥ ती ऐकावी श्रोतेजन। तुम्हीं असा भाग्यवान। म्हणूनीच तुमचें वळलें मन। गुरू महिमान ऐकावया ॥२३॥ शयनारती समयीं। दर्शन करूनि जावें गेहीं। ऐंशा विचारें शास्त्रिबुवा पाहीं। घाटावरी पातलें ॥२४॥ हातपाय धुवून करितें झालें आचमन। देवद्वारीं येऊनि नमन। करितां द्वार बंद देखिलें ॥२५॥ शयनारती झालिया वरी। देवाचिया कट्टयावरी कोणीही राहूं नये निर्धारीं। नियम ऐंशापरी होता ॥२६॥ परी तो नेणूनि शास्त्रिबुवा। नमस्कार करिती देवा। पाहूनि एकांत बरवा। प्रदक्षिणाही घालिती ॥२७॥ पुन्हः देव द्वारा सन्मुख येती।

तों त्याणीं देखिला भव्य यती। तेजःपुंज अंगावरती। भगवी छाटी बैसलासें ॥२८॥ पुसतसें शास्त्रिबुवासी। अरे तूं कोण या समयासी कां आलास या स्थळासीं। येथील नियम नेणसी कीं ॥२९॥ यावेळीं येथें येऊं नये। कोणीही येथें बसूं नये। निजूं नये बोलूं नये। राहूं नये या स्थळीं ॥३०॥ शास्त्रिबुवा विनयें बोलती। स्वामीं मी नेणे येथील पद्धती। जैंसे महाराज आज्ञापिती तैंशा चरितीं वागेन ॥३१॥ इतुकें झालिया संभाषण। गुप्त होती यती जाण। शास्त्रिबुवांचें मन। आश्चर्यचकित जाहलें ॥३२॥ म्हणती श्रीनृसिंह सरस्वति। तोचि हा होय निश्चिती। मज दर्शन देऊनि एकांतीं। कैंसा गुप्त झाला हो ॥३३॥ माझी कर्मगती ओढवली। ही अमोलिक संधी गेली। कैंशी मला भूल पडली। न वंदिलीं पाऊलें हीं ॥३४॥ कामधेनू घरीं आलीं। अभाग्यानें दुरी लोटिली। तैंशी कर्म गती ओढवली। कैंशी भूल पडली मला ॥३५॥ आतांच हें वर्तमान। गोविंद स्वामींस सांगावें जाऊन। ऐंसा मनीं विचार करून। शास्त्रिबुवा मठांत येती ॥३६॥ स्वामीस करूनि वंदन। सांगती साद्यंत वर्तमान। तें म्हणती तुम्हां लागून। दिधलें दर्शन दत्तात्रेयें ॥३७॥ धन्य भाग्य तुमचें। दर्शन झालें श्रीदत्ताचें। दर्शन नव्हें तपश्चर्येचें। फळ साचें लाधलेंत ॥३८॥ धन्य आजिचा सुदिन। तुम्हां झालें दत्तदर्शन। या नरदेहा येऊन। सफळ जिणें केलेंत ॥३९॥ इतुकें गोविंद स्वामीचें वचन। ऐकतां शास्त्रिबुवांचे मन। प्रसन्न होऊनि म्हणती धन्य।आजीं झालें जिणें माझें ॥४०॥ श्रीदत्तायोगीवरा। दर्शन देऊनि या पामरा। धन्य केलें तवोपकारा। नाहीं पारावार

खरा ॥४१ ॥ तुम्हीं दीन दयाळू सत्य। हें ब्रीद नोहें असत्य। भव दर्शने कृतकृत्य। झाला दीन भृत्य हा ॥४२ ॥ ती पाहिलेली यतिमूर्तिं। पुन्हः पुन्हा ध्यानीं आणिती। प्रेमाश्रू नेत्रांतुनी गळती। कंठ सद्गदीत झाला ॥४३ ॥ त्या यतिरूपीं गुंतले लोचन। तेणें स्थिरावले मन। देहभाव गेला हारपून। तेथें तहान भूक कैंची ॥४४ ॥ तें रूप मनींध्यात। गृहीं येऊनि झाले निद्रिस्त। तों त्याणीं अवचित। स्वप्न एक देखिलें ॥४५ ॥ स्वप्नामाजीं यतिवेश। श्रीदत्त म्हणती शास्त्रीबुवांस। तुज पाहिजे मंत्रोपदेश। तरी हा घे देतो तुला ॥४६ ॥ या मंत्राचें विधान। गोविंद स्वामीपाशीं जाऊन। बरवें घेई समजून। ऐंसे सांगून गुप्त झालें ॥४७ ॥ स्वप्न पाहतां त्वरित। शास्त्रिबुवा जागृत होत। उठोनिया बैसत। श्रीदत्त चिंतन करिती ॥४८ ॥ म्हणती करूणा करा दत्ता। जाणूनि माझिया मनोरथा। मज उपदेशूनियां समर्था। धन्य गुरूनाथा केलेंसी ॥४९ ॥ तरी मी काय होऊं उतराई। हा देहची अर्पितों तव पायीं। मी बालक तूं आई। चरणीं ठाव देई मज ॥५० ॥ मग तोही स्वप्न वृत्तांत। मौनी स्वामीस सांगत। ते म्हणती तुमचें दैवत। श्रीदत्त आजपासुनी ॥५१ ॥ त्यामंत्राचें विधान। जाणूनि घेती स्वामी पासून। तदनंतर परतून माणगावां येते जाहलें ॥५२ ॥ स्वहस्तें देवालय बांधुनी। आंत दत्तमूर्तिं स्थापुनी। त्रिकाळ पूजा चालविली त्यांणीं ॥५३ ॥ जैंशी नृसिंहवाडींत ॥५३ ॥ पालखी काढिती शनिवारीं। पहावयास जमती नरनारी। वाजंत्री जनभक्ती पुरस्सरीं। वाद्य घोष करिताती ॥५४ ॥ शास्त्रिबुवाचें सदाचरण। शुद्ध वैराग्य शुद्धमन। पाहूनि श्रीदत्त ही मान। देती त्यांच्या

वचनाला ॥५५॥ कोणी करिती नवस। प्रार्थना करूनि श्रीदत्तास। कोणी प्रदक्षिणा औदुंबरास। घालिती पुत्रप्राप्तीस्तव ॥५६॥ पिशाच्च बाधेचें जन। धूपारती समयीं ओरडती जाण। कोणी श्रीगुरू चरित्र सप्ताह पूर्ण। करूनि ब्राह्मण भोजन घालिती ॥५७॥ कोणी करिती रूद्रावर्तन। कोणी घालिती लोटांगण। कोणी हरिनाम संकीर्तन। कोणी गायन भजन करिती ॥५८॥ कोणी बांधिती धर्मशाळा। कोणी पाजळती दीपमाळा। कोणी आणिती पुष्पमाळा। देवासी अर्पावया लागीं ॥५९॥ तात्पर्य नृसिंहवाडी समान। जनापूज्य झालें तें स्थान। जेथें होय पिशाच्च मोचन। मन कामना पूर्ण होऊनि ॥६०॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद चरित्रामृतें गोपाळबुवा विरचितें श्रीदत्तदर्शनं नाम ॥ तृतियोध्याय गोड हा ॥ श्री गुरुदेव दत्त ॥

* * *

## ॥ अध्याय चवथा ॥

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्री गुरुभ्यो नमः॥ श्रीगुरुचरित्र श्रवण पठण। करितां होय अघनिरसन। अंतीलाधे पदनिर्वाण। योगीजना दुर्लभ जें॥१॥ पुढें वर्तली कैंशी कथा। ती विस्तारें सांगतों आतां। करुनिया एकाग्रचित्ता। परिसां तुम्हीं भाविक हो॥२॥ दर शनिवारीं हजारों लोक। माणगांवीं दर्शनार्थ देख। जमती उपायनें ही कित्येक। आणिती प्रेमभावें करुनि॥३॥ द्रव्यही देवासी अर्पिती। शास्त्रिबुवातें विप्रां वाटिती। किंवा ब्राह्मण संतर्पणा वेंचिती। प्रपंचा न खर्चिती आपुल्या॥४॥ शास्त्रिबुवांच्याही गृहीं। अनेक चीज वस्तूं पाही। उघड्या जागेंत पडुनी राही। परीकोणी न हात लाविती॥५॥ यात्रेकरू उपायन। निमित्तें देवापुढें धन। ठेविती तें तैसेची पडून। रहातसें मंदिरीं॥६॥ एका बाईनें मात्र। पापाची पर्वा अणुमात्र। नधरितां विचित्र। करणी केली ती ऐका॥७॥ कोणी एका यात्रे करूनें। देवापुढे ठेविलें नाणे। उपायन निमित्तें चार आणे। ते समयीं तेथे कोणी नव्हतें॥८॥ पाहुनिया एका बाईने। उचलुनीं घेतलें ते नाणे। ही गोष्टकोणीही नेणे। निजगृहीं जाय आनंदे॥९॥ शास्त्रिबुवांच्या गृहीं। देवगण रक्षक होते पाहीं। बाईच्या शरीरी लवलाहीं। प्रवेशून तीस तेथ॥१०॥ आणिती धरूनि लवलाही। गुप्तमार देती पाहीं। वरुनि कोणा न दिसें काहीं। परीती ओरडूनि रडतसें॥११॥ शास्त्रिबुवा म्हणती तीस। काय कारण रडावयास। ती सांगे घडला दोष। माझ्या हातें स्वामियां॥१२॥ यास्तव मज हे देवगण। मारदेती दारूण। सोडवा मज यांच्या हातून। पाहुनी म्हणती

शास्त्रिबुवा ॥१३॥ तें देवगण फक्त। शास्त्रिबुवांनाच होतें दिसत। मग ते दत्ता प्रार्थित। बाईला त्रास न द्या तुम्हीं ॥१४॥ कलियुगीं अज्ञानी जन। द्रव्यावरी मने ठेवून। वागती परी निज दूत जाण। त्या अल्पदोषास्तव गांजिती ॥१५॥ तरी हे योग्य नव्हें। येथें निजदूतांनी न रहावे। जे कां होईल स्वभावें। तें मी सोशीन आनंदे ॥१६॥ ऐकुनि प्रार्थना वचन। श्रीदत्त देवगण। कोणालाही त्रास जाण। तेव्हापासून न देती ॥१७॥ बाईनें शास्त्रिबुवांचे चरण। धरूनि अपराधक्षमापन। करा म्हणे या हस्तें जाण। न होय पुन्हः दोष ऐंसा ॥१८॥ येणें परी विनवून। श्रीपुढें चार आणे ठेवून। निजगृहीं गेली जाण। पश्चाताप पावुनी ॥१९॥ ऐंसा महिमा थोर वाढला। तों तेथील भिक्षुक वर्गाला। लालुच सुटला पाहूनी धनाला। शास्त्रिबुवाला म्हणती तें ॥२०॥ एके उत्सवाचें दिवशीं। पात्रें वाढिली भोजनासी। ब्राह्मण भोजना बैसले परियेसी। शास्त्रिबुवांच्या घरी ॥२१॥ म्हणती गांवीं प्रसिद्ध झालें स्थान। तरी तेथें जे कां होईल उत्पन्न। तें सर्व ग्राम भिक्षुकांचे जाण। त्यांत तुमचें कांही नाहीं ॥२२॥ तुम्हीं देवाचे पूजारी फक्त। तुम्हांसी मिळेल पगार नक्त। देवस्थानाचें उत्पन्न कमी जास्त। तें आम्हां भट भिक्षुकांचे ॥२३॥ हे बोलणें जरी तुम्हां पसंत। तरी आम्ही ग्रास घेंऊं मुखांत। एरवीं न जेवितां गावांत। ऊठनी जाऊं घरोघरी ॥२४॥ भिक्षुक ब्राह्मण लाचावले। हें गावच्या अधिकारियानें जाणिलें। त्यांनी समजावूनी वहिलें। भोजना बैसविलें सादरें ॥२५॥ विप्र जेऊनी झाले तृप्त। त्यांना शास्त्रिबुवा जोडिती हस्त। म्हणती हें तुमचे समस्त। मी तो कःपदार्थ तुम्हां

पुढे ॥२६॥ माझें वचन ऐका यथार्थ। देवापुढें जे येती पदार्थ। विप्रांसीच वांटितो किमर्थ। अनर्थकारक घेवं मी ॥२७॥ साधावयास परमार्थ। मीश्रीदत्त चरण सेवित। मज नको पशुगृहवित्त। प्रपंचीं मी सक्त न व्हावें ॥२८॥ एवढें तुम्हीं आशिर्वचन। द्यावें मज दासालागून। तुमचें ब्राह्मणाचे वचन। कोण न मानील सांगा ॥२९॥ शास्त्रिबुवांचे नम्र वचन। ऐंशापरी ऐकून। विप्रांचे आनंदले मन। संतोषून गृहीं गेले ॥३०॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें गोपाळबुवा विरचिते। द्रव्यापहारी स्त्री दुःख निरसन। विप्रस्तुती कथनं नाम चतुर्थोध्याय गोडहा। श्रीकृष्णार्पणमस्तु। श्री गुरुदेव दत्त ॥

* * *

## ॥ अध्याय पाचवा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ संतोषुनि विप्रभले। आपुल्या घरीं जाते झाले। पुढें काय वर्तले। तें ऐका श्रोतेजन ॥१ ॥ दोन प्रहरीं एके दिवशीं। शुद्ध वस्त्र नेसुनी परियेसी। शास्त्रिबुवा पुजेसी। बैसले असतां शूद्र एक ॥२ ॥ आला पाटी डोईवर। घेऊनि पिकले फणस फार। तेणें जाहलासे शिरीभार। देवळा जवळीं पातला। ।३ ॥ देवासी प्रदक्षिणा घालिती लोक। गुरुचरित्र वांचिती कित्येक। त्यांना हात लावा म्हणे देख। पाटी उतरावया मज ॥४ ॥ त्या लोकांचे सोवळें कठिण। स्थूल देहावरी ज्यांचें मन। शुद्ध नाहीं अंतःकरण। स्नानसंध्या वरपंग ॥५ ॥ भूतदया नाहीं अंतरी। राख लाविली शरीरीं। माळा घातल्या गळया माझारीं। तरी काय सोंवळें झालें ॥६ ॥ अंतरीं काम वाढला। मग देवा भजूं लागला। नवस करितों सत्य नारायणाला। सव्वामणाचा ॥७ ॥ मन तरीं विषयासक्त। विषय प्राप्तीस्तव देवा भजत। तरी तो कनिष्ठ प्रतीचा भक्त। तयापासून देवदूर ॥ ८ ॥ भरला जनीं जनार्दन। ऐंसा विश्वास ज्यांचा पूर्ण। परोपकारी ज्यांचें मन। ते जाणावें उत्तम भक्त ॥९ ॥ ज्यांचा आवडता देव। ज्यांचे चित्तीं प्रेमभाव। वसतसे सदैव। तेंचि सोंवळें पवित्र जन ॥१० ॥ जगाचें करावया कल्याण। अवतरले भूमंडळीं सज्जन। निजदर्शन देवूनि पावन। करिती पतित जनातें ॥११ ॥ असो तो शूद्र म्हणे माझें। हात लावुनी उतरा ओझें। लोक म्हणती आम्हीं दुजें। कांही नेणो या समयीं ॥१२ ॥ आम्हीं सोवळों या समयासी। तूं तरी शूद्र अससी। हात लावावया

आम्हां सांगशी। लाज कैंशी तुज न वाटे ॥१३॥ त्या शूद्राच्या डोईवरी। ओझें झालेसें भारी। हात लावा म्हणे करूणा स्वरीं। ओझें उतरावया मज ॥१४॥ त्याचें करुणा वचन। शास्त्रिबुवांनी ऐकून। पाटीस हात लावून। खालीं उतरून ठेविती ॥१५॥ लागतां ओढ आत्म ज्ञानाची। स्वार्थ ती नुरवी साची। व्यक्तित्व क्षणांतचि। नष्ट करुनि सोडीतसें ॥१६॥ ईश्वरी प्रेम सागरांत। तत्काळ नेउनी बुडवीत। मग तो बद्धजीव संगतींत। राहिला तरी काय झालें ॥१७॥ ईश्वरी प्रसाद किं चिन्मात्र। झाल्या अंतःकरण पवित्र। होईंन लागतां क्षणमात्र। अपवित्रता नये मग ॥१८॥ असतां तरुणीं नवोढा। गृहकृत्यीं असतो वोढा। मूल होंता त्याचा कोडा। पुरवितां वेळ न पुरें ती तें ॥१९॥ त्यास गोंजारी दिनभर। लडिवाळपणें वारंवार। तेवीं अज्ञानी नर। अनेक कार्यीं व्यग्र असतो ॥२०॥ परी एकदां परमेशाची। वोळख पटतांसाची। मग गोडी अन्य कार्याची। तिळमात्र ही न उरे ॥२१॥ लागे गोडी ईश्वराची। तत्सेवा करण्याची। तदीच्छेनुरुप वागण्याची। तद्दर्शनाची आवडी ॥२२॥ स्पर्शास्पर्श नियम। अवश्य पाळणें उत्तम। वर्णाश्रमोचीत कर्म। करावें आत्मोंन्नतीसाठीं ॥२३॥ उदात्त हेतूनें नैतिक। त्याच परी धार्मिक। उन्नती व्हावया देख। सोंवळें अवश्य पाळावें ॥२४॥ येणें शरिराला व मनाला। अवश्य पडतसें आळा। जगदुपयोगी करण्याला। अवश्य सामर्थ्यवान करी ॥२५॥ अन्याला कमीपणा द्यावा। वा पोकळ डौल दावावा। जनीं श्रेष्ठपणा मिरवावा। यासांठीं मात्र तें नोहें ॥२६॥ सोवळें पाळण्याच्या पद्धतींत। मानसीक थोरपणा ऱ्हास होत।

अनुदार कल्पनांचा ज्यांत। प्रवेश होत असेल ॥२७॥ तें सोंवळें नसून। सोंवळयाच्या नांवाखालीं जाण। अमंगळ घातूक पूर्ण। दडलेले नीचत्व असे जाणा ॥२८॥ असो शास्त्रिबुवांचे सोवळें कडकडीत। परीभूतदया अंगीं वसत। म्हणूनीच द्रवलें चित्त। शूद्र आर्तस्वर ऐकूनी ॥२९॥ धिक्कार करूनि दुसऱ्याचा। जो टेंभा मिरवी आचाराचा। तो आचार नोहेसाचा। अनाचारचि जाणावा ॥३०॥ विचारासहित आचार। तो जाणावा सदाचार। या विरहित अनाचार। किंवा मिथ्याचार जाणावा ॥३१॥ स्वधर्म वर्ण आश्रम कर्म। करितां तोषें पुरुषोत्तम। परी त्याचें नेणूनि वर्म। धर्म नामें कर्म करिती ॥३२॥ भूत दया अंगी। तिळभरही नसूनि जगीं। सोंवळें केलें जरी वरपंगी। तरी ते बापुडें करील काय ॥३३। जरी प्राप्त व्हावा देव। हृदयीं भूत दयेसी द्यावा ठाव। हें प्रथम साधन अपूर्व। संत सज्जनीं कथियेलें ॥३४॥ संत पदवी प्राप्त व्हावी। तरीं भूतदया आदरावी। यत्नें प्रयत्नें करुनि बरवी। मिळवा संत समागमें ॥३५।. तो कुणबी म्हणे शास्त्रिबुवांस। मी पाटी उतरावयास। त्रास दिधला तुम्हांस। झाली शिवाशीव स्वामियां ॥३६॥ तें म्हणती त्या शूद्रास। परोपकार करावयास। वारंवार संधी न मिळे खास। काय उपयोग शरिराचा ॥३७॥ याच गुणें संत महिमा वाढला। ज्यांच्या घरीं देव राबला। दया शांतीसीं ठाव दिधला। अंतःकरणीं तयांनीं ॥३८॥ असो आठ वर्षे पर्यंत। तें दत्त संस्थान सतत। नृसिंहवाडी समानख्यांत। माणगांवीं जाहलें ॥३९॥ कोणासी कांहीं अडचण प्राप्त। झालिया तेणें माणगांवांत। येंउनी शास्त्रि बुवांसी त्वरित।

भेटूनि दुःख मुक्त व्हावें ॥४० ॥ पिशाच्च बाधेचें जन। तेही येथें येऊन। श्रीदत्त सेवा करून। मुक्त होऊन घरीं जाती ॥४१ ॥ रोगी आरोग्या पावती। शास्त्रिबुवा स्वतः औषध देती। त्यांना एका बैराग्यानें वनस्पती। प्रीतिपूर्वक दाखविल्या ॥४२ ॥ त्या लोकोपयोगांत आणिती। त्याची लोकांसी येई प्रचिती। शास्त्रिबुवांपाशीं धावती। रोगमुक्त व्हावया ॥४३ ॥ श्रीदत्ताची सेवा करिती। वरी औषध ही घेती। प्रारब्ध भोग संपविती। रोगमुक्त होती तत्काळीं ॥४४ ॥ कोणी शुभ शकून। पहावया येती जाण। त्यानाही योग्य प्रश्न। सांगून देती शास्त्रिबुवा ॥४५ ॥ कोणी दाविती जन्म पत्रिका। त्याचें हीं फल सांगती देखा। वेदशास्त्र शिकविती कैका। उपनिषदार्थ सांगती ॥४६ ॥ सायंकाळीं पुराण सांगती। सुलभ सांगण्याची पद्धती। ऐकावया नरनारी जमती। तेणें ते अतिपूज्य जाहले ॥४७ ॥ माणगांवातील जना। पूज्य होते एवढे न जाणा। आसपास गांवालाही जाणा। आधारस्तंभ ते होते ॥४८ ॥ शास्त्रिबुवांची सेवा परिपूर्ण। श्रीदत्तांनीं मानून। त्यांना आज्ञापिती जाण। दीनोद्धारण करावया ॥४९ ॥ उत्तरपंथा जाऊन। भक्तिमार्गा लावावें जन। जा सत्वर आतां येथून। ऐंसा स्वप्नीं दृष्टांत देती ॥५० ॥ शास्त्रिबुवांचे प्रथम पासून। होतें विरक्त अंतःकरण। तो दृष्टांत ऐकून। आनंद वाटला मानसीं ॥५१ ॥ प्रपंचाचे कैंसे करावे। तें उभय बंधूसी सांगूनि स्वभावें। मातेसी पुसूनि निघावें। ऐंसा विचार केला मग ॥५२ ॥ दुसरें दिवशीं तोच दृष्टांत। ऐकूनि शास्त्रिबुवा त्वरित। भोजन सारूनि मातेसी सांगत। आम्ही जातो तीर्थाटना ॥५३ ॥ शास्त्रिबुवा तीर्थाटन। करावया

जाणार म्हणून। आसपासच्या गांवींही जाण। वार्ता प्रथम पसरली ॥५४॥ तेथील जना जीव कीं प्राण। झाले होते शास्त्रिबुवा जाण। ते जाणार ऐंशी वार्ता ऐकून। तळमळूं लागले सकळही ॥५५॥ माणगांवीं धांवत येती। त्याना नानापरी विनविती। नेत्रांतुनी अश्रुधारा गाळिती। म्हणती सोडुनीं कां जातां ॥५६॥ आम्हांसीं तुम्हावीण दुसरा। नाहीं कोणाचा आसरा। आम्हीं झालों सैरावैरा। गमन वार्ता ऐकुनी ॥५७॥ त्या लोकांची प्रेमभक्ती। पाहूनि शास्त्रिबुवांचें नेत्र श्रवती। सद्गदीत कंठ होती। मायेची गति अनिवार ॥५८॥ सर्वांची एकची धांदळ। होवूनि झालें शोकाकूल। माता झालीसें विकल। पुत्र स्नेहें करूनिया ॥५९॥ रमाबाई म्हणे वासुदेवा। तूं जातोस कोण्या गांवां॥ परदेश नाहीं बरवा। मज सोडून जाऊं नको ॥६०॥ तुझ्या गुणाला जाणून। येथे हजारों लोक येती जाण। तूं गेल्यावरी येथून। शून्य वाटेल सकळही ॥६१॥ तुज मानिती सकळ जन। आम्हां होतें ते भूषण। तुज वांचूनि अरण्य। भासेल आम्हां सकळातें ॥६२॥ आपुल्या हातें देवालय बांधून। कां जातोस ते सोडून। हे दुःख करिती सर्वजन। यांच्याकडे पहा कांहीं ॥६३॥ जरी तुज अवश्य करणें गमन। माझ्या वचना दे मान। केव्हां येशील परतून। ते सांगून मग जाई ॥६४॥ शास्त्रिबुवा म्हणती माते। देवालय बांधूनि स्वहस्तें। आजपर्यंत एकचित्तें। पूजा केली दत्ताची ॥६५॥ तेणें दत्त भगवान। मजवरी संतुष्ठ होऊन। मज दृष्टांती सांगती जाण। गमन कराया उत्तर पंथा ॥६६॥ श्रीच्या आज्ञेप्रमाण। सर्व कांही घडतें जाण। जैसे आज्ञापिती दत्त भगवान। वागणें

तैशापरी ॥६७ ॥ हें शास्त्रिबुवांचें भाषण। ऐकून रमाबाई बोलें वचन। वासुदेवा तूं दत्तभक्त जाण। अससी पूर्ण मी जाणतें ॥६८ ॥ परी मजकडे तो दत्त। कां देईनारे चित्त। मी त्यासी भजतें सतत। मज कां दृष्टांत देईना ॥६९ ॥ तो कृपा करील कैंशापरी। हें मज सांगे निर्धारी। मी व्रतें नियम केलें नानापरी। सोशिलें आजवरी कष्ट बहुत ॥७० ॥ मला ह्या भवबंधांतून। मुक्त करीन कां भगवान। तुज प्रपंचाची आशा नाहीं जाण। मला कांहीं सुटेना ॥७१ ॥ शास्त्रिबुवा माते प्रती। म्हणती तुज मिळेल सद्गती। हा निश्चय जाणूनि चित्तीं। दत्त चरणीं भक्ती ठेवी ॥७२ ॥ दत्तकृपा तुजवरी। खास असें निर्धारी। तूं ती नेणूनि अंतरीं। व्यर्थ खिन्न होसी माते ॥७३ ॥ रमाबाई म्हणे ऐकवचन। तुज विचारितें एक प्रश्न। परमेश्वर प्राप्तीचें साधन। करूं लागतां एखादां ॥७४ ॥ इंद्रिये जरी ओढ घेती। विषयांकडे धांवती। तरी काय करावें मजप्रती। सांग निश्चिती वासुदेवा ॥७५ ॥ आम्हां स्त्रियांना साचार। श्रुतिस्मृति श्रवणाधिकार। नाहीं म्हणूनि वारंवार। तूं सांगसी पुराण समयीं ॥७६ ॥ धिक्कार आमुच्या जन्माला। देवानें नर जन्म कां न दिला। त्या योगें आम्हां ज्ञान प्राप्तीला। सोय होती खचीत ॥७७ ॥ अरे वासुदेवा नर जन्म। आम्हां मिळावयाचें वर्म। सांग कांहीं तरी उत्तम। कर्म जीवें भावें करूं ॥७८ ॥ किंवा जन्मो जन्मीं आम्हाला। हाच स्त्री जन्म मिळणार वहिला। आमुची दया नाहीं कां देवाला। येणार नर जन्म द्यावयाला ॥७९ ॥ शास्त्रिबुवा म्हणती मातें। स्त्रियाकरिती व्रतातें। किंवा वायन दानें देती विप्रातें। करिती संकल्पातें त्यावेळीं ॥८० ॥ संकल्प

केल्या वांचून। स्त्रियाचें न तोषे मन। हे वर्म जाणूनि ब्राह्मण। संकल्प सोडून दान घेती ॥८१॥ तुमच्या हातें संकल्प जळें। सोडवूनि ब्राह्मण निराळे। तुम्हीं भोगितां त्याचीं फळें।अज्ञानानें आनंद मानितां ॥८२॥ ऐंसा कोणतां संकल्प आहे। कीं जो आम्हा बांधिताहे। पुनःपुन्ह स्त्री जन्म देत आहे। आम्हां लागीं सांग तो ॥८३॥ ऐंसे पुससी माते। तरी ऐक हो एकचित्तें। मजलागीं भाग पडलें तूतें। सांगणे भावार्थ तयाचा ॥८४॥ मज या जन्मीं। एवढेंच नव्हें जन्मो जन्मीं। अखंड सौभाग्य प्राप्त नामी। असावें आसा संकल्प तो ॥८५॥ ब्राह्मण मुखें उच्चार करवूनि। दान देता म्हणवूनि। तो ब्राह्मण तुम्हां लागुनी। होवूनि स्त्री जन्म देतो ॥८६॥ यास्तव जें कांहीं दान देणें। किंवा जे व्रत करणें। तें पति आज्ञेनें परमेश्वरीं अर्पणें। हे वंर्म जाणणें मुख्य ॥८७॥ तेणें न होईल बाधक। परमेश्वरा प्रिय होईल देख। कर्म करणें निर्हेतुका। नसावें दांभिक ऐक माते ॥८८॥ अवधूतें यदु राजास। स्वगुरु कथिलें चोवीस। तोचि प्रकार विशेष। बाणूनि घ्यावा सुविचारें ॥८९॥ भागवतीं एकादशी। कथन केलें सुरसीं। त्याची छाया मधुरशी। एकनाथें ही वर्णिली ॥९०॥ तोचि अनुवाद सांप्रत। मातें सांगतों तुजप्रत। देवूनिया एकाग्र चित्त। अत्यादरें परियेसी ॥९१॥ आपुला हक्क असतां। कनिष्ठ बंधूसी राज्यदेपिता। तो अपमान सोसवेना तत्वतां। ययाति पुत्राय दूसी ॥९२॥ तो खिन्न होऊनि मनीं। फिरत गेला तत्क्षणीं। सह्याद्रीच्या निबिड वनीं। तो तेथें देखे अवधूता ॥९३॥ स्थळ पाहूनि एकांत। निर्जनवनीं स्वस्थ चित्त। पडला असे अवधूत। धष्टपुष्ट शरिरानें ॥९४॥

यदुराजा तया पाहुनी। पुसें तूं कोण या निर्जन वनीं। ऐंशा या एकांत स्थानीं। कां येऊनि राहिलासी ॥९५॥ तूं दिससी धष्टपुष्ट। तरी खाशी काय सांग स्पष्ट। मनुष्य कीं तूं योगी श्रेष्ठ। चिंता रहित दिसतोसी ॥९६॥ करूनि एकाग्र चित्त। पडूनि राहिलासी निवांत। एवढें ज्ञान कोठूनि प्राप्त। झालें सांग तुज प्रतीं ॥९७॥ कोण गुरू तुज भेटला। जेणे स्थिर केलें त्वच्चित्ताला। निर्भयमनें राहसी भला। एकलाचि अरण्यांत ॥९८॥ हें व्याध्र सिंहाचें वसती स्थान। अगर सर्पाचें घरचि जाण। तुझे निर्भय अंतःकरण। कैशापरी जाहले ॥९९॥ जैंसा गुरू तुज भेटला। तैंसा जरी भेटेल मला। मी ही शरण जाऊनि त्याला। उद्धार करून घेईन ॥१००॥ ऐंसे यदुरायाचें वचन। ऐकूनि बोले अवधूत जाण। मी चोवीस गुरू पासून। ज्ञान संपादन केलें ॥१०१॥ ते कोणते गुरु। म्हणशील तरी ऐक विचारूं। सांगतों तुज साचारूं। जेणें भव सागरूं तरशील ॥१०२॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें गोपाळबुवा विरचिते। पंचमोध्याय गोडहा ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त।

* * *

## ॥ अध्याय सहावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ अवधूत यदुराजास। म्हणती निजगुरु चोवीस। त्यांची नामें विशेष। सांगतो ऐक तुजलागीं ॥१॥ पहिला पृथ्वी गुरु माझा। जल हा जाण दुजा। तिसरा अग्निज्ञान काजा। केलासे वायू चौथा जाण ॥२॥ आकाश जाण पांचवा। चंद्रगुरु सहावा। सूर्य सातवा कपोत आठवा। अजगर नववा जाणपां। समुद्र गुरू दहावा। पतंग हा अकरावा। भ्रमर गुरू बारावा। तेरावा गुरू मातंग ॥४॥ मधुकर गुरू चौदावा। मृग जाण पंधरावा। मत्स्य गुरू सोळावा। सतरावा पिंगला वेश्या ॥५॥ अठरावा टिटवी नामक। एकूणिसावा गुरू बालक। विसावा गुरू कुमारी देख। एकविसावा सर्प जाण ॥६॥ शरकार गुरू बावीसावा। पेशस्कार तेविसावा। ऊर्ण नाभीं चोविसावा। गुरू ऐंसे ऐक माझें ॥७॥ आतां त्या प्रत्येकापासून। कोणतें ज्ञान संपादन। केलें म्हणशील तरी जाण। ऐक तुजप्रती सांगतों ॥८॥ पृथ्वी गुरू पहिला। तयापासून संपादिला। क्षमा गूण वहिला। साधकाला उत्तम ॥९॥ जरी पृथ्वीला जाळिलें। किंवा नांगरांनीं फाळिलें। मळमूत्र विसर्जन केलें। तरी क्रोध करीना ॥१०॥ ती सर्वांसी आधार। तिचे फारची उपकार। असोनि तिजवरी जीवभार। नाना प्रकारें कुकर्म करी ॥११॥ परी ती कोप न करी। बाळकासी मातेपरी। क्षमा धरूनि अंतरीं। नाना परीचें त्रास सोसी ॥१२॥ जीवांचिया उपयोगासांठी नाना पदार्थ ठेवीं पोटीं। खणित्याला देतसें उठाउठी। कधीं ही हिंपुटी न होय ॥१३॥ अपकाऱ्यावरीही उपकार। करीतसें

वारंवार। सहनशीलता वागवी थोर। ऐंशी उदार माऊली ॥१४॥ असें साधकानें वागावें। सहनशीलता साधन बरवें। पृथ्वी गुरू पासुनी स्वभावें। जाणिलेंम्या यदुराया ॥१५॥ आतां दुसरा गुरू जो उदक। ज्ञान दाता मज देख। तयांपासून गुण ऐक। घेतला तो सांगतों ॥१६॥ स्वभावें अंतर्बाह्य जळ। पवित्र आणि निर्मळ। शांत करी विमळ। सेवन कर्त्यासी जाणपां ॥१७॥ जेथें जो नेईल तेथें जातें। स्वभावतः शुद्ध राहते। जोडावें जैशा साधनातें। नाना यत्नें साधकानें ॥१८॥ ऐक राजा अग्निपासून। मी कोणता घेतला गूण। तो सांगतों तुज लागून। तूं मुमुक्षुपूर्ण असशीं ॥१९॥ स्वभावें अग्नि असें पवित्र। परंतु त्याची लीला विचित्र। एखाद्या वस्तूशी संग अणुमात्र। होतां आपुल्यापरीकरी ॥२०॥ ऐंसे साधन साधावें। कीं दुजीयास संगे उद्धरावें। आपण पवित्र स्वभावें। रहावें अग्निचिया परी ॥२१॥ वायू गुरू जो चौथा। त्यापासून ज्ञान सर्वथा। घेतलें तें आतां। ऐक तुज सांगतों ॥२२॥ या प्राण वायूसी जाण। समयीं खावया मिळतां अन्न। रहातों संतुष्ठ होऊन। त्यान अपेक्षा रस स्वादीं ॥२३॥ या कलियुगीं जाण अन्नमय असे प्राण। यास्तव सद्बुद्धींला उत्तेजन। येईल ज्या अन्नानें ॥२४॥ ऐंशा अन्नाचा मिताहार। करूनि रसा स्वादींनजर। मुमुक्षुनें साचार। देवूं नये कधींही ।।२५॥ बाह्य वायू समान। निर्दोषी राहूनि कालक्रमण। करावें प्रपंची जाण। अनासक्त पणें वागुनी ॥२६॥ या परी घेतलें शिक्षण। आतां आकाश गुरू पासून। जाणूनि घेतलें जें ज्ञान। तें तुजलागीं सांगतों ॥२७॥ चराचर देहांतरीं । आत्मा एकचि अवधारी। जेवींनाना

घंटातरीं। असे आकाश तरी ऐक ॥२८॥ जरी अचळ आकाश असे। तरी घड्याबरोबर जसें। चालतसें असें भासे। परी नसे तसें तें ॥२९॥ तें जेवि अचळ। आत्मा तसा निश्चळ। देह चालिलें तरी अढळ। जो केवळ अकंप ॥३०॥ फुटे मृत्तिकेचा पिंड। तें वि मरतां देहपिंड। आत्मा न मरे जो सुदृढ। तो अखंड अज सदैव ॥३१॥ तया तिन्हीं देहाचा। संग नसें तयांचा। भेद नोहे हा साचा। आकाशाचा शिष्य जाणें हे ॥३२॥ असे विज्ञानम्या राया। आकाश गुरू करुनिया। मिळविलें म्हणूनियां। सोडिलें भया एकत्वें ॥३३॥ जे नाना विकार। भासती तें शरीरावर। न घडे न वाढे आत्मापर। हें निशाकर गुरू सांगे ॥३४॥ परा रवी हा तेजोमंडळ। ग्रह नक्षत्रें उदक मंडळ। तेव्हां चंद्रजळ मंडळ। हे निखळ जाणावें ॥३५॥ चंद्र द्वीतीय मंडळापरी। भासतां आकाशांतरी। सूर्य सत्तेनें सूर्यापरी। निवारी अंधकारातें ॥३६॥ स्वयें चंद्र मंडळ जळ। म्हणूनि भासें सीतळ। या परी आत्म सत्तेनें केवळ। देह सकळ चेतनसे ॥३७॥ जळ चंद्र मंडळीं जसें। देहीं अंतःकरण तसें। त्यांत आत्मा बिंबीतसें। तेणें भासे विषय जात ॥३८॥ हा साक्षिभूत आत्मा न नासे। चंद्रापासून असें। ज्ञान घेतलें असे। सातवा गुरू परिसें आतां ॥३९॥ गुणदोष बुद्धि नसून। व्यवहार करून। असतां नये बंधन। हें सूर्यापासून शिकलों ॥४०॥ चराचर जगांत। जें जें दिसेल उपयुक्त। तें ठेवावें सुरक्षित। आपण आसक्त न होतां ॥४१॥ पुढें यथा योग्य काल। पाहूनि मग तें सकळ। पात्रीं सोडावें केवळ। परोपकार मतीनें ॥४२॥ समस्त संपलें तरी। खेद न करणें अंतरीं। पुढें तसें

काळांतरी। मिळतां अंतरीं न हर्षावें ॥४३॥ राग द्वेष सोडून। अनायसें अर्थ जोडून। यथाकाळीं पात्रीं सोडून। अलिप्त होऊन रहावें ॥४४॥ सूर्य हा भविष्य जाणून। जळ ठेवीं सांठवून। ते यथाकाळीं दे सोडून। परी अभिमान न करी ॥४५॥ आठवा गुरू कपोत। त्यापासून झालें ज्ञान प्राप्त। कोणतें म्हणशील तरी समस्त। सांगतो ऐक तुजपां ॥४६॥ वृक्षावरी घरटें करूनि। कपोती सह कपोत वनीं। नांदत असतां एके दिनीं। प्रारब्ध ओढवलें तयाचें ॥४७॥ आनंदानें नांदती। दिवसां पिलांसी खाणे आणि ती। रात्रीं एके ठायीं रमती। क्षण न विसंबती एकमेकां ॥४८॥ खाणें आणावया वनांत। कपोती सह कपोत। गेला असतां अकस्मांत। मागें पारधी येऊनि ॥४९॥ फांसा लाविला वृक्षावरी। खावयास घालूनि अंतरीं। कपट नेणूनी तीं पिलें सारी। धान्य पाहूनि लांचावली ॥५०॥ निर्भय चित्तेंधान्य खाती। हें पराध्यानें पाहूनि त्वरित गती। फासां आवळतां सहजगतीं। सारीं सांपडली फांसांत ॥५१॥ पंख हालविती फडफड। बाहेर पडांवयाची धडपड। करिती परी फांसा अवघड। अधिकाधीक गुंतती ॥५२॥ चोंचींत खाणे धरूनि। कपोती आली त्यास्थांनीं। पिलें फांसामाजीं पाहुनी। दुःख करी अत्यंत ॥५३॥ त्यांच्या प्रेमें फांसांत। ती ही स्वांगें येऊनी पडत। पारध्यांस आनंद बहुत झाला पाहुनी तियेतें ॥५४॥ कपोत आला मागुनी। प्रियेसी फांसा माजीं देखुनी। विचार करितसें मनीं। म्हणें वांचूनि काय करणें ॥५५॥ जेथें माझी वसे प्रिया। मज योग्य राहणें तयां ठायां। ऐंशा विचारें यदुराया। कपोत फांशीं पडतसें ॥५६॥ प्रियेच्या

प्रेमें करूनि। निजहिता हित नेणूनि। पारध्याच्या भक्षस्थानीं। पडला जावूनि कपोत ॥५७॥ तया ऐंशी स्थिती प्राप्त। व्हावया कारण विषयीं रत। बुद्धीं झाली अत्यंत। कपोताची यदुराया ॥५८॥ दारा गाराचें प्रेम। अंतःकरण तेणें सकाम। तयासी कैचीं उपरम। जन्म मरण चुकेना ॥५९॥ टाळावया जन्म मरण। निष्काम करावें अंतःकरण। हें कपोत गुरू पासून। घेतलें मी मुक्ती प्राप्त्यर्थ ॥६०॥ करूनि सर्व संग परित्याग। धरूनि मनीं वीतराग। हें सह्याद्रिवन हाचि बाग। मानूनि येथें पडलों असे ॥६१॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें गोपाळबुवा विरचिते। अवधूत गुरू कथनं नाम। षष्ठोध्याय गोड हा॥ श्री गुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय सातवा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ अवधूत म्हणती यदूसी। आठ गुरू परियेसी। सांगितलें तुजशीं। आतां नववा सांगतो ॥१ ॥ राजा सुख दुखः पारब्धाधीन। हें निश्चयपूर्वक जाण। मग या संसारीं भ्रमण। करूनि आयुष्य कां वेचावें ॥२ ॥ ईश प्राप्तीचें साधन करावें। अजगराप्रमाणें धैर्य ठेवावें। निर्भयपणें असावें। एके जागीं पडूनि ।।३ ॥ जो आहार प्रारब्धानें। मिळेल तो खावून राहणें। स्वादिष्ठ वाईट न म्हणणें। आनंदानें रहावें ॥४ ॥ ही अजगर वृत्ती जाण। अजगरासी गुरू करून। जाणूनि घेतली म्यां जाण। उदासीनपणें राहतो ॥५ ॥ हा माझा गुरू नववा। समुद्र जाण दहावा। त्याणें केला मज बरवा। उपदेश तुज सांगतों ॥६ ॥ वर्षाकाळीं नद्या अनेक। समुद्रासी मिळती देख। परी तो उच्छृंखल न होय ऐक। गंभीरपणानें राहतो ॥७ ॥ उष्णकाळीं नद्याचें। पाणी आटलें तरी त्यांचे गंभीरपण न मोडे साचे। लक्षण एक वृत्तीचेंहें ॥८ ॥ समुद्रापरी साचार कोणासी आपुला अंतपार। लागूं न देतां निर्विकार। वृत्तीनें सदा रहावें ॥९ ॥ ऐक माझा अकरावा गुरू। उपदेश कर्ता मज थोरू। पतंग जाण साचारू। त्याज्य लक्षण विचारू सांगे ॥१० ॥ दीप कलीका पाहून। पतंग जातसें मोहून। त्यावरी घालितां झडपण। पंख जळूनि खालीं पडे ॥११ ॥ धडपड करूनि प्राण सोडी। तैंशी जया विषय गोडी। स्त्रीची लावण्यता पाहून सोडी। आपुली इंद्रियें मोकळी जो ॥१२। जयासी नाहीं ज्ञानसंपर्क। विषय भोगीं जो होतो गर्क। तयासीं शेवटीं प्राप्त नरक। राजा रंक असो

कां ॥१३॥ तात्पर्य हे विषय भोग। भोगितां उठती रोग। यास्तव आदरावा अभ्यास योग। परमेश्वर साधनाचा ॥१४॥ हें त्याज्य लक्षण शिक्षण। पतंग गुरू पासून। घेतलें मी जाणून। पडून राहिलों स्वस्थचित्तें ॥१५॥ बारावा गुरू भ्रमर। त्यापासून मज ज्ञान सार। प्राप्त झालें सविस्तर। सांगतों ऐक यदुराया ॥१६॥ सुगंधामध्यें आसक्त भृंग। करितसे कमलाचा संग। मकरंद सेवनीं दंग। होऊनि बंधांत पडतसे ॥१७॥ सायंकाल होतांति जाण। कमल मुख बंद होई पूर्ण। भृंग आंत अडकून। प्राणासी मुकतसें ॥१८॥ त्याची कमला वरी प्रीती। तेणें बाहेर पडावयाची शक्ति। अंगीं असतां निश्चिती ॥१९॥ प्राणासी मुके प्रेमबंधें ॥१९॥ भ्रमराप्रमाणें सुख मानून। रहातां रसा स्वादांत गुंतून। जीवासी पडे स्नेहबंधन। ईश्वर ध्यान सुटून जाय ॥२०॥ शेवटीं प्राणही समर्पण। करणें भाग पडे जाण। त्याज्य लक्षण शिक्षण। घेतलें भ्रमरा पासुनी ॥२१॥ ईश प्राप्तीस्तव चांग। साधकें आदरावा ध्याय योग। रसा स्वादें अंगी रोग। उद्भवूनि बंध होतसे ॥२२॥ आतां तेराव्या गुरू पासून। ज्ञान संपादिलें जाण। हें सांगतों तुज लागून। चित्त देऊनि ऐक तूं ॥२३॥ आजू बाजूस खड्डा करून। वर पातळ फळया घालून। त्यावरी माती टाकून। जमीन तयार करिताती ॥२४॥ मग काष्टाची हत्तीण। कृत्रिम चर्म पांघरून। उभी करिती तेथें जाण। हत्ती धरावया लागीं ॥२५॥ कामवश होत्साता। हत्तीधावें तिला पाहतां। खळग्या माजीं पडे तत्त्वतां। सुटका कैंची तयामग ॥२६॥ सिंहा वांचून इतरांस। जो कधींही न भिणारा खास। परी तो होतां कामवश। जन्मभर बंधन भोगी ॥२७॥

तैसा स्वस्त्रीशीं किंवा परस्त्रीशीं। जो नर लंपट झाला परियेसी। तो पडला मोह फांशी। अधोगती तयासी जाण॥२८॥ कृत्रिम हत्तिणीला पाहतां। हत्ती जन्मवरी पावे बद्धता। प्रत्यक्ष स्त्रीची लावण्यता। पाहुनी नर कां न फसे॥२९॥ रुपवती पीनस्तानी तरुण। स्त्रीला पाहून ज्यांचे मन। मोह न पावे जाण। तो शिवसमान जाणावा॥३०॥ राजा या स्त्रियांचें नाम ग्रहण। नको रे नको दर्शन। त्यांचा नसावा संग जाण। म्हणूनि एकांत वन सेवितों॥३१॥ चौदावा गुरू मधुकर। तयापासूनि ज्ञान सार। संपादिलें साचार। सांगतों ऐक चित्त देउनी॥३२॥ अनेक फुलावरी बैसून। मध नेऊन मुखांतून। सांठवी अवघड ठायां संपूर्ण। मधमाशी जाणपां॥३३॥ स्वतः कधीं न खाई। दुसऱ्यालाही न देई। ऐंशी तिची खोडपाही। जाणूनि नर काय करिती॥३४॥ निशीं समयीं विशाल। घेवूनि जाती मशाल। घरट्याखालीं धरिती तत्काळ। पळती जळती मधमाशा॥३५॥ त्यांची कोण घेतो दाद। मग त्यांतूनि मध। काढूनि घेती निर्विवाद। सांठविल्याचा परिणाम हा॥३६॥ जयासी करणें योगाभ्यास। जया मोक्षाची असे आस। तप करण्याचा हव्यास। ज्याच्या मनें घेतला॥३७॥ त्याणें मधमाशी प्रमाणें जाण। गृहस्थांच्या घरीं जाऊन। उदर निर्वाहा पुरतें अन्न। भिक्षा मागून आणावें॥३८॥ आहाराहून जास्त आणूं नये। संग्रहाला ठेवूं नये। भलत्याच मार्गीं करूं नये। विनियोग तयाचा॥३९॥ आणिलें असेल जे भिक्षान्न। साधनें पचवावे पूर्ण। त्या योगें गृहस्थाचेंही कल्याण। होवून

स्वकार्य साधतसें ॥४० ॥ राजाही मधुकर वृत्ती। ब्रह्मनिष्ठ ब्रह्मचारी यति। किंवा तपोनिष्ठ विद्यार्थी। यांचेसाठीं फक्त असे ॥४१ ॥ उदर निर्वाहाची सोपी युक्ती। साधकायोग्य तुजप्रती। सांगितली मी निश्चिती। ती चित्तीं असूं दे ॥४२ ॥ पंधरावा गुरू कस्तुरी मृग। ज्याचा वायू समान वेग। त्यापासून उपदेश चांग। संपादिला जो ऐक ॥४३ ॥ जो गाणाऱ्याची सुस्वर तान। किंवा तंतू वाद्य शब्द ऐकून। निकट येता मोहित होऊन। पारध्या करवीं बंधपावे ॥४४ ॥ शेवटीं त्याचा प्राण। घेऊनि नाभींतील कस्तुरी जाण। स्वकार्यास्तव घेती काढून। परिणाम शब्द विषयाचा ॥४५ ॥ ऐंसेच स्त्रियांचें सुस्वर गायन। भुलें जो नर ऐकून। तो श्रृंगऋषी समान। बद्द होई प्रपंची ॥४६ ॥ श्रृंगऋषी ब्रह्मचारी। वसतसे वनांतरीं। अप्सरांचें गायन ऐकूनि सत्वरीं। निजकर्मा विसरला ॥४७ ॥ यासाठीं भगवद्गुणा व्यतिरिक्त। गाणें न ऐकण्याची शिस्त। ठेवावी मग विषयासक्त। मन न होईल निश्चयें ॥४८ ॥ हे मृग गुरू पासून। मी घेतलें असे शिक्षण। आनंदें सेवितों निर्जन वन। मज बंधन कैंचे होय ॥४९ ॥ माझा सोळावा गुरू मत्स्य। जो होऊनि जिव्हा वश। भुलोनी जातां रसा स्वादास। प्राणास मुके कैंसा ऐक ॥५० ॥ ते सांगतो तुजप्रती। मत्स्याची जळींच पळगती। मांस लावूनि टाकिती। गळासी जळा माझारी ॥५१ ॥ त्या मांसा खावयांसाठीं। मत्स्य धावे उठाउठीं। खाऊं लागे तो कंठीं।

गळ अडके तेधवां ॥५२॥ गळ जळा बाहेर ओढितां जाण। गळा जाई फाटून। मत्स्य सोडितसे प्राण। परिणाम रस विषयांचा ॥५३॥ राजा जिव्हा वश होऊन। रसास्वादासी भुलोन। कां पावावे व्यर्थ बंधन। मीना परी साधकानें ॥५४॥ मीहें त्याज्य लक्षण शिक्षण। मिळविलें मीन गुरू पासून। आतां सत्रावा गुरू करून। ज्ञान घेतलें तें ऐक ॥५५॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें गोपाळबुवा विरचितें। अवधूत गुरू कथनं नाम। सप्तमोध्याय गोडहा। श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ श्री गुरुदेव दत्त ॥

* * *

## ॥अध्याय आठवा॥

। श्रीगणेशाय नमः॥ श्री गुरुभ्यो नमः॥ मात्रा सत्रावा गुरु ऐक। वेश्या पिंगला नामक। नव यौवना कमळ मुखीं देख। कांती चंद्रासमान जियेची॥१॥ तिचें सुंदर रूप पाहून। सुस्वर गाणें ऐकून। पुरुषमृग जाई भुलून। धावे सकाम होउनी॥२॥ ती रात्री निद्रा न करी। कामी पुरुष येतां द्वारीं। धनाची विशेष मागणी करी। धन लोभ धरूनी॥३॥ कोणी एकही पुरुष। कबूल होईना तिच्या मागणीस। मागणी कमी करण्यांस। तिलाही कमीपणा वाटे॥४॥ ऐंसे गेले बहुत दिन। इच्छित मागणी देईना कोण। तेणें अंतरीं झाली खिन्न। म्हणे मज सम पापीण नाहीं॥५॥ वैराग्याकुंर अंतःकरणीं। उद्भवला म्हणे दुराचारिणी। मज समान नसेल कोणी। या त्रिभुवनीं धुंडितां॥६॥ द्रव्यावरी नजर ठेवून। मी खोटा विचार करून। कामांध होऊन। दुराचार। करूं लागलें॥७॥ हा केवढा मूर्खपणा। आजी माझ्या अंतःकरणा। कळूनि आला विवेकें जाणा। धिःकार कामा इतःपर॥८॥ धिक्कार या देहाला। हाईश भजनीं न लाविला। आजवरी झिझविला। धनलोभें कामुक पुरुषीं॥९॥ तरीं मी आज पासून। या विषयीं न रमेन। परमेश्वर भजन करीन। क्षमा मागेन पापाची॥१०॥ ऐंशी सुबुद्धि धरिली। मनीची धनाशा सोडिली। तेणें ती सुखें झोंपी गेली। त्या रात्रीं ऐकराया॥११॥ तात्पर्य या गोष्ठीचें। सांगतों मी तुजसाचें। आशा बद्ध मन जयांचे। निद्राकैंची तयाला॥१२॥ जरी ज्ञानप्राप्ती व्हावी। तरी संसार चिंता सोडावी। मनीची दुराशा

टाकावी। आदरावी ईश सेवा ॥१३॥ पक्षी टिटवी नामक। आठरावा मद्गुरुदेख। ज्ञान संपादिलें ऐक। तें तुजप्रती सांगतो ॥१४॥ टिटवीला मांस कवळ। गवसला तो तत्काळ। होऊनिया उतावीळ। चोंचींत सकळ घेतला ॥१५॥ घेऊनि चालिली नभपंथीं। तिला इतर पक्षीं पहती। कवळ हिरावया धांवती। पाठी लागती तियेच्या ॥१६॥ एकलीचा पाठलाग। पक्षी करिती सवेग। जाणूनिया तो प्रसंग। विचार करीं निजमनीं ॥१७॥ म्हणें या कवळा साठीं। पक्षी लागले माझ्या पाठीं। तरी या त्यागितां संकटीं। मुक्त होईन निश्चयें ॥१८॥ ऐंसा करूनि विचार। कवळ त्यागीं भूमीवर। सुखी झाली साचार। आपसांत पक्षीं भांडती ॥१९॥ एका कवळा कारणें। कलहा आमंत्रण देणें। हें अयोग्य जाणूनि टिटवीनें। त्याग केला तयाचा ॥२०॥ तात्पर्य हा प्रपंच। दुःखदायक असे साच। येणें पदोपदीं जाच। सोसावा लागे जीवांसी ॥२१॥ मुमुक्षुनें याचा त्याग। करूनि ईशभक्ती चांग। आदरिता तुटती लाग। जन्म मरणाचें ॥२२॥ यास्तव राजा यावनीं। प्रपंच त्याग करूनि। राहिलों असे पडूनि। टिटवी गुरू करुनिया ॥२३॥ एकोणीसावा गुरू बालक। त्यापासाव ज्ञान देख। घेतलें जे मीं तें ऐक। एकाग्र चित्तें सांगतों ।।२४॥ बालक भस्मांत खेळो। किंवा चिखुलीं लोळों। त्याच्या सेवें कोणी बोलो। अथवा न बोलो कोणी ॥२५॥ कोणी करो तिरस्कार। अथवा करो सत्कार। त्याचा तो न करी विचार। आनंदानें रहातसे ॥२६॥ दोरीला किंवा सर्पाला। पाहुनी भय नुपजे त्याला। द्वैतभाव त्याच्या चित्ताला। न शिवे जैंसा कदापी ॥२७॥ पाप पुण्य स्वस्ताई।

न्यून संपन्न महागाई। कोण त्या गोष्टीचीही। चिंता नसे तयासी॥२८॥ धन कसें कमवावें। तें रक्षण कसें करावें। कोणत्या परी खर्चावें। हें ही नेणें बालक॥२९॥ त्याची भूक होतां शांत। मनाशींच क्रीडा करित। राहतो स्वस्थ तद्वत। साधकानें रहावें॥३०॥ जो नर सत्कारमान। अथवा दुःख नाशास्तव जाण। विचार करी रात्रंदिन। त्याणें सहस्त्र वर्षे पर्यंत॥३१॥ जरी केलें शास्त्र श्रवण। श्रवणाचें केलें मनन। तरी त्याची अंतरवृत्ती जाण। शांत न होय कदापी॥३२॥ देहाला प्रारब्धाधीन। समजून चिंता रहित होऊन। रागद्वेष मनांतून। काढून टाकी जो नर॥३३॥ तोचि निश्चितपणें राहतो। तोचि सुखभोक्ता होतो। परमेश्वरा आवडतो। ईश्वर रूप तो जाण॥३४॥ आतां विसावा गुरू कुमारी। जिच्या वर्तनें निर्धारीं। ज्ञान उद्भवलें हृदयांतरीं। ऐक अवधारी सांगतों तें॥३५॥ अनुभविण्यास्तव आनंदवृत्ती। साधकें धरावी बालक वृत्ती। निरंतर बैसून एकांती। अभ्यास त्याचा करावा॥३६॥ ऐक गोष्ठ सांगतो यास्तव। मी फिरत असतां एक गांव। पाहिला त्या ठिकाणीं अनुभव। मिळाला अपूर्व मज लागीं।।३७॥ तेथें एक विप्राघरीं। विवाहा योग्य कन्या निर्धारी। होती सुशील विचारी। एकटीच घरीं आपुल्या॥३८॥ एक विप्र तिच्या घरीं। उतरला पहावया नोवरी। तिचे माता पिता बाहेरी। गेले असतां परगावीं॥३९॥ तिणें आदर सत्कार करून। ब्राह्मणा बसाया दिलें आसन। आपण घरांत जाऊन। भोजनाची व्यवस्था करी॥४०॥ तांदूळ सडूं लागे जाण। वाजती हातांतील कंकण। तें तिला योग्य न वांटून। फोडून टाकी एकेक॥४१॥ तरी शब्द बंद होईना। पुन्हः एकेक कंकणा। फोडीतसे ती जाणा। हाती राहिलें

एकेक ॥४२॥ मग अवाज राहिला। पाहुनी कन्येस आनंद झाला। स्वयंपाक करूनि ब्राह्मणाला। भोजन तिणें करविलें ॥४३॥ राजा अनेक लोक एके ठायीं। जमतां गुण दोषांचे भाषण होई। तेणें एक वृत्ती न राहे पाहीं। साध्य न होई साधन ॥४४॥ प्रमाद उत्पन्न होऊन। आनंद वृत्ती भंग होई जाण। यास्तव एकांतीं राहण्याचें शिक्षण। कन्या गुरू पासूनि घेतलें ॥४५॥ सुखानुभव घेत। समाधान वृत्तीनें स्वस्थ। एकांतीं पडून राहिलों येथ। ऐंसे साधकें रहावें ॥४६॥ सदैव आनंद पाहिजे जयास। तेणें एके ठायीं फार दिवस। राहूं नये खास। एक विसावा गुरू सांगे ॥४७॥ धरूनि एक स्थान। राहतां लोकांची ओळख होऊन। ती उपाधिला कारण। होतसें जाण साधकां ॥४८॥ या करितां सर्प जसा। निद्रावश न होतां सहसा। एकांती मौने राहतो जसा। तैंसे साधकें रहावें ॥४९॥ अनायासें गवसल्या ठायीं। राहणे परी कायम न राहीं। क्रोध न करी कधींही। सावधान असावें ॥५०॥ ऐंसे साधकें रहावें। ईश प्राप्तीचें साधन करावें। प्रपंची मन भुलूं न द्यावे। आयुष्य न वेंचावें व्यर्थ ॥५१॥ क्षणभंगुर जाणूनि सृष्टी। परमार्थीं ठेवावी दृष्टी। निश्चयपूर्वक धैर्य पोटीं। आत्म प्राप्तीसाठीं ठेवावें।।५२॥ राजा हें शिक्षण। घेतलें सर्प गुरूपासून। बाविसावा गुरू ऐक जाण। तुज लागून सांगतों ॥५३॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें गोपाळबुवा विरचिते अवधूत गुरू कथनं नाम। अष्टमोध्याय गोडहा ॥श्रीगुरुदेव दत्त॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

* * *

## ॥अध्याय नववा॥

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्री गुरुभ्यो नमः॥ जया गुरूपदींभाव। तया सहजची मोक्ष ठाव। लाभे नलगे अन्य उपाव। करावा हांव धरूनि॥१॥ राजा जै व्हावे स्थिर आसन। प्राण व्हावा स्वाधीन। तेव्हांध्यान योग साधे जाण। साधकासी यदुराया॥२॥ मग ध्यान समईं। बाह्य गडबड न बाधे कांहीं। तुड गोष्ट सांगतों ये विषयीं। ऐक चित्त देवूनिया॥३॥ होता एक शरकार। बाणाग्र उत्तम करी तयार। तया पासूनि लढाऊ वीर। बाण तयार करूनि घेती॥४॥ तयार करावया एके दिनीं। बाणा ग्रहातीं घेवूनि। तो बैसला असतां दुकानीं। चित्त एकाग्र करूनिया॥५॥ त्या दुकानावरून। वाजत गाजत थाटान। राजाची स्वारी गेली जाण। परी तो अजाण त्या विषईं॥६॥ तात्पर्य या गोष्टीचें। जो एकाग्र चित्तें ईश्वराचें। ध्यान करी त्या योग्याचें। बाह्यभान नष्ट होई॥७॥ परंतु प्रथम आसनाचा। त्याच परी प्राणाचा। जय केला पाहिजे साचा। त्यावीण समाधी अप्राप्त॥८॥ जरी न होई चित्त स्थिर। तरी मूर्ति कल्पूनी साकार। ती ध्यान योगें हृदयीं स्थिर। करितां मन स्थिर होईल॥९॥ चित्त स्थिर होतां। श्वास जय होई तत्वतां। तेणें विषयांचें स्मरण न होतां। स्वरूपीं चित्तलीन होईं॥१०॥ स्वरूपीं झाल्या चित्तलीन। ब्रह्म साक्षात्कार होईं जाण। साक्षात्कारें नासतीं संपूर्ण। द्वंद्वें शोक मोहादिक॥११॥ ऐंसे शरकार गुरू पासून। ज्ञान संपादन करून। याठाईं स्थिर मन करून। पडून राहिलों असे मी॥१२॥ तेविसावा गुरू माझा। सांगतो तुज मोक्ष काजा। या ठायीं मी तुझ्यासम दुजा। मुमुक्षु

राजा न देखीला ॥१३॥ नरा सदैव ज्याचें ध्यान। तत्स्वरूप तो होई पूर्ण। ये विषयीं तुज लागून। एक गोष्ट सांगतों ॥१४॥ अळी नामक किड्यासी। धरून आणी घरासी। डंख मारी तयासी। येतां जातां भ्रमर तो ॥१५॥ तेणें दुःख होई अळीस। केव्हां येऊनी करील दंश। ऐंसा लागतसे ध्यास। दिन निशीं भ्रमराचा ॥१६॥ लागता भ्रमर ध्यास। तेणें तो अळी रूपास। सोडूनि भ्रमर रूपाची होई खास। भ्रमर कीटक न्याय हा ॥१७॥ मग ब्रह्मरूपीं होईल जीव। यांत कोणतें नवल अपूर्व। जरी जीवाचे पूर्व। स्वरूप ब्रह्मची असें ॥१८॥ ब्रह्मरूप प्रथम होता। तो ब्रह्मरूप झाला म्हणतां। लाज न वाटे कीं चित्ता। आश्चर्य यांत कोणतें ॥१९॥ देहासी मी मी म्हणून। आपणचि वाढविलें अज्ञान। त्या अज्ञानाचें निरसन। केल्या नवल तें कोणतें ॥२०॥ अळी पासून हा उपदेश। जाणूनि एकांत वास। पत्करला असे खास। तेणें पूर्ण रूपास पावलों ॥२१॥ आतां चोविसावा गुरू। उपदेश कर्ता साचारूं। त्याणें सांगितला मज विचारू। तो सविस्तरू सांगतो ॥२२॥ ऊर्ण नाभी नाभीतून। तंतू काढितसे जाण। घर तयार करून। त्यांत आनंदें राहतो ॥२३॥ जेव्हां वाटेल मनास। तेव्हां आपुल्याच उदरीं तंतूस। गिळून टाकी स्वातंत्र्यास। भोगीतसे ऐंशापरी ॥२४॥ आपणचि उपादान। आपणचि कारण होवून। ऊर्ण नाभीं घर बांधून। राहे जैंसा स्वातंत्र्यें ॥२५॥ तेवी परमेश्वर स्वातंत्रें। राही न कधीं परतंत्रे। आपुल्याच इच्छा मात्रें। अनेक रूपें धरी तसे ॥२६॥ आपणचि जगाला उपादान। आपणचि कारण होऊन। गुणमयी मायेस उत्पन्न। करून विश्वोत्पत्ती करी ॥२७॥

उत्पत्ती करावया सायास। कांहीं न लागती तयास। संकल्प मात्रेंची खास। सर्व कांहीं करीतसे ॥२८॥ तात्पर्य परमात्मा एक। असतां रूपें धरी अनेक। सामावून घेतसे देख। आपणा माजीं आपणासी ॥२९॥ ऐंसा आत्मा जो जगा कारण। तोच मी हा निश्चयपूर्ण। ज्यांच्या अंतरीं बाणला जाण। निर्वाण पदा योग्य तो ॥३०॥ अंगीं वैराग्य बाणल्या वाचूंन। चित्ती न ठसें ब्रह्मज्ञान। यास्तव मी देहापासून। ज्ञान घेतलें ते ऐक ॥३१॥ राजा नरदेह दुर्लभ जाण। त्याला नित्य आहार देऊन। आत्म प्राप्तीचें साधन। साधून घ्यावे प्रयत्नें ॥३२॥ जो या कार्यासी असावध। तो संसारी जाणावा बद्ध। जरी तो जाहला सिद्ध। रिद्धि सिद्धि साधुनी ॥३३॥ दोष दृष्टी देहावरीही। जावत्काळ होणार नाहीं। ताव तशास्त्र बोध व्यर्थ पाही। नुपजे मनीं वैराग्य ॥३४॥ देह विटाळाचा गोळा। परी बरवे साधन मोक्ष प्राप्तीला। हें वर्म न केळे मनुष्याला। तरी तो व्यर्थ जन्मुनी ॥३५॥ शास्त्रिबुवा म्हणती माते। यदू अवधूत संवाद तूतें। कथिला सारांशें एकचित्तें। तूं ही श्रवण केलासी ॥३६॥ अवधूत नव्हे तो जाण। जगद्गुरु श्रीदत्त भगवान। स्वमुखें ययाति पुत्रा जाण। दीनोद्धारार्थ ज्ञान सांगे ॥३७॥ तें यदूच्या अंतःकरणीं। ठसावलें तत्क्षणीं। वैराग्य उद्भवलें मनीं। दत्तार्चनीं रंगला ॥३८॥ करितां ध्यान योग। हरपला द्वैत भाग। स्वरूप प्राप्ती झाली चांग। श्रीदत्त कृपा प्रसादे ॥३९॥ माते तूं ही येणेरिती। वर्तन करितां सद्वृत्ती। पावशील जाण निश्चिती। दत्तपदीं प्रीती धरी ॥४०॥ पवित्र, स्वल्प शुष्क। अन्न आहार करूनि सात्विक। एकांतीं सुखासनीं

बैसूनी ऐक। इष्ट देवता ध्यान करावें ॥४१॥ मंत्र जप मनें करावा। बाह्य व्यापार सोडावा। नित्य नियम राखावा। मनोवृत्ती शांत होती ॥४२॥ ऐंसे सांगून मातेसी। शास्त्रिबुवा बोलती स्त्रियेसी। मी निघालो तीर्थयात्रेसी। दत्ताज्ञेसी मानुनी ॥४३॥ जाणूनि पतीचे मानस। सती झाली अती उदास। म्हणे अंतरेल सहवास। आस अन्य कवणाची ॥४४॥ अश्रूधारा लागल्या नयनीं। सद्गद कंठें विनयवाणी। शास्त्रिबुवा लागूनि। अन्नपूर्णा बाई बोलती ॥४५॥ माझ्या हातें काय दोष। घडलें कीं जेणे तीर्थयात्रेस। एकटेच जाता धर्म पत्नीस। भवाटवी माजीं सोडुनी ॥४६॥ नियमानें पती सेवा करणें। पती आज्ञेंत राहणें। पती सहगमन करणें। तीर्थक्षेत्रांदिक यात्रेसी ॥४७॥ पतिव्रता स्त्रीचा धर्म। पती सेवा सर्व नियम। पती आज्ञेनें व्रत नेमकर्म। करणें शास्त्राज्ञा जरी असे ॥४८॥ तरी मज कां सोडूनि। तीर्थयात्रे लागूनि। आपण एकटेचि जातां म्हणूनि। विनंती मी करीतसे ॥४९॥ काय चरणाची सेवा चुकली। म्हणूनि मज सोडूनिया एकली। जाण्याची बुद्धीं झाली। तीर्थयात्रेसी तुम्हांतें ॥५०॥ या चरणाचा अपमान। घडला नाहीं मज हांतून। नाहीं केलें आज्ञेचे उल्लंघन। आजपर्यंत कधींही ॥५१॥ जरी अपराध एखादा घडला। तरी तो सहन पाहिजे केला। प्राणी पात्र नव्हे कां क्षमेला। सहनशीलता गूण थोर ॥५२॥ जें या चरणाला सुख। तेंच या देहाचें सुख। समागमे चालावयाचें दुःख। किमपी न होईल मज लागीं ॥५३॥ मार्गीं चरणसेवा करीन। आपुलें बोधामृत सेवीन। उच्छिष्ठ अन्न प्रसाद खावून। समागमें राहीन आनंदें ॥५४॥ मज समागमे घेतल्या विना।

तीर्थयात्रीं कराल गमना। तरी विरहें हा देह जाणा। पडेल निश्चयें सांगतें ।।५५ ।। इतुके स्त्रियेचें भाषण। शास्त्रिबुवांनीं करून श्रवण। मातेशीं केले नमन। आज्ञा घेऊनि निघालें ।।५६ ।। रमाबाई म्हणे वासुदेवा। येशील केंव्हा माणगांवा। तो तुझा हेतू कळवावा। मज आतांची मग जाई ।।५७ ।। शास्त्रिबुवा म्हणती मातेसी। कां मज विलंब करित्येसी। श्रीदत्ताची आज्ञा जैंशी। तैंशापरी वागणें भाग ।।५८ ।। ऐंशापरी शांतवन। करूनी पुन्हः मातेशीं नमन। केलें मग घरांतून। स्त्रीसह आले बाहेरी ।।५९ ।। इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें गोपाळ बुवा विरचिते। अवधूत गुरू कथन। नृसिंहवाडी गमनंन्नाम। नवमोध्याय गोड हा।। श्रीगुरुदेव दत्त ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

* * *

## ॥अध्याय दहावा॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ धन्य धन्य गृहस्थाश्रम। ज्याचे आचारितांनेमधर्म। संतुष्ठ होई पुरुषोत्तम। आनंद धामप्राप्त होय॥१ ॥ गृहस्थांनीं आप्त पालन। अतिथी सत्कार करावा जाण। कुळाचार संपूर्ण चालवावें कुलाचें॥२ ॥ रंजले गांजले जे नर। त्यांचा घ्यावा समाचार। पतित जनांचा उद्धार। केला पाहिजे निजवर्तनें॥३ ॥ देवऋषी आणि पितर। यांचे जाणूनि उपकार। त्यांच्या ऋणातून पार। झाले पाहिजे गृहस्थें॥४ ॥ यज्ञ याग करावे। योग्य कर्म आचरावें। मुक्त होण्यास्तव झटावें। रात्रंदिन जाणा॥५ ॥ स्वधर्म कर्तव्याला। जागण्यांसीठीं शरीराला। जाळिती त्यागिती वित्ताला। शेवटीं राज्या दिकालांहीं॥६ ॥ असो सती हीन वसना। किंवा दरिद्री कवी जाणा। विरक्त ब्राह्मण कां असेना। कीं घायाळ योद्धा असो॥७ ॥ त्यक्त परिग्रह संन्याशीं। असो कां तपस्वी वनवासी। हे व्यावहारीक दृष्टीसी। विभव शून्य जरी दिसती॥८ ॥ तरी ते उदात्त कल्पना। कल्पतरूं शीतळ छाये जाणा। कर्तव्यमुक्त होऊनि राहतांना। जरी इंद्रपद त्यांना दिलें॥९ ॥ तरी ते स्वीकार न करिती। पाहा लोक जरी शिव्या देती। तरी दगडाचा टाळ घेऊनि हातीं। वृत्ती भजना नंदी निमग्न॥१० ॥ जनोद्धारा कारणें। बोध केला तुकारामानें। देवापाशीं वैकुंठीचें ठाणें। मागितलें नाहीं॥११ ॥ अथवा मुक्ती वैभव। किंवा सत्यलोकींचा ठाव। न याचिता भगवद्भाव। याचिला फक्त तयानें॥१२ ॥ सुलोचना सतीनें अग्नी प्रवेश। करूनि पती सनिध्यवास। इच्छिला श्रीरामें वनवास।

बंधू भरतें पांडवांनीं ॥१३॥ कष्टप्रद कर्तव्य साधन। स्वीकारिलें सुखोपभोग त्यागून। लोक कल्याण कार्याची जाण। दीक्षा घेतली जाणुनी ॥१४॥ भिक्षेचा अंगिकार। करूनि स्वकर्तव्य तत्पर। झालें जे कां नर। ते भगवद्भक्त जाणावें ॥१५॥ नर श्रेष्ठकर्तव्याचे। तेचि दुरित नाशक साचे। उन्नति कारक त्यांचें। विचार शुद्ध सात्विक ॥१६॥ स्वतःला पावनकारक। लोक कल्याण साधक। कर्में जो नर करी अनेक। भगवत् प्राप्ती विषयीं ॥१७॥ तत्परतेनें आणि उत्सुकतेनें। जो नर कर्म करूं जाणें। तयाशींच भगवतद्भक्ती बाणे। प्रभूला तोच भक्त प्रिय ॥१८॥ कामुकानें पुष्पमाला धारण। केल्या ती कामवाढवी जाण। पुष्पमाला प्रसाद दे श्रीकृष्ण। उद्धवाभक्ती भाववाढे ॥१९॥ एखादा सुस्वरें लावणी गाई। तेथें बीभत्स रस उपजें पाहीं। तोचि सुस्वर अभंगा अनुकूल होई। ती बहार भक्ती भावाची ॥२०॥ हें वस्तु योजनेचे चातुर्य। प्रापंचिकांनांच ठाऊकें होय। ते वस्तु समुदाय व सृष्टी सौंदर्य। पाहूनि आनंद पावती ॥२१॥ देवाचा दयाळुपणा। ते वारंवार प्रेर्मेंगाती जाणा। तात्पर्य धर्माज्ञा मानून। साधिती चतुर्विध-पुरुषार्थ ॥२२॥ निज प्रजेलाही देती साधून। अपारज्ञत्ता आणि ज्ञान। ऐंसे जो करी संपादन। गृहस्थाश्रम धन्य त्याचा ॥२३॥ ऐंसाचि शास्त्रिबुवांचा। गृहस्थाश्रम होता साचा। तेणें प्रसाद होऊनी श्रीदत्ताचा। जगदोद्धारार्थ आज्ञा झाली ॥२४॥ असो मातेसी करूनि नमन। शास्त्रिबुवा बाहेर आलें जाण। जनसमुदाय जमलेला पाहून। बोलती वचन तयांसी ॥२५॥ जन हो तुम्हीं स्वस्थ असा। श्रीदत्ताचा दृष्टांत जसा। शिरसा मानूनि

तीर्थवासा। जाणे आम्हां भाग असे ॥२६॥ श्रीदत्ताचे भजन करा। वाचेंदत्त नाम उच्चारा। तेणें चुकतील येरझारा। जन्म मरणाच्या ॥२७॥ प्राणी मात्रांचा सहवास। एके ठायी न होय खास। प्रारब्ध लागलें देहास। तयापरी कर्म होई ॥२८॥ प्रारब्धानें उत्पन्न। प्रारब्धानें मरण। प्रारब्धानें सुख दुःख जाण। भोगघडे प्राण्यासी ॥२९॥ देहाचा नाहीं भरंवसा। ईश्वर भजन करित असा। काळाचा चुकेल फांसा। गुंतू नका प्रपंची ॥३०॥

ऐंसे सर्वांसी सांगून। करूनिया शांतवन निजबंधूसी समजावून। मार्गक्रमण आरंभिती ॥३१॥ जनांस दुःख झालें अपार। शास्त्रिबुवा करिती नमस्कार। रमाबाईसी गहिंवर। आलासे पुत्र स्नेहें ॥३२॥ पत्नीसह वर्तमान। स्मार्ताग्नी सवें घेऊन। शास्त्रिबुवा मार्गक्रमण। करीत नृसिंहवाडीस आले ॥३३॥ गोविंदस्वामीस नमूनि। लागती मौनी स्वामींचे चरणीं। साद्यंत वर्तमान सांगूनि। वास करिती वाडीत ॥३४॥ गोविंद स्वामी पासूनी। उपनिषद् भाष्यार्थ घेती जाणूनि। काया वाचा मनें करूनी। कृपा संपादिती तयांची ॥३५॥ एक वर्षपर्यंत। राहिलें असतां श्रीवाडींत। अन्नपूर्णा बाईसी एक सुत। झाला परी न वांचला ॥३६॥ अल्प काळें झाला मृत। गोविंदस्वामी ही त्यांच अवधींत। स्मरूनि इष्ट दैवत। देह विसर्जन करिती पैं ॥३७॥ शास्त्रिबुवांच्या स्वप्नांत। गोविंद स्वामी येऊनी सांगत। आम्ही होणार समाधिस्थ। तरी हा प्रसाद घे आतां ॥३८॥ म्हणूनि स्वहस्तें देती। लिहिलेली एक पोथी। द्रवीडी भाषेंत असे ती। नामे लघुवासुदेवमनन ॥३९॥ परी ते जागृत होवोनि। पाहती तों प्रत्यक्ष नयनीं। न दिसे या लागीं

खिन्न मनीं। होती जाणा ते समयीं ॥४०॥ मग श्रीवाडीस त्वरित गती। येती तों गोविंदयती। समाधिस्थ झालें निश्चिती। सर्व पूजारी मिळूनी ॥४१॥ त्यांच्या संग्रहीं जे ग्रंथ। होतें तें समस्तां वांटित। त्यांतील शास्त्रिबुवासी देत। लघु वासुदेव मनन ॥४२॥ तो ग्रंथ येतां हाती। आली प्रत्यक्ष स्वप्न प्रचिती। आनंदलें निज चित्तीं। राहती तेथक्कचित्काळ ॥४३॥ चतुर्थाश्रमीं तो ग्रंथ। रचिते झालें प्राकृत लिपींत। तत्श्रवणें मननें निश्चित। नर कृतार्थ होतसें ॥४४॥ असो गोविंदस्वामीचा। देह संस्कार करिती साचा। तो दृष्टांत झाला श्रीदत्ताचा। उत्तर दिशेस जा म्हणूनि ॥४५॥ यास्तव वानप्रस्थाश्रमधर्म। पाळण्याचा करूनी नेम। करवीर क्षेत्र अनुपम। पाहूनि दर्शना पातलें ॥४६॥ श्रीमहालक्ष्मीसी वंदूनी। पत्नीसह वर्तमानीं। तेथूनि आले दिंडीखनीं। पंढरी क्षेत्रांत ॥४७॥ जरी मन झालें तयार। तथापि देहासी सदाचार। अभ्यास सतत पाहिजे साचार। ऐंसा अभिप्राय थोरांचा ॥४८॥ स्वतःला कारण नसतां। केवळ कृती परहिता। मनीं मानूनि तत्वतां। भूदेव ऐंसे वर्तती ॥४९॥ सतत आत्म निष्ठराहून। जनापराध साहून। त्यांच्या उन्नतीस्तव जाण। बोधक हेंचि भूदेव ॥५०॥ भगवत्प्रीती संपादन। कैंसी करावी भक्ती करून। तिचे मार्गदर्शक जाण। यथार्थ हेंचि भूदेव ॥५१॥ जनामध्ये राहून। असूनि कर्तव्य परायण। उन्नती कारक तत्व ग्रहण। करणारे सत्पुरुष हेंची ॥५२॥ सत्वृत्तीची पोषक। बुद्धीला प्रौढकारक। मनः सामर्थ्यवर्धक। मार्ग एक उपासना ॥५३॥ वैराग्य युक्त उपासना। शास्त्रिबुवांची पाहुनी जाणा। स्वयें येई पंढरी राणा। ब्राह्मण रूप धरोनी ॥५४॥ चणें घेऊनी हातांत। शास्त्रिबुवासी प्रसाद देत। त्याणीं

ते ठेविलें गांठोडीत। बांधूनिया स्वहस्तें ॥५५॥ दुकांनीं भाजलेला चणा। खावया योग्य न आपणां। म्हणूनि न खातां जाणा। ठेविला होता बांधुनी ॥५६॥ श्रीविठ्ठलाचें दर्शन। करूनि त्रिरात्र राहून। पंढरीहुनी मार्ग क्रमण। आरंभिले तयांनीं ॥५७॥ मार्गी येऊनी स्वप्नांत। शास्त्रिबुवासी पंढरीनाथ। पुसती कां नाहीस खात। स्वहस्थे दिलेला प्रसाद मीं ॥५८॥ तेंव्हा ते म्हणती श्रीदत्तें। जैंसे आज्ञापिलें मातें। तेणें परी एकचित्तें। वागतसें मी जाणा ॥५९॥ मी बाजाराची कोणतीही। वस्तू खात नाहीं कधींही। यास्तव ते चणे पाही। बांधुनी ठेविलें असती ॥६०॥ काल श्रीसनैवेद्य करूनी। प्रसाद घेतला उभयतांनीं। हें शास्त्रिबुवांचे वचन ऐकोनी। पंढरीनाथ गुप्त झाले ॥६१॥ शास्त्रिबुवा जागे झाले। जणे होते बांधून ठेविलें। त्याजागीं पाहूं लागले। तो तें गांठोडींत नमिळती ॥६२॥ हा चमत्कार पाहून। हृदयीं दत्तमूर्ति आठवून। कर संपूट जोडून। प्रार्थना करिती तेधवां ॥६३॥ देवा जैंसा तुम्हीं मला। नियम लावूनि असे दिला। तेणें परी वागणें मला। माझा न यांत अपराध ॥६४॥ मी नियम न सोडीन। आपुली आज्ञा न मोडीन। माझी परीक्षा न करा जाण। दीनदास मी चरणाचा ॥६५॥ असाच माझा नियम आपण। घ्याल पार पाडून। ऐंशी माझी विनंती जाण। आहे श्रीचरणांपाशी ॥६६॥ यापरी प्रार्थना करून। पुढें करिती मार्गक्रमण। वानप्रस्थाश्रम धर्म पाळण। करीत येती गोदातटीं ॥६७॥ इति श्रीमत्परम हंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें गोपाळबुवा विरचिते। पंढरी यात्रा निरूपणंन्नाम। दशमोध्याय गोड हा ॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त ॥

* * *

## ॥ अध्याय अकरावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्री गुरुभ्यो नमः॥ अर्चितां प्रेमें गुरू पादुका। काय न्यून त्याभाविका। भवाब्धि तारक नौका। यावीण देखा अन्य नसती॥१॥ मागील कथानुसंधान। वानप्रस्थाश्रम स्वीकारून। शास्त्रिबुवा स्त्रीसह जाण। आले गोदातटाकीं॥२॥ तेथें कांहीं दिवस वस्ती। करूनि आनंदे काळ क्रमिती। एकेदिनीं एकांतीं। पुसती अन्नपूर्णा बाई॥३॥ विनयें करून भाषण। म्हणती भगवद्भक्त गुण संपन्न। स्त्रियांना उत्तम संतती जाण। कोणत्या नेमधर्में होईल॥४॥ हे आपुल्या मुखें ऐकावे। इह परत्र साधन बरवें। स्त्रियांना कल्याणकारक व्हावें। सांगावे ऐसें धर्मकर्म॥५॥ स्त्रियेचें ऐकून वचन। शास्त्रिबुवा बोलती जाण। उत्तम केलास प्रश्न। ऐकूनि समाधान वाटतें।॥६॥ हा तुझा प्रश्न। उपदेशकारक स्त्रियांना जाण। होईल सांगतों तुजलागून। ऐक एकाग्र मन करूनि॥७॥ कन्येचे गर्भादाना पासून। ऋतूशांत्यादिक संस्कार संपूर्ण। करवावे विधियुक्त जाण। पाळावे नियम कन्येनेहीं॥८॥ रजस्वलेचे नियम पाळून। पतीची सेवा करणें जाण। त्याच्या आज्ञेनें भगवत्पदीं पूर्ण। भाव असावा जाणपां॥९॥ आचार संपन्न असावा पती। योग्य कालीं व्हावी गर्भोत्पत्ती। गर्भ संस्कार यथा पद्धती। अवश्य केले असतां॥१०॥ उत्तम गुण संपन्न। संतती होईल उत्पन्न। कन्या अथवा पुत्र जाण। होयकुलोद्धारक। असे नियम पाळिल्यावीण। उत्तम गुण संपन्न। प्रजोत्पत्ती न होयजाण। सांगतों निश्चयें तुजलागीं॥१२॥ उत्तम असे स्त्रीरूपीं

क्षेत्र। परी पुरुषरूपी बीज अपवित्र। जरी पुरुषरुपीं बीज पवित्र। क्षेत्र अपवित्र स्त्रीरुपी ॥१३॥ तरी उत्तम गुण संपन्न। प्रजा न होय उत्पन्न। उभयही क्षेत्रबीज जाण। पवित्र असावें लागते ॥१४॥ या आर्यावर्तदेशांत। झाले आचार्य प्रख्यात। वेद शास्त्र संपन्न भगवद्भक्त। राजेही होऊनी गेले ॥१५॥ त्यांचे पूर्वज नेमधर्म। पाळुनी वर्णाश्रमोचीत कर्म करीत होते भक्ती सप्रेम। आदरपूर्वक भगवंताची ॥१६॥ तेणें ते कुलोद्धारक। प्रजा लाधले ऐक। येणेपरी भाषण देख। शास्त्रिबुवांचे ऐकुनी ॥१७॥ पुनरपी भर्त्याप्रती। पतिव्रता होय पुसती। एखाद्या स्त्रियेचा पती। जरी झाला धर्मभ्रष्ट ॥१८॥ किंवा एकाच गोत्रांत लग्न होईल न जाणत। कीं नीच वर्ण पुरुषाप्रत। वरील उच्च वर्ण कन्या ॥१९॥ तरी त्या पतिव्रतेनें। पती बरोबर भ्रष्ट होणे। कीं कोणे रीतीनें वागाणें। तें सांगावें मजलागी ॥२०॥ शास्त्रिबुवा म्हणती ऐक। तव प्रश्न परोपकारक। होईल कुळ स्त्रीयांना देख। कथा एक तुज सांगतो ॥२१॥ युगांतरी घडली असे। तुझ्या प्रश्नासरीसें। मज स्मरण झालें विशेषे। एकचित्तें ऐकपां ॥२२॥ मध्यहिंदूस्थानांतून। एक चांभार पुत्र जाण। द्रविड देशीं राहिला येऊन। कांची ग्रामीं जाण पां ॥२३॥ तूं कोण कोणाचा अससीं। ऐंसे पुसतां जनासी। सांगतसे तो परियेसी। मी अनाथ विप्रपुत्र ॥२४॥ विद्याभ्यासांस्तव। सोडूनि आलो देशगांव। जरी रहाया मिळेल ठाव। तरी येथेंची राहीन ॥२५॥ हें तयांचे भाषण। एका ब्राह्मणानें ऐकून। तत्कपट भाव नेणून। त्या आपुलें घरीं ठेविलें ॥२६॥ कळूं न देता निजवर्म। करी ब्राह्मणासम कर्म। वेदशास्त्र

शिकूनि उत्तम। द्विजपुत्र म्हणवितसे ॥२७॥ तो होता भाविक ब्राह्मण। त्यानें निजकन्या दान। देऊनी घर जावई जाण। केला तयासी सत्वर ॥२८॥ वीस वर्षे जाहल्यावरी। निज कन्येच्या उदरीं। गर्भ राहिला पाहुनी करी। विप्रसंस्कार गर्भाजे ॥२९॥ परी गर्भ राहिल्या पासून। उत्तरोत्तर कष्टी होऊन। नऊ मास भरतां पूर्ण। पुत्र जाहला स्त्रियेसी ॥३०॥ पुत्र जाहला पाहूनि। सती आनंदली मनीं। परी निजपती चांभार म्हणूनी। तिच्या ध्यानीं मनीं नाहीं ॥३१॥ शास्त्र पद्धतीने जातकर्म। तीन वर्षे होता चौलकर्म। करूनि पुत्राला शिक्षण उत्तम। देतसे ब्राह्मण वर्णाश्रमाचें ॥३२॥ पित्याच्या जात्यनुसार। पुत्राचा स्वभाव साचार। अनुवंशीक संस्कार। जैंसे बीज तैंसे फळ ॥३३॥ खेळावया जाई पुत्र। परी त्याचा खेळ विचित्र। रस्त्यांतील हाडें जमवूनि एकत्र। आणीतसें घरासी ॥३४॥ हा ब्राह्मणत्वाला अयोग्य। ऐंसा पाहूनि पुत्र उद्योग। त्याला त्या सतीनें योग्य। शासनहीं केलें ॥३५॥ ब्राह्मण वर्णाचे शिक्षण। वारंवार देई जाण। परी तो पुत्र निजगुण। कांहींकेल्या न सोडी ॥३६॥ यास्तव पतीला एकांतीं। पाहुनी म्हणे ती सती। या पुत्राला मी नानारीतीं। शिकविते परी नायके हा ॥३७॥ हा आपला पुत्र। ब्राह्मणत्वाला अयोग्य विचित्र। खेळ करितो हाडे एकत्र। जमवूनि आणितो घरासी ॥३८॥ यासी वारंवार शिक्षण। दिलें तरी हा नायके जाण। याचें काय असावें कारण। मज न कळे म्हणूनि पुसतें ॥३९॥ ऐंसे तिचें ऐकूनी वचन। चांभार पुत्रानें वर्म जाणून। ती वेळ घालविली जाण। हंसण्या बोलण्यामध्येंच ॥४०॥ कांहीं काळ गेल्यावर। गांवीं जावया चांभार।

निघाला पाहूनि श्वशूर। आइती करी वाटेची ॥४१॥ वाट खर्चास्तव धन । देईं तें आनंदें घेऊन। चालिला पित्या भेटाया जाण। पती पाहुनी सती वदे ॥४२॥ मज ही श्वशूर दर्शन। व्हावें इच्छा करावी पूर्ण। समागमें मज न्यावें आपण। विनंती अमान्य न करणें ॥४३॥ तो म्हणे मीं पितृदर्शन। करून येतो सत्वर जाण। तूं पूत्रासी घेऊन। येथेच रहा पित्याघरीं ॥४४॥ परी तिनें घेतली आळ। म्हणे मीं कैंसी कंठू काळ। मज तुमचा विरहानळ। पोळील सत्य सांगतें ॥४५॥ चांभारासी पडलें संकट। म्हणे ही वेळ आली बिकट। मजतरी पित्याची भेट। घेणें आहे अवश्य ॥४६॥ गांवीं नेईल इला जरी। तरी माझें वर्म फुटेल बाहेरी। ब्राह्मण कन्ये बरोबरी। लग्न लाविल्याचें ॥४७॥ तरी इला समागमें न्यावें। मार्गि विहिरींत ढकलून द्यावें। इच्या पित्यासी कळवावें। पत्र द्वारें वर्तमान ॥४८॥ आपण जाऊनि गांवीं। पित्याची आनंदें भेट घ्यावी। श्वशुर गृहीं येऊनी वरावी। दुजी नवी विप्रकन्या ॥४९॥ ऐंसा मनीं करूनी विचार। स्त्रियेस घेई बरोबर। श्वशुर गृहीं ठेवूनी कुमर। मार्ग क्रमीत चालीला ॥५०॥ एके दिवशीं दोन प्रहर। होतां तीस म्हणे चांभार। मज लागली भूक फार। विहीर येथें बरवी असें ॥५१॥ ह्या वृक्षाखालीं बैसून। स्वयंपाक करी जाण। प्रथम करूं जेवण। नंतर मार्गक्रमू पुढें ॥५२॥ पति व्रतेसी पति वचन। मान्य वेदाज्ञा समान। म्हणूनि ती वृक्षाखालीं बैसून। आइती करी पाकाची ॥५३॥ स्नानार्थ गेली विहीरीवर। हें पाहुनी तो चांभार। तिच्या मागोमाग गेला सत्वर। पाणी आणण्या निमित्तें ॥५४॥ ती पाणी काढीत असतां।

तिला विहिरींत ढकलूनि अवचिता। आपण झाला मार्ग क्रमितां। तेथूनिया सत्वरीं ॥५५॥ जाऊनिया आपुल्या गांवीं। श्वशुरासी पत्र पाठवी। कीं गावी जाण्यापूर्वि। मार्गि स्त्री पडली विहिरींत ॥५६॥ स्नानार्थ पाणीं काढीत असतां। आंत पडली अवचिता। ती बाहेर काढावयाची तत्वतां। बहुत केली खटपट ॥५७॥ परी दैवयोगें मरण पावली। कर्म गती ओढवली। होणारी गोष्ट घडली। न चुकें ब्रह्मादिकांसी ॥५८॥ ऐंसे वर्तमान लिहून विचित्र। श्वशुरासी पाठविलें पत्र। तिच्या मरण वार्तेनें अहोरात्र। दुःखी होती माता पिता ॥५९॥ त्या विप्र कन्येसी विहिरींत। ढकलूनि गेला चांभार सुत। परी ती न मरतां आंत। जिवंत होती उभींच ॥६०॥ एक तृषावर्त प्रवासी। आला त्याच ठायासी। प्राशन करितां जळासी। त्याणें तीस पाहिलें ॥६१॥ बाहेरी काढिली त्वरित। मग ती पुसत पुसत। गेली पित्याच्या गृहाप्रत। तों पूर्विच पत्र गेले होतें। इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें गोपाळबुवा विरचिते। एकादशोध्याय गोडहा॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय बारावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ निजकन्येसी पाहुनी। आनंद माता पित्यामनीं। तिला पाहतां गळा पडुनी। म्हणतसें माता तियेसी ॥१॥ तुझें विचित्र वर्तमान। कळविलें तुझ्या नवऱ्यानें जाण। तूं कैंसी आलीस परतून। विहिरींत पडून मेलेली ॥२॥ आमुच्या महद्भाग्यानें। तुझें पुनरपी झालें येणें। आम्हासी तुझ्या नवऱ्यानें। कैंसे पत्र पाठविलें ॥३॥ काय घडला चमत्कार। तो सांग आम्हां सविस्तर। ऐंसे म्हणूनि वारंवार। पुसों लागली तिची माता ॥४॥ परी ती पतिव्रता धर्म। राखूनि पतीचे दुष्टकर्म। न सांगे माता पित्यासी वर्म। विहिरींत पडण्याचें ॥५॥ पतिव्रता म्हणे माते। मार्ग क्रमीतां पतीतें। क्षुधा लागली म्हणून मातें। त्याणीं आज्ञापिलें जाण ॥६॥ स्वयंपाक करावयासी। पाणी काढितां परियेसी। विहिरीत पडलें दैवगतीसी। कोण चुकवी जाणपां ॥७॥ परी दुखापत फारशी। दैवें नाहीं झाली मजसी। त्याच विहिरीवर एक प्रवासी तृषाक्रांत पातला ॥८॥ त्याणें मज काढिलें बाहेर। हीच हकीकत सविस्तर। त्यांचेकडे दोष नाहीं साचार। ती भयंकर विहिर होती ॥९॥ मी आंत पडले पाहून। त्यांचे घाबरलें अंतःकरण। बाहेर निघण्याची आशा नव्हती जाण। म्हणून तें गांवीं गेले ॥१०॥ लिहीलें असेल तुम्हां पत्र। परी मम दैवगती विचित्र। विहिरींत कांहीवेळ मात्र। मज रहावें लागलें ॥११॥ असो यापरि सांगून शांतवन। करूनि माता पित्याचें जाण। तेथेंच पुत्राचें पालन। करीत राहिली ती सती ॥१२॥ इकडें गांवीं गेला चांभार। पित्यासी भेटूनी सत्वर। परतुनी आला साचार।

श्वशूरगृहीं भेटावया ॥१३॥ तों गृहाच्या द्वारीं। पुत्रासी घेऊनी कडेवरी। उभीं राहिली सती सुंदरी। दचकला अंतरीं तत्क्षणीं ॥१४॥ परी ती पतीस पाहतां। चरणांवरी ठेवी माथां। आसन देवूनि तत्वतां। पती पूजन करीतसें ॥१५॥ चरण तीर्थ घेवूनी। मग बैसविला भोजनीं। विहिरींत दिले ढकलूनि। हा नाणी मनीं पतिदोष ॥१६॥ पूर्ववत सेवा करी। हें पाहूनि चांभार विचार करी। इला विहिरींत ढकलिलें जरी। तरी ही सेवा करिते माझी ॥१७॥ तरी इजला मी कोण। सांगतां ही कोणा लागून। न सांगेल खास जाण। मग कां न सांगावें ॥१८॥ एकांतीं एकेदिनीं। विप्रकन्या तया लागूनि। पूर्व प्रश्न आणुनी मानीं। पुसती झाली तेधवां ॥१९॥ तियेसी म्हणे चांभार। तूं पतिव्रता साचार। अससी म्हणूनी सविस्तर। कारण तुज सांगतों ॥२०॥ मीं विहिरींत ढकलिलें तुला। तो दोष तूं झाकिला। तुझ्या सहनशील स्वभावाला। पारावार नसेची ॥२१॥ मी जातीचा चांभार। द्रविड देशी रहाणार। कांचीं ग्राम माझा साचार। तूं अद्यापी नेणसी ॥२२॥ माझ्या जात्य स्वभावानुसार। पुत्र कर्म करितों साचार। पित्याचा अंश पुत्र यास्तव। पितृगुण पुत्रांठायीं ॥२३॥ ऐंसे चांभाराचें भाषण। त्या सतीनें ऐकून। शिव शिवशद्ब उच्चारून। पति शय्येचा त्याग केला ॥२४॥ परमेश्वराची प्रार्थना। करूनि म्हणे नारायणा। मी काय दोष केलें जाणा। न कळे जन्मजन्मांतरीं ॥२५॥ ब्राह्मण कुलांत उत्तम। होऊनिया माझा जन्म। चांभाराशीं संगम। कोण्या दोषें जाहला ॥२६॥ हे दया सागरा भगवंता। मी काय केले अशा दुष्कृता। या पतीपाशीं

संबंध होता। जन्मांतरीं माझा काय॥२७॥ त्या संबंधेया जन्मीं। चांभारा पदरीं पडलें मी। होवूनि या मोक्षकामी। पतिव्रता धर्म पाळिलें॥२८॥ तेसर्वही गेले व्यर्थ। या दोषांतून मी मुक्त। व्हावें कैंशापरी। इह परत्र। सुख कैंचे आतां मज॥२९॥ मज जन्म चांडाळाचा। घेणें भाग पड़ेल साचा। या ब्राह्मण जन्माचा। मातेरा झाला खचीत॥३०॥ देवा मी काय करावे। काय मार्गा स्वीकारावें। कोण्या रीतिनें मुक्त व्हावें। या महद्दोषापासुनी॥३१॥ ऐंशापरी दुःखानें। रात्र क्रमिली त्या सतीनें। प्रातःकाळ होतांच विनयानें। पित्यालागीं प्रश्न केला॥३२॥ सती म्हणे अहो ताता। पात्र अशुद्ध झालें असतां। त्याचें शुद्धीकरण तत्वतां। कैंसे व्हावें ते सांग॥३३॥ पिता म्हणे ऐकमुली। अग्नि संस्काराने भली। पात्र शुद्धी सांगितली। धर्मशास्त्री ऐकपां॥३४॥ ऐंसे ऐकूनि पितृ वचन। देह अग्नींत जाळून। टाकावयाचा निश्चय पूर्ण। केला जाण सतीनें॥३५॥ म्हणें या पापापासून। एरवीं मुक्ततां न होय जाण। चांभारालाही पावन। येणेंची रीती करावें॥३६॥ जरी मी याला सोडून। अग्नींत देह दहन करीन। तरी हा दुजी विप्रकन्या वरून। भ्रष्ट करील तिलाही॥३७॥ तैंशापरी मम पुत्र जरी। माझ्या मागें राहील तरी। विप्रकन्या वरून वर्ण संकरी। प्रजा उत्पन्न होईल॥३८॥ या पापासी कारणीभूत। मीच होईन यास्तव फक्त। प्रथम चांभारासी जाळूनी अग्नींत। नंतर पुत्रां जाळावें॥३९॥ ऐंसा सतीनें करून निश्चय। पाहूनि या निशीं समय। चांभाराला गाढ निद्रा प्राप्त होय। तोंवरी स्वस्थ बैसली॥४०॥ निद्रिस्त होतां चांभार। पुत्रासी घेऊनी बरोबर। त्या घराचें

बंद करूनि द्वार। चौफेर अग्नी लाविला ॥४१॥ ईश्वराची करूनी प्रार्थना। म्हणे देवा जगज्जीवना। या चांभारें मज भ्रष्टविलें जाणा। यास्तव याला जाळितें मी ।४२॥ तरी हे दीन नाथा देवा। हा हर एक जन्मीं रेडा व्हावा। त्याच्या रक्ताचा तिलक बरवा। वहावा दसऱ्याला देवीसी ॥४३॥ येणें प्रमाणें चांभाराला। घरा माजीं कोंडूनी जाळिला। नंतर पुत्रास घेऊनी मार्ग क्रमिला। सतीनें उत्तर दिशेकडे ॥४४॥ यमुना किनारी मधुवनीं। पवित्र रमणीय स्थळ पाहुनी। पुत्रा सहित त्या ठिकाणीं। सतीनें अग्नीस देह अर्पिला ॥४५॥ पुढें त्या स्त्रीची व पुत्राची। वेळू वृक्षामध्येंसाची। उत्पत्ती होऊन परमात्म्याची। कृपा झाली तयावरी ॥४६॥ करूनि वेळूची काठी मुरली। श्रीकृष्णें आपुल्या हातीं धरिली। त्या उभयतांना सद्गती दिली। योग्यांना जी दुर्लभ ॥४७॥ शास्त्रिबुवा पत्नी प्रती। येणेंपरी सांगती। नीचवर्ण वराप्रती। उच्चवर्ण कन्यावरील ॥४८॥ नेणूनी जरी विवाह झाला। पतीचा पाहिजे त्याग केला। जरी पतिव्रता धर्म सतीला। पाळणें अवश्य असे ॥४९॥ विषय भोग भोगूनये। प्रजा उत्पन्न करूं नये। समागमें राहूं नये। कदापीही तयाच्या ॥५०॥ आतां एक गोत्रांत जियेचा। नेणूनी विवाह घडला साचा। तरी त्या सतीनें पतीचा। त्याग करावा अवश्य ॥५१॥ किंवा धर्म भ्रष्ट झाला जिचापती। काय करावें तिये सती। पतिव्रता धर्म कोणें रीती। पाळावा तें सांगतों ॥५२॥ त्या पतीचा त्याग करावा। ईश्वराला पती मानावा। ईश भजनादर करावा। सन्मार्ग धरावा निर्धारें ॥५३॥ येणें रिती वागतां। त्यासतीप्रती परमात्मा। अंती मुक्तीं देईल तत्वतां। अधोगती निवारुनी ॥५४॥

जरीनीच वर्ण पतीशी। उच्चवर्ण कन्या कामासी। लोलत्प होऊनी अहर्निशीं। वरूनी प्रजा उत्पन्न करी॥५५॥ तरी ती अधोगतीसी जाऊनी माता पित्या दिकांसी। नेईल नरका प्रती परियेसी। प्रजा तिची दुष्ट होईल॥५६॥महा अभिमानी नास्तिक। वर्णाश्रम धर्मनाशक। चांडाळ रूप ती देख। धर्मभ्रष्ट करणारी॥५७॥ ऐंशा परी परियेसी। अन्नपूर्णा बाईसी। शास्त्रिबुवा प्रसन्न मानसी। होऊनी गोष्ट सांगती॥५८॥ गोदातटीं राहून। तप अनुष्ठान करून। आनंदे काळ क्रमण। करीत असतां जाणपां॥५९॥ अंतकाळ आला जवळ। ज्वरें करी तळमळ। मनीं जाहली विकळ। अन्नपूर्णा वदेभर्त्यासी॥६०॥ हे पहा देवदूत। न्यावया लागींतिषृत। आतां कृपावलोकनें त्वरित। पावन केलें पाहिजें॥६१॥ पत्नीचें भाषण ऐकूनी। त्वरा केली शास्त्रि बुवांनीं। गंगाजळीं स्नान घालुनी। शुद्ध स्थळीं बैसविलें॥६२॥ तिच्या हस्तें विधीपूर्वक। वस्त्रालंकारादिक। दान अर्पिलें ब्राह्मणा देख। मनस्वास्थ्य असतांची॥६३॥ मग तिये पतिव्रतेसी। आशिर्वाद देती परियेसी। हस्त ठेविती मस्तकेसी। कृपावलोकनें करूनी॥६४॥ अन्नपूर्णा बाई। मस्तक ढेवीं भर्त्यापायीं। म्हणे नाथा लवलाहीं। अपाव आतां चुकवावा॥६५॥ श्रीगुरुदेवदत्त। नमोच्चार करूनी त्वरित। क्षणभंगूर देहाप्रत। सोडिती झाली तेधवां॥६६॥ अज्ञान ह्रदय ग्रंथीं। तुटूनी पावली सद्गती। पतिपूर्वि कर्मविली मुक्तीं। ऐंशी सती क्वचित जाणा॥६७॥ इति श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। द्वादशोध्याय गोडहा। श्रीकृष्णार्पणमस्तु॥ श्री गुरुदेव दत्त।।

## ॥ अध्याय तेरावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ गुरुपदीं जयाची निष्ठा। तेणें वश केले वैकुंठ पीठा। तया मुक्त मुक्तीच्या वाटा। योगी श्रेष्ठाही वंद्यतो ॥१ ॥ प्रपंच केल्या विषमरीतीं। संतजन तया दूषिती। तोचि नेटकाजे करिती। तो संसार नव्हेची ॥२ ॥ आत्मोन्नतीच्या उद्देशानें। प्रपंच केला जयानें। तो प्रपंच नव्हें तयारी करणें। परमार्थाची जाणवी ॥३ ॥ अथवा जाणा धर्म स्थिती। वैकुंठाची वाटची ती। किंवा महायात्रा म्हणती। साधुसंत तयातें ॥४ ॥ आत्मोन्नतीचा उद्देश। जना कारणें सोसी क्लेश। धन्य जगीं तो सत्पुरुष। परमार्थ रूपे संसार त्या ॥५ ॥ सोमल खातां प्राणी मरतो। परी वैद्य तेंचि औषध देतो। त्याची योजना उत्तम करितो। तेणें जीव वांचतो मनुष्याचा ॥६ ॥ श्री रामाच्या संसाराला। व्यवहाराला आचरणाला। नांव ठेवितां येईल कोणाला। काय म्हणूनि सांगा बरें ॥७ ॥ व्यवहारीं चार प्रकारचे। प्रापंचिक असती साचे। कोणी दास इंद्रियांचे। होवूनि विषयीं मग्न असती ॥८ ॥ कोणी वैराग्याचें पुराण। ऐकूनि जाती भांबावून। ते प्रपंचींना परमार्थी जाण। आणीकही सांगतों ॥९ ॥ कोणी सदाचार संपन्न। सत्ता ऐश्वर्य ज्ञान। यांच्या प्राप्ती विषयीं झटून। उपयोग करिती श्रृष्टीचा ॥१० ॥ श्रीरामदासाचा संसार। शिष्य असती हजार। बैसूनी पंक्ती बरोबर। भोजन करिती अनेक ॥११ ॥ तैंसाच श्रीशंकराचार्याचा। प्रपंच वाढला साचा। दहा हजार शिष्यांचा। मेळा जमला सभोंवती ॥१२ ॥ प्रपंच नेटका त्यांचा। झाला आत्मोन्नतीचा। जगदोद्धारार्थ

साचा। तो परमार्थचि जाणा ॥१३॥ एरवीं भाष्या सारखा ग्रंथ। ब्रह्म सूत्रादिक वेदांत। कोण लिहिता प्राकृत। ग्रंथ दासबोधासम ॥१४॥ व्यासमुनी प्रचंड ग्रंथ। कासया लिहिते महाभारत। प्रयत्न करूनि भगीरथ। त्याग करुनि सर्वस्वांचा ॥१५॥ मार्कंडेयें तीव्र अनुष्ठान। किमर्थ केलें चौदा कल्पें जाण। शिरीं गवतांची पेढी धरून। सुख साधन सोडूनी ॥१६॥ तरीं या सर्वांनी उन्नतीचा। उद्देश अंतरी धरुनि साचा। स्वार्थ त्याग पूर्वक देहाचा। परोपकारार्थ उपयोग केला ॥१७॥ त्यांचा झाला जरी संसार। तरी तो संसार नव्हे साचार। तो परमार्थाचा व्यवहार। तया संसार कोण म्हणे ॥१८॥ शास्त्रिबुवांचा संसार। येणे रीतीचा साचार। पत्नीही होती उदार। तेणें तो जाहला नेटका ॥१९॥ त्या सतीस अन्वर्थक। अन्नपूर्णाबाई देख। होते तिणें स्वप्नांतही विन्मुख। जाऊं न दिला अतिथी ॥२०॥ ती अन्नपूर्णा साक्षांत। शास्त्रिबुवा संगे नांदत। उभयही नृसिंहवाडींत। आनंदें काळ क्रमित असतां ॥२१॥ शास्त्रिबुवा ग्रामीं जाऊनी। शुक्ल भिक्षा आणिता मागूनी। स्वहस्तें स्वयंपाक करूनी। अन्नपूर्णा घालिती ॥२२॥ नित्यपांच पंचवीस पान। अतीत अभ्यागता भोजन। होय शुक्ल भिक्षा प्रसाद जाण। येती सेवावयासी ॥२३॥ शास्त्रिबुवांची योग्यता। सर्वांना ठाऊक होतां। ते भिक्षेस्तव गावांत जातां। भिक्षा मिळे बहूत ॥२४॥ परी त्यानीं ती शिल्लक। ठेविली नाहीं कधीं देख। प्रसाद ग्रहणार्थ बरेंच लोक। येती नित्य त्यांचे घरी ॥२५॥ एके दिनीं पुजाऱ्यांना। मृताशौच आलें जाण। विचार पडला संन्याशाना। ते समयीं भिक्षेचा ॥२६॥ मग मौनी स्वामी आदिक। तितुकें

संन्यासी होते देख। तितुक्यांना वाढिती स्वयंपाक। करूनि अन्नपूर्णा बाई ॥२७॥ शास्त्रिबुवांचा वास। होता श्रीनृसिंहवाडीस। तितुक्या अवधींत अतिथांस। अन्नछत्र त्यांचे घर होतें ॥२८॥ तात्पर्य त्या साध्वीनें। पती सेवा करूनी। उत्तम रीतीनें। वागावें कैंसे पतिव्रतेनें। तें वळण दिलें घालुनी ॥२९॥ पुढे चौदावे दिवशीं त्या गावांत। शास्त्रिबुवासी दत्ताज्ञा होत। ती शिरसामान्य करूनि त्वरित। ते चतुर्थाश्रम स्वीकारिती ॥३०॥ जो श्रुतीगणातें गेय। योगी जनातें ध्येय तो श्रीमद्दत्तात्रेय। प्रेषोच्चार त्यांना देतसे ॥३१॥ प्रणव जप करावयासी। उपदेश करी परियेसी। जावूनि अवंतिका क्षेत्रासी। दंड धारण करी म्हणे ॥३२॥ श्रीदत्त मंदिरांत। नारायण यती विख्यात। नांदत असे माझा भक्त। सत्वर जाईं तयापाशीं ॥३३॥ ऐंसा श्रीदृष्टांत। ते श्रवण करूनी त्वरित। निघालें मार्गक्रमण करित। खांडवा शहरांमाजी येती ॥३४॥ श्रीदत्त मंदिरांत। येवूनिया मुक्काम करीत। तेथें एक ब्राह्मण भक्त। आग्रह करी तयांना ॥३५॥ म्हणे महाराजांच्या मुखें पुराण। श्रवण करावें आम्हीं जाण। तेणें होऊं पावन। विनंती अमान्य करूं नये ॥३६॥ त्याचा आग्रह पाहून। सांगती भगवद्गिता श्लोकार्थ जाण। ब्राह्मण मंडळी भावीक पूर्ण। पुराण श्रवणें आनंदती ॥३७॥ त्यांची वक्तृत्व शैली पाहून। ब्राह्मण डोलविती मान। मोठ मोठें म्हणती विद्वान। सामान्य यती हा नोहे ॥३८॥ महाराज म्हणती ब्राह्मणासी। जाणे आम्हां ॐकारेश्वरासी। नवज्वर विकार या देहासी। भोगणें असे निश्चित ॥३९॥ ॐकारेश्वर क्षेत्रांत। प्रारब्ध भोग भोगूं निश्चित। तुम्हीं आतां रहा स्वस्थ। म्हणूनि

मार्गक्रमण करिती ॥४० ॥ ॐ कारेश्वरीं येती। धर्मशाळेंत रहाती। तो अंगी ज्वर फणफणला अती। राहती पडून तैंसेची ॥४१ ॥ तेथील ब्राह्मण मंडळी। पातली तयांच्या जवळीं। म्हणती स्वामी तुम्हींये वेळीं। आमुच्या गृहीं चलावें ॥४२ ॥ येथे लागतो बहुत वारा। नाहीं तिळमात्र ही उबारा। यास्तव चला आमुच्या घरां। विनंती मान्य करा आमुची ॥४३ ॥ आग्रह करिती ब्राह्मण। परी स्वामी न सोडिती ते स्थान। नित्यविधीपूर्वक करूनी स्नान। स्वस्थ पडूनी रहाती ॥४४ ॥ ज्वरे व्याप्त शरीर पूर्ण। पांच दिवस झालें जाण। अत्याग्रह धरिती ब्राह्मण। आमुचें घरीं चला म्हणुनी ॥४५ ॥ मग एका विप्रां घरी। ज्वर असतां शरीरीं। जाऊनि रहाति तैंशाच परी। प्रारब्ध भोग भोगिती ॥४६ ॥ ऐशा परी नऊदिन। क्रमितां तया ठायीं जाण। सर्वांगी घाम येऊन। ज्वर कमी होऊं लागला ॥४७ ॥ शरीर झालें अशक्त चालतांना झेपा जात। तों विचित्र घडलें अकस्मांत। सुटले बडबडत स्वामी ॥४८ ॥ चुकलों चुकलों फिरून। ऐंसे न करीती वर्तन। म्हणून धांवती जाण। जन आश्चर्य पावती ॥४९ ॥ म्हणती स्वामीला वायू जाहला। किंवा समंध अंगी संचारला। यांच्या या बडबडण्याला। आम्हीं म्हणावें तरी काय ॥५० ॥ जन गेले घाबरून। हें स्वामीनीं पाहून। म्हणती आम्हां श्रीदत्तेंदंड जाण। केला असे या समयीं ॥५१ ॥ गृहस्थांच्या घरी कधीहीं। राहूनये आम्हीं पाहीं। परी राहिलों विप्रगेहीं। शिक्षालवलाहीं जाहली ॥५२ ॥ श्रीमद्दतापाशीं जाण। कबूल करावें लागलें जाण। पुन्हः ऐंसे वर्तन। कधींही न करीन ऐंसे ॥५३ ॥ ऐंसे जनासी सांगती। ऐकूनि लोक आश्चर्य पावती। मग

काहीं दिवस रहाती। ॐकारेश्वर क्षेत्रांत ॥५४॥ कांही दिवस क्रमिल्यावरी। निघालें मार्ग क्रमित सत्वरीं। बढवाई ग्रामीं रेवां तिरीं। येती ब्राह्मण वस्ती पाहुनी ॥५५॥ तेथें एक वैदिक। ब्राह्मण नांदतसें देख। तो प्रश्न करीतसे अनेक। वेद मंत्रा संबंधी। ॥५६॥ त्यासी यथा पद्धती सांगून। करिती त्याचें शांतवन। तेथूनि अवंतिका क्षेत्रीं येती जाण। नारायणानंद यतिपाशीं ॥५७॥ त्यानीं शके अठराशें बारा जाण। ज्येष्ठ वद्य द्वितिया सुदीन। पाहूनि स्वामीला दंड धारण। करविला शास्त्र पद्धती ॥५८॥ वासुदेवानंद सरस्वति। ऐंसे योग पट्ट देती। चातुर्मासास्तव राहवून घेती। त्या अवंतिका क्षेत्रांत ॥५९॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृते। गोपाळबुवा विरचिते। त्रयोदशोद्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्री गुरुदेव दत्त॥

* * *

## । अध्याय चौदावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्री गुरुभ्यो नमः॥ श्री गुरुचरित्राची प्रौढी। वर्णावी तितुकी थोडी। लागे अधिकाधिक गोडी। आवडी अधिक होतसें॥१॥ विस्तारपूर्वक पुढील कथा। सांगतो श्रवण करावी आतां। शास्त्रिबुवा चातुर्थाश्रमीं होता। नियम राखिलें तयानीं॥२॥ गुर्जर ब्राह्मण वळगिती। द्रविड विप्रांघरीं जाती। माध्यान्हीं भिक्षा आणिती। तीन पांच वा सात घरें॥३॥ जे अन्न येईल झोळींत। त्या माजीं निर्वाह करित। संन्यास कर्मे यथोक्त। करूनि उज्जयनींत राहती॥४॥ एक सोंवळयाची धाबळ। चार लंगोट्या छाट्या जवळ। दोन दत्तमूर्ति सोज्वळ। उपनिषद्‌वही संग्रहीं॥५॥ एक लहानशी पाणदोरी। इतुक्या वस्तू बरोबरी। आणखी नियम निर्धारीं। सांगतों श्रवण करावें॥६॥ नित्य त्रिकाळ स्नान करिती। आचार यथा पद्धती। प्रसंग पडल्या शुद्ध होती। स्पर्शा स्पर्श शुद्ध झालिया॥७॥ द्रव्यासी न शिवणें। पायीं प्रवास करणें। अन्यापासून सेवा न घेणें। स्पर्श न करणें मनुष्यांसी॥८॥ होईल तेवढा परोपकार। करणें आड मार्गे संचार। कोणासी न घेतां बरोबर। पवित्र राहती निशिदिनीं॥९॥ जाणूनि संन्यास पद्धती। व्रणे उपवास करिती। येणें परी राखिती। विशिष्ठ नियम आपुलें॥१०॥ कडक नियम पाहून। हा संन्यासी नव्हें जाण। या युगीं दत्ताची अवतीर्ण। झाला लोक बोलती॥११॥ शब्द पांडित्य करूनि। म्हणविती आपण ब्रह्मज्ञानी। आचाराची करिती हानी। देव प्राप्ती त्या कैंची॥१२॥ बेलफुले आणूनि। दक्ष होती देवार्चनीं। परी

भक्तीचा अभाव मनीं। देव प्राप्तीं त्या कैंची ॥१३॥ प्रपंच करिती सावचित्त। त्यांतचि सर्व धर्म प्राप्त। प्रपंच मूळ शाळा तत्त्व। परमार्थ साधावया ॥१४॥ जो या शाळेंत तयार। तो सोडो वा न सोडो घर। तयाचा आचार व्यवहार। अंतर्बाह्य शुद्धची ॥१५॥ बोले तैंसेचि वर्तन। त्याचेंचि करिती अभिनंदन। चतुर्विध पुरुषार्थ जाण। अंती सद्गती त्या मिळें ॥१६॥ ज्या प्रपंच परमार्थ। एकरूप झाला यथार्थ। ज्यांचे आचरण निश्चित। धर्मरूप झाले ॥१७॥ त्यालाच सद्गती प्राप्त। तोचि जाणावा जीवन्मुक्त। येरां ती स्थिती अप्राप्त। जरी झाला ब्रह्मज्ञानी ॥१८॥ पूर्वाश्रमीचे आचरण। अंतर्बाह्य शुद्ध जाण। ज्यानीं साधिलें हें साधन। काय न्यून चतुर्थाश्रमीं ॥१९॥ अभ्यास बाल वयांत। शिकूनि जो तयार होत। वृद्ध झाला तरी न विसरत। तो पूर्वाभ्यास आपुला ॥२०॥ आधींच होता विरक्त। संन्यास घेतला त्यांत। जैंसी साखर पडली दुधांत। मग काय विचारावें ॥२१॥ संन्यास केल्यापासून। श्रीची स्वामीस आज्ञा जाण। करीत रहावें तीर्थाटण। क्षेत्र पाहूनि वास करणें ॥२२॥ नास्तिक लोक बहुत असती। वर्णाश्रम धर्म उच्छेदिती। मानेल तें करिती। विषमा चार सर्वही ॥२३॥ त्यांना सन्मार्गा लावावे। शास्त्र धर्म श्रवण करवावे। भक्ति तत्त्व सांगूनि बरवे। उद्धारावें तयातें ॥२४॥ श्रीदत्ताज्ञा मानून। चातुर्मास होता संपूर्ण। गुरू स्वामीची आज्ञा घेऊन। ते उज्जनीहूनि निघालें ॥२५॥ तेथून दीड योजना दूर। क्षिप्रा किनारीं महत्तपूर। तेथें अठराशें तेरा संवत्सर। वास करिती चातुर्मास ॥२६॥ द्विजांप्रती नित्य जाण। उपनिषद्भाष्य श्रवण। तैंसेच वेदशास्त्राध्ययन। अधिकारानुरूप

करविती ॥२७॥ सायंकाळी पुराण। इतर जनांस्तव। सांगती जाण। बोध करिती कळकळीनें। धर्म मर्यादा नुल्लंघाया ॥२८॥ महत्तपूर ग्रामीं जाण। ब्रह्मनिष्ठ गौड ब्राह्मण। राहे पिशाच्चवृत्तीं धरून। सप्तम भूमिका रूढ जो ॥२९॥ तो महाकालीचा उपासक। यास्तव कालीमिय्या नाम देख। उच्चारी सर्वकाळ चोख। ऐकूनि लोकथट्टा करिती। ।३० ॥ तो रहातसे वेड्या समान। त्याचा छळ करिती ब्राह्मण। स्वामीराज म्हणती जाण। त्या ग्रामस्थ ब्राह्मणांसी ॥३१॥ हा काली देवाचा उपासक। म्हणूनि कालीमैय्यां नाम देख। उच्चारी तुम्हीं कांपातक। जोडितां थट्टा करूनि ॥३२॥ हा पूर्वि कर्मनिष्ठ। ब्राह्मण विद्व द्वरिष्ठ। रुद्राभिषेक सप्तशती पाठ। करीतसे नियमानें ॥३३॥ गालव पुरींचा नृपनाथ। शिंदे नामक प्रख्यांत। लक्ष ब्राह्मण संतर्पित। अतिप्रेमें करूनिया ॥३४॥ त्या ब्राह्मण संतर्पणांत। हा ब्राह्मणोच्छिषृखात। उष्ट्या पत्रावळी शोधित। अन्न प्रसाद खावया ॥३५॥ म्हणूनि तुम्हीं याला भ्रष्ठ। म्हणतां परी हा ब्रह्मनिष्ठ। असे वंदनीय श्रेष्ठ। न करा याची थट्टा तुम्हीं ॥३६॥ युधिष्ठिरानें यज्ञ केला। राजसूय म्हणती त्याला। त्यासमयीं ब्रह्मवृंद जेविला। त्यांचे कोण गणीत करी ॥३७॥ श्रीशुक योगिंद्रानें। त्यावेळीं शुक वेषानें। ब्राह्मणोच्छिष्ट प्रसादमनें। सेविला नाहीं काय कीं ॥३८॥ लक्ष ब्राह्मण संतर्पणांत। एखादा ब्रह्मनिष्ठ येत। यजमान पवित्र करित। ईश्वराज्ञे करूनिया ॥३९॥ तो निर्दोषी अग्नीसमान। अनेक जन्मांती जाण। एवढा अधिकार प्राप्तपूर्ण। जीवालागीं होतसे ॥४०॥ अनंत जन्माची तपश्चर्या। सामावली एके ठांया। त्याच्या मोक्षलागें पाया। इतरांची

कथा काय ॥४१ ॥ सप्तम भूमिका रूढ जे पुरुष। त्यांना नांहीं दोषस्पर्श। त्यांचे वर्तन विशेष। न कळे सामान्य नरासी ॥४२ ॥ ते राहती कोण्या स्थिती। तयांची वर्तन पद्धती। जाणावया कुंठितमती। प्राकृताची होतसे ॥४३ ॥ ते पंचमाश्रमीं निश्चिती। त्यांचे गुण लोक नेणती। तेही कदा न दाविती। गुण आपुले परासी ॥४४ ॥ लोकां पाहिजे चमत्कार। तो कार्य साधू तत्पर। परी ईशश्रृष्टीत चमत्कार। वारंवार न घडेची ॥४५ ॥ स्वरूपद्वारें प्रगट होई। अध्यात्मिक तेज पाहीं। त्यावरूनि खूण कांहीं। कळो येई संताची ॥४६ ॥ त्यांचा नेहमीं सत्कार करावा। व्यावहारिक लाभ व्हावा। हा त्यांत हेतू नसावा। प्रापंचिक जनासी ॥४७ ॥ ते जग कल्याणासाठीं। करीत असती अनेक गोष्टी। बैसूनिया गिरी कपाटीं। अथवा पृथ्वीपाठीं फिरूनी ॥४८ ॥ त्यांचा कोणा न कळे अंत। ते प्रसन्न झालिया काय न देत। अशा पुरुषांचें अस्तित्व। सकळां सुखकारक ॥ ४९ ॥ तेचि दुरित निवारक। आणि बुद्धिलागीं प्रेरक। परी सामान्य नरादेख। प्रत्यय नये तयांचा ॥५० ॥ जे असती भाविक। त्यांना येत अनुभव चोख। म्हणून ते पदरज देख। सेविती अशा पुरुषांचे ॥५१ ॥ जरी त्यांचा आशिर्वाद। मिळे तरी तो सुखद। प्रापंचिकासी निर्वाण पद। दायक तोचि जाणावा ॥५२ ॥ वडील आणि संतांचा। तसाच जाणा ईश्वराचा। आशिर्वाद प्रभाव साचा। न कळे सामान्य नरातें ॥५३ ॥ तो आशिर्वाद नव्हें जाण। जाणा चक्र सुदर्शन। त्या चक्राचें कवच पूर्ण। ज्या पुण्यशीले लेईले ॥५४ ॥ त्याचें सर्वरिष्टांपासून। निश्चयें होईल संरक्षण। लाधेल तया पद निर्वाण। संदेह त्यांत

नसेची ॥५५॥ तुमचे सारिखे अज्ञानी। नसतील या त्रिभुवनीं। आपुला आचार पाळुनी। भक्ति भावें रहावे ॥५६॥ ते दिलें सोडून। अतिथि आदर करणें जाण। उलट निंदा करितां म्हणून। अज्ञानी पूर्ण तुम्हींच ॥५७॥ येणेपरी ब्राह्मणा प्रती। वासुदेवानंद सरस्वति। त्या ब्रह्मनिष्ठाची स्वरूप स्थिती। सांगुनी दवडिती अज्ञान ॥५८॥ तेणें तेथील लोकांची भक्ती। बैसली ब्रह्मनिष्ठा वरती। मग सारंगपुर ग्रामीं येती। दक्षिणी ब्राह्मण वस्ती पाहुनी ॥५९॥ चातुर्मास वास। करूनिया सारंग पुरास। जना लाविती भक्ति मार्गास। सुदूपदेशें बोधुनी ॥६०॥ त्या ग्रामीं धनिक ब्राह्मण। होता तो स्वामीसी पाहून। भावें बोलें वचन। विनय संपन्न होऊनि ॥६१॥ म्हणे तुमचे जवळ दत्तमूर्ति। असे मज लागा द्यावी ती। तिची सेवा करीन निश्चिती। स्थापना करूनि निजमंदिरीं ॥६२॥ त्याचा आग्रह पाहून। जवळी होत्या दत्तमूर्ति दोन। त्यापैकीं एक देती जाण। त्याधनिक ब्राह्मणा लागीं ॥६३॥ त्यानेंही निज मंदिरीं सुंदर। बांधूनि लहानसे स्वतंत्र मंदिर। आंत ती दत्तमूर्तिं सुंदर। स्थापूनि अर्चा चालविली ॥६४॥ धरूनि मनीं भक्तिभाव। त्रिकाळ पूजा करी उत्सव। गुरु द्वादशी दत्त जयंती सर्व। ब्राह्मण जमवूनि त्या ठायीं ॥६५॥ तेथूनि श्रीगुरू मार्ग क्रमित। जालवण नामक ग्रामीं येत। चातुर्मासास्तव रहात। ब्राह्मण वस्ती पाहुनी ॥६६॥ चातुर्मास करूनि पूर्ण। भागिरथी तटीं येती जाण। ब्रम्हावर्त क्षेत्र पावन। मुक्काम करिती चातुर्मास ॥६७॥ ज्या ज्या ठायीं ते रहाती। त्या त्या स्थळीं त्यांची शांतमूर्ति। तप उपासना तेज पाहूनि पावती। लोक तेथीचें आश्चर्य ॥६८॥ त्यांचा ऐकूनि

सदुपदेश। समाधान वाटे लोकांस। म्हणती हा ईश्वर अवतार खास। आम्हां उद्धाराया पातला ॥६९॥ ब्रह्मावर्त क्षेत्रीं षण्मास। वास करूनि हरिद्वारास। येती मथुरा कुरुक्षेत्रांदिकांस। पहात उद्धारीत भाविक जना ॥७०॥ बरवें क्षेत्र हरिद्वार। तेथें द्वारका मठाचे थोर। शंकराचार्य श्री राजराजेश्वर। असती वास करूनी ॥७१॥ वासुदेवानंद महाराजांना। आग्रह करिती रहावयाना। चातुर्मासास्तव जाणा। आपणा जवळी ॥७२॥ राहूनिया तया स्थानीं। त्यांचे वचन मानूनी। त्यांना उपनिषद्भाष्य ऐकवूनि। तेथूनि बद्रिकाश्रमीं जाती ॥७३॥ बदरी नारायणाचे दर्शन। करावे हा हेतू धरून। निघालें बहुत दक्षिणी ब्राह्मण। मार्गक्रमण करीत ॥७४॥ त्यांच्या समागमे निघती। वासुदेवानंद सरस्वति यति। ब्रह्मवृंद भिक्षा देती। स्वयंपाक करूनी तयांना ॥७५॥ श्रीसत्य नारायण हृषीकेश। स्थान पाहूनि देव प्रयागास। येती अलक नंदा गंगा संगमास। स्नान करिती तेधवा ॥७६॥ तेथूनि पाहती उत्तर काशी। येती मग गंगोत्रीसी। स्नान दर्शन करूनि परियेसी। पातले रूद्र प्रयागा ॥७७॥ तेथे अलक नंदा मंदाकिनी। संगमी स्नान करूनि। अगस्त्याश्रमी येऊनी। वास करिती एक रात्र ॥७८॥ मग गुप्त काशीस येती। स्नान दर्शन करूनि पुढतीं। मार्ग क्रमितां ज्योतिर्मठ पाहती। स्नान करिती विष्णू प्रयागीं ॥७९॥ येती त्रिजुगी नारायणा। वंदुनी बदरी केदारीं आले जाणा। मंदाकिनीच्या स्नाना। करिती दर्शना केदाराच्या ॥८०॥ बद्रि केदार जोतिर्लिंग। हिमालयीं असे चांग। दर्शन करूनि यथा सांग। निघालें बद्री नारायणा ॥८१॥ तुंगनाथ महादेवा। वंदूनि उरवी मठ बरवा। पाहूनि

पंडूकेश्वर देवा। आले नारायणासी ॥८२॥ बदरी नारायण पुरीत। त्रिरात्र वास करित। तेथूनि कर्ण प्रयागीं येती त्वरित। स्नान करिती नंद प्रयागीं ॥८३॥ हिमालय पर्वत बर्फाचे घर। रक्त गोठूनि विकळ होतें शरीर। म्हणूनि उबदार वस्त्रें फार। तेथें लोक वापरती ॥८४॥ लोह्या बुरणूस बनाती। याचे कपडे शरीरीं घालिती। किंवा कापूस घालूनि वस्त्रें शिविती। हिमाची बाधा न होय तेणें ॥८५॥ थंडी ऐंशा परीची। परी सामान्य छाट्यांवरी साची। काढूनि बद्रिकाश्रमाची। यात्रा पूर्ण केली त्यांनीं ॥८६॥ उपवास थंडी ऊन। दुःखश्रम आणि तहान। सर्व संकट सहन। करितां आली पाहिजेंत ॥८७॥ मार्गीं त्या यात्रेंत। उत्तर काशी स्थानीं नांदत। एक दक्षिणी ब्राह्मण ईशभक्त। कर्मिष्ठ शास्त्रोक्त वर्तन ज्याचे ॥८८॥ स्व हस्तें स्वयंपाक करी। हें पाहूनी निर्धारीं। चिंतिती निज हृदयांतरीं। श्रीवासुदेवानंद महाराज ॥८९॥ हा असे कर्मिष्ठ ब्राह्मण। तरी याच्या येथें भिक्षा करून। स्वस्थ रहावें पडून। भटकण्या माजीं अर्थ काय ॥९०॥ म्हणूनि तेथें रहाती। तों त्याच रात्रीं दृष्टांतीं। श्रीदत्त तयाना आज्ञापिती। येथें राहूं नको म्हणुनी ॥९१॥ येथूनिया चालता होई। न राहे क्षण भर ही। ऐंसा दृष्टांत ऐकूनि पाहीं। तेथुनी लवलाही निघालें ॥९२॥ मार्गक्रमण करीत। हरिद्वारा येती त्वरित। तेथें एक यात्रे करूं ब्राह्मण अशक्त। पाहिलासे तयांनीं ॥९३॥ त्याचें विकळ झालेसें शरीर। पहाडी बोझेवाला असे बरोबर। त्याणें केला मनीं विचार। ब्राह्मण द्रव्य लुटण्याचा ॥९४॥ परी वासुदेवानंद महाराजांनी। त्याचा विचार जाणुनी। त्या

ब्राह्मणापाशीं राहूनि। सेवा करिती तयाची ॥९५॥ परोपकारास्तव जाण। काया झिजवावी पूर्ण। सत्कार्यीं वेचावया प्राण। तयार असलें पाहिजे ॥९६॥ ब्राह्मणा घरचें अन्न। तयासाठीं आणून। करविती तया भोजन। नेसविती धूत वस्त्रें ॥९७॥ त्या नातलगा वर्तमान। कळविती पत्र लिहून। ते तेथें येतांचि जाण। आपण पुढें मार्ग क्रमिती ॥९८॥ हरिद्वाराहून निघालें। मार्गीं द्रविड विप्र गृह न मिळे। एखादें जरी मिळालें। तरी न घेती भिक्षा तेथें ॥९९॥ भिक्षा करावया घरें तीन। पाहिजेंत पांच सात जाण। एरवी उपवास पूर्ण। घडतसे तयांना ॥१००॥ कधीं द्विजांनीं दिल्या फलाहार। तो करिती स्वल्प साचार। दूध दहीं मिठाई साखर। न सेविती कदापी ॥१॥ तुपादि पौष्टिकपदार्थ न सेविती देख। त्यांचे ऐंसे नियम कडक। जाणत्यासी ठाऊक असती ॥२॥ ब्रह्मावर्ति अठरा दिवसांत। येवूनि भिक्षा करीत। मार्गीं तो पर्यंत। पडले उपवास तयांना।।३॥ एका ब्राह्मण स्त्रीनें। भुइ मुगाचे दिलें दाणे। भाजूनि गहूं आणि चणे। पीठ करूनि तयाचें ॥४॥ ते पाण्यांत कालवून। खाती नित्य मार्गक्रमण। वीसपंचवीस कोस पूर्ण। करिती अनवाणी पायानें ॥५॥ ब्रह्मावर्त क्षेत्रांत। येवूनि राम मंदिरांत। चातुरमास वास्तव्य करित। अठराशें सतरा शकाब्दि ॥६॥ या पुढील अनुसंधान उत्तराध्यायीं केलें कथन। तें ऐकावें श्रोते जन। एकचित्ते करूनिया ॥१०७॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। हिम केदार यात्रा वर्णनंन्नाम। चतुर्दशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥ श्री गुरूदेव दत्त॥

## ॥ अध्याय पंधरावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ तेथें गणेश भक्त ब्राह्मण। गणपति बुवा नामें जाण। त्यांचा भ्रातृपुत्र यवन। धर्मभ्रष्ठ जाहला ॥१ ॥ तत्कांता महाराजांसी। नमन करूनि परियेसी। पुसतसे विनयेसी। काय करावें म्हणूनि ॥२ ॥ म्हणे पती झाला पतित। मीही तत्संगें भ्रष्ठ। व्हावें काय सांगा स्पष्ठ। धर्म जाणतसां तुम्हीं ॥३ ॥ तो मज पाचारित असे। मी वर्तन करावें कसें। सांगाल शास्त्रोक्त तसें। वचन ग्रहण करीन ॥४ ॥ आम्हां स्त्रियांना शास्त्रार्थ। ठाऊक कैंचा यथार्थ। म्हणूनि मी असे पुसत। वागेन आज्ञे प्रमाणें ॥५ ॥ तिचें वचन ऐकून। महाराज सांगती जाण। वर्णाश्रमाला सोडून। जरी भ्रष्ठ जाहला पती ॥६ ॥ तो जरी प्रायश्चित्त। घेऊनि शुद्ध होईल त्वरित। तरी त्याच्या स्त्रीनें शास्त्रोक्त। संबंध पतीशी ठेवावा ॥७ ॥ शास्त्रोक्त प्रायश्चित्तपूर्वक। जरी तो शुद्ध न होईल देख। तरी त्या पतीचा त्याग ऐक। अवश्य स्त्रियेनें करावा ॥८ ॥ ऐंसा असे शास्त्रार्थ। धर्मानें वागावें यथार्थ। तरीच तोषें श्रीभगवंत। इहपर लोक साधे येणें ॥९ ॥ मग त्या बाईने पतीला। प्रायश्चित्त घेण्या आग्रह केला। ब्राह्मणांकडून तयाला। समजाविलें बहुतांपरी ॥१० ॥ परी तो न घे प्रायश्चित्त। यवनापरी आचार समस्त। करूनि मद्य मांस सेवित। मदोन्मत्त होऊनिया ॥११ ॥ ऐंसे तयाचें वर्तन। त्याच्या स्त्रियेनें पाहून। तत्संबंध दिला सोडून। राहिली ईश सेवा करूनी ॥१२ ॥ कानपूर नगरीं जाण। राहे धनिक गौड ब्राह्मण। महाराजांचा भक्त पूर्ण। कन्या विवाह इच्छित ॥१३ ॥ पित्यानें वर पाहिला।

वर्तमान कळलें कन्येला। पित्यासी प्रश्न केला। एकांत समय पाहुनी ॥१४॥ कन्या म्हणे पित्यासी। मजवर योजिलासी। काय करी उद्यमासीं। मज कथन करावें ॥१५॥ पिता बोले वचन। नोकरी करित असे जाण। इतुकें पितयाचें भाषण। ऐकूनी कन्या म्हणतसे ॥१६॥ बाबा सांगत्यें तुज लागून। ऐंशा पतीशीं न वरी जाण। स्वधर्मि न ज्याचें मन। तो वरूं नये वाटतें ॥१७॥ स्व ज्ञातीय विप्र पुत्र। आचार संपन्न पवित्र। तपकरी अहोरात्र। ऐंसा पती मज व्हावा ॥१८॥ हें कन्येचे प्रौढ भाषण। ब्राह्मणानें ऐकून। महाराजांसी निवेदन। करितां झाला तेधवा ॥१९॥ ते म्हणती तयासी। तुझी कन्या परियेसी। कां वदतसे ऐंशी। निदान त्याचें सांगतों ॥२०॥ ती पूर्व जन्मीं योगभ्रष्ट। म्हणूनि तुज सांगे स्पष्ट। तिला वर पाहण्याचे कष्ट। व्यर्थ करिसी कासया ॥२१॥ पती योग्य व्हावा तिला। तरीं याच ठायाला। स्वयें येईल घराला। न करी चिंता मानसीं ॥२२॥ ऐंसे स्वामीचे भाषण। ऐकूनि विनवी ब्राह्मण। मी स्वतः भिक्षूक नसून। कन्या भिक्षूका देऊं कशी ॥२३॥ श्री गुरु म्हणती ब्राह्मणासी। तूं धर्म शास्त्र नेणसी। आचार युक्त परियेसी। स्वधर्में वर्तन जयाचें ॥२४॥ करूनिया ईश भजन। निष्काम तप करी जाण। तो भिक्षा मागून। उदर पूर्ति करीना कां ॥२५॥ परी सोडून धर्म कर्म। करीनीच समागम। सेवा करूनि जोडीदाम॥ ईश्वर नाम मुखीं नये ॥२६॥ होवूनि या विषयासक्त। पशूसम कर्में आचरित। जनामाजीं मिरवीत। श्रेष्ठत्व जो आपुलें ॥२७॥ तो स्वधर्म वर्णभ्रष्ठ। परी जो पवित्र कर्मनिष्ठ। जामात ऐसा मिळाल्या इष्ट। तुज अनिष्ट कां

भासे ॥२८॥ आचार विहित पती। जरी मिळेल कन्ये प्रती। उभय कुळांगती। तदा चरणें होईल ॥२९॥ स्वामीचें भाषण शास्त्रोक्त। ज्यामध्यें अत्यंत हित। ऐकूनि द्विज प्रसन्न चित्त। होवूनि स्वस्थ राहिला ॥३०॥ कांहीं काळ गेल्यावरी। त्या ब्राह्मण घरा शेजारी। धर्म शाळेंत एक ब्रह्मचारी। तीर्थे करीत पातला ॥३१॥ तो होता योगाभ्यासी। अनुष्ठान करीसायासी। त्याची मुख श्रीपरियेसी। दिसत होती प्रसन्न ॥३२॥ द्विज सुता त्या पाहून। विनयें करीतसे प्रश्न। म्हणे आपण कोण। कोठूनि आलां श्रमूनि ॥३३॥ कोण ब्राह्मण आपण। ऐंसे ऐकूनि तिचें भाषण। ब्रह्मचारी सांगे जाण। गौड ब्राह्मण असें मी ॥३४॥ तीर्थ यात्रा करीत। आलो गंगातटा प्रत। पुससी मज किमर्थ। या ठायीं येऊनी ॥३५॥ ऐंसे पुसे ब्रह्मचारी। कन्या बोले अवधारी। आपण आमुचें घरीं। भोजना आलें पाहिजे ॥३६॥ आपण पवित्र ब्राह्मण। अनायासें आलां जाण। आम्हां करावें पावन। अन्न घेवूनी सदनीचे ॥३७॥ ब्रह्मचारी बोले अवश्य। येईन मी भोजनांस। ऐकूनि कन्या पितयास। गृहीं जाऊनी सांगतसे ॥३८॥ बाबा एक विप्रपुत्र जाण। येथें आलासे स्वेच्छें करून। तया भोजना आमंत्रण। देऊनी आलें आतांचि ॥३९॥ उतरला धर्म शाळेंत। तो मी वरिलासे निश्चित। मद्विवाह सुमुहूर्त। पाहुनी करी तया सवें ॥४०॥ कन्या भाषण ऐकूनी। विप्र विचार करी मनीं। कोण आलासे कोठुनी। तें जाऊनी पहावे ॥४१॥ जाऊनिया तयापाशीं। बोलवावें सत्कारेंसी। मनीचा हेतू तयासी। घरीं आणूनि कळवावा ॥४२॥ जाऊनी धर्म शाळेंत। विप्र पुत्रा घरीं आणित। भुक्ती

सुखें केलें तृप्त। कन्या हेतू कळविला ॥४३॥ तें ऐकूनी वचन। विप्र पुत्र बोलें आपण। योगाभ्यास करीतसें जाण। पूर्ण ब्रह्मचर्य पाळुनी ॥४४॥ विवाह अपेक्षा न मनीं। धनातें मी तुच्छ मानीं। असतो भिक्षान्न सेवुनी। ईशाभावें भजत असे ॥४५॥ तीर्थयात्रा स्वच्छंदे। करीत फिरतो आनंदें। कोणी बद्ध व्हावें भवबंधें। प्रभू पदार विंद सोडुनी ॥४६॥ इतुकें बोलतां ब्रह्मचारी। ब्राह्मण जाहला खिन्न अंतरीं। जावूनि स्वामी पदीं झडकरी। वृत्त सर्व कथियेलें ॥४७॥ आपुलें वचन प्रमाण। मानूनि आजवरी पूर्ण। बसलों होतो तो सुदीन। आज पातला वाटतें ॥४८॥ स्वज्ञातीय ब्रह्मचारी। उतरला धर्मशाळे भीतरीं। तयानें पाहूनि अवधारी । भोजना घरी आणिला ॥४९॥ असे सदाचार संपन्न। पायीं तीर्थ यात्रा करून। करीतसे अनुष्ठान। ईश्वर भजन भक्तीनें ॥५०॥ आपुली अनुज्ञा जाहली। तद्वत त्यापाशीं गोष्ठ काढली। परी तयानें नाकारिली। अमान्य केलें वचन माझें ॥५१॥ आपण तयातें कथावें। कीं मत्कन्येते स्वीकारावें। तरी होईल माझें बरवे। मनीं स्वस्थता वाटेल ॥५२॥ द्विजाचा भावार्थ परिसून। स्वामी सांगती त्यालागून। ब्रह्मचाऱ्या बोलावून। येथें आणा सवेग ॥५३॥ ऐंसे बोलुनी तो ब्राह्मण। धावत गेला त्वरें करून। ब्रह्मचाऱ्या सांगे जाण। स्वामी तुम्हां पाचारिती ॥५४॥ ऐंसे ऐकूनि तयास्थानीं। ब्रह्मचारी आला आज्ञा मानूनी। कन्येसी वरी म्हणूनी। स्वामी तया आज्ञापिती ॥५५॥ म्हणती या कन्येनें। तुजशीं वरीले मनानें। यास्तव आतां विवाह करणें। इजसवें जाणपां ॥५६॥ तुज योग्यही नोवरी। कुळगोत्रा साजे बरी। ही आज्ञा

अवधारी। विवाह करी यास्थळीं ॥५७॥ परस्पर संबंध। याला न येईल बाध। या स्त्रियेपासूनी बंध। तुज न होईल संसारीं ॥५८॥ भवार्णव तरावया। मदत करील तुज जाया। ही सुशील तनया। वरावया योग्य तुज ॥५९॥ इलातूंन वरितां। दोष बाधेल तत्वतां। ही असे पतिव्रता। तुज त्रास न घडेल ॥६०॥ ऐंसू ऐकूनिया सद्गुरूची वाणी। ब्रह्मचारी मनीं आणी। मग सुमुहूर्त पाहुनी। वरिले विप्र कन्येसी ॥६१॥ इति श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। पंचदशोध्याय गोड हा। श्रीकृष्णार्पणमस्तु॥ श्री गुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय सोळावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ गुरु कथा भागीरथी। श्रोत्यांप्रती पावन कर्त्री। सुख दाइनी इह परत्री। अन्य न ऐंसी भुवनत्रयीं ॥१ ॥ त्या ब्रह्मावर्त क्षेत्रांत। स्वामींचे नांव ऐकूनि त्वरित। एक रोगी ब्राह्मण येत। आरोग्य व्हावया कारणें ॥२ ॥ तया कोणी कथिलें होते। सप्तदाचे तीर्थ तूतें। जरी प्राशन करावयातें। मिळेल तुझ्या प्रारब्धें ॥३ ॥ तरी तुझा हा रोग। जाऊनी होईल शुद्धांग। यास्तव तो आला सवेग। नांव ऐकूनि स्वामीचें ॥४ ॥ ते लिहावया एके दिनीं। उभे पाय ठेऊनी। पाटीं बैसले एकाग्र मनीं। ब्राह्मण आला अकस्मांत ॥५ ॥ चरणीं जळ घालून। तें तीर्थ करी प्राशन। त्याचें कृत्य पाहून। स्वामी तया बोलती ॥६ ॥ ब्राह्मणा मज शिवून। न विचारतां जाण। पायांवरी तोय घालून। किमर्थ प्राशन केलेसी ॥७ ॥ तो म्हणे आहो स्वामीं। अनंत अपराधी असे मी। चरणतीर्थ आरोग्य कामीं। म्हणूनि घेतलें आदरें ॥८ ॥ अपराध क्षमा करणें। फार त्रासलों रोगानें। मज आशिर्वाद देणें। कृपा करणें मजवरी ॥९ ॥ त्या ब्राह्मणाचें भाषण। ऐकूनि बोलती स्वामीं आपण। घडलें तें उक्त जाण। होवो आरोग्य तुज लागीं ॥१० ॥ ऐंसे बोलूनि त्वरित। जाऊनि स्नान करित। रात्रीं असतां निद्रिस्त। अकस्मांत स्वप्न पडलें ॥११ ॥ एकाग्र मन करूनी। स्वप्न विचार करिती मनीं। श्रीदत्त ध्यान करूनी। निद्रा करितें जहाले ॥१२ ॥ प्रातःकाळीं उठती। तों तनूवरी फोड दिसती। स्वामी आपुल्याशींच वदती। अरिष्ठ कोठूनी पातलें ॥१३ ॥ लोक येती

धांवूनि। यतीसी बोलती नमूनी। हा प्रारब्ध भोग कोठूनी। आला तुम्हां जवळीच ॥१४॥ आम्ही या रोगासी। उपचार करितों परियेसी। ऐंशीया भाषणासी। ऐकूनी स्वामी बोलती ॥१५॥ हा आमुचा नसे रोग। दुजियाचा प्रारब्ध भोग। भोगावया आला योग। भोगूनी सारिला पाहिजे ॥१६॥ मज चित्तीं ऐंसे गमे। हा उपचारे न शमे। ऐंसे सांगतों नियमें। ऐकनि लोक तटस्थ ॥१७॥ त्याच रात्रीं स्वामींना। दृष्टांत जाहला जाणा। त्रिदिन नर्मदा स्नाना। करितां रोग परिहरे ॥१८॥ ऐंसा तो दृष्टांत। ऐकूनि निघालें त्वरित। मार्ग क्रमित स्नानार्थ। रेखा तटीं पातलें ॥१९॥ स्नान करितां नर्मदेचें। शुद्धांग झालें स्वामींजींचें। नकळे ईश्वरी मायेचें। चरित्र सामान्य नरासी ॥२०॥ मग स्वामींनीं जाणा। केली नर्मदा मातेची प्रार्थना। ती संक्षिप्त श्रोतें जना। सांगतों भावें परिसावी ॥२१॥ श्लोक - अयेरेवे देवेडित गुणगणे मर्त्य तरणे। क्षणे नापिस्नाना त्पर मगतिदाभिष्ट वरदा। त्वमे वातो देवा अपित वन चे च्छंतिहितंट। परित्यक्तुं वक्तुं तव गुण गणान्क: प्रभुरिह ॥२२॥ स्वभक्त वरदे सुरद्विषद भेद्यसद्दर्मदे। सुदुर्ग तिद कर्मदे। हतगदे पिसद्धर्मदे अये न दिन दीन तां व्रजसी कर्हिचिच्छर्मदे। प्रसीद जन कामदे जय नमोस्तुते नर्मदे ॥२३॥ एवं प्रभावे जय देवि रेवे। प्रसीदमतेंबु सदैव सेवे। श्रीनर्मदे देवि नमो नमस्ते। श्रीशर्मदे सोमसुते नमस्ते ॥२४॥ भवांतके भयं देही। तापंमेहर नर्मदे। भवात्मके नयंदेही पापंमे हर नर्मदे ॥२५॥ ऐंसी करुनिया स्तुती। पुढें मार्ग आक्रमिती। ब्रह्माणी घाटीं येती। वास करिती क्वचित्काळ ॥२६॥ एके दिवशीं स्नानार्थ। जात असतां मार्गांत। पाय

लचके चालूं न देत। ऐंशी स्थिती जाहली ॥२७॥ भिक्षेस ग्रामीं न जाती। ध्यान करीत तेथेंच बैसती। तो ध्यानीं अवचिती। कन्या सुंदर देखिली ॥२८॥ दहा वर्षांची सुकुमार। महाराजांसी म्हणे सत्वर। ऊठ भिक्षेचा झाला अवसर। लाविसी विलंब कासया ॥२९॥ तुझा पाय असे दुखत। तयासी लावित्यें भस्म मंत्रित। तूं उभा राहूनि त्वरित। पाय ठोकी भूवरी ॥३०॥ लचक बंद होईल। चालतां पाय न दुखेल। भिक्षा मागूनि आणवेल। मग कां पडून राहसी ॥३१॥ ती साक्षात् नर्मदा। स्नान मात्रें हरे जन शर्मदा। कन्या रूपें येऊनी तदा। औषध सांगून परतली ॥३२॥ नर्मदेची करूनी स्तुती। जाऊनि भिक्षा आणिती। लचक बंद झाली निश्चिती। विभूती लावितां नर्मदेनें ॥३३॥ त्या ब्रह्माणी गावांत। परिवारें एक ब्राह्मण नांदत। धन लोभी अत्यंत। कन्या लग्नें पांच करी ॥३४॥ ती विचित्र कथा। श्रोते हो सांगतो आतां। एकाग्र करा निज चित्ता। तरीच स्वहिता साधल ॥३५॥ त्या ब्राह्मणानें प्रथम। पुण्य पत्तनीं विप्रोत्तम। तत्पुत्र वर उत्तम। निज कन्येसी पाहिला ॥३६॥ शास्त्रोक्त कन्यादान। केलें विवाह करून। तैंसेच अलंकार संपूर्ण। श्वशुरें घातलें स्नुषेला ॥३७॥ त्या अलंकारा सहित। ती पित्यागृहीं येत। आई बाप जैंसे शिकवीत। तयापरी वागतसे ॥३८॥ तिच्या पित्यानें तिला। दूर नेवूनी विवाह केला। पूर्विंच्या श्वशुराला। पत्रद्वारें कळविलें ॥३९॥ घरी स्नुषा आपुली। होती मृत्यू पावली। पटकीं विकारें झाली। ऐंशी स्थिती विपरीत ॥४०॥ होणारी गोष्ठ घडली। ती आपणां कळविली। बहू खटपट केली। ऐषधोपचार देऊनी ॥४१॥ ती सर्व

झाली व्यर्थ। ऐंसे लिहूनि असत्य। कवळी तें मानुनी सत्य। श्वशुरादि राहिलें ॥४२॥ दुसऱ्या सासऱ्याला। तैंशाच वर्तमानाला। कवळी दूर स्थानाला। नेवूनि तिचा विवाह करी ॥४३॥ अलंकारासह गृहीं येई। पिता ते काढुनी घेई। श्वशुरादिकांसी पाही। कळवी विचित्र वर्तमान ॥४४॥ कन्या विक्रयीं तत् पित्यानें। पांच वेळ धन लोभानें। लग्न केलें अधिधीनें। नेणती जन श्वशुरादी ॥४५॥ त्यांच ब्रह्माणीं गांवांत। पांचवा विवाह करित। चौथ्या पतीसी कळवीत। मृत वर्तमान तियेचें ॥४६॥ करितों खोटें कर्म। हें नेणें तो अधम। वाढे मनीं द्रव्य काम। अघोर कृत्या प्रवर्तला ॥४७॥ पापाचा घडा भरला। बुद्धि सुचे चौथ्या पतीला। सांगे आपुल्या पितयाला। स्त्री शोध करावा ॥४८॥ ऐकूनि तत्पिता। स्नुषा वृत्त पुसतां। ब्रह्माणी ग्रामीं येतां। प्रत्यक्ष देखे स्नुषेसी ॥४९॥ ती पंचमपती घरीं। बैसली होती द्वारीं। पाहूनिया तो झडकरी। तिज समीप धावलां ॥५०॥ त्याणें तिला धरून। दागिनें घेतलें काढून। बोभाटा झाला पूर्ण। त्या नोवरी विषयींचा ॥५१॥ चतुर्थ वर पित्यानें। नेलें काढूनि दाग दागीनें। पाहुनी पंचम श्वशुरानें। काय केलें ते ऐंका ॥५२॥ पंचम वरा होऊनी आघात। दुर्दैवें मृत्यू पावे अकस्मांत। केशवपन विधियुक्त। करिती तिचें श्वशुरादि ॥५३॥ पत्र लिहूनिया कळविती। तिच्या प्रथम नवऱ्याप्रती। तो आला सत्वर गती। स्त्रिये लागीं न्यावया ॥५४॥ गावीं नेण्याचा विचार। करी तिचा प्रथमवर। केंस राखिलें सत्वर। वपन केलें असतांही ॥५५॥ गोष्ट कळली स्वामींसी। बोलविती तयासी। म्हणती ही गोष्ट परियेसी।

योग्य नव्हें सर्वथा ॥५६॥ सप्तपदीं झाल्यावरी। पुनर्विवाहा अयोग्य नो वरी। पुन्हः ऐंसे केलें तरी। कन्या पतीत जाणावी ॥५७॥ पंक्ती बाहेर करावी। ती भ्रष्ट समजावी। तिशीं जो लग्न लावी। तोही पतित जाणावा ॥५८॥ त्याचाही त्याग। केला पाहिजे सवेग। धर्मशास्त्र सांगे चांग। तुम्हीं जाणत असा कीं ॥५९॥ पांच वेळ विवाह। होऊनी जाहली धर्मबाह्य। तिचा धरूनिया मोह। घरीं जरी नांदवाल ॥॥६०॥ तरी तुम्हीं ही व्हाल पतित। सांगतो हें शास्त्रोक्त। ऐंसे भाषण यथार्थ। ब्राह्मणानें ऐकिले ॥६१॥ म्हणे स्वामी आज्ञापिती। तैंसाच वागेन निश्चिती। परी या स्त्रियेप्रती। आपुल्या घरीं नेईन ॥६२॥ ना तरी इचे माता पिता। पुन्हः करितील नीचता। पृथकपणें घरी ठेवितां। भीति कदा न राहे ॥६३॥ ऐंशापरी सांगून। स्वामीसीं करी नमन। तिचा संबंध तोडून। दुजी कन्यापर्णी तसे ॥६४॥ अति लोभ हानिकारक। हे येथें वर्णिलें चोख। धर्मशास्त्र ही देख। प्रसंगानें वर्णिलें ॥६५॥ विस्तार झाला बहुपरी। शीण न मानावा अंतरीं। सार काढुनी चतुरीं। समाधान मानावें ॥६६॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। षोडषोध्याय गोड हा ॥

## ।। अध्याय सतरावा ।।

।। श्रीगणेशाय नमः ।। श्री गुरुभ्यो नमः ।। श्रीगुरुचें अगाध महिमान। किती वर्णाचें वाचें जाण। वेदशास्त्रा पडे मौन। काय मतिमंद जाणेल ।।१ ।। स्वामी रेवातटीं मार्ग क्रमित। येती नेमावर क्षेत्रांत। रेवा नाभिस्थान विख्यांत। लिंग सिद्धेश्वर जाणा ।।२ ।। तेथें राहुनी कांहीं दिवस। पुन्हः निघती यात्रेंस। मंडलेश्वरादि स्थानें विशेष। रेवा तटीं पाहती ।।३ ।। नेमाड प्रांतीं चिखलदा ग्राम। तयास्थानीं करिती मुक्काम। मनीं धरूनी कांहीं काम। एक ब्रह्मचारी आला ।।४ ।। विनंती करी स्वामीस। शिकवा म्हणे योगाभ्यांस। अधिकारानुरूप त्यांस। अभ्यास सांगती योगाचा ।।५ ।। पुढें आला सण दिपवाळी। स्वामीसी जाहला तयेवेळीं। उद्यांमज अभ्यंग घाली। ऐंसा श्रीदत्त दृष्टांत ।।६ ।। तो एकूनिया जाणा। स्वामींनीं केली प्रार्थना। मी संन्याशी आपणां। अभ्यंग कैंसे घालावें ।।७ ।। स्पर्श न करी अग्नीस। भिक्षें वांचुनी अन्यास। याच ना न करी खास। श्रीस ठाऊकें असेची ।।८ ।। स्नान घालावया जाण। उष्णोदक आणूं कोठून। नित्या प्रमाणें स्नान घालीन। करीन पूजन भस्मानें ।।९ ।। ऐंसे बोलूनि तयेवेळीं। दुजें दिनीं प्रातःकाळीं। स्नान करिती नर्मदा जळीं। नित्याप्रमाणें महाराज ।।१० ।। जाऊनिया विप्रसदनीं। भिक्षा आणिती माध्यान्हीं। श्रीदत्त मूर्ति नयनीं। पाहतां न दिसें समीप ।।११ ।। मूर्तिसी नैवेद्य दिल्या वांचून। सेवन न करीती भिक्षान्न। ते समयीं पाहतां जाण। मूर्ति कोंठेंही नाढळे ।।१२ ।। नर्मदेवरी भिक्षान्न। नेऊनि भाग करिती अर्पण। तोरूदन शब्द मंद जाण।

कर्ण पथें ऐकिला ॥१३॥ कोण रडत असावें। ते जावूनि पहावें। मनीं आणूनि ऐंसे बरवें। पुढें जाती महाराज ॥१४॥ रुदन शब्द धोरण। ठेवूनि किनारीं जाण। करितां मार्ग आक्रमण। तो नवल देखिलें ॥१५॥ नर्मदे माजीं घनदाट। प्रकाश पडला अचाट। न करितां बोभाट। स्वामीं आंत उत्तरलें ॥१६॥ दृष्टी पडला प्रकाश। तेथें पाहती सावकाश। देखतें झालें मूर्तिस। काढिली वरती प्रेमानें ॥१७॥ स्वयें प्रार्थना करून। म्हणती मी बालक अज्ञान। अपराध पोटीं घालून। चलावें आतां मज सवें ॥१८॥ लावूनि सुगंधादिक तेल। घालितों स्नाना उष्ण जल। स्वीकारा अभ्यंग निर्मल। मंगलधामा जगदीशा ॥१९॥ वंदूनी श्रीदत्त मूर्तिसी। घेऊनी आले स्वस्थानासी। अभ्यंग घालूनि तियेसी। षोडशोपचारें पूजिली ॥२०॥ ऐकूनिया ग्रामस्थ जन। करिती मनीं आश्चर्य जाण। म्हणती धन्य उपासना सगुण। महाराजांची असे कीं ॥२१॥ धन्य स्वामी उपासक। आश्चर्य मानिती सकळ लोक। सगुण मूर्तिनें देख। लीला ऐंशी दाविली ॥२२॥ अठराशें अठरा शकाब्द। दीपावळी सण प्रसिद्ध। झाला चमत्कार विशुद्ध। तो वदलें-लोकांप्रती ॥२३॥ पुढें निघूनि सत्वर। तिलक वाडा ग्राम रुचिर। पाहुनी तेथ साचार। चातुर्मास राहिलें ॥२४॥ शके अठराशें एकोणवीस। सालीं या ग्रामीं विशेष। वास करिती चातुर्मास। रेवा तट पाहुनी ॥२५॥ जनांस सद्बोध करिती। धर्म मर्यादा शिकविती। अश्विन मासीं शुद्ध तिथी। एकादशीस निघालें ॥२६॥ मणि नागेश्वर दर्शन। रेवा ओर संगमीं स्नान। कुंभेश्वरा वंदून। आले गंगनाथ महादेवा ॥२७॥ तेथूनि श्रीव्यासाश्रमा

येती। शुक योगिंद्रा वंदिती। अनसूया दर्शन घेती। स्तुती करिती अनुसयेची ॥२८॥ अथ अनसूया स्तोत्र प्रारंभः - ॥ पतिव्रता शिरोरत्न भूतां सुंदर विग्रहा। सुचरित्रा दिव्य तेजः सर्व लोक नमस्कृता ॥१॥ विष्णु प्रपौत्रीक पौत्री सती कर्दम पुत्रिका। देवहूती समुत्पन्ना सुमुखी कपिल स्वसा ॥२॥ अत्रिपत्नी महाभागा दयाक्षांत्यादिभूषिता। अनसूया वेदगेया निजधर्म जिता खिला ॥३॥ श्रीदत्तात्रेय जननी चंद्रमाता मनस्विनी। दूर्वासोजन यित्रिशा जगत्संकट वारिणी ॥४॥ चतुर्विंशति नामानि मंगला निपराणिच। पाव नान्यनसूयापादत्तमातुः पठेन्नरः ॥५॥ त्रिकाल मेक कालंवा श्रद्धाभक्ति समन्वितः। तस्य धर्मे रुचीदत्त भक्ति मुक्ति क्रमाद्भवेत ॥६॥ इति अनसूया स्तोत्र संपूर्णं॥ मग शिनोर ग्रामीं येऊन। मार्गंडेश्वर दर्शन। करितां एक गुर्जर ब्राह्मण। गांडा नामक पातला ॥३५॥ विनयें वंदून स्वामीस। म्हणे शिकवा योगाभ्यास। हा भवच्चरणदास। यास उदास न करावें ॥३६॥ सद्गुरु चरण प्राप्त। कधीं होई न कृतार्थ। मनीं तळमळ होती बहुत। ती शांत जाहली ॥३७॥ सद्गुरूच्या प्राप्तींसाठीं। बहुत केली आटाआटी। जाणूनि सद्गुरुनीं मजसांठीं। धांव घेतली वाटतें ॥३८॥ धन्य आजिचा सुदिन। घडलें सद्गुरु रायाचें दर्शन। सकळ दोष दाऊन। पावन झालों निर्धारें ॥३९॥ घालूनि साष्टांग नमस्कार। विनवीतसे वारंवार। आतां माझा अव्हेर। न करावा हें मागतो ॥४०॥ आपुल्या दासामाजीं। मज मिळवावा सहजी। ही विनंती असे माझी। अंतरांत जाणावी ॥४१॥ तयाला घेऊनी बरोबर। निकोरा ग्रामीं येती सत्वर। जाणूनि तयाचे अंतर। योगाभ्यास

सांगती ॥४२ ॥ त्या शिष्यासह वर्तमान। नर्मदातीरीं आक्रमण। करीत शुक्लतीर्था येऊन। राहती सुक्षेत्र पाहुनी ॥४३ ॥ मग त्या शिष्यास सांगती। माता पित्यासी भेटूनि निश्चिती। आज्ञा घेऊन सत्वर गती। येई द्वारका क्षेत्रांत ॥४४ ॥ तया ठाईं चातुर्मास । करणें असें आम्हांस। ऐंसे सांगूनि तयास। आपण तेथुनी निघालें ॥४५ ॥ गिरनार पर्वतीं जाऊनी। श्रीदत्तात्रेया वंदुनी। प्रभास पाटण क्षेत्रां पाहुनी। सोरटी सोमनाथां पातलें ॥४६ ॥ तेथूनि प्राची सरस्वती। तटीं स्वामिराज येती। नंतर सुदामा पुरी प्रती। येऊनी राहती अल्पकाळ ॥४७ ॥ येणें परी यात्रा मिषें फिरत। अठराशें वीस शकाद्बांत। ज्येष्ठमासीं द्वारका क्षेत्रांत। स्वच्छंदेसी पातलें ॥४८ ॥ क्षेत्रस्थजनांला आनंद झाला। म्हणती आतां या स्थळाला। अवश्य पाहिजे वास केला। चतुर्मास वरी स्वामींनीं ॥४९ ॥ तेथें जनाग्रहास्तव। वास करिती स्वामीराव। तेणें आनंदलें सर्व। क्षेत्रवासीं नरनारीं ॥५० ॥ या द्वारका क्षेत्रांत। प्राकृता वरीं संस्कृत। श्रीगुरुचरित्र रचित। दत्ताज्ञेसी मानुनी ॥५१ ॥ तेथील शारदा मठाचें। आचार्यत्व पत्करावें साचें। ऐंसे मत ग्राम वासियांचें। परी ते अमान्य करिती ॥५२ ॥ सर्वांना उपदेश करून। चातुर्मास होतां पूर्ण। स्वामींनीं मार्ग क्रमण। आरंभिलें एकाएकीं ॥५३ ॥ राजकोट नगरीं येती। कांहीं दिवस करूनि वस्ती। सदुपदेश जनाकरिती। तेथूनि येती सिद्धपुरीं ॥५४ ॥ राहती हटकेश्वर मंदिरीं। चातुर्मास होय तोंवरी। एक यतिराज अवधारी। तयास्थानीं पातलें ॥५५ ॥ नाम बंबं महादेव सरस्वती। पाटण मुक्कामाहूनि येती। आम्हां ऐकवा म्हणती। रूद्रभाष्य उत्तर मिमां-

सा ॥५६॥ त्यांच्या आग्रहें करून। भाष्य मीमांसा करविलें श्रवण। दर्शनार्थ बहुत जन। जमती यती ब्रह्मचारी ॥५७॥ त्यांत एक ब्रह्मचारी। कर्नाटक देशस्थ अवधारी। दर्शनार्थ मंदिरीं। नियमानें जाणा येतसे ॥५८॥ तो बदरिकाश्रमीं जाऊन। गंगोत्री केदार नारायण। दर्शन करूनि येऊन। राहिला होता मंदिरीं ॥५९॥ त्या संग्रहणी आजार। होऊनि तयाचें शरिर। अशक्त झालें असे फार। कोणी परामर्ष न घेती ॥६०॥ हें तेथील पुजाऱ्याला। कळतां तो महाराजांला। सांगे त्याच्या वर्तमानाला। तेवेळीं श्रीगुरूसांगती ॥६१॥ ऐंशा अभ्यागताची। व्यवस्था झाली पाहिजे साची। एतदर्थ मंडळीची। अवश्य मदत पाहिजे ॥६२॥ नंतर मंडळीची भक्ती। पहावया योजिती युक्ती। सायंकाळीं दर्शनाप्रती। जमले असतां ग्रामस्थ ॥६३॥ एका ब्राह्मणाकडे पाहून। म्हणती धर्म शाळेंत जाण। ब्रह्मचारी विकळ होऊन। पडला असे संग्रहणीनें ॥६४॥ त्याची तुमच्या हांतून। व्यवस्थान होय अझून। त्याची शुश्रुषा जाण। तुम्हींच केली पाहिजे ॥६५॥ पंधरा दिवस पर्यंत। त्याची व्यवस्था ठेवा सतत। ऐंसे स्वामी बोलत। ऐकिले तें सर्वांनी ॥६६॥ परी त्यांतील कोणीही। शब्द न बोलती एकही। तों एक ब्राह्मण लवलांही। उठूनि उभा राहिला ॥६७॥ तेणें ब्रह्मचाऱ्यासी। नेलें आपुल्या गृहासी। शुश्रुषा चालविली अहर्निशीं। अत्यादरेंची करुनी ॥६८॥ पंधरा दिवस भरतां पूर्ण। ब्रह्मचाऱ्या समीप येऊन। स्वामी बोलती जाणून। पुढील भविष्य तयाचें ॥६९॥ अरे तुझीया जवळ। असें जें का गंगाजळ। मार्जन करूनि सकळ। प्राशन करी आदरें ॥७०॥ ऐंसे श्रींचे वचन ऐकून। त्वरित

करितां झाला मार्जन। प्राशनही करून। मुखें दत्त नाम उच्चारी।।७१।। महाराजाकडे पाहून। त्याणें देह सोडिला जाण। अंती सत्पुरुष दर्शन। होतां निर्वाण पदपावें।।७२।। हा चमत्कार पाहून। जना झाली आठवण। स्वामीं बोलिलें होतें जाण। व्यवस्था ठेवा म्हणूनी।।७३।। ते दिवस आज भरले। पंधरा पूर्ण जाहले। भविष्य होतें जाणिलें। म्हणूनि कथिलें होतें तैं।।७४।। त्या अनाथ प्रेताचा संस्कार। करिती ब्राह्मण सत्वर। सायंकाळीं विप्र समग्र। येती श्रीगुरुदर्शना।।७५।। मंडळीं बैसलीसें पाहून। श्रीगुरु बोलती वचन। तुम्हीं येथें नित्य येऊन। शास्त्र श्रवण करितसां।।७६।। परी तुमच्या मनीं दयेचा। विवेकाचा व प्रेमाचा। लवलेशही नसे साचा। पुण्य संग्रह कैंचा मग।।७७।। दया शांती विवेक। परोपकार बुद्धीं देख। जयातें नाहीं ठाऊक। जगीं जिणे व्यर्थ तयाचें।।७८।। त्याणें जरी केले नित्य कर्म। सांभाळूनी राहिला धर्म। तरी त्याचें पुण्यकर्म। व्यर्थ गेलें जाणावें।।७९।। मग संग्रह व्हावा कोठून। कैशी ईशकृपा व्हावी जाण। यासाठीं गृहस्थे जाण। आदर करणें अतिथीचा।।८०।। शक्त्यानुसार सेवा करावी। तत्कृपा संपादावी। ईशभक्ती आदरावी। तरीच गृहस्थाश्रमधन्य।।८१।। ऐंसे महाराजांचे भाषण। ऐकूनि लज्जित झालें जन। म्हणती अपराधी अहोंपूर्ण। क्षमा करणें आम्हांसी।।८२।। या उपरी आम्हांकडून। ऐंसा अपराध न होय चुकून। सद्‌गुरो कृपा छत्र पूर्ण। आम्हांवरी असावे।।८३।। ऐंसे म्हणूनि वारंवार। करूनिया नमस्कार। मग जाती घरोघर। पश्चात्तापा

पाऊनी ॥८४॥ या सिद्ध पुरांत एक ब्राह्मण। होता स्वामी भक्त जाण। डाकोरजीची पूजा करून। राहे त्याच मंदिरीं ॥८५॥ कृष्णंभट्ट त्याचें नाम। केवळ भक्तिवान उत्तम। त्याला दुर्जन समागम। बहुत बाधक झालासे ॥६८॥ त्या समागमें करून। तो गांजा ओढी निशींदीन। दुजें काहीं न सुचे जाण। गुंग झाला त्या नादीं ॥८७॥ ऐंशी पाहुनिया स्थिती। त्याची स्त्री झाली कळविती। सकळ वर्तमान स्वामी प्रती। म्हणे सांगा कांहीं मत्पतीतें ॥८८॥ ऐंशी ऐकूनी तियेची विनंती। पती कंठी बांधाया प्रती। एक ताईत मंत्रूनी देती। तिये जवळी महाराज ॥८९॥ आणीकही खावयासी। गोळया देती तिजपाशी। तिनें त्या आणूनि गृहासी। दिल्या पतीशी सेवाया ॥९०॥ स्वामीचें नांव सांगून। कंठी ताईत बांधी जाण। म्हणे गोळया करा सेवन। महाराजांनी दिल्या असती ॥९१॥ ऐकतां सद्गुरूंचे नांव। मनीं ठेवूनि दृढभाव। तो गोळया सेवी सर्व। ताईत ही आदरिला ॥९२॥ असो श्रीगुरु दर्शनार्थ। एके दिनी येतो भक्त। तया पाहूनि अकस्मांत। श्रीगुरु पुसती कसें काय ॥९३॥ त्यावेळीं तो लज्जेने। स्वामी पदातें वंदूनि म्हणे। या चरणाच्या कृपेनें। उत्तम स्थिती लाधलों ॥९४॥ आतां श्रीनीं कृपा करणे। मम हस्तें सेवा घेणें। एवढें असे मागणें। चरणापाशीं दासाचें ॥९५॥ तेथूनि पुढें त्वरित। स्वामी राज कृपावंत। नर्मदा तटीं मार्क क्रमित। डाकूर क्षेत्रीं पातलें ॥९६॥ जाऊनिया शिनोर ग्रामीं। रेवातटीं

पुण्य भूमी। राहती तिलक वाडाधामी। दुष्काळ दिन पाहुनी ॥९७॥ तेथें महामारीचा आजार। होता फार जोरावर। त्यामुळें औषधोपचार। पुसती लोक तेथिंचें ॥९८॥ श्रीगुरु उपचार सांगती। गूण सकलां येई निश्चिती। पाहूनि त्यांची प्रसन्न मूर्ति। जन अंतरीं सुखावले ॥९९॥ तेथील लोकाची भक्ती। जडली श्रीच्या पदाप्रती। काशी विश्वेश्वर हीचमती। त्यांच्या अंतरीं बाणली ॥१००॥ पुढील कथा प्रसंग अष्टादशीं वर्णिला सांग। गुरुपदीं होवूनि गुंग। श्रवण करा भाविक हो ॥१०१॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृते। गोपाळबुवा विरचिते। सप्तदशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥ श्रीगुरुदेवदत्त॥

* * *

## ॥ अध्याय अठरावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्री गुरुभ्यो नमः॥ जया श्रीगुरूचे पाठबळ। त्याची इष्ट कार्यें सकळ। होवूनिया उतावेळ। गुरु माऊली करीतसें॥१॥ तिलकवाडा ग्रामीं देख। स्वामीचें भक्त अनेक। त्यांत कबाडी दादा देख। भाविक भक्त रहातसें॥२॥ सात्विक गुणसंपन्न। साधुसेवा करी जाण। तया एक पुत्र गुणवान। विद्याभ्यास करीतसें॥३॥ तो विद्येंत मागे पडला। पाहूनि दुःख होई कबाडी दादाला। नमस्कारूनि म्हणे स्वामीला। पुत्र पत्रिका पहावी॥४॥ श्रीगुरु पाहूनि टिपणासी। सांगती कबाडी दादासी। भाग्यहीन पुत्र परियेसी। परी उपाय सांगतों॥५॥ पुत्रादेतो मंत्र सांगून। त्याचा श्रद्धापूर्वक जाण। जप करितां निश्चयें करून। खास भाग्योदय होईल॥६॥ मग पुत्रातें मंत्र सांगती। तो जप करितां निश्चिती। त्याची अल्प दिवसां अंती। झाली पूर्तिमन कामना॥७॥ मग तेथूनि मार्गक्रमिती। राजकोट नगरां येती। कांहीं दिवस वास करिती। भक्त जनां कारणें॥८॥ तेथ आर्य समाजाचा। स्थापन कर्त्या स्वामीचा। दयानंद सरस्वतीचा। अनुयायी वादार्थ पातला॥९॥ महाराज म्हणती तयास। तुमचे तेज न पडे खास। तरी मार देऊनि आम्हांस। इच्छा पूर्ण करावी॥१०॥ ऐंसे म्हणूनि आपुलें। मुख त्यांनीं पुढें केले। तो मंडळींनीं पाहिलें। आलें धांवत झडकरी॥११॥ तो पळतसें सवेग। मंडळीं करिती पाठलाग। स्वामी म्हणती त्यावरी राग। करूं नका कोणीही॥१२॥ त्याणीं जरी मारिलें। तरी पाहिजे सहन केलें। टाकी घाय दगडें सोशिलें। म्हणूनि देवत्व पावला॥१३॥

जनाचे सोशी आघात। तोचि जाणावा संत। सर्वांभूतीं श्रीदत्त। ओतप्रोत भरलासें ॥१४॥ असो एक मणी शंकर नामक। गृहस्थ उदास झाला देख। म्हणे मी असे निपुत्रिक। स्वामींनीं कृपा करावी ॥१५॥ स्वामी म्हणती तयास। पूर्वि सर्प मारिलास। त्या दोषे पुत्र होण्यास। प्रतिबंध तुज येतसे ॥१६॥ दोष परिहारास्तव। सांगतों तुज उपाव। मनीं ठेवितां भक्तिभाव। मनोरथ पुरवील ॥१७॥ ऐकूनि स्वामींचे वचन। विनवी कर संपुट जोडून। जैंशी आज्ञा मज लागून। होईल तैंसा वागेन मी ॥१८॥ मग उपाय कथियेला। आचरितां तनय झाला। मनीं परम संतोषला। म्हणे कृपाप्रसाद स्वामीचा ॥१९॥ या प्रमाणें कित्येक। जन कामना अनेक। पूर्ण करूनि देख। येती चिखलदा ग्रामीं ॥२०॥ रेवा तीर उत्तम। पाहूनि चातुर्मास मुक्काम। करितां तें वैकुंठ धाम। ग्रामस्थ भक्तां जाहलें ॥२१॥ तेथें दोघे गृहस्थ। स्वामी लागीं विनवीत। एक कर्नाटक देशस्थ। ख्यात आप्पा नामक ॥२२॥ दूजिया नाम व्यंकट। म्हणती जोडूनि कर संपुट। जेणें प्राप्त वैकुंठ पीठ। ती वाट आम्हां दावावी ॥२३॥ त्यांना योगाभ्यास सांगती। चातुर्मास वरी राहती। जना लागी संबोधिती। निज अमृत वेचें करूनी ॥२४॥ तों तुझे गुरू उज्जनींत। आजारी असती बहुत। तूं जाई त्वरित। सेवा करावया कारणें ॥२५॥ श्रीदत्त दृष्टांत येणेपरी। होतां स्वामी निघालें पादचारी। आप्पा शिष्या झडकरी। पुढें पाठविलें सेवेला ॥२६॥ पायानें मार्गक्रमण। करिती सत्वर आपण। उज्जनी मुक्कामीं येऊन। राहती तत्पर गुरु सेवे ॥२७॥ किंचित्काळ तेथें राहती। श्रीगुरु सेवा स्वहस्तें करिती।

आरोग्य होता बा गुरुप्रती। आज्ञा घेऊनी निघालें॥२८॥ महत्त पुरीं चातुर्मास करिती। श्री दत्ताज्ञे निश्चिती। दत्त महात्म्य रचिती। संस्कृत ग्रंथाधारें॥२९॥ ग्रंथसंख्या जाण। पांच हजार पूर्ण। ग्रंथाचें अवलोकन। भाविक जन करिताती॥३०॥ गालव पुरच्या नृपाचें। गुणा छावणी नांवाचें। लष्करी ठिकाण असे साचें। तेथें सरकारी वैद्य असे॥३१॥ विश्वनाथ ताटके नाम। शास्त्र वैद्य असें उत्तम। उपचार करी परमोत्तम। भक्त असें स्वामींचा॥३२॥ फोड उठला त्याच्या पायासी। वाढत चालला दिननिशीं। वेदना होऊनी तयासी। आंतूनि सडूं लागला॥३३॥ तो रोग पाहून। तयासी वैद्य बोलती जाण। पाय कांपिल्या वाचून। न होय बरवा कदापी॥३४॥ तो म्हणतसे तयांना। माझा श्रीगुरु असे जाणा। त्यांच्या कृपेनें रोग नाना। बरें झालें लोकांचे॥३५॥ त्यांचे आज्ञेशिवाय। कापणार नाहीं पाय। जरी झाला अपाय। तरी सोशीन निर्धारें॥३६॥ त्यांचे ऐकूनि वचन। सर्व वैद्य हंसती जाण। तुझ्या गुरुसी खूण। कैंसी कळे रोगाची॥३७॥ ऐंसे होय तो बहुदिन। गेले पाय चालला सडून। दुःख भोगीतसे दारूण। कांहीं उपाय चालेना॥३८॥ श्रीगुरुचा नसे पत्ता। म्हणे भोग न सरे आतां। न कळें ईश्वरीं सत्ता। काय होणार असेल ती॥३९॥ जरी श्रीगुरु येथें असते। उपाय करिती रोगातें। माझा पाय बरा करिते। संशय नसेची॥४०॥ परी मी आतां काय करूं। प्रारब्धाचा चमत्कारू। केंव्हा कृपा करील श्रीगुरु। करुणा सागरूं मजवरी॥४१॥ ऐंशी

भाकीतसे करूणा। तों वर्तमान कळलें जाणा। स्वामी महत्तपुरीं जाणा। क्षिप्रा किनारीं असती पैं ॥४२॥ ऐंसे कळतां वर्तमान। महत्तपुरीं आला जाण। साष्टांग करूनिया नमन। अश्रूं नेत्रांतुनी ढाळीतसे ॥४३॥ म्हणे श्रीचरणाचें दर्शन। सकल दुःख नाशक पूर्ण। यास्तव मम दुःख निराकरण। होईल म्हणूनि पातलों ॥४४॥ ऐंसे बोलुनी फोड दाखवी। नमस्कारूनि पुन्हः विनवी। म्हणे स्वामींनीं कृपा करावी। दासावरी आपुल्या ॥४५॥ स्वामी म्हणती तयासी। रोग नाश व्हावयासी। औषध देतां दुसऱ्यांसी। तुम्हां हे काय झालें ॥४६॥ पायासी शस्त्रें कापून। बरा करावा कीं जाण। ऐंसे ऐकूनि भाषण। वैद्य पुन्हः म्हणतसें ॥४७॥ केले बहुत उपाय। परी रोग वाढत जाय। आतां महाराजांचें पाय। अपाय माझा चुकवोत ॥४८॥ मग श्रीगुरु म्हणती वैद्यासी। अनुष्ठान करावयासी। सांगतों तें करा निश्चयेसी। पायास पोटीसही बांधीत जा ॥४९॥ तेणें बरा होईल पाय। दत्तपदीं ठेवा निश्चय। तो वारील अपाय। ऐंशा संकट समयासी ॥५०॥ मग सांगती अनुष्ठान। करवा ब्राह्मणांकडून। श्री आज्ञेप्रमाणें जाण। एक मास करविलें ॥५१॥ पाय पूर्ववत् झाला। वैद्य मनीं संतोषला। आला आपुल्या स्थानाला। आज्ञा घेऊनी स्वामींची ॥५२॥ त्यासी इतर वैद्य पुसती। तुमचा पाय कोणे रिती। बरा झाला तें आम्हांप्रती। सविस्तर सांगावें ॥५३॥ दैवे श्रीगुरुची गांठ पडली। तत्पदीं माझी

मती जडली। कृपा करूनिया भली। उपाय मज कथियेला॥५४॥ तेणें न लागतां सायास। पूर्वरूप प्राप्त झालें पायास। बोलिलों होतो तुम्हांस। अनायासें घडूनि आले॥५५॥ ऐंसे म्हणूनि वारंवार। करी सद्गुरु नामोच्चार। इतर वैद्य बोलती सत्वर। श्रीगुरु दर्शन आम्हां करवा॥५६॥ दर्शनें आम्हीं पवित्र। होवूनि निवतील नेत्र। दर्शन करविण्याचें मात्र। श्रेय तुम्हीं संपादावे॥५७॥ तो म्हणे तयांना। माझ्या हातीं नाहीं जाणा। ते स्वच्छंदे करिती तीर्थाटना। दर्शन दुर्लभ तयांचे॥५८॥ ऐंशा प्रकारें वैद्याचा। मंत्र प्रयोगे पायाचा। रोग बरा झाला साचा। त्या महत्तपूर ग्रामांत॥५९॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृते। गोपाळबुवा विरचिते। अष्टदशोध्याय गोड हा॥ श्रीगुरुदेवदत्त॥

* * *

## ॥ अध्याय एकोणीसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ जयावरी झाली सद्गुरु कृपा। तयाच्या जनन मरण खेपा। चुकल्या येथ आक्षेपा। घ्यावयाचे प्रयोजन नसें ॥१ ॥ असो कार्तिक शुद्ध पौर्णिमेचें। ग्रहण स्नान करूनि क्षिप्रेचें। मार्गक्रमण करावयाचे। ऐंसा संकल्प स्वामींचा ॥२ ॥ तत्पुर्विंच श्रीदत्त। देऊनिया दृष्टांत। आज्ञापिती त्वरित। जावया गंगा किनारीं ॥३ ॥ ते करूनि प्रार्थना। म्हणती संकल्प केला जाणा। स्नान करूनिया ग्रहणा। पुढें जावया निघेन ॥४ ॥ श्रीदत्ता ही प्रार्थना। नरुचली म्हणूनि पुन्हः। दृष्टांती सांगती स्वामींना। गंगा तटाकीं जावया ॥५ ॥ तो न मानूनिया दृष्टांत। राहती तैंसेची तेथ। त्या रात्रीं सर्प करीत। दंश त्यांच्या पायासी ॥६ ॥ त्या सर्पाचे वीष। श्रीस देई अत्यंत त्रास। वीष लहरी क्षणोक्षणास। येऊनि मूर्छित पडती ते ॥७ ॥ बसती योगासन घालून। वीष लहरीसी जाण। नित्य कर्मापूर्ते पूर्ण। प्रतिबंध करिती योग बळें ॥८ ॥ परी त्यानंतर जाण। वीषलहरीं येती दारूण। मूर्छित पडती क्षणोक्षणास। तितुकें सहन करिती पैं ॥९ ॥ जरळी होते तिथे शिष्य। स्वामींच्या मुखें भाष्य। ऐकती करिती योगाभ्यास। नामें ऐका तयांची ॥१० ॥ गांडा बुवा व्यंकट चैतन्य। तिसरा आप्पा नामें जाण। स्वामीची स्थिती पाहून। दुखित होती मानसी ॥११ ॥ ते स्वामीसी बोलती। औषधोपचार करितो या प्रती। परी श्रीगुरु सांगती। या नादीं लागूं नका ॥१२ ॥ औषधोपचाराच्या नादीं जाण। लागू नका विनाकारण। ग्रहण स्नान करून। जातां सर्व परिहरे ॥१३ ॥ ऐंसी ही असतां

त्यांची स्थिती। नित्य कर्म न सोडिती। भक्त जनांस्तव सांगती। उपनिषद्भाष्य वेदांत ॥१४॥ कोणा औषधोपचार सांगती। कोणा योगाभ्यास शिकविती। कधीं दुःखींन दिसती। वर्तती देह साक्षी होऊनी ॥१५॥ निद्रिस्त जाहल्यावरी मात्र। स्वामी दिसती व्यथित। परी श्रीदत्त नाम पवित्र। उच्चारींत पहूडती ॥१६॥ येणेंपरी दशदीन। दुःख भोगिलें दारूण। ग्रहण स्नान करून। दुजे दिनीं भिक्षा करिती ॥१७॥ पुढें जावया निघाले। गांवा बाहेर येते झाले। तत्क्षणीं वीष शमन पावलें। नवल जाहले परी एक ॥१८॥ सर्प जो कां चावला। त्याचा विषारी दंत रुतला। महाराजांनी घेतला। आपुल्या चरणीं काढुनी ॥१९॥ जैंसे कालियाचें विशेष। श्रीकृष्णें काढुनी टाकिलें वीष। तेविं सर्पाचा दंतची निःशेष। स्वामीनीं काढूनि घेतला ॥२०॥ होतां संताची संगती। क्रोध वीष न राहे निश्चिती। सद्वासना उपजेचित्तीं। ऐंसी फलश्रुती संतसंगीं ॥२१॥ मग तेथें स्नान करूनि। गेले सारंग पुरा निघूनि। तिघा शिष्या दिले पाठवूनि। गुणा छावणी वैद्याकडे ॥२२॥ आपणही मार्ग क्रमित। त्या ठायीं येती त्वरित। जिव्हा छेदन करवीत। वैद्यापासुनी त्रिवर्गाची ॥२३॥ हा वैद्य स्वामींचा शिष्य। महाराजांना सर्प वीष। बाधक दंत विशेष। काढुनी टाकी पायातुनीं ॥२४॥ खेचरी मुद्राभ्यास। सांगूनिया त्रिवर्गास। म्हणती श्रीणता येईल तनूस। जाऊनी बसा योगस्थानीं ॥२५॥ शनैःशनैः अभ्यास। चालूं ठेवा रात्रंदिवस। आपण जातो ब्रह्मावर्तास। भागीरथी किनारीं ॥२६॥ ऐंसे सांगूनि मार्ग क्रमिती। वेत्रवती तिरीं येती। भेलसा ग्रामीं राहती। चातुर्मास वरी जाणा ॥२७॥ या

भेलसा ग्रामांतरीं। एक विप्र भक्त सहपरिवारीं। गोविंद पंडित नामधारी। रहातसे जाणपां ॥२८॥ त्यातें स्वामीं महाराजानीं। योगाभ्यास कथूनि। लाविला योग साधनी। भक्ती पाहुनी तयाची ॥२९॥ त्यांने समाधीपर्यंत योग। साधन करूनि साधिला चांग। श्रीगुरू चरणीं अनुराग। ठेवितां असाध्य तें काय ॥३०॥ असो पूर्ण करूनि चातुर्मास। स्वामी येती जालणवास। क्वचित्काळ करूनि वास। राहती तये स्थानीं जाणा। ।३१॥ तेथें दक्षिणी ब्राह्मणांत। जाहले होतें दोन तट। ते मोडूनि त्वरित। ऐक्यतां केली स्वामीनीं ॥३२॥ तेथून करिती मार्गक्रमण। गंगा तटा कातें लक्षून। येती ब्रह्मावर्ता जाण। अठराशें चौवीस सालीं ॥३३॥ तेथें सारस्वत ब्राह्मण। बदरीकाश्रमीं यात्रा करून। राहिला होता येऊन। विश्रांती स्थान पाहुनी ॥३४॥ गोपाळबुवा तयाचें नाम। श्रीगुरू भजन करण्याचा नेम। मनीं म्हणतसे सप्रेम। स्वामीसी पाहीन केधवां ॥३५॥ त्यानें महाराजांची किर्ती। जनमुखें ऐकिली होती। परी त्यांची साक्षात मूर्ति। देखिली नव्हती कधींही ।३६॥ म्हणे आपुल्या अंतःकरणीं। सद्दर्शन दुर्लभ भुवनीं। तें अनायासें बसल्या स्थानीं। होणार आजी निश्चये ॥३७॥ इतुक्या माजीं ग्रामीचें जन। सांगती शुभ वर्तमान। महाराजांचे आगमन। झालें येथे आतांची ॥३८॥ ऐकूनि त्याच्या आनंदाला। पारावार नाहींसा झाला। म्हणे पुण्य आले फळाला। धन्य आजिचा सुदीन पैं ॥३९॥ स्वामी बैसले राम मंदिरीं। त्यांना जाऊनि नमस्कारी। बोले इच्छा होती अंतरीं। फळली निर्धारीं ती आज ॥४०॥ स्वामीं दर्शनें झालो पावन। पाप संघ जळाला तूर्ण। श्रीदत्ते कृपा

केली पूर्ण। म्हणूनि चरण दर्शन झालें ॥४१॥ ग्रामस्थ लोक सकळ। बैसले श्रीगुरुमूर्ति जवळ। त्यांना तें क्षेमकुशल। पुसती सदय हृदयानें ॥४२॥ त्यांची प्रसन्नमूर्ति पाहून। जना वाटतसें जाण। साक्षांत श्रीदत्तची चालून। आला कीं काय या ठांया ॥४३॥ दंड कमंडलू शोभेकरी। काषायांबर अंगावरी। कौपीन कटी भस्म शरीरीं। तेजमुखांवरी झळकतसें ॥४४॥ सदा शोभे सुहास्य वदन। भक्तां करिती कृपावलोकन। मुखीं नाम नारायण। सदय अंतःकरण स्वामीचें ॥४५॥ सर्प वीष परिहार। गुरू सेवेचा घेतला भार। शिष्यां उपदेश सार। या अध्यायीं वर्णिलें ॥४६॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। एकोन विंशोध्याय गोड हा॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय विसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ ऐंशी महाराजांची मूर्ति। जे जन नयनीं पाहती। ते आपणां धन्य म्हणविती। समाधान पावती अंतरीं ॥१ ॥ त्यांची दिनचर्या जाण। प्रातःकाळीं करिती स्नान। नित्य कर्म सारून। विद्यार्थ्यांना शिकविती ॥२ ॥ वेदशास्त्र मंत्र तंत्र। उपनिषदें ज्योतिःशास्त्र। वैद्यक वेदांत पवित्र। अध्ययन करविती ॥३ ॥ माध्यान्हीं करूनिया स्नान। आन्हीक सर्व सारून। तदूपरी भिक्षान्न भोजन। नंतर विश्रांती दोन घटी ॥४ ॥ गीता भाष्य सांगती। श्रीमद्भागवत ऐकविती। चारही वर्णा पाजिती। बोधामृत आनंदें ॥५ ॥ सायंकाळीं स्नान करिती। श्रीपादुकेसी वंदिती। दर्शनार्थ लोक जमती। कुशल पुसती तयांना ॥६ ॥ कोणी करिती कीर्तन। कोणी करिती श्रीदत्त भजन। ते संपे पर्यंत पूर्ण। ऐकत बसती प्रेमानें ॥७ ॥ द्वारका मार्गि उपवास। घडले तेहतीस दिवस। नित्य वीस पंचवीस कोस। मार्क क्रमिती पायानें ॥८ ॥ खोबरे खारीक सेवन। तेणें उष्णतां अंगीं जाण। जडला विकार संग्रहणी। शरीर अशक्त जाहलें ॥९ ॥ बहिर्दिशे बहुत वेळ। जाऊनिया होती विकळ। दरवेळीं स्नान निर्मळ। करूनि प्रारब्ध भोगिती ॥१० ॥ वैद्य औषधें देती। परी स्वामी नाकारिती। फक्त तक्र प्राशन करिती। संग्रहणी शमनार्थ ॥११ ॥ उष्णोदकें करावें स्नान। म्हणूनि विनवीती ब्राह्मण। परी नायकती वचन। कटाक्ष थोर आचरणीं ॥१२ ॥ यथावकाशें कवित्व करिती। पदें अष्टकें श्लोक रचिती। कांहीं धर्ति संस्कृती। कांहीं प्राकृत भाषेंत ॥१३ ॥ असो स्वामी

तेथें असतां। योगाध्यासी शिष्य उभयतां। आण्णा व्यंकट चैतन्य तत्त्वतां। आले ब्रह्मावर्तासी ॥१४॥ रामचंद्र बुवा खेर नामक। तेथे महाराजांचा शिष्य एक। स्नान संध्या करूनि देख। मधुकर वृत्तीनें रहातसे ॥१५॥ शिरोळकर ब्राह्मण। शंकर शास्त्री नामें जाण। आला काशी क्षेत्राहून। स्वामी दर्शनार्थ ब्रह्मवर्ती ॥१६॥ तया ब्रह्म निरूपण। तदनु संधानें आख्यान। देती करावया कीर्तन। लिहूनिया स्वहस्ते ॥१७॥ रसाळ वाणीनें भागवत। स्वामीराज स्वतः सांगत। एकादशीस कथा होत। शिरोळकर विप्राची ॥१८॥ त्यानें तीन एकादशीस। कीर्तन केलें सुरस। राम मंदिरीं बहुवस। तत् श्रवणार्थ जन जमती ॥१९॥ तों कांहीं दिन तेथ राहुनी। स्वामीची आज्ञा घेऊनी। गेला काशी भुवनीं। शास्त्राध्ययन निमित्तें ॥२०॥ असो गोपाळ बुवासी। इच्छा उपजली मानसी। एकांती म्हणे स्वामींसी। हरी कीर्तन करीन ॥२१॥ तरी श्रीगुरु आज्ञा व्हावी। दास इच्छा पुरेल बरवी। सत्संग कायन करवी। मतिमंद सज्ञान होतसें ॥२२॥ गोपाळबुवाची विनंती। ऐकूनि सद्गुरुनाथ बोलती। श्रीहरीची कीर्तन भक्ती। यथा शक्ति करावी ॥२३॥ मग तो एक निरूपण। पाठकरी आख्यान। येतां एकादशीचा दिन। उभा राहे किर्तना ॥२४॥ गांवातील नरनारी। श्रवणार्थ येती मंदिरीं। दाटी झालीसे भारी। नवल परी पहावया ॥२५॥ लोक म्हणती हा कीर्तन। कसा करील उभा राहून। माधुकरी मागणारा जाण। कीर्तन ज्ञान या कैंचे ॥२६॥ धंदा करण्याचें ज्ञान। नसे अंगीं विद्या जाण। म्हणून निर्वाहा साधन। माधुकरी यानें पत्करिली ॥२७॥ न्यून बोलती लोक। परी स्वामी पद वंदूनी

देख। उभा राहिला देवा सन्मुख। मंगला चरण आरंभिलें ॥२८ ॥ पुढें निरुपण चालिलें। श्रवणार्थ जे बैसले। ते माना डोलवूं लागले। म्हणती कैंचे आले ज्ञान या ॥२९ ॥ गोपाळ बुवासी प्रथम प्रसंग। परी कीर्तनी भरला रंग। मंडळी ही झाली दंग। श्रीगुरु आशीर्वचन फळा आले ॥३० ॥ सत्संगे ज्ञानोत्पत्ती। होऊनि उपजे ईशभक्ती। अंतरीं वाढे विरक्ती। अंती सद्गती जीवासी ॥३१ ॥ मग तेथील मंडळींत। इच्छा चालली वाढत। स्वामीसी जोडूनी हात। वत्कृत्व शक्ती द्या म्हणती ॥३२ ॥ प्रेमें करावे हरी कीर्तन। ऐंसे मनीं वाटतें जाण। बाळकाचे लाड पूर्ण। कोण माते वीण पुरवील ॥३३ ॥ मग तें एकेकासी। लिहून देती निरूपणासी। त्याच परी आख्यानासी। साधारण रीतीनें ॥३४ ॥ ते करूनि पाठांतर। करिती कीर्तन नाम गजर। श्रवणा जमती नारीनर। त्या श्रीराम मंदिरीं ॥३५ ॥ आठ वर्षाच्या मुलानें। कीर्तन केले स्वेच्छेनें। सत्पुरुष कृपा कटाक्षानें। ज्ञान ज्योती उजळली ॥३६ ॥ क्षण मात्र सत्संग। तो करी अघभंग। देई निर्वाण पद अभंग। भव बंध छेदूनी ॥३७ ॥ पुढें आली श्रीदत्त जयंती। ब्राह्मण उत्सव करिती। समारंभे आरती धूपारती। ओवाळिती श्रीदत्तमूर्ति पुढें ॥३८ ॥ कीर्तन ब्राह्मण भोजन। शेवटीं ललित करिती मिळून। स्वामीं संगे रात्रंदिन। काल क्रमण करिताती ॥३९ ॥ ऐंसा आनंद चालूं असतां। स्वामी स्वप्नीं तीन देवता। येऊनी म्हणती आतां। सत्वर येथूनि जा कसें ॥४० ॥ आम्हीं ग्रामीं प्रवेश। करणार हे खास। यास्तव सांगतो जावयास। आम्हीं तुम्हां येथुनी ॥४१ ॥ त्याना स्वामी वदती। जरी श्रीदत्त आज्ञापिती।

तरी यांच क्षणाप्रती। स्थान सोडूं सत्वर ॥४२॥ तुमची आज्ञा आम्हासी। मान्य नाहीं परियेसी। जे असें तुमचे मानसी। ते सुखें करावे ॥४३॥ मंदिरांतील बाईसी। स्वामी सांगती दुसरें दिवशीं। मारिका आजाराची सांथ परियेसी। येणार येथे निश्चयें ॥४४॥ यास्तव सावध असा। देहाचा नाहीं भरवसा। येथें राहूं नका सहसा। जाऊनी रहा अन्य ग्रामीं ॥४५॥ ऐंसे स्वामीचें वचन। बाईनें करूनि श्रवण। इतरां सांगता जाण। लोक जागा सोडिती ॥४६॥ कांहीं अन्य ग्रामीं गेले। कांहींनी स्थान बदलिले। कित्येक तेथेंचि राहिलें। दत्त पदांबुज चिंतित ॥४७॥ उभय शिष्यापैकीं। एक शिष्य कर्नाटकी। त्या ग्रंथिक ज्वरें एकाएकीं। ग्रासिला ब्रह्मावर्तांत ॥४८॥ स्वामीनीं तयासी। मृत्यू लक्षणें परियेसी। पूर्वि सांगितली जैंसी। तैंसी दिसूं लागली ॥४९॥ अश्रूधारा चालल्या नयनीं। सद्गुरूसी विनवी जोडूनि पाणी। म्हणे मज भवत् हस्तें करूनी। संन्यास दीक्षा मिळावी ॥५०॥ माझी इच्छापूर्ण झाली। श्रीगुरु मूर्ति हृदयीं साठविली। देहाची माती झाली। तरी खेद न वाटे ॥५१॥ वचन ऐकूनि शिष्याचें। मन द्रवलें स्वामीचें। ब्राह्मण हस्तें त्याचें। सर्व कर्म करविलें ॥५२॥ दिला आतूर संन्यास। प्रेषोच्चार करविला सुरस। म्हणती पद्मासन घालूनि बैस। नारायण नाम उच्चारीं ॥५३॥ ध्यानीं आणूनी श्रीगुरूवचन। तैसाचि तो करी जाण। उच्चार करितां नारायण। प्राणोत्क्रमण झाले त्याचें ॥५४॥ या परी सद्गुरुपायीं। ध्यान ठेवूनी लवलाही। देह विसर्जला पाही। भाग्यापार नाहीं त्याच्या ॥५५॥ प्राण प्रयाण समयीं। जेणें श्रीमूर्ति हृदयीं। सांठविली त्याच्या

पायीं। ब्रह्मादि सुरगण लागती ॥५६॥ अथवा हरिभक्त मूर्ति। हृदयीं सांठविली पूर्ति। प्राण प्रयाण समयीं नेत्रीं। विलोकी तो धन्य धन्य ॥५७॥ धन्य त्याचा संसार। त्याची चुकली येरझार। त्या पाहूनि यमकिंकर। धाकें पळती दशदीशा ॥५८॥ असो या परी तयासी। सद्गती दिली परियेसी। पुढें स्वतः स्वमीसी। त्याच आजारे गांठिलें ॥५९॥ त्याचा त्रास एक दिवस। त्यांना झाला विशेष। सुख दुःख भोग देहास। आपण साक्षित्वें वागती ॥६०॥ श्रीगुरु चरित्राधारे संस्कृत। समश्लोकीं रचिती ग्रंथ। नित्य तीनशें श्लोक करित। श्रीदत्त दृष्टांत मानुनी ॥६१॥ तीन मास पर्यंत। ब्रह्मावर्त क्षेत्रांत। मनुष्यें नव्हतीं बहुत। नंतर ग्राम भरलासें ॥६२॥ असो त्या क्षेत्रांत। जनमनीं इच्छा बहुत। नाम सप्तेसात करित। यति आज्ञा घेऊनी ॥६३॥ दर सप्त्या अंती। नाम मंत्र बदलिती। विश्वेश्वर चरणीं मती। रत झाली सर्वांची ॥६४॥ हरी कीर्तन पुराण। नित्य करिती प्रेमें भजन। एवं होता सप्तदिन। ब्राह्मण संतर्पण करिती ॥६५॥ तेथ एक गृहस्थ थोर। माधवराव सुभेदार। प्रेमळ भक्त उदार। स्वामीं चरणीं मन ज्यांचे ॥६६॥ रात्रौ दीपोत्सव करिती। थाटानें होय आरती। ते आश्चर्य वदू किती। सकळ लोक सुखा-वले ॥६७॥ विश्वेश्वर मंदीर। त्या ठिकाणीं नाम गजर। भजनीं लोक हजर। राहती अती आदरें ॥६८॥ स्वामी राज मंदिरी येती। तीन घटका विराम करिती। त्यामुळें भाविका चित्ती। उत्साह अधीक होतसें ॥६९॥ नाम मंत्र रूचिर। खालीं लिहीलें साचार। ठेऊनिया शुद्धाचार। मंत्र प्रत्यही वाचावे ॥७०॥ शिवहर शंकर। गौरीशंकर। हा

नामोच्चार। पहिल्या सप्तकाचा ॥७१॥ हरे राम हरे राम। राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण। कृष्ण कृष्ण हरे हरे ॥७२॥ हा नामोच्चार। दुसऱ्या सप्ताही साचार। आतां तिसऱ्याचा विचार। सांगतो ऐका तुम्हातें ॥७३॥ श्रीपाद श्रीनृहसिंहस्वामी। श्रीमद्दत्तात्रेयनामी। नामोच्चार आठही यामी। करिती निष्कामी होऊनी ॥७४॥ गणेश गौरी हरनंदन। विघ्नविनाश गजानन। हा चवथ्या सप्ताहा पूर्ण। स्वामी नामोच्चार सांगती ॥७५॥ हरिहर गणपती भास्कर शक्ती। स्वरूप ईशो वरदो जयती। पांचवा सप्ताहा योजिती। हा नामोच्चार जाणा ॥७६॥ जय पुरुषोत्तम। शरणद सत्तम। हा नामोच्चार पुरुषोत्तम। यासी उत्तम सांगती ॥७७॥ पूर्व सप्ताही नामोच्चार। शिवहर शंकर गौरी शंकर। तोचि सातव्या निर्धार। योजिलासें स्वामीनीं ॥७८॥ दिगंबरा दिगंबरा। श्रीपाद वल्लभ दिगंबरा। ऐंशा नामोच्चारा। एके सप्ताही सांगती ॥७९॥ पुढें पातला जेष्ट मास। गंगोत्सव दहा दिवस। मनीं धरूनि हव्यास। पुन्हः सप्ताह आरंभती ॥८०॥ भागीरथी जप पावन गंगे। जान्हवी तारय पातक भंगे। नाम उच्चारिती अनुरागें। दशहार पर्वणी साधती ॥८१॥ शिशुना म्हणावया प्राकृत। पदें रचिली बहुत। करुणा अष्टकेंही रसभरित। केली असती स्वामीनीं ॥८२॥ ती साग्र जरी पाहणें। तरी गद्य ग्रंथ वाचणें। तेणें अंगी प्रेमबाणे। रसीकें अवश्य वांचावी ॥८३॥ पुढें श्रावण मास आला। जनमनीं मोद झाला। नित्य करिती कीर्तनाला। प्रेमळ भक्त आदरें ॥८४॥ निरुपण आणि आख्यान। स्वामी देती लिहून। दरदिनीं प्रत्येक जण। कीर्तन करी

सप्रेमें ॥८५ ॥ असो श्रावण मासांत। आख्यानें रचिली बहुत। बोध केला अमित। जना कारणें स्वामींनीं ॥८६ ॥ पुढें संपन्न जन। त्याणीं सामुग्री जमवून। सांगता कराया जाण। सिद्ध जाहले आदरें ॥८७ ॥ लोक ग्रामीं भिक्षा करिती। नानाविध पदार्थ जमती। प्रसाद म्हणूनि निश्चिती। बर्फि अर्पिली स्वामींनीं ॥८८ ॥ सर्व सिद्धतां करून। केले ब्राह्मण संतर्पण। तो प्रकार परिपूर्ण। उत्तराध्यायीं वर्णिला ॥८९ ॥ गुरु लाघव अपूर्व। वाचे न वर्णवे सर्व। मनुजें त्यजूनिया गर्व। सादर व्हावें गुरुपदीं ॥९० ॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। विंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय एकविसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ श्रीगुरु चरित्र अमृत धारा। सेवितां भव रोगा न थारा। लक्ष चौऱ्यांशी फेरा। चुके जन्म मरणाचा ॥१॥ धन्य आमुचें जिवित झालें। श्रीगुरु चरित्र ऐकविलें। श्रोते म्हणती वर्तले। पुढें काय ते सांगा ॥२॥ ब्राह्मण संतर्पणा सामान। यथेच्छ मिळालें जाण। सर्व एके ठाईं जमून। करिती आइती तयेवेळीं ॥३॥ द्विज पंक्ती बैसती। भोजन करूनि तृप्त होती। महाराज मधूनि फिरती। प्रत्येक ब्राह्मण संतर्पणी ॥४॥ हास्य वदनें विनोदी शब्द। बोलूनि सर्वांदेती मोद। नित्य नूतनानंद स्वाद। तेथील जन अनुभविती ॥५॥ सत्संगाचा महिमा। वर्णू न शके शेष ब्रह्मा। न पुरे द्यावया उपमा। नसे सीमा तयासी ॥६॥ ग्रामांतील सर्व लोक। कामे करिती अनेक। श्रीदत्त नामदेख। उच्चारिती प्रेमानें ॥७॥ तात्पर्य तेथील नरनारी। आबाल वृद्ध सारी दंग झाली नाम गजरीं। संसारांत असून ही ॥८॥ तांदूळ धुणा समान। सत्संगती असे जाण। मद्याचा मद उतरे पूर्ण। तांदूळ धूण पिताची ॥९॥ तेवि वासना मदिरेचा। उतरे कैफ लोकांचा। प्रभाव संत संगतीचा। महानुभाव सांगती ॥१०॥ सत्समागमे दुर्जनांत। आदर बुद्धिं उपजत। तो सुशील होय त्वरित। महानुभवा सांगती ॥११॥ ओलें लाकूड अग्नीवर। ठेवितां सुके सत्वर। जळूनिया तदनंतर। अग्नीरूप होतसें ॥१२॥ तेवी साधुसंगे जाण। जनमनांतील पूर्ण। ओलावा जातसे सुकून। लोभ काम वासनेचा ॥१३॥ नंतर विवेकाची ज्योत। अंतःकरणी उजळत।

वैराग्य उपजोनी त्वरित। ते संत होती निश्चयें॥१४॥ त्या ब्रह्मावर्तांत। विष्णुबुवा ब्राह्मण येत। ईश भजन करीत। राम मंदिरीं राहिला॥१५॥ त्यानें एके दिवशीं जाण। केले कीर्तन निरुपण। दुजे दिनीं पहाटें उठून। गेला ग्रामा बाहेरी॥१६॥ तिसरें दिवशीं धांवत। महाराजा समीपयेत। पुढें गडबडा लोळत। म्हणे कृपा करावी॥१७॥ स्वामी म्हणती तयासी। काय झालें तुजसी। कां लोळसी धरणीसी। सांग सकळ वृत्तातें॥१८॥ तो म्हणे महाराजांसी। उभा असतां कीर्तनासी। पर ललना पाहूनि मानसीं। दुष्ट वासना उपजली॥१९॥ यास्तव गेलो बाह्य देशी। शिक्षा करावया नेत्रांसी। रुईचा चीक परियेसी। भरिला यथेच्छ अविचारें॥२०॥ तेणें डोळे बंद झाले । माझें पाप मज फळलें। कैंसे प्रारब्ध ओढवले। सुचली बुद्धि विचित्र॥२१॥ स्वहस्तें पायावर। मारूनि घेतला प्रस्तर। कैंसा सुचला अविचार। नेत्री चीक भरण्याचा॥२२॥ स्वामीनीं कृपा करणें। नेत्रांसी औषध देणें। भवत्कृपा अवलोकनें। दृष्टीं मज मिळावी॥२३॥ म्हणूनि धरणीवर। लोटांगण घाली वारंवार। विनवी शीघ्र मजवर। कृपा दृष्टी करावी।।२४॥ महाराज म्हणती तयासी। शिक्षा करणें नेत्रांसी। तरी तूं ग्राम बाह्य प्रदेशी। किमर्थ गेलासी येथुनी॥२५॥ सुई भोसकुनी घेतासी। नेत्र फुटते सहजेसी। आटोकाट करण्यासी। काय प्रयोजन तुज होतें॥२६॥ कुबुद्धि उपजली मानसी। नेत्र दोष सांगसी। विवेकें वळवितां मनासी। साधन सुलभ हे होतें॥२७॥ नेत्र फोडण्याचें प्रयोजन। नव्हतें तुज लागून। साहस कर्म करून। काय फळ मिळालें॥२८॥ ऐकूनिया श्रीचे वचन। विनवी

कर जोडून। माय बाप आपण। अनुकंपा करावी ॥२९॥ स्वामीस माझी करुणा। न येईल तरी जाणा। आतांच देतो प्राण। काय उपयोग वांचुनी ॥३०॥ स्वामी जना सांगत। ठेव अंधार कोठडींत। भोजन देवूनि यथास्थित। परामर्ष घेत जा ॥३१॥ देतों औषध नेत्रांसी। डोळयांत घालितां परियेसी। चीक उष्णता सहजेसी। जलरुपें निरसेल ॥३२॥ मग स्वामी औषध देती। मंडळी व्यवस्था करिती। अंधार कोठडींत एकांती। नेऊनी ठेविती तयासी ॥३३॥ चार पांच दिन क्रमिलें। नेत्रांतुनी उष्णोदक गेले। विष्णुबुवा बाहेर आले। बोलत बैसले जनांसी ॥३४॥ उष्णतेनें नेत्र नाजुक। झालें प्रथम देख। त्यांत वाते रजःकण अनेक। शिरलें बाहेर बसतांची ॥३५॥ तेणें ते पुन्हः बिघडले। दृष्टी समंदत्व आलें। ग्रामस्थ विप्र म्हणती भले। त्यांना पाठवा औषधगृहीं ॥३६॥ मग कानपूर नगरीं। पाठवितें झालें सत्वरीं। सेवेस्तव एक ब्रह्मचारी। बरोबरी देती तयाच्या ॥३७॥ त्याचे नांव व्यंकटेश। पवित्र राहे रात्रंदिवस। स्वामीच्या सत्संगास राहिला तो येऊनी ॥३८॥ स्वामी म्हणती तयासी। जा याच्या शुश्रुषेसी। आरोग्य होतां यासी। समागमे ये येथें ॥३९॥ ऐकूनि स्वामींचे वचन। विनये करी भाषण। म्हणे या हस्तें जाण। व्हावी भवच्चरण सेवा ॥४०॥ ते म्हणती सेवा इच्छिसी। तरी हीच सेवा तुजसी। याची शुश्रूषा परियेसी। करी शांत मनानें ॥४१॥ अनाथ ब्राह्मणाची सेवा। करितां ती पावे देवा। प्राप्त होईल प्रसाद मेवा। श्रीगुरु कृपेचा झडकरी ॥४२॥ ध्यानीं आणिलें वचन। शिरसा मान्य करून। ब्राह्मणाच्या सेवे जाण। जाता झाला

ब्रह्मचारी ॥४३॥ आरोग्य होतां ब्राह्मणास। घेऊनि निघाला त्यास। आला ब्रह्मावर्तास। स्वामी संनिधपातला ॥४४॥ विष्णु बुवाचें नेत्र। पूर्ववत झालें आणुमात्र। कसर राहिली त्यांत। मग स्वामी तयां बोलती ॥४५॥ तुझी शुश्रूषा जाण। काळजीपूर्वक करील कोण। आम्ही उपाय करवून। यावेळ पर्यंत ठेविलें ॥४६॥ कार्या पूर्ति तुज दृष्टी। मिळाली कां होसी कष्टी। धरावया न लागे यष्टी। दृष्टी परस्त्री वरी न जाय ॥४७॥ तूं ज्यासाठी उद्योग केला। तो कार्यभाग जाहला। तुझा योग चांगला। कामापूर्ति दृष्टी आलीसें ॥४८॥ आतां ईशभजन करी। खिन्न न होई अंतरीं। रहावें जाऊनि घरीं। संसारीं परमार्थ साधावा ॥४९॥ तरीच बरवें होईल। नातरी उभया अंतरशील। परमार्थ न साधेल। परमार्थ जाईल हातीचा ॥५०॥ या देहाचा अभिमान। अभ्यासे सुटेल जाण। विवेकें चंचल मन। आवरून धरावें ॥५१॥ शिक्षा करूनि इंद्रियांसी। काय उपयोग परियेसी। तीं हळुहळु ईशभक्तीसी। लावितां महत्कार्य करतील ॥५२॥ मनलावी ईशध्यानीं। नेत्र लावावें दर्शनीं। कर योजावें पूजनीं। चरण कीर्तनी वागवावें ॥५३॥ श्रवणें कथा ऐकावी। मुखें ईश कीर्ती गावीं। तरीच भक्त ही पदवी। प्राप्त होतसें मानवा ॥५४॥ ऐंसे इंद्रिया वळण। द्यावे पुन्हः पुन्हः झटून। येणेंपरी षड्रिपू दमन। ईश साधनी करावें ॥५५॥ ईश भजनी काम असावा। दुर्वृत्तीवर क्रोध करावा। देव दर्शनाचा लोभ असावा। मोह ईश गुणानुवादी ॥५६॥ मी ईश्वराचा दास। त्याचा भक्त असें खास। ऐंसा गर्व श्रेष्ठ पदांस। नेईल संशय नसेची ॥५७॥ प्रपंच्या सक्तीचा

मत्सर। करितां साधे इहपर। येणें परी मनोविकार। सहाहीं ईश्वरी वळवावें ॥५८॥ मग तूं राही जनांत। वनांत वा गिरी कंदरांत। तुझें मन संतप्त। विषयासक्त न होय ॥५९॥ दैवि आनंदानें तृप्त। होशील भवांतूनी मुक्त। महान्भवद्भक्त। तुज मान देतील। ।६०॥ या रिती ब्राह्मणांस। महाराज करिती उपदेश। मग तो ग्रामीं जावयांस। निघाला स्वामी पदां वंदुनी ॥६१॥ स्वामीची ऐकूनि किर्ती। काशी निवासी एक यती। दर्शन लालसा धरूनि चित्तीं। पातलें ब्रह्मावर्तांत ॥६२॥ त्यांचे अन्वर्थक नाम। प्रसिद्ध असे शांताश्रम। त्यांचा ही समागम। तेथील जना लाभला ॥६३॥ दर्शना आले शांताश्रम। परस्परें लोटले प्रेम। नितांत झाला आराम। परमानंद प्रवर्तला ॥६४॥ उभयही परम अधिकारी। नेत्रांतून गळें वारी। उचंबळल्या आनंद लहरी। अनिर्वाच प्रेम दाटलें ॥६५॥ तेथें ते चातुर्मास। राहिलें सहवासास। सप्ताहांची गर्दी विशेष। चालूं होती पूर्विंच ॥६६॥ आणिकही पूर्ववत। सप्ताहा करत्तिती सुरवात। स्वामी नामोच्चार सांगत। तो ऐका श्रोते हो ॥६७॥ जीवापरी आवडतें। स्वामी असती सर्वातें। नृसिंह मूर्ते जय हत भीते। सांगते झाले नामोच्चारा ॥६८॥ मग ग्रामस्थांनी एकचित्तें। सप्ताह नेला शेवटातें। पुढें आणीकही सप्ताहातें। आरंभिती तो ऐका ॥६९॥ अंजनी सूता रुद्रावतारा। जयरामदूता भवभय वारा। ऐंशीया नामोच्चारा। महाराज जना सांगती ॥७०॥ हा हनुमान जयंती प्रित्यर्थ। सप्ताह करिती समस्त। पुढें काय वर्तलें अकस्मात। तें चित्त देऊनी ऐकावें ॥७१॥ एके दिनीं स्नान करूनि। प्रातःकाळीं मठस्थानीं। स्वामी वदती जनां लागुनी। पाहिजे

त्यानीं न्यावी श्रीदत्त मूर्तिं ॥७२॥ हे त्यांचे वचन। व्यंकटेशानें ऐकून। सत्वर मूर्ति स्वाधीन। करून घेतली त्या समयीं ॥७३॥ ही अंगुष्ट प्रमाण श्रीदत्त मूर्ति। महाराजापाशीं होतीं। तिच्या आज्ञेनुसार वागती। आज पर्यंत स्वामी राय ॥७४॥ पूर्वि श्रीराममूर्तिं। समर्थांसी बोलत होती। किंवा श्री पांडुरंग मूर्ति। नाम्यासवें बोलती झाली ॥७५॥ तैशापरी श्रीदत्तमूर्तिं। स्वामी सवें वदत होती। ब्रह्मचार्या मिळालीती। म्हणूनि विशेष काय झालें ॥७६॥ ज्याची सिद्धी त्याला कळे। येराती कैंशी मिळे। स्वतः साधन पाहिजे केले। हे न कळे मूढाला ॥७७॥ ती मूर्ति आपणां मिळाली। म्हणूनि चित्तवृत्ती आनंदली। परी जपणूक चुकली। तरी व्यर्थ होय ॥७८॥ राजा नहुषा इंद्रपद। प्राप्त होतां चढला मद। इंद्राणीसी संबंध। करावया धाविन्नला ॥७९॥ शेवटीं इंद्रपद जाऊनी। पावला अजगर योनी। असो काय करावे कोणी। ज्याचें त्याला फळ लार्धे ॥८०॥ फुकट हत्ती मिळाला। परी सामर्थ्य पाहिजे पोसण्याला। एरवी तो दरिद्र्याला। कैसा पालन करवेल ॥८१॥ यापरी संभाषण। करितें झाले स्वामी जाण। पुढें कांहीं दिवस मौन। व्रत धरिले आदरें ॥८२॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। एक विंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय बाविसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ नरे व्हावया कृतार्थ। सोडावा लौकीकार्थ। साधावा परमार्थ। लीन व्हावें श्रीगुरुपदीं ॥१ ॥ स्वामीनीं धरिता मौन। जन होती उद्विग्न। गोपाळनाथे व्हावया धन्य। काय केलें परियेसा ॥२ ॥ सुरस कीर्तना योग्य। श्रीगुरु चरित्र भाग। घेऊनि आख्यानें रचली सांग। स्वामी राजा दाखविण्या ॥३ ॥ हेतू धरून सायंकाळीं। आला मठ द्वारा जवळीं। उभा राहिला ते वेळीं। वंदिलें चरण स्वामींचे ॥४ ॥ मी कीर्तना योग्य रचिलासें कथा भाग। महाराजांनीं यथासांग। ऐकावा हे इच्छितों ॥५ ॥ तो एकिल्या वांचून। माझे न होय समाधान। यास्तव कृपा करून। स्वस्थ मनें ऐकावा ॥६ ॥ आज्ञा होता या समयां। त्वरें लागेन वाचाया। ऐसें भाषण ऐकूनिया। स्वामी मान डोलाविती ॥७ ॥ वाचाया संकेत करिती। मुखें नारायण उच्चारिती। तेणे आनंद चित्तीं। झाला गोपाळबुवाच्या ॥८ ॥ विमल मन करून। मानसीं धैर्य धरून। श्रीगुरुचरण स्मरून। वाचाना आरंभ करितसें ॥९ ॥ सती आख्यान सर्व। रजक आख्यान अपूर्व। मंदद्विज पुत्रां ठाव। दाविला भुवनेश्वरीनें ॥१० ॥ तो येऊनी औदुंबरीं। श्रीयतीसी नमस्कारी। आशिर्वाद होतां झडकरीं। वेद चारी बोलिला ॥११ ॥ ते ही आख्यान रचिलेलें। गोपाळनाथें वाचिलें। पुन्हः नमन केले। किंचित्काळ स्थिरावला ॥१२ ॥ ऐकूनि सर्व आख्यानें। यती हंसती प्रसन्न मनें। कांहीं आर्याही तयानें। मग वाचूनि दाखविल्या ॥१३ ॥ त्या करूणाकर आर्या। रचिल्या श्रीदत्त तोषवाया। त्याही सर्व

ऐकूनिया। होती प्रसन्न स्वामिराज ॥१४॥ गोपाळबुवा करी प्रार्थना। विनये बोले महाराजांना। येथूनि करितो गमना। अवंतीका क्षेत्रीं क्षिप्रातटीं ॥१५॥ स्वामीचें प्रयाण। सत्वर होण्याचें चिन्ह। मला दिसते पूर्ण। मागें कासया रहावे ॥१६॥ गंगेची प्रवाह धारा। ती गेली पैलतिरा। आतां करावे स्थलांतरा। हेंचि प्रशस्त वाटतें ॥१७॥ स्वामीनीं कृपा करून। पुनश्च द्यावें दर्शन। मग प्रणाम करून। मठाबाहेर तो निघे ॥१८॥ नंतर तया खुणाविती। पाटीवरी लिहून पुसती। जवळ वाट खर्चा प्रती। पैसे असती कीं कसे ॥१९॥ पांघराया वस्त्रें पुरती। असती कीं नसती। जरी पाहिजे असती। तरी देतो आतांची ॥२०॥ तो म्हणे स्वामीसी। थोडे बहुत खर्चायासी। पैशे असती मजपाशीं। काळजी न करणें स्वामीनीं ॥२१॥ स्वामी कृपेनें। असती वस्त्रें प्रावर्णे। परी एक मागणें। असें दीनदासाचे ॥२२॥ पुनश्च चरण दर्शन। द्यावें कृपे मज जाण। माझे असावें स्मरण। प्रेमवाढतें असावें ॥२३॥ मग ऐकूनि भाषण। यती करिती हास्य वदन। पाटीवरी दाविती लिहून। गायत्री जप अनुष्ठान करावया ॥२४॥ रेवा किनारी नेमावर। क्षेत्र सिद्ध नाथेश्वर। लिंग बरवे मनोहर। तेथें जावया आज्ञापिती ॥२५॥ ती आज्ञा मानिली। गोपाळ मूर्ति निघाली। महाराज तयास्थळीं। क्वचित्काळ होतेंची ॥२६॥ त्यांना श्रीचा दृष्टांत। पुढें झाला अकस्मांत। तो ऐका श्रोते समस्त। भाग्यवंत सत्य तुम्हीं ॥२७॥ अनंत जन्माचे सुकृत। असे तुमच्या पदरांत। म्हणूनि तृष्णा वाढली बहुत। श्रीगुरुचरित्र ऐकावया ॥२८॥ नृसिंहवाडीस जावे। तेथील पूजाऱ्या सांगावे। पूर्विप्रमाणें चालवावे।

नित्यनेम पूजा विधी ॥२९ ॥ जेव्हां पादुकावरील। वस्त्रपूजारी देतील। तो पर्यंत तेथकाल। क्रमावा स्वस्थचित्तानें ॥३० ॥ जेव्हां येणेपरी श्रीदृष्टांत। झाला तो जना समस्त। तें सांगता अकस्मांत। मंडळी उद्विग्न जाहली ॥३१ ॥ म्हणती आज तीन वर्षें। कृपा केली श्री जगदीशे। पुढें आमुचें कैंसे। या दुःखप्रद संसारीं ॥३२ ॥ नित्य स्वामी दर्शन। दुःख करी निरसन। आतां तारक कोण। आधार आम्हां कवणाचा ॥३३ ॥ स्वामी राये भागवत। येथें संपविलें समस्त। तितुक्या अवधींत। संग्रहणी शांत जाहली ॥३४ ॥ सर्वांचें करूनि शांतवन। भावें करा श्रीदत्त भजन। ऐंसे सर्वां संबोधून। तेथूनिया निघाले ॥३५ ॥ ही वार्ता फांकली ग्रामांत। कानपुरांतील क्षणांत। धांवती भक्त समस्त। दर्शनार्थ तत्काळीं ॥३६ ॥ ब्रह्मावर्तापासून समीप। भूतेश्वर स्वयंभू भूताधीप दर्शनें प्राणी होय निष्पाप। लिंग बरवे मनोहर ॥३७ ॥ ब्रह्मदेवानें यज्ञ समयीं। हें स्थापन केलें ठायी। पहिला मुक्काम येथेंची पाहीं। स्वामी रायें केला असे ॥३८ ॥ तेथें भक्त मंडळी जमती। आनंदें भजन करिती। माते पुढें बाळ क्रीडती। जैंसे प्रेमे भक्तीनें ॥३९ ॥ प्रातःकाळीं मार्गर्कमण। करिती सर्वां देऊनि दर्शन। माघारे परतले तेथून। भक्तजन सर्वही ॥४० ॥ यमुना तटीं मार्ग क्रमित। काल्पी समीप आले त्वरित। ही वार्ता गेली जालवणांत। दर्शनार्थ भक्त पातले ॥४१ ॥ तेथें एक येऊनि यवन। त्यानां विनवीतसें जाण। मजवरीं अनुग्रह करून। स्वामींनीं पावन करावे ॥४२ ॥ त्याचा भाव जाणूनि। कुराणांतील वाक्य तत्क्षणीं। सांगती तया लागूनि। नित्य जप करावया ॥४३ ॥ तेथून झांशी समीप पिछोर।

ग्राम असे तेथे सत्वर। येऊनी राहती दिवस चार। ब्राह्मण वस्ती पाहुनी ॥४४॥ त्या स्थानीं विप्रा जवळ। देती कंथा धाबळ। लहानसी तुंबी तत्काळ। म्हणती ब्रह्मावर्ती पाठवा ॥४५॥ महाराजाचें आज्ञा वचन। मानूनि त्या विप्रे जाण। वस्तू दिल्या पाठवून। ब्रह्मावर्ती मठांत ॥४६॥ स्वामी रहाती ज्या मठांत। तेथें त्या ठेवूनि जन समस्त। पूजा करिती भावयुक्त। उत्सव ही प्रतिवर्षिं ॥४७॥ मग तेथूनि मार्गक्रमिती। वेत्रवती तटीं येती। भेलसा ग्रामीं ब्राह्मण वस्ती। पाहूनि भिक्षा करिती तेथें ॥४८॥ असो तेथें एक दिन। राहूनि स्वामी करिती गमन। मार्गीं एक यती जाण। भेटें अकस्मांत येऊनी ॥४९॥ हा शिरोळ ग्राम वासी। त्यांचाच शिष्य परियेसी। पूर्वाश्रमीं अभ्यासासी। होता स्वामीं संन्निध ॥५०॥ दिक्षित घराण्यांतील जाण। नाम ज्याचें नारायण। याचा स्वभाव विलक्षण। जाणती लोक तेथीचें ॥५१॥ पुढें गृहस्थाश्रमीं होऊनी। स्मार्ताग्नी ठेवूनी। शुष्क वृत्तीवर निर्वाह करूनि। वास करी श्रीवाडींत ॥५२॥ वर्णाश्रमोचिताचार। करी शुद्ध विचार। श्रीदत्त भक्ती साचार। भाव अंतरीं धरूनी ॥५३॥ तद्भार्या इहलोक। सोडी मग संन्यास देख। करितो मनःपूर्वक। शास्त्रोक्त यथा पद्धती ॥५४॥ स्वामी करवी दंड धारण। करावा हा हेतू धरून। त्यांच्या शोधार्थ जाण। गेला होता ब्रह्मावर्ती ॥५५॥ तेथें न होता दर्शन। उत्साह रहित होऊन। करीत होता मार्गक्रमण। तो अकस्मांत स्वामी भेटले ॥५६॥ दरिद्रयासी मिळतां धन। जैसें आनंदे त्याचें मन। तेवी तो हर्ष पावून। स्वामीचरणीं लागतसे ॥५७॥ कर संपूट जोडून। म्हणे भवत् हस्ते करून। मज

व्हावें दंड धारण। विनंती अमान्य न व्हावी ॥५८॥ ऐकूनि तयाची विनवणी। महाराज म्हणती तया लागुनी। तूं नृसिंहवाडीस जाई परतूनि। मी येतोचि मागुनी सत्वर ॥५९॥ तेथें या गोष्टीचा विचार। करितां येईल साचार। ऐंशी कार्यें पाहूनि अधिकार। करावी लागती ॥६०॥ सोपें असे संन्यास घेणें। परी कठीण आचार करणें। वरी वरी वेष दाखविणे। ही दुषणे मात्र होती जनी ॥६१॥ संन्यास म्हणजे वैराग्याची। परमार्थाची आत्मोन्नतीची। तैशीच परोपकाराची। पूर्णता येथ जाणावी ॥६२॥ आधीं अखिल स्वार्थ। नष्ट जाहला पाहिजे यथार्थ। एरवी या आश्रमाची व्यर्थ। हेलना कासया करावी ॥६३॥ सर्व जग हें माझे घर। ऐंशी मती व्हावी स्थीर। किंबहुना चराचर। आपणचि झालें पाहिजे ॥६४॥ प्राणी मात्रा अभयदान। प्राप्त व्हावें आपणांपासून। सर्वांभूतीं दया जाण। अंतःकरणीं असावी लागे ॥६५॥ जीव लोभ पाहिजे सुचला। मन बंध पाहिजे तुटला। ईश सक्षात्कार पाहिजे झाला। तोचि पुर्ता संन्याशी ॥६६॥ निर्गुण प्रभूची प्रतिमा सगुण। संन्याशानें व्हावें जाण। सत्ता, सुख, प्रकाश जाण। ही लक्षणें असावी ॥६७॥ आतर्क्य ईश्वरी स्वभावाची। तैशी ईश्वरी कर्तृत्वाची। कल्पना करणाऱ्या साधकाची। साधनें संन्याशानें व्हावें ॥६८॥ सत्‌चित्‌ आनंद पद सामर्थ्य। प्रत्यक्ष प्रगट करणारी समर्थ। व्यक्ती आपण व्हावें यथार्थ। नातरी अनर्थ करूं नये ॥६९॥ जगदोद्धारक संकल्प दीक्षा। घेऊनि जनां सद्वस्तु शिक्षा। द्यावया मागणें नित्य भिक्षा। घरोघरीं फिरुनिया ॥७०॥ इतर सर्व वासना नाश। केला पाहिजे अवश्य। एरवी या संन्यास

दीक्षेस। बट्टा खास लागेल ॥७१ ॥ संन्याशानें जगाला केवळ। देवता रूप व्हावे निर्मळ। एवढें सामर्थ्य ठेवावें जवळ। नातरी तो बाष्कळपणा ॥७२ ॥ ब्रह्मभांडाराची सिद्धी। जवळ बाळगूनि बिदोबिदीं। फिरावें इहलोकीचें प्रतिनिधी। होऊनिया ईश्वराचे ॥७३ ॥ प्रभू साम्राज्याची द्वाही। फिरवावी दिशा दाही। प्रभू नामाच्या ध्वजा पाहीं। ठायीं ठायीं उभाराव्या ॥७४ ॥ प्रभूनाम गजरें इहलोक। वैकुंठचि करावें देख। आपल्या पवित्रतेन अनेक। जनासी पावन करावे ॥७५ ॥ आपुल्या पुण्यानें जना कृतार्थ। आपुल्या तपानें जाना समर्थ। केलें पाहिजे ना तरी व्यर्थ। अनर्थ लोकीं करूं नये ॥७६ ॥ आपुल्या चैतन्यानें सचेतन। आपुल्या कृपेनें सुखसंपन्न। आपुल्या विद्येनें सज्ञान। करणें लागे जनांसी ॥७७ ॥ नित्य करुनि प्रवास। स्वरुपाचा परिचय जगास। करूनि दिला पाहिजे अवश्य। तोचि परम पूज्य संन्यासी ॥७८ ॥ दया, श्रद्धा, शौचदान। ऐंसा आदरे युक्त जाण। स्वयें असावे आपण। जनासी धडा घालूनि द्यावा ॥७९ ॥ ऐंसे श्रेष्ठ चतुर्थाश्रमाचें। नियम ज्यानें पाळिलें त्याचे। नाम आजरा मरचिसाचें। जगावरी रहातसें ॥८० ॥ त्याचे नि शोभा संन्यासाश्रमा। नातरी आव आणिला रिकामा। तरी त्याणें आणिली काळीमा। आपुलीया कुळासी ॥८१ ॥ असो येणेपरी शिष्यासी। महाराज सांगती परियेसी । तो निघतसे नृसिंहवाडीसी। आज्ञा घेऊनि तयांसी ॥८२ ॥ इकडे महाराज मार्ग क्रमित। रेवातटीं आलें त्वरित। हुशंगाबाद प्रख्यात। शहर ब्राह्मण वस्तीचें ॥८३ ॥ तेथें चौघे येऊनि विद्यार्थी। महाराजांसी प्रार्थीती। म्हणती आम्हां राज भाषेंत निश्चिती। ह्या वर्षि

परिक्षा देणें असे ॥८४॥ सरकारी विद्यालयांतील चौथी। परिक्षा देणे असे आम्हां प्रती। आमुचि असे विनंती। तरी स्वामींनीं कृपा करणें॥८५॥ परिक्षा होईल उत्तीर्ण।ऐंसा उपाय सांगा आम्हा लागून। जैसे महाराज सांगतील जाण। तेणेंपरी वर्तन करुं॥८६॥ महाराज म्हणती विद्यार्थ्यांसी। आम्ही हे नेणो परियेसी। आम्ही काय असो ज्योतिषी। पुसा अन्य स्थळां जाऊनी॥८७॥ पुन्हः ते चौघेंही जाण। मध्यस्थ आणूनि एक ब्राह्मण। विनविती महाराजांना जाण। करूणा वचने करूनिया॥८८॥ मध्यस्थ जयराम मुजूमदार। विनवीतसें जोडूनि कर। महाराजांनीं या बालकांवर। कृपा केली पाहिजें।।८९॥ मग तें त्या चौघांसी। एक मंत्र सांगती परियेसी। म्हणती याचा आष्टोतर शतेंसी। जपनित्य करा भावें॥९०॥ परिक्षा होई पर्यंत। याचा जप करा सतत। तुमचा पूर्ण होईल मनोरथ। स्वस्थ असावें अंतरीं॥९१॥ स्वामी आज्ञा प्रमाण। मानूनि तें चौघेंजण। जप करितां परिक्षा उत्तीर्ण। झाले यती प्रसादे॥९२॥ भक्ति, भाव असे जया। सत्पुरुषाची होईल दया। मग कार्य सिद्धी व्हावया। क्षण एक न लागे॥९३॥ महाराज तेथूनि निघाले। मार्ग क्रमित चालिलें। नृसिंहवाडीस आले। श्रीच्या आज्ञेनुरुप॥९४॥ गृहस्थाश्रमीं असतां जाण। महाराज गेलें वाडीतून। आतां चतुर्थाश्रमीं होऊन। पातलें उपास्य देवतेपाशीं॥९५॥ वासुदेव शास्त्रि गृहस्थाश्रमीं। येथें होते तेचि हें स्वामीं। वासुदेवानंद सरस्वती नामी। या मंगल धामीं पातलें॥९६॥ ऐंसे म्हणूनि सकळ जन। करिताती साष्टांग नमन। धन्यवाद गावूनि जाण। पावन झालों म्हणताती॥९७॥ स्वामी सर्वांसी

क्षेम कुशल। पुसती तेणें आनंदले सकळ। म्हणती आजिचा दिन मंगळ। सद्दर्शन लाभ झाला ॥९८ ॥ पाहूनि महाराजांची मूर्ति। तपतेज दिव्य कांती। साक्षांत श्रीनृसिंह सरस्वति। पातलासे वाटतें ॥९९ ॥ ऐंसे म्हणती सकळ जन। करिती प्रेम पूर्वक दर्शन। वारंवार नमिती जाण। स्वामी कुशल विचारिती ॥१०० ॥ दृष्टांत आणिला ध्याना। स्वामी आलें श्रीगुरुस्थाना। जयांच्या लीला नाना। वर्णितां प्रेम दुणावें ॥१ ॥ श्रीगुरु सेवेचें फल आगाध। नष्ट होती काम क्रोध। अंतरीं उपजे बोध। मोद अखंड वसतसें ॥२ ॥ म्हणूनि सेवा आदरावी। तेणें मुक्ती साधावी। शांती विरक्ती ध्यावी। अनायासें नरानें ॥१०३ ॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृते। गोपाळबुवा विरचिते। द्वाविंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय तेविसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ श्रीगुरुचरित्र वर्णन। करावे तितुकें थोडे जाण। श्रोते ऐका सावधान। यथामती सांगतसें ॥१ ॥ महाराज नृसिंह वाडींत। येता आनंदती जन समस्त। पूर्वाश्रमांतील दिक्षित। नामक शिष्य जो होता ॥२ ॥ त्यानें केले संन्यास ग्रहण। करावया दंड धारण। स्वामीपाशीं येऊन। म्हणे स्मरण असें कीं माझें ॥३ ॥ स्वामींनीं मज सांगितले। वचन पाहिजे सांभाळिलें। नृसिंहवाडीस येणे झाले। आतां कृपा करावी ॥४ ॥ महाराज म्हणती तयासी। श्रीदत्ताज्ञे वांचूनि परियेसी। दंड धारण कोणासी। करविणार नाहीं निश्चयें ॥५ ॥ यास्तव अन्य यती पासून। तुम्हीं करावे दंड धारण। ऐंसे त्यांचे ऐकूनि वचन। दिक्षित स्वामी उद्विग्न होती ॥६ ॥ नवनीत पाहूनी मांजर। टपत बसले दिनचार। खावया न मिळें साचार। मग निराश होतसे ॥७ ॥ तैंसे दिक्षित स्वामीसी झालें। म्हणे देवा कां चाळविलें। काय माझें दुर्दैव आलें। आडवे याच कार्यासी ॥८ ॥ बहुता दिवसांपासून। करावया दंड धारण। आशा धरली जाण। ती निराशा आजी जाहली ॥९ ॥ काय मी असें पतित। श्रीदत्ता तूं तरी घे पदरांत। आतां माझें मनोरथ। पूर्ण कोण करील ॥१० ॥ तुझ्या आज्ञेवांचून। मज न करविती दंड धारण। माझी इच्छा पूर्ण। तुजवीण कोण करील ॥११ ॥ ऐशापरी श्रीदत्ताची। चित्तीं प्रार्थना करिती साची। तो सूर्यास्त समयासी। वेळ समीप आलीसे ॥१२ ॥ स्वामी समीप तो पर्यंत। उभें नारायण दिक्षित। नेत्रांतुनी अश्रू गाळित। करूणा भाकीत

श्रीदत्ताची ॥१३॥ भजन पूजन झाल्यावरी। स्वामी निद्रा करिती सत्वरी। तो अवचीत स्वप्न देखूनी अंतरीं। विस्मित झाले तेधवां ॥१४॥ स्वप्नीं महाराजां प्रती। श्रीदत्त येऊनि आज्ञापिती। दंड धारण करवी म्हणती। माझी आज्ञा तुज असे ॥१५॥ नारायण दिक्षित स्वामी। मज भजत असे अंतर्यामी। त्याची भक्ती असे निष्कामीं। सत् पथगामी तो खरा ॥१६॥ ऐंशी आज्ञा होतां श्रीची। स्वामी करवी दंड धारणेची। इच्छा पूर्ण झाली साची। दिक्षित स्वामीची त्या समयीं ॥१७॥ योगपट्ट नृसिंह सरस्वती। नाम ठेविती तयाप्रती। वाडीतची रहावे म्हणती। उत्सवमूर्ति अर्चूनिया ॥१८॥ हे श्रीदत्त कृपा पात्र स्वामीं। वास करिती नृसिंह धामी। चित्तवृत्तीं श्रीदत्त नामीं। आराम पावली जयांची ॥१९॥ त्यांनीं महाराजांचे स्तोत्र। केलें असे परम पवित्र। त्यांतील दोन श्लोक मात्र। लिहितों श्रोत्या कारणें ॥२०॥ अथ स्तोत्र - दिव्यते वसुभिःश्छिद्धीर्वसुदेव इतीर्यते। स एवानंद एतस्य निधिर्यस्मिंचविद्यते। वासुदेवानंद सरस्वति ब्राह्मी तनुः स्वयं। सएवायं दत्तगुरु स्तस्मैश्रीगुरुवे नमः ॥१॥ श्रीसच्चिसुख मूर्तये स्तुच नमोधी साक्षिणे श्रीगुरो। मायाधीश्वरते नमोस्तुच पुनर्भुयः सदाते नमः। आज्ञार्थ धृतकर्म मार्ग वपुषे मातर्नमः पाहिमां। मंदार्थ प्रकटी कृतंच भवताचोपास्ती युक्तं वपुः ॥२॥ कृष्णा पंचगंगा संगम स्थान। मानलें श्रीदत्तासी जाण। तेथें ब्रह्मनिष्ठ यती पावन। रहातसें एक तरी ॥२३॥ या नियमानुसारें। पूर्वि नारायण स्वामीं रहाती बरे। त्यानंतर कृष्णानंद यति विचरे। याच क्षेत्रा माझारी ॥२४॥ तदुपरी गोपाळबुवाचा स्वामी श्रेष्ठ। नांदती तेथें ब्रह्मनिष्ठ। मग मौनी स्वामी वरिष्ठ।

होते निवास करुनि ॥२५॥ आतां परमहंस परिव्राजकाचार्य। श्रीवासुदेवानंद सरस्वति यतिवर्य। ज्यांच्या दर्शनमात्रें कार्य। तत्काळ होय नराचें ॥२६॥ परीते जगदोद्धारार्थ। श्रीदत्ताज्ञा मानूनि विचरत। अत एव स्वामी दिक्षित। ब्रह्मनिष्ठवास करिती ॥२७॥ मित भाषणीं शांत दांत। हास्य वदनें राहणें एकांत। ज्ञानीपरी अहंकार रहित। प्रेमळ रत श्रीदत्त भजनीं ॥२८॥ यांचें होता दर्शन। जीवा होय समाधान। यांचा अधिकार असामान्य। असें पावन पुरुष हा ॥२९॥ महाराजांची मार्गीच जाण। एके दिनीं स्नान करुन। येत असतां कृष्णेवरून। समाधी लागली अकस्मांत ॥३०॥ त्या माजीं श्रीदत्त। त्यांच्या मुखें आज्ञापित। बोलावुनी पूजारी समस्त। वदते झाले तें ऐका ॥३१॥ तुम्हीं आपुले सदा चरण। सोडूनि यथेच्छ वागतां जाण। हे योग्य नव्हें तुम्हां कारण। वर्तन चोख ठेवावें ॥३२॥ शुद्धा चरणें वागून। विवेक बुद्धीं बाळगून। देवसेवा कराल जाण। तरीच कल्याण होईल ॥३३॥ तुमच्या वडिलांचे योग्य वर्तन। तुम्हीं करावें अनुकरण। नातरी तुम्हां जाण। शीध्र सद्गुरुदंडील ॥३४॥ हें श्रीचे आज्ञा वचन। स्वामी मुखें ऐकून। पूजारी खिन्न वदन। करूनिसचिंत बैसले ॥३५॥ हस्त जोडूनि विनवीती। अनंत अपराधी म्हणती। क्षमा करा बाळका प्रती। एवढी विनंती अवधारा ॥३६॥ प्राक् नियम स्वामीनीं आधी। सांगूनि आम्हां यथाविधीं। आमुची करवावी देहशुद्धी। प्रायश्चित पूर्वक ॥३७॥ मग श्रीपादुकापूजन। विधी नियम शुद्ध वर्तन। कैंसे करावें आचरण। हें स्वामींनीं सांगितलें ॥३८॥ पूजारी जमूनि सकळ। श्रीकोपशमनार्थ तत्काळ। देह शुद्धींस्तव प्रबळ।

रुद्राभिषेक करिती पैं ॥३९॥ ये समयीं स्वामी दर्शनार्थ। कवठे गुलंद ग्रामीचा गृहस्थ। तात्या इनामदार येत। कुटुंबा सहित सत्वर ॥४०॥ विनवी प्रार्थनापूर्वक। बेचाळीस वर्षे झाली देख। मी संतान हीन हा कलंक। लागतसें मजलागीं ॥४१॥ यास्तव स्वामीनीं कृपा करणें। एवढा दोष निवारणें। स्त्रियेसी व्रतोपाय सांगणें। वंध्यादोष निरसनार्थ ॥४२॥ संतती व्हावया येतो बाध। तो नष्ट व्हावया निर्विवाद। महाराजांनी कृपाप्रसाद। द्यावा दीन कारणें ॥४३॥ श्रद्धायुक्त भाषण। ऐकूनि एक अनुष्ठान। करावया सांगती जाण। निरोप देती जावया ॥४४॥ पुष्प प्रसाद श्रीफल देती। अनुष्ठान करी म्हणती। संतान होईल तुज निश्चिती। श्रीदत्त कृपा करतील ॥४५॥ मग तो इनामदार। पुरोहिता वदे सत्वर। महाराजांची तसबीर। विकत एक आणावी ॥४६॥ उभयतां करितो गमन। तुम्हीं तसबीर घेऊन। यावे शिरोळ ग्रामीं जाण। सांगून पुढें जाती ते ॥४७॥ उपाध्यायें तसबीर। विकत घेऊनी सत्वर। शिरोळ ग्रामीं साचार। त्यांज कडे पाठविली ॥४८॥ त्या तसबिरीस पाहून। त्यांना भूल पडली जाण। म्हणती कैंशी ही छबी जाण। स्वामींचें स्मरण नदे आम्हां ॥४९॥ महाराजांची मूर्ति। ही भासत नाहीं चित्तीं। परत करावी निश्चिती। दुजी बदलून आणावी ॥५०॥ मनीं करुनि विचार। एका सेवकांबरोबर। पाठविली तसबीर। बदलूनि आणाया कारणें ॥५१॥ सेवक वाडीस आला। इकडे चमत्कार काय झाला। त्या इनामदाराला। स्वप्न पडलें त्या रात्रीं ॥५२॥ स्वप्नांत संन्याशी येऊन। म्हणे माझ्या तसबिरीची जाण। अवज्ञा करीसी काय कारण। मूर्खपण

कां करिसी ॥५३॥ दे तो इकडे श्रीफल प्रसाद। संततीसी न यावा बाध। यास्तव दिला होता परिहद। झाली तुझ्या श्रद्धेची ॥५४॥ ऐंसे म्हणूनि प्रसादफल। काढूनि घेतला नारळ। गुप्त होई संन्याशी तत्काळ। जाग्रत झाला गृहस्थतो ॥५५॥ स्त्रियेसी सांगे स्वप्न। स्वामींचें रूप आठवून। म्हणे सद्गुरो पतीत पावन। काय अपराध धडला हा ॥५६॥ आपुल्या चरणीं आमुची। पूज्य बुद्धि असतां साची। अवज्ञा तसबिरीची। या रंका हस्तें केवी होय ॥५७॥ तूं अससी सर्वसाक्षी। आमुचें गुण दोष न लक्षी। कृपा कटाक्षें निरिक्षी। भक्तांरक्षी अनुदिनीं ॥५८॥ आम्हां करवी चुक घडली। ती पाहिजे क्षमाकेली। तसबिरीची भूल पडली। माया वरणें करूनिया ॥५९॥ प्रार्थना करूनि सत्वर। पुन्हः तीच तसबीर। मागून घेतली साचार। दुजा सेवक पाठवूनी। ।६०॥ इकडे वाडीतील पूजाऱ्यांनीं। अतीरुद्राभिषेक श्रीचरणीं। आरंभिला त्यांत स्वामींनी। स्वतः श्रीपूजापत करिली ॥६१॥ पूजा करितां एके दिनी। स्वामीस उघडें पाहूनी। शीत परिहारा म्हणूनी। पूजाऱ्यांने काय केलें ॥६२॥ श्रीपादुकेंवरील करवती काठीं। पांघराया दिली भगवी छाटी। स्वामीं वाट पहाती त्यासाठीं। ती उठाउठीं प्राप्त झाली ॥६३॥ ते व्हांते जना समस्त। सांगती श्रीची आज्ञा दृष्टांत। म्हणती आम्हां जाणे प्राप्त। झालें अवश्य आजची ॥६४॥ जैंसे श्रीनीं आज्ञापिलें। तैसें आम्हां येणे झालें। श्री आज्ञा वचन निरोपिलें। तुम्हा लागीं येऊनी ॥६५॥ श्रीची आज्ञा आम्हासी। माझें वस्त्र मिळतां तुजसी। गमन करी उत्तर दिशेसी। तयांपरी प्राप्त जाहलें ॥६६॥ दुपारीं भिक्षा करून।

आलें देवालयीं जाण। श्रीपादुकेंसी वंदन। करूनि निघालें तत्क्षणीं ॥६७॥ सर्वही जन धांवती। महाराजांच्या चरणीं लागती। सोडूनि जाऊं नका म्हणती। गाळीती अश्रू नेत्रांतुनी ॥६८॥ महाराज सांगती सर्वांसी। सोडूं नका श्रीचरणांसी। सदाचारानें वागा परियेसी। तुम्हांसी सुख होईल ॥६९॥ जैसें श्रीचें आज्ञा वचन। तैसें आम्हां करणें वर्तन। अवश्य केलें पाहिजे गमन। आनंदे येथ नांदा तुम्हीं ॥७०॥ ऐंसे म्हणूनि झडकरी। महाराज चालिलें पादचारी। तो कित्येंक चरणांवरी। लोटांगणे घालिती पुनःपुनः ॥७१॥ त्याची पाहूनि दिव्यकांती। तपस्तेजयुक्त मूर्ति। दंड कमंडलू शोभे हाती। कासे कसिली कौपीन ॥७२॥ अंगावरी भगवी छाटी। कपाळीं लाविली भस्म उटी। नृसिंह सरस्वती कृष्णा तटीं। आलें कीं काय वाटतसें ॥७३॥ तो ह्रदय द्रावक देखावा। किती म्हणूनि वर्णावा। प्रत्यक्षचि अनुभवावा। तेव्हांची कळें सर्वही ॥७४॥ ते तेथून निघालें। शिरोळ ग्रामीं येऊन राहिलें। तेथें इनामदार आले। सह कुटूंब दर्शना ॥७५॥ सांगती स्वप्न वृत्तांत। आम्ही अपराधी बहुत। आमुचे दोष अगणित। कोण गणित करील ॥७६॥ परी ते सर्व पोटी घालणें। दासा उद्धारावे कृपेनें। ऐंसे त्याचें गाऱ्हाणें। ऐकूनि महाराज म्हणती तया ॥७७॥ येथें काल एक गृहस्थ। अशीच गोष्ट सांगत। म्हणे मी निद्रिस्थ। असतां अकस्मांत स्वप्न पडलें ॥७८॥ स्वप्नांत एकानें येऊन। एकाएकीं चापट मारून। मूर्खा मजकडे पाय करून। निजलास काय म्हणतसे ॥७९॥ इतुक्यां माजीं जागा झालो। इकडे तिकडे पाहूं लागलो। स्वप्नाचा विचार करीत पडलो। तो उमगलो

आपुल्या मनीं ॥८०॥ तस्[illegible]कडे पाय करून। निजलों होतो मी जाण। पुन्हः न व्हावें तैसें म्हणून। पडलें हे स्वप्न वाटे ॥८१॥ ऐंसे तयानें सांगितलें। तुम्हांलाही ऐंसेचि जाहले। तरीं वर्तन आपुलें। विहिताचार ठेवावें ॥८२॥ यांतील आम्हांसी कांहीं। तिळमात्र ठाऊक नाहीं। परी एवढें आम्ही जाणों पाहीं। तुम्हांसी ते सांगतों ॥८३॥ या शरिराचा अभिमान। वाहणारा अन्य आहे जाण। लहानपणापासून। आपण तयां काय करावें ॥८४॥ ऐंसे ऐकूनि वचन। सर्व आश्चर्य पावती जाण। उभयतां कर जोडून। विनविताती पुनःपुन्हा ॥८५॥ महाराज करिती हास्य वदन। पुन्हः श्रीफल प्रसाद जाण। वंध्यास्त्रीस देऊन। तोषविती तेधवां ॥८६॥ नंतर ती उभयतां। गांविं जाती तत्वतां। भक्तीनें अनुष्ठान करितां। गर्भवती झाली स्त्री त्याची ॥८७॥ नऊमास पूर्ण होऊन। प्रसूत झाली कन्यारत्न। पंचेचाळिसाव्या वर्षि जाण। कन्या झाली वांझेसी ॥८८॥ ईश्वरी कृपा संत कृपा। भावें करितां अनुष्ठान जपा। सिद्धी होय पशू वपा। होमा व्यान लागती अग्नींत ॥८९॥ हें श्रीगुरुचरित्र आख्यान। भावें करिता श्रवण पठण। वंध्यादोष निवारण। होती संततीयुक्त न[illegible] ॥९०॥ स्वामींचा वाडीत संचार। पूजाऱ्यां सांगती शुद्धाचार। भक्ताचां घेऊनी भार। संतान [illegible]। दीधलें ॥९१॥ श्रीदत्ताज्ञा होतां सत्वर। दंड धारण विधी प्रकार। केला त्या योगें फार। दिक्षित स्वामीं संतोषले ॥९२॥ तया योगपट्ट नांव। नृसिंह सरस्वती अभिनव। देऊनि केला नवलाव। अध्यायीं या वर्णिलें ॥९३॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। त्रयविंशोध्याय गोडहा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

## । अध्याय चोविसावा ।।

।। श्रीगणेशाय नमः ।। श्री गुरुभ्यो नमः ।। पुढील कथेचा विस्तार। श्रवण करा सविस्तर। चित्त करूनिया स्थिर। सादरें श्रवण करावया ।।१ ।। ज्योतिर्लिंग असें ख्यात। नामे परळी वेद्यनाथ। तेथील एक ब्राह्मण भक्त। नृसिंहवाडींत रहातसें ।।२ ।। नाम तयाचें वैजनाथ। तीस वर्षांपासूनि तेथ। वास्तव्य करी जनां सांगत। पिशाच्च बाधा असें मज ।।३ ।। जन उपसर्ग न व्हावा। एतदर्थ त्यानें हा कावा। मनीं धरूनी पिशाच्च भावा। राहे स्वच्छंदे करुनी ।।४ ।। पिशाच्च बाधा आपणांस। हे दावावया स्पर्शास्पर्श। संशयी मुद्रा बहुवस। स्नानें करी कृष्णाजळीं ।।५ ।। तेथील सामान्य जन। नेणती सत्पुरुष महिमान। हा निरुपद्रवी सामान्य। पुरुष ऐंसे समजती ।।६ ।। परी सत्पुरुष लक्षणें। बालोन्मत्त पिशाच्चवत् राहणें। पाहतां सूक्ष्मरीतीनें। सज्जना प्रती दिसती ।।७ ।। जो कां असे सज्जन। तोचि जाणें साधु लक्षण। येरे जरी विचक्षण। तरी संत खूण नेणती ।।८ ।। सिद्धी साध्य करूनी भली। जो संताच्या नांवाखालीं। चमत्कार दाऊनि जमविली। शिष्य मंडळी असंख्य ।।९ ।। तया विषय लंपटनर। चमत्कार दिसतां नमस्कार। करिती परी संतपण साचार। नव्हें नरक द्वारची तें ।।१० ।। लालुची जनांचा स्वभाव। जो कां आपुली विषय हाव। पुरवील त्यापाशीं धाव। घेऊनि शरण जाती तयां ।।११ ।। परी आपुले सत्यहित। कोठें आहे नेणती निश्चित। सज्जना दुर्जन ठरवित। दुर्जना नमिती अविचारें ।।१२ ।। करितां दुर्जन संग। प्राप्तनोहे श्रीरंग। शिष्यत्व, गुरुत्व ढोंग। उदरार्थ

सोंग अवघेचि ॥१३॥ रामदास स्वामी समर्थ। शिष्यां सह फिरत फिरत। विप्रगृहीं ग्रामांत। उतरलें असतां एके दिनीं ॥१४॥ त्याच ग्रामीं भ्ररण करित। आला हरिदास तेथे। कीर्तन करुं म्हणत। ग्रामांतील लोकांसी ॥१५॥ तया सिद्धि होती प्राप्त। कीर्तन झालिया समाप्त। वरुनि पुष्पवृष्टीं होत। नेणती वर्म तयाचें ॥१६॥ सकल लोक म्हणती। झालिया कीर्तन समाप्ती। देव पुष्पें वर्षती। कीर्तन भक्ती पाहुनी ॥१७॥ कीर्तना जन समुदाव। निशीं समयीं घेई धांव। चमत्कार पाहण्याची हाव। धरुनि जमती तात्काळ ॥१८॥ हरीगुण श्रवण करणें। यास्तव कीर्तनासी जाणे। हें वर्म सोडूनि पूर्णपणें। सूज्ञ जनही नादावले ॥१९॥ समर्थांचें शिष्यांत। मुसळ गोसावी विख्यांत। शिष्य होता त्याच्या मनांत। कथा श्रवणाचें संचरले ॥२०॥ त्या बुवासी प्राप्त सिद्धी। हें समर्थे जाणूनि आधीं। न लागावें त्याच्या नादीं। म्हणूनि शिष्या आज्ञापिलें ॥२१॥ स्वहस्तें कोरूनि बरी। मारुती मूर्ति मुसळावरी। तें मुसळ गोसाव्या करीं। दिलें होतें समर्थांनीं ॥२२॥ ते खांद्यावरी घेऊनी। गोसावी गेला कीर्तनीं। समर्थांचा शिष्य जाणूनि। सन्मानें बुवानीं बैसविला ॥२३॥ परी कीर्तन होता समाप्त। पुष्पवृष्टीं न होत। तेणें मुसळ गोसावीं मनांत। म्हणें हे अवघें थोतांड ॥२४॥ बुवा अंतरीं घाबरलें। म्हणती आज काय झालें। जन थट्टा करूं लागले। पुष्पवृष्टीं न होय कैंसी ॥२५॥ होता कीर्तन समाप्ती। देव वर्षाव करिती। आज कां ऐंशी स्थिती। जन वदती आपसांत ॥२६॥ बुवानीं वर्म जाणिलें। आजवरी सिद्धी बळें। पिशाच्च करी वर्षाव फुलें। परी ती आज चालेना ॥२७॥

समर्थांचा शिष्य आला। तेणें माझ्या सिद्धीला। आळा असें खास पडला। म्हणूनि खिन्न झालासें ॥२८॥ मुसळ गोसावी स्वस्थानीं गेला। समर्थ पुसती तयाला। काय चमत्कार देखिला। तो सांग आम्हा कारणें ॥२९॥ तो सांगे सर्व थोतांड। जनाचें कोणी धरावे तोंड। पुष्पवृष्टीचें माजविलें बंड। कीर्तनी होतसे म्हणूनिया ॥३०॥ तयासी म्हणती समर्थ। पुष्पवृष्टीं होय हे यथार्थ। परी त्याचें वर्म निश्चित। तूं नेणसी अद्यापी ॥३१॥ सिद्धी प्राप्त असे बुवासी। पिशाच्च पुष्पें वर्षि परियेसी। अज्ञानी नर या वर्मासी। नेणूनी धांवती उगेची ॥३२॥ मुसळांवरी मारुती मूर्ति। कोरिली असें त्याची भीति। पिशाच्च न येई पुढती। पुष्पवृष्टीं कैंसी होय ॥३३॥ जना पाहिजे चमत्कार। चमत्कारास्तव नमस्कार। या विरहित ज्ञातानर। त्याचा अव्हेर करितातीं ॥३४॥ सिद्धीच्या नादीं जो लागला। तो परमार्थीं मुकला। तो दिसें जरी भला। तरी देव दूर तयासी ॥३५॥ इहलोकीं तयामान। देती अज्ञानी जन। तो सत्पुरुष नव्हें जाण। सिद्धीचा भक्त जाणावा ॥३६॥ ह्या सिद्धि नव्हत मूर्तिमंत। मुमुक्षूंस विघ्नेंयथार्थ। ज्याचें मन परमार्थांत। त्यासी आडव्या पदोपदीं ॥३७॥ हे समर्थांचे वचन। ऐकूनि मुसळ गोसावी जाण। म्हणे धन्य समर्थ चरण। अगाधमहात्म्य संताचें ॥३८॥ तो वैजनाथ ब्राह्मण। सामान्य नरा दिसे सामान्य। परी निरपेक्षतां निरभिमान। गुण बाणला अंगीं जयाच्या ॥३९॥ श्रीची नृसिंहवाडीस। पूजा माध्यान्ह समयांस। त्यावेळीं हा ब्रह्म कर्मास। करीत बैसे कृष्णातिरी ॥४०॥ पुजाऱ्याकडून देवासी। नैवेद्य येतां परियेसी। पूजाऱ्यानें वैजनाथासी।

पाचारणें भोजना ॥४१ ॥ महापूजा नसतां जाण। सेवेकरी येऊन। त्यासी शीघ्र बोलावून। भोजना कारणें ते नेती ॥४२ ॥ आयता जासी भोजनासी। माधुकरी कां न मागती। ऐंसे पुसतां जनांसी। सांगतसें काय तें ऐका ॥४३ ॥ भिक्षेस जाऊं न दे समंध। या समंध बाधेमुळें खेद। दैवें मज केलें बद्ध। परी मुक्ती सुख श्रीगुरु देतसें ॥४४ ॥ असो त्याचें भाषण। ऐकूनि समस्त जन। म्हणती बाधा खास जाण। असावी असें भासते ॥४५ ॥ बडबडतो भलतेंच। मना न वाटे संकोच। असे पिशाच्चाचा जाच। म्हणूनि वेड्या समगती ॥४६ ॥ कोणी शिव्या देती। त्याची ही नसे खंती। मानापमान नाहीं चित्तीं। वेड्यासम गती म्हणूनी ॥४७ ॥ परी यासी ब्रह्मभूत। जडलें ते कोणी नेणत। हा ब्रह्मनंदें उन्मत्त। ऐंसे कोणा उमजेना ॥४८ ॥ असो ज्याचा सखा हरी। त्यावरी विश्वकृपा करी। त्याचा योगक्षेम श्रीहरी। चालवितो आस्थेनें ॥४९ ॥ बोलाविती वैजनाथा। तो एकवेळ जेऊनी तत्वतां। स्वानंदे विचरे निश्चलता। न मोडे ज्याच्या चित्तांची ॥५० ॥ भोजन दक्षिणेचा पैसा। न खर्चितां सहसा। जमा करुनि एकेक असा। आठ रुपये जमविलें ॥५१ ॥ तें एका गृहस्थापाशीं। ठेविलें असती परियेसी। चमत्कार झाला बहुवसी। तो एकचित्तें ऐकावा ॥५२ ॥ एके दिनीं स्वामीशी। ब्राह्मण म्हणती एकांतेसी। वैजनाथाची स्थिती कैशीं। निवेदावी स्वामींनीं ॥५३ ॥ महाराज म्हणती विप्रांसी। हा देह प्रारब्धासी। भोगीतसें पूर्वजन्मेसी। इति कर्तव्यता झालीसें ॥५४ ॥ अखंड धारे समान। त्याची निश्चल वृत्ती जाण। परमेश्वरीं कृपेवीण। ऐशीं वृत्तीनोहेची ॥५५ ॥ त्याचें पूर्वजन्मीं श्रवण। झालें असे

निश्चयें करून। ऐसें ऐकतां भाषण। विप्र आश्चर्य करिताती ॥५६॥ एकांत पाहुनी दर्शनार्थ। येतसें तो वैजनाथ। महाराज विनोदें पुसत। तयांलागीं एके दिनीं ॥५७॥ रुपयाची व्यवस्था कांहीं। देवाकडे असे कीं नाहीं। तो म्हणे समंध कांहीं। सुचूदेत नाहीं मज ॥५८॥ स्वामींसी लोक म्हणती। समंधबाधा कोणे रिती। ते समस्तां सांगती। ब्रह्म समंध बाधा असे ॥५९॥ यासी लागलें महाभूत। ते कांहीं सुचूं न देत। पुन्हः पातला वैजनाथ। एके दिनीं दर्शना ॥६०॥ महाराज म्हणती तयासी। खजिन्यांतूनि परियेसी। देवा प्रीत्यर्थ कांहींसी। योजना करिसी कीं कसें ॥६१॥ भाषण ऐकूनि वैजनाथ। काहीं न वदे तटस्थ। पाहूनि मंडळी म्हणत। किमर्थ आज ही स्थिती ॥६२॥ हा झालासें निरुत्तर। याच्या मनीं काय विचार। आला असें साचार। तो सत्वर विचारावा ॥६३॥ ऐंसे विप्र समस्त। स्वामीसी सुचवीत। मग ते पुसती यथार्थ। खजिनदारा बोलावुनी ॥६४॥ तो म्हणे आम्ही स्पष्ट। सांगतों त्याचें अवघे आठ। रुपये आम्हांपाशीं गांठ। मारुनी ठेविलें असती ॥६५॥ मग ठरलें सर्वानुमतें। एक देऊनी शिलकी तें। देवा प्रीत्यर्थ खर्चायातें। शेषसात काढावें ॥६६॥ श्रीची महापूजा करावी। झुणका भाकरी भोजना खावी। ब्राह्मण मंडळी तोषवावी। द्रव्य याचें खर्चूनिया ॥६७॥ ऐसा स्वामी पुढें बेत। ठरला तो ऐकूनि निश्चित। समस्तांसी बोले वैजनाथ। माझी अट एक असे ॥६८॥ देवाची स्वतः स्वामींनीं। महापूजा करावी बैसूनी। ती रुचे मज लागुनी। मान्य करावी ही अट ॥६९॥ महाराज म्हणती अवश्य। आपण करुं श्रीपुजेस।

वार्ता कळली सकळांस। ग्रामा माजीं तात्काळ ॥७० ॥ महापूजा श्रीपादुकेची। स्वामी हस्ते होणार साची। झुणका भाकर वैजनाथाची। नैवेद्य अर्पण होणे असें ॥७१ ॥ मग काय विचारावे। त्याला साह्यतां या नांवें। ग्रामस्थ मंडळीनें स्वभावें। आरंभ केला आइतिसी ॥७२ ॥ स्वतः महाराज दुजे दिनीं। प्रातःकाळीं उत्तमासनी। श्रीपुजेस बैसले येऊनी। स्वहस्तें पूजा करिती पैं ॥७३ ॥ इकडे पाकसिद्धता। जन करिती तत्वतां। श्रीस महानैवेद्य होतां। पंक्ती बैसल्या भोजना ॥७४ ॥ भोजनाचा उत्तम बेत। त्या माजीं विशेष पदार्थ। केला होता पंचामृत। होता अमृत तुल्य तो ॥७५ ॥ त्या दिनीं सहस्त्रावरी। सहाशतें निर्धारी। जेऊनी झाले नरनारी। सात रुपयें खर्चांत ॥७६ ॥ आश्चर्य वाटलें जनासी। आनंद झाला सर्वांशी। कोण समर्थ जाणावयासी। सत्पुरुषांचें महात्म्य ॥७७ ॥ श्रीगुरुचरित्री असे कथा। भास्कर नामें ब्राह्मण होता। त्रिवर्गा पूर्ति तत्वतां। सामुग्री आणिली तयानें ॥७८ ॥ त्याचा भाव जाणूनी। श्रीनृसिंह सरस्वतीनीं। अगणीत नर जेववूनी। तया तोष दीधला ॥७९ ॥ तैसें हें उदाहरण। प्रत्यक्ष पाहिलें म्हणती जन। वैजनाथासी पुढें करून। स्वामींनी लिला दाखविली ॥८० ॥ श्रीवासुदेवनंद सरस्वती। आम्हां नर रुप दिसती। परी नर नव्हें श्रीदत्त मूर्तिं। आम्हां प्रती वाटतसें ॥८१ ॥ ऐंसे म्हणूनि नमस्कार। करिताती वारंवार। महाराजांचे स्तुती स्तोत्र। प्रेमभावे गाती जाणा ॥८२ ॥ स्वामी सकळां म्हणती। आम्ही नेणो साधन रिती। फक्त शब्द ठावें असती। दत्त ऐंसे दोनची ॥८३ ॥ ही नामे ज्याची रसना। अखंड उच्चारील जाणा।

त्याच्या पुण्यासी नाहीं गणना। जगद्वंद्य जाणा तो॥८४॥ श्रीगुरु चरित्राचा पाठ। करितां नरासी श्रेष्ठ। ज्ञान प्राप्त होऊनि वरिष्ठ। वैकुंठ पद लाभें त्या॥८५॥ येणें परी जनासी। नाम महिमा आहे कैसीं। महाराज सांगती परियेसी। तेचि तुम्हां कथितसें॥८६॥ स्वतः श्रीगुरु चरित्र। प्रेमयुक्त स्वामी वाचित। जनांसी म्हणती याचा अर्थ। आम्हा न कळे कांहींच॥८७॥ ग्रंथ पाहतां प्राकृत। महाराजां सारखें मुक्त। वाचक म्हणती अर्थ। याचा न कळे आम्हासी॥८८॥ यावरुन त्या ग्रंथाचें। महात्म्य काय वर्णावे वाचे। कळेल त्या भाग्यवंताचे। सुकृत उदया आले खरें॥८९॥ ब्राह्मणाचे रुपये सात। खर्चूनी स्वामींनीं केली मात। द्विज जेवविलें बहुत। अध्यायीं या वर्णिलें॥९०॥ समर्थें सत्य प्रचीती। या वया स्वशिष्याप्रती। सुमन वृष्टींची मिथ्या स्थिती। पूर्णपणें जाणविलें॥९१॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। चतुर्विंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु।
॥श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## । अध्याय पंचविसावा ।।

।। श्रीगणेशाय नमः ।। श्री गुरुभ्यो नमः ।। शिरोळग्रामीं तीन दिवस। राहूनि तेथील सर्व जनांस। आनंदविती मग सावकास। मार्गक्रमण आरंभिती ।।१ ।। येती गाणगापुरासी। मठामाजीं परियेसी। श्रीचे ध्यान करिती स्वस्थ चित्तेंसी। परी ध्यानीं न येई श्रीदत्त मूर्ति ।।२ ।। म्हणूनि मनीं खिन्न होती। कापाध्यानीं श्रीदत्त मूर्ति। नये कळे कारण निश्चिती। माझी चित्त वृत्तीं तरी स्थिर ।।३ ।। श्रीनृसिंह सरस्वति। गाणगापुरींवास करिती। मठधामीं राहती निश्चिती। श्रीगुरु चरित्रीं लिहीले असें ।।४ ।। माझा भक्त जो निष्कामीं। त्यासी अवश्य या मठधामीं। भीमा आमर जा संगमीं। देईन देईन प्रतिज्ञा जी ।।५ ।। ती आजी माझ्या अनुभवास। कां बंरे येईना प्रत्ययांस। काय श्रीच्या ही प्रतिज्ञेस। विघ्न येतसें म्हणावें ।।६ ।। मी इतुका वेळ या ठायीं। एकाग्र बैसलों पाहीं। परी श्रीमूर्ति ध्यानीं न येई। काय न राही ती येथें ।।७ ।। ऐसे मनीं चिंतीती। पुन्हः ध्याना बैसती। तो त्यांना दृष्टांती। श्रीदत्त सांगती येऊनी ।।८ ।। अरे येथील नारी नर। वर्तन करिती स्वैर। यास्तव मी संगमावर। राहिलो असे जाऊनी ।।९ ।। तूं तेथेचीं येई। माझें दर्शन होईल पाहीं। येथें दुर्जन सकळही। माझी अवज्ञा करिताती ।।१० ।। यांना सुटली द्रव्य आस। तूं येथें राहू नकोस। माझें दर्शन संगमस्थानास। तुज अवश्य होईल ।।११ ।। ऐंसा होतां दृष्टांत। संगमीं जाती त्वरित। श्रीचे दर्शन यथार्थ। झालें त्यांना तात्काळी ।।१२ ।। श्रीचा निरोप घेऊनी। मग निघालें तेथोनी। येती माहूरगड स्थानीं। मातापुरीं

मार्गक्रमित ॥१३॥ तेथूनि परळी वैद्यनाथ। ज्योतिर्लिंग प्रख्यांत। स्थान बरवें विख्यात। येती दर्शनार्थ तेथें ॥१४॥ कोटीतीर्थ स्नान करुनी। वैद्यनाथेश्वरा वंदूनि। राहती कया धुगंगा पावनी। नरसी नामक ग्रामांत ॥१५॥ क्रमिती चातुर्मास तेथ। ब्राह्मण वस्ती पाहुनी बहुत। आनंदती ग्रामस्थ। महाराजांच्या दर्शनें ॥१६॥ त्या देशांतील जन। आधींच असती भक्तिवान। त्यात सत्संग जाण। होता अनिवार सुखावती ॥१७॥ स्वामीनीं तेथील जनांस। करुनि सदुपदेश। त्यांच्या धर्म वासनेस। अधीक भर घातली। आधींच दूध पवित्र मधुर। त्यांत पडली साखरेची भर। त्या मधुरत्वाचा बहार। अनुभवा वीण कळेना ॥१९॥ गोड पदार्थ अथवा साखर। पडलेल्या ठायीं भराभर। जेवी मुंग्या जमती अपार। तेवी नारीनर तेथें जमती ॥२०॥ दिवा पेटविता तत्क्षणीं। पतंग धांव घेती झणीं। तेवी हजारों भक्त त्यास्थानीं। दर्शनार्थ पातलें ॥२१॥ पतंगा बोलवावयापाहीं। दिवा स्वयें जात नाहीं। सत्पुरुष उपदेश पाही। याच पद्धती बोलिला ॥२२॥ परी त्यांच्या पासून। उपदेश घ्यावया जाण। लोक येती दुरून। ऐंसे महत्त्व सज्जनांचें ॥२३॥ गुलाबाची कळी उमलता। बोलावणें न पाठरितां। आपोआप तत्वतां। मधमाशा येती मधार्थ ॥२४॥ वर पडणारे पर्जन्य पाणी। विचित्रकार पन्हाळांतुनी। भूवरीं आलें म्हणूनि। तें काय पन्हाळ जळ म्हणावें ॥२५॥ वास्तवीक ते पर्जन्य जळ। पन्हळांतून वाहे निर्मळ। तेवीं साधू उपदेश सकळ। ईश कृती समजावी ॥२६॥ नरसी ग्रामीं भाविक जन। सत्संगार्थ येती जाण। तेणें तो ग्राम गजबजून। राहिलासें तें समयीं ॥२७॥ शके अठराशे

श्री वासुदेव चरित्र

सत्तावीस। सालीं तेथ चातुर्मास। केला नरसी ग्रामीं वास। यती राजे सुखानें।।२८।। कयाधु सरिता तटीं। वस्ती केली गोमटी। शुद्ध पाहुनी विप्रमठीं। यज्ञांग वृक्षातळीं।।२९।। इकडे नृसिंहवाडीत। मारिका आजाराजी सांथ। सुरुं झाली तेणे समस्त। तेथील जन घाबरलें।।३०।। प्रिय शिष्य विख्यात। असती जे स्वामी दिक्षित। त्यांना हा वृत्तांत। कळविती तेथील पूजारी।।३१।। म्हणती आम्हां कांहीं उपाय। सांगा जेणे प्रतिकार होय। रोगाते वारितील श्रीपाय। अपाय न होय आम्हां तें।।३२।। ते सकळां सांगती जाण। भावें आरंभा श्रीदत्त भजन। श्रीदत्त नाम रात्रंदिन। चालवा विघ्न निरसेल।।३३।। दिगंबरा दिगंबरा। श्रीपादवल्लभ दिगंबरा। ह्या नामोच्चारें भजन करा। विधी हरिहरा तोष होय।।३४।। पुढें त्या नृसिंहवाडींत। एके दिनीं अकस्मांत। श्रीची पालखी फिरत। तो विचित्र वृत्त घडलेंसें।।३५।। पालखीतील उत्सव मूर्ति। भूतळीं पडे त्वरित। हा प्रसंग पाहुनी चित्त। विकळ जाहलें सर्वांचें।।३६।। म्हणती आम्हांवरी दारुण। प्रसंग येण्याचें हे चिन्ह। मग सर्व वर्तमान। दिक्षित स्वामीस निवेदिती।।३७।। त्यानीं त्वरें वर्तमान। साद्यंत पत्रीं लिहून। सर्वांश्रुत करुन। पाठविलें महाराजा।।३८।। ते सर्वारिष्ट शांत्यर्थ। करुणा त्रिपदी पाठवीत। पुजाऱ्यास आज्ञापित। देवापुढें म्हणावया।।३९।। तेंव्हापासुनी ती पदें। श्रीमूर्ती पालखीमध्यें। बैसली असतां आनंदे। म्हणती प्रेमें पूजारी।।४०।। इतिहास रुपें जाण। केलें चरित्र वर्णन। त्यांत ती पदें तीन। अवश्य लिहीली असती।।४१।। ही सर्वारिष्ठ शांत्यर्थ। करुणापदें संग्रहांत। ठेऊनी जो नित्य गात। तो

सुखस्वाद घेतसें ॥४२॥ त्या वर्षि वाडीत। मारिका आजाराची सांथ। आली ती शांत। झाली त्वरित श्रीकृपें ॥४३॥ चातुर्मास होतां पूर्ण। स्वामी निघती नरसीहून। आवंढ्या नागनाथेश्वरा वंदून। आले मूळ तापी ग्रामीं ॥४४॥ जी जन मन मोहिनी। त्वरित अघ नाशिनी। तापी पश्चिम वाहिनी। त्रि दिन तेथ राहिलें ॥४५॥ तेथूनि करंजनगरा येती। सत्वर पाहती अमरावती। जगदंबा दर्शन करिती। चित्रकूट पर्वतीं मग येती ॥४६॥ पयश्विनी मंदाकिनी। संगमीं स्नान करुनि। कामती नाथा वंदूनी। ऋष्याश्रम पाहती ॥४७॥ भरद्वाज, अगस्ती, अत्री आश्रम। पाहुनिया उत्तम। करुनि तेथें विराम। नंतर पुढें निघाले ॥४८॥ ज्या तीर्थास्नान करिती। ज्या देवतेचे दर्शन घेती। त्या तीर्थ देवतेसी स्तविती। रुचिर पदें रचुनी ॥४९॥ ती सर्व स्तुती पदें। गद्य रुप चरित्रामध्यें। लिहीली असती आनंदें। अवश्य पठण करावी ॥५०॥ मार्गक्रमण करित। आले ब्रह्मावर्ति त्वरित। तेथूनि काशीपुरी येत। तारक मठांत राहती ॥५१॥ श्रीवाराणसीपुरींत। स्वयं प्रकाश स्वामी नांदत। परोपकारी रत। असे चित्त जयाचें ॥५२॥ ज्ञान वृद्ध वयोवृद्ध। निरहंकारी शुद्ध बुद्ध। ज्यांच्या दर्शन मात्रें आनंद। होय प्राणी मात्रांसी ॥५३॥ महाराजांच्या दर्शनाची। त्याना इच्छा बहुदिवसांची। तो त्यांच्याच आगमनाची। वार्ता कळली एकाएकी ॥५४॥ मग काय विचारावें। तदानंद गगनीं न मावे। मठांत पातले स्वभावें। निज शिष्यांसहित ॥५५॥ महाराजांना वंदन आरंभिती। तो तें तयाना म्हणती। आपण विरुद्ध करितसा निश्चिती। वंदन आपणाप्रती करितों मी ॥५६॥ आम्हा वडील आपण।

आम्ही आपणां करितो वंदन। तेव्हां ते म्हणती जाण। आपण जरी लहान असा ॥५७॥ तरी आम्हां असा वंद्य। सांगतो ऐका विशद। श्रीनृसिंह सरस्वती प्रसिद्ध। ज्यांचें वर्णन श्रीगुरुचरित्रीं ॥५८॥ ते जेव्हां या वाराणसीस। आले करुनि संन्यास। दश वर्षांचे होते खास। त्यांना ब्रह्मनिष्ठ यती वंदिती ॥५९॥ श्रीदत्तावतार जाणून। मोठमोठें यती जाण। त्यांना वंदिती तद्धावें जाण। मी आपणां वंदितसे ॥६०॥ म्हणूनि महाराजासी वंदन। करिती स्वयंप्रकाश जाण। शिष्यानीं तें पाहून। महाराज पद वंदिलें ॥६१॥ तेथें कृष्णानंद सरस्वती। नामक प्रख्यात होते यती। त्यानीं ही महाराजांप्रती। वंदन केलें भक्तीनें ॥६२॥ महाराज श्रीदत्तावतार। याच भावानें साचार। अनेक यतीचा संभार। दर्शन सुखा पातला ॥६३॥ अनेक शास्त्रीं विद्वान। ब्रह्मचारी गृहस्थ जाण। स्वामीचें होता दर्शन। समाधान पावलें ॥६४॥ म्हणती सद्दर्शनें कृतार्थ। झालों आजी यथार्थ। आमुचें झालें धन्य जीवित। काशी क्षेत्रांत राहुनी ॥६५॥ आम्हा करावया पुनित। विश्वेश्वर आले साक्षांत। म्हणूनि जन समुदाय तेथ। दर्शनार्थ धांवतसें ॥६६॥ मठांत बसावया तिळभर। जागा नसे नारीनर। बैसले दर्शानर्थे अपार। निज व्यवसाय सोडुनी ॥६७॥ प्रपंचासी कोण पुसें। दर्शनाचे लागले पिसे। संत दर्शन अलभ्य असे। म्हणूनि मठाकडे धांवती ॥६८॥ सत्पुरुष दर्शन महिमा। त्यापुढें कोण पुसे कामा। जे असती सत्समागमा। भाग्य त्यांचे न वर्णवे ॥६९॥ सत्समागम ज्या घडे। तयादेव सहज जोडे। अंगी विपुल शांति जडे। ऐश्वर्य अमित येतसें ॥७०॥ दर्शन मात्रें व्हावे धन्य। एवढा मनीं हेतू जाण।

वेडावले सकळ जन। धांवती तल्लीन होऊनी।।७१ ।। महाराज तीन दिन फक्त। राहूनि काशी क्षेत्रांत। पंचक्रोशी करावया निघत। अनेक भक्तां समागमें।।७२ ।। विश्वेश्वराचें करुनि दर्शन। निघालें पंचक्रोशीस जाण। त्यांचे येणे रितीगमन। पाहूनि उद्वेग जना वाटे।।७३ ।। स्वयंप्रकाश सांताश्रम। कृष्णानंद अद्वैताश्रम। म्हणती सत्समागम। लाभला नाहीं बहुकाळ।।७४ ।। जाहलें नाहीं संभाषण। क्षेम कुशल वर्तमान। पुसावया एकही क्षण। आम्हां नाहीं गवसला।।७५ ।। भुकेल्या पुढें पक्वान्न। सेवावया ठेविलें जाण। परी ते दुर्दैवें करुन। एकाएकीं अदृश्य होय।।७६ ।। दरिद्यांसी धन। सापडले अवचीत जाण। आनंदित झालें मन। तो तें गुप्त होय जेवी।।७७ ।। तेवी ही गोष्ट घडली। चित्तवृत्तीं आनंदली। तो दुखाची वेळ पातली। दुर्भाग्यें करुनी।।७८ ।। तीन दिवस पंचक्रोशी। यात्रा करिती विशेषी। अनेक जन समागमेसी। तेय वेळीं महाराज।।७९ ।। आले रामेश्वर स्थानासी। तो निशीं समयेसी। श्रीदत्त दृष्टांतेसी। आज्ञापिती तयांना।।८० ।। अरे श्राद्धान्न खाऊन। यात्रा करसी काय कारण। ही तुला शिकवण। दिली कोणी येथेंची।।८१ ।। ऐंसा दृष्टांत ऐकून। सर्व असती जें जन। त्यांना पुसती जाण। भिक्षे श्राद्धान्न वाढितां कीं।।८२। यतीसी श्राद्धान्न। वाढूं नये भिक्षे जाण। तो म्हणेल वाढा म्हणून। तरीच वाढणें तयासी।।८३ ।। त्यांचे आज्ञेविण। कदापी भिक्षेस श्राद्धान्न। धर्म मर्यादा सोडून। किमर्थ आम्हा वाढितां।।८४ ।। पंचक्रोशींत ठायीं ठायीं। तीर्थक्षेत्रीं अवश्य पाही। श्राद्धान्न करितां कांहीं। तुम्ही भिक्षान्न वाढितां।।८५ ।। तुम्हा श्राद्ध करणें

अवश्य। ते न करितां आम्हास। भिक्षा वाढिल्या अन्नास। दोष आम्हा बहू असे ॥८६॥ आम्ही भिक्षा श्राद्धान्नाची। न सेवूं या स्तव तुम्ही श्राद्धची। करणें वर्जिलें येणेची। धर्महानी झालीसें ॥८७॥ महाराजांचें ऐसें वचन। ऐकूनि ते सर्वजन। म्हणती आम्हीं अपराधी पूर्ण। क्षमा करणें स्वामिया ॥८८॥ मग श्राद्धकर्म करणें भाग। नव्हते ज्यांना ज्यांना सांग। त्यानीं स्वामीस यथासांग। भिक्षा वाढिली ते ठाईं ॥८९॥ त्याचा नैवेद्य करुनी देवासी। ते बसती भोजनासी। तो घांस न गिळवे परियेसी। म्हणती ऐंशी स्थिती कां होय ॥९०॥ विचारी तो ध्यानीं बैसूनी। तो दृष्टांत झाला तें क्षणीं। वाडीचा रस्ता धर म्हणूनि। सकळ जनां सांगती ॥९१॥ म्हणती सकळही जन। महाराजांनीं करावें गमन। परी पंचक्रोशीपूर्ण। आम्हां समागमे ॥९२॥ आम्हां करणें कृतार्थ। मग जावें मार्ग क्रमित। तो तें दंड घेऊनि हातांत। निघती दक्षिण दिशेसी ॥९३॥ सकळ जन आडवे येती। पुन्हःपुन्हः विनत्निनी। म्हणूनि पंचक्रोशी वाट धरिती। तो पोटी शूळ उत्पन्न होय ॥९४॥ मग सर्वां शांतवून। निघाले वाडी पथ धरून। प्रयाग त्रिवेणी संगमा जाण। आले क्षण न लागतां ॥९५॥ त्रिवेणी वरी जाऊन। स्नान करिती संगमीं जाण। तो प्रयाग वाळतें ब्राह्मण। त्याचें स्वागत करिती पै ॥९६॥ त्यांना नमस्कार करून। म्हणती दर्शनें केलें पावन। महाराजा विषयीं जाण। त्याची पूज्य बुद्धि जाहली ॥९७॥ त्यांचा अधिकार ठाऊक नसतां साचार। त्यांच्या चरणीं नम्र। केवि झालें न कळे हे ॥९८॥ संन्याशी आहेत पाहून। पूज्य बुद्धि जाहली उत्पन्न। ऐसें म्हणावें तरी जाण।

संन्याशाची उणीव तेथें नसे ॥९९॥ शेंकडो यती ब्रह्मचारी। असती तेथें घरोघरीं। हे म्हणणें अयोग्य तरी। वाटतसें खास आम्हा ॥१००॥ ज्याचा सखाहरी। त्यावरी विश्वकृपा करीं। हें वचन येथें निर्धारी। साजें अवश्य सत्पुरुषीं ॥१०१॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। पंचविंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय सव्विसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ होऊनि वासनेचा क्षय। जे तृप्त झाले अक्षय। ज्यांना परोपकारा खेरीज कर्तव्य। उरलें नाहीं सर्वाथा ॥१॥ सात्विक गुण संपत्ती। जयापाशीं असें निश्चिती। ज्ञान दृष्टीनें अखिल जगती। चैतन्य स्वरुप दिसें जया ॥२॥ जन दुःखें जे दुःखीं। लोक सुखानें जे सुखीं। वसुधा सर्व कुटूंबा सारखी। भूतदयेमुळें वाटे ॥३॥ हरावया पर दुःख। स्व जीवाचा बळी देख। द्याया तयार असती ऐक। संतोषानें जाणा ॥४॥ प्राणीमात्रांच्या हिताविषयीं। जे अहर्निश झटती पाही। यास्तव निज संसाराही। जयांनीं दिली तिळांजुळी ॥५॥ स्वार्थाचा होम केला। अंगीं सुकृताग्नी भडकला। तो लोकांच्या पाप राशीला। दहन कराया कारणें ॥६॥ अविद्या तिमीर निर्मूलन।करिती ज्ञान प्रकाशे जाण। जन मुखश्री प्रसन्न। करिती जे निज तेजें ॥७॥ सर्वांना कर्तव्य तत्पर। करण्यापुरतें शरीर। योग सामर्थ्य निरंतर। अंगीं वसे जयाच्या ॥८॥ विषय जन्य सुखाहूनी। सरस आत्मानंदाचा ज्यांनीं। लाभ करून घेतला लक्षगुणीं। वंदनीय पुरुष समर्थ ते ॥९॥ ज्यांना पाहतांची सत्वर। नम्र होतसें शीर। तें ब्रह्मादिका साचार। वंदनीय जाणावे ॥१०॥ असो स्वामी आले प्रयागांत। ही वार्ता गेली काशींत। तेथूनी पुन्हः सर्वही भक्त। येती त्यांच्या दर्शना ॥११॥ नमूनि म्हणती जन। काशीतील भक्तां दर्शन। न देतां न पुसतां जाण। आपण निघूनि आलांत ॥१२॥ काशी निवाशीं जन। असती धन संपन्न। पाप वृत्तींकडे मन। असे भासलें कीं काय ॥१३॥ ऐकूनि

या त्यांच्या भाषणा। ते म्हणती सकळ जना। ही तनू काशी विश्वेश्वराची जाणा। श्रीदत्तार्पण असें ॥१४॥ त्यांची आज्ञा जैशीं। तैसें राहणें आम्हांसी। आज्ञे नुरुप वागण्यासी। सदा तत्पर असो आम्ही ॥१५॥ देवाचें आज्ञे नुसार। वर्तन आमुचें साचार। वचन ऐकूनि निरुत्तर। सकळ जन जाहलें ॥१६॥ सर्वां बोलती प्रेमपूर्वक। आपुल्या ठायां जावे देख। काया वाचा मनें एक। विश्वेश्वर भजत जा ॥१७॥ सर्वां आमुचा नारायण। अवश्य सांगावा जाण। परता मागें येथून। ठायीं आपुल्या जावया ॥१८॥ ऐसें सांगूनि सर्वांप्रती। स्वामी चालले सत्वरगती। आलें ब्रह्मावर्ता निश्चिती। वार्ता फांकली गांवांत ॥१९॥ धांवत येती सकळ जन। आनंदे घेती दर्शन। क्षेम कुशल वर्तमान। पुसती प्रेमें तेधवां ॥२०॥ त्या रात्रीं मठांत। जमूनि सर्वही भक्त। भजन करिती प्रेमयुक्त। गाती नाचती आनंदें ॥२१॥ तेथे त्या समयीं। गोपाळबुवा होता पाही। म्हणे स्वामींनीं या ठायीं। पुनश्च दर्शन दिलें मज ॥२२॥ तरी इष्ट हेतू आपुला। पाहिजें येथेंच साधिला। नातरी आपणांला। वारंवार संधी न साधे ॥२३॥ परी भीती वाटे मना। धारिष्ठ अंगीं येईना। माझी विनंती स्वामींना। मान्य होईल कीं कसे ॥२४॥ ऐंशा समर्थापाशीं। बोलूं कैंचा परियेसी। पात्र कीं अपात्र त्यासी। मनीं शंका ही वाटे ॥२५॥ मग एके दिवशीं। कागदावरी परियेसी। लिहून इष्ट हेतूसी। तो पुढें ठेविला ॥२६॥ तो कागद घेऊनी जवळ। स्वामी वाचिती तात्काळ। मग म्हणती पाहुनी वेळ। पुरवूं तव कामना ॥२७॥ तिसरें दिवशीं प्रातःकाळीं। बोलावुनी त्या सुवेळीं। अनुग्रह करिती तात्काळीं। अती प्रेमें करुनिया ॥२८॥ गोपाळनाथा तो दिन। आनंदाचा

झाला जाण। म्हणें कृपा करून। कृतार्थ केलें स्वामींनीं ॥२९॥ जन्मा आल्याचें सार्थक। झालें माझे आजी देख। झालों पावन निःशंक। निष्कलंक होऊनी ॥३०॥ केवळ पापी अनिवार। माझा करुनि अंगिकार। शिरीं घेतला पूर्ण भार। धन्य सद्‌गुरु माऊली ॥३१॥ म्हणूनि मस्तक ठेवी पायीं। म्हणे काय होऊं उतराई। सद्‌गुरु चरणाची पाही। पूजा कैंशी करुं आतां ॥३२॥ मज घेतलें पदरांत। दोष न पाहिलें अमित। अनुकंपा करुनि क्षणांत। केलें कृतार्थ मज लागीं ॥३३॥ सद्‌गुरुची नवलाई। वर्णावी ती अल्पपाही। अंतपार नाहीं। अढळ पद दात्री खरी ॥३४॥ मग पद्य युक्त स्तुती। करुनिया यथामती। तयानें केली आरती। महाराजांची ते वेळीं ॥३५॥ आरती प्रारंभः। आरती गुरुराया। महाराज यतिवर्या। विनविती भक्तवृंद। कर जोडूनिया पाया ॥धृ०॥ कर्म हीन नर झाले। भक्ती मार्गा नेणती। दिनोद्धार करावया। नर तनूस्वीकारीसी ॥१॥ यति दिक्षा घेऊनिया। भिक्षा मागत फिरसी। वासुदेवानंद नाम। जनामाजी मिरवीसी ॥२॥ कीर्ति ऐकनियां येती। भाव अंतरीं धरुन। स्वामी पद दर्शनेंचि। होति पतित पावन ॥३॥ लागलीसें गोपाळाला तुझ्या चरणाची आस। देऊंनियां भक्तीप्रेमा तोडी प्रपंच पाश ॥४॥ आरती समाप्तः। स्वामी राजतये दिवशीं। तत्‌गृहीं येती भिक्षेसी। ऐशापरी तयासी। कृतार्थ केलें कृपेनें ॥३९॥ मग ब्रह्मावर्तांत। एक मास पर्यंत। विश्रांती करुनि निघत। श्रीवाडीस यावया ॥४०॥. त्या ब्रह्मावर्त क्षेत्रांत। स्वामीचा विनोदी भक्त। त्याचे नाम शिवदत्त। होता विद्वान प्रेमळ ॥४१॥ स्वामीसी विनवी कर जोडून। म्हणे जातेवेळीं द्या दर्शन। इच्छा मनीं हीं जाण। विनंती अमान्य करुं नये। महाराज म्हणती तयासी। दर्शन करणें

तुजसी। तरी पुर्णपणें या समयासी। इच्छा तृप्त करुन घे ॥४३॥ आम्हीं प्रातःकाळीं गमन। अवश्य करणार जाण। तो म्हणे मी दर्शन। अवश्य करीन ते वेळीं॥४४॥ ऐसें म्हणूनी तो तेथ। निजला मठद्वारांत। स्वामीच्या गमन मार्गांत। समयी जागती ठेऊनी॥४५॥ परी स्वामी रायांनी। तीन याम होतां रजनीं। मार्ग स्वीकारिला झणीं। विनोदी घोरत पडलासें॥४६॥ कोण्या पंथे कैंसे गेले। हें कांहीं तया न कळे। मार्गांत तरी तेवेळें। निजला होता यथेच्छ॥४७॥ जागृत होऊनि पाहिलें। तेथें कोणी न देखिलें। म्हणे पदरीं मूर्खत्व आले। व्यर्थ परिक्षा पाहिली॥४८॥ त्या समयीं ब्रह्मावर्तांत। स्वामीच्या दर्शनार्थ। गोपाळाचार्य पंडित। गालव पुराहुनि येती॥४९॥ जैंसे हे असती विद्वान। तैंसेची भगवद्भक्त जाण। यांचे स्वामीसी भाषण। किंचित्काल जाहलें॥५०॥ सगुण निर्गुण उपासना। हा विषय होता जाणा। पंडिताच्या शंका। निवारिल्या यतिराये॥५१॥ मग निरोप घेऊन। गालव पुरीं येती जाण। महाराज करिती मार्गक्रमण। दक्षिण दिशेस लक्षुनी॥५२॥ त्यांचे करावया दर्शन। मार्गिं अनेक भक्तजन। बैसले असती जाण। मार्ग प्रतिक्षा करीत॥५३॥ त्या सर्वांदर्शन देत। स्वामी क्रमिती दक्षिण पंथ। संस्था निकानें मार्गांत। आपुले सेवक ठेविलें॥५४॥ ते स्वामीस विनवीती। म्हणती धन्याची विनंती। मान्य करुनि निश्चिती। तेथ पर्यंत चलावे॥५५॥ येणेंपरी आग्रह पूर्वक। पाहूनि स्वामी म्हणती देख। तुम्हीं मज प्रथम एक। सांगा मी पुसतो तें॥५६॥ तुमच्या धन्यानें तुम्हांसी। काय आज्ञापिलें परियेसी। ते सांगा निश्चयेसी। मग मी तुम्हांसी सांगेन॥५७॥ ते म्हणती स्वामीसी। या मार्गानें एक संन्याशी। येईल

तुम्हीं प्रार्थुनी त्यासीं। येथ बोलावुनी आणावें ॥५८॥ ऐंसे आमुच्या धन्यानें। आज्ञापिलें आम्हा कारणें। तरी विनंती मान्य करणें। स्वामींनीं येणें तेथवरी ॥५९॥ त्याना बोलती स्वामी जाण। तुमचा धनी न सामान्य। या नगरीचा राजा जाण। आम्हा कासया बोलाविला ॥६०॥ मी तरी सामान्य संन्याशी। तो कां बोलावील आम्हासी। त्यानें इच्छिलेला संन्याशी। मागुती येत असेल ॥६१॥ कोणीतरी पालखींत। राज संन्याशी असेल येत। मजलागीं किमर्थ। दरिद्यासी। पाचारिता ॥६२॥ तो मोठ्या मानाचा। संन्यासी असेल साचा। आमुच्या ठाईं संशय त्याचा। घेऊं नका व्यर्थची ॥६३॥ इतुकें महाराज बोलती। सेवकांची भुलली मती। म्हणती स्वामी योग्य बोलती। अवरोध जाण्या करुं नये ॥६४॥ तो मार्ग क्रमीत सत्वरीं। पातले रम्य इंदूर पुरी। उपवन असें मनोहरी। विराम करिती ते स्थानीं ॥६५॥ तेथें जमले ब्राह्मण भक्त। सांगा म्हणती गायत्री भाष्यार्थ। मागें अठरा दिवसपर्यंत। कथिलें विप्र वृंदासी ॥६६॥ तपस्तेज वक्तृत्व शैली। पाहुनी तेथील विद्वान मंडळीं। त्यांच्या भजनी लागली। मग निघालें तेथूनी ॥६७॥ गोपाळनाथ प्रार्थना करीत। तया स्वामी अनुग्रह देत। तेणें तो आनंद भरित। होऊनिया राहिला ॥६८॥ अष्ठादश दिवस इंदूरपुरी केला वास। विप्रां कथिलें गायत्री भाष्य। ती कथा या अध्यायीं ॥६९॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचितें। षडविंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

## ॥ अध्याय सत्ताविसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्री गुरुभ्यो नमः॥ श्रीगुरुचरित्राचा महिमा। कोणा न कळे त्याची सीमा। वर्णू न शके शेष ब्रह्मा। तेथ उमा रमेसी कोण पुसे ॥१॥ रेवातिरीं ॐकारेश्वर। जोतिर्लिंग मनोहर। वास करिती साचार। स्वामी राज ते स्थानीं ॥२॥ तेथ एक दक्षिणी ब्राह्मण। अम्मलदार होता जाण। यवनवत् वर्तन। असें पूर्ण जयाचे ॥३॥ परी त्याची भाविकमाता। स्वामीसी पाहुनी तत्वतां। म्हणे मज अनाथा। घरी भिक्षा अवश्य करावी ॥४॥ योग्य पाहुनी वर्तन। भिक्षा संपविती तेथें जाण। तो पिपामध्यें स्नान। करितां तत्पुत्र पाहिला ॥५॥ संध्या न करितां भोजन। करावया बैसला जाण। ब्राह्मणत्व अयोग्य वर्तन। पाहुनी स्वामी बोलले ॥६॥ ते म्हणती बाईसी। तुमच्या अपवित्र अन्नासी। आम्ही सेविलें परियेसी। हे अनुचीत आम्हां कारणें ॥७॥ आतां वांती करुन। काढुनी टाकितो अन्न। ब्राह्मणाचें घर असून यवनापरी आचार हा ॥८॥ पिपांत बैसूनि स्नान। तुमच्या पुत्रानें केलें जाण। संध्या वैश्वदेव त्यजून। भोजन केलें तें पाहिलें ॥९॥ तुम्ही असा कर्मभ्रष्ट। तुमचे अन्न घेणें अनिष्ठ। हे सांगतों स्पष्ठ। वर्णश्रेष्ठ म्हणवितां ॥१०॥ ब्राह्मण न करी उत्तम। आश्रमोचीत कर्म। भूतहितास्तव निष्काम। प्रेमें झटत नाहीं जो ॥११॥ अन्य धर्मवर्ण कर्में। आचरी जो नित्य प्रेमें। तयासी यम धर्में। कां बरें न दंडावें ॥१२॥ शूद्राची सर्व लक्षणें। ज्या ब्राह्मणा बाणली जाणें। त्या ब्राह्मणा न म्हणणें। ब्राह्मण ऐसें ॥१३॥ तैशीं ब्राह्मणाची लक्षणें। शूद्रा

अंगी बाणली जाणें। त्या शूद्र न म्हणणें। शूद्र ऐसें ॥१४॥ असत्कर्में ब्राह्मणास। शूद्रत्व येई खास। सत्कर्मानें शूद्रास। ब्राह्मणत्व येतसें ॥१५॥ शूद्र योनीमध्यें जन्मास। आलेल्या भगवद्भक्तांस। सन्मान मिळे तो खास। ब्राह्मणा समानची ॥१६॥ ठराविक कर्तव्यें ब्राह्मणाची। त्यांच्या करवी न घडती साची। जी कर्में न करण्याची। ती करीत असती पै ॥१७॥ त्यांचे कोणते गुण अवगुण। त्याचा विचार विशेषे करुन। भारती शांती अनुशासन। पर्वि सविस्तर केलें असें ॥१८॥ ब्राह्मण सर्वांचा ज्ञानगुरु। केवळ सद्गुणाचे आगरु। तेज शक्तीचें साचारुं। वसती स्थान जाणावे ॥१९॥ भूत मात्रांच्या हितासाठी। परमार्थ बुद्धीने मोठी। दया ठेवावी पोटीं। हेंच त्यांचे मुख्य व्रत ॥२०॥ सत्य असावा ज्यांचा धर्म। तप अनुष्ठान ज्यांचा नियम। स्वतः रहावे शुद्ध उत्तम। इतरां शुद्ध ठेवावे ॥२१॥ स्वतः कर्तव्य तत्पर रहावें। इतरां तैंसे ठेवावें। हे सोडिले स्वभावें। ब्राह्मणानी अविचारें ॥२२॥ द्रव्य लोभ सोडून। करावें तप अनुष्ठान। ज्ञान चर्चा करणें जाण। शिक्षण लोकां देत जावे ॥२३॥ ब्रह्मचर्य व्रताचा अंगिकार। करुनि शास्त्रीय विचार। अवश्य करावा आचार। तो त्यजिला ब्राह्मणांनीं ॥२४॥ स्व कुलाचाराचा। तिरस्कार करुनि साचा। टेंभा मिरविती ब्राह्मणाचा दुसऱ्याचा धिक्कार करुनी ॥२५॥ ब्राह्मणाची परमार्थ बुद्धी। जाऊनी उपजे स्वार्थी बुद्धी। तेंव्हा ते जाहले मंदधी। तेजोहीन स्वयेंची ॥२६॥ चालावया चरितार्थ। भलतेंच वर्तन करीत। उत्तम गोष्टीचा अनर्थ।

केला विपर्यास करुनी ॥२७॥ तप आणि वेदाध्यायन। मनो निग्रह ब्रह्म भावना जाण। इत्यादि गुण युक्त राहून। ज्यानीं ब्राह्मणत्व कायम ठेविलें ॥२८॥ ऐसें दुर्लभ ब्राह्मण। असती या युगीं जाण। प्राचीन काळी ब्राह्मण। धर्म योग्यता जाणत होते ॥२९॥ ते ऐश्वर्यादि भोग त्याजून। करिती शुद्ध धर्माचरण। तेणें होते सामर्थ्यवान। तेज संपन्न तैसेची ॥३०॥ ते कृपानुग्रह इतरांवरी। करीत होते साचारी। तेणें इतरांची ही ब्राह्मणावरी। भक्ती होती विशेष ॥३१॥ ते स्वतः धर्मशील असून। सर्वांच्या हिता विषयीं जाण। आपुल्या जीवाहून। विशेष चिंता करित होते ॥३२॥ तेणें सर्वांकडून ब्राह्मणाचा सन्मान होत असे साचा। सांप्रत विपरीत वृत्तींचा। स्वीकार केला द्विजांनीं ॥३३॥ झाले भ्रष्ट प्रपंचा सक्त। काम वाढला अत्यंत। तपस्तेज नष्ट होत। तेणें महत्व कमी झालें ॥३४॥ इतुकें यतीचें वचन। तत्पुत्र करी श्रवण। अंतरीं पश्चाताप मानून। कर जोडून प्रार्थीतसें ॥३५॥ म्हणे स्वामी आज्ञापिती। तेणें परी वागेन निश्चिती। आतां कृपा करा पुरती। येथेंची वास करावा ॥३६॥ मज संध्या नित्य कर्म। ब्रह्मयज्ञ वैश्वदेव होम। विधियुक्त शिकवूनि उत्तम। आपण गमन करावे ॥३७॥ पश्चातापयुक्त भाषण। ऐकूनी तेथेची जाण। वास करुनि तयां शिक्षण। देती ब्रह्म कर्माचें ॥३८॥ नित्य तया संथा सांगती। तो ही पाठ करी निश्चिती। कांही दिन करुनि वस्ती। निघती पुढें जावया ॥३९॥

म्हणती नित्य ब्रह्म कर्म। करावे अवश्य उत्तम। तेणें होईल क्षेम। अंती मोक्षधाम पावाल ॥४० ॥ कर्मे वर्मा श्रमोचित। करितां निष्काम भक्ती प्राप्त। भक्तीनें संतकृपा त्वरित। होय आत्मज्ञान सत्संगे ॥४१ ॥ तो पुसतसें स्वामीसी। ऐशिया कर्मे सद्गतीसी। पावले कोण परियेसी। तें मज स्वामींनीं सांगावे ॥४२ ॥ द्विजसुत आचार हीन। अनुतापें झाला खिन्न। मग करुनि प्रसन्न मन। त्या ब्रह्मकर्म शिकविती ॥४३ ॥ या परी रुचिर वृत्त। कथिलें या अध्यायांत। करुनिया विमलचित्त। पुढील कथा अवधारा ॥४४ ॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृते। गोपाळबुवा विरचिते। सप्तविंशोध्याय गोड हा ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

* * *

## ॥ अध्याय अठ्ठाविसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ ऐकूनि तयाचा प्रश्न। स्वामी म्हणती तया जाण। मुलांचे मन परिपूर्ण। प्रेमयुक्त असतें ॥१॥ योग्य कालीं होता लग्न। प्रेमांतील अर्धभाग पूर्ण। तत्कालत्रीं जाय जाण। बाकी अर्ध भाग उरे ॥२॥ त्या मुले बाळें होतां। पावभाग जाई तत्वतां। उरला पाव भाग आतां। त्याची वाटणीं सांगतो ॥३॥ आई बापाकडे कांहीं भाग जाण। कांहीं कीर्ती, पोशाखमान। कांही गर्व अभिमान। यांच्या ठायीं जातसे ॥४॥ ईश्वराच्या वाट्यांस प्रेम। तीळही नुरे यास्तव प्रथम। बालपणी लावावें नियम। ईश्वरीं प्रेम जडेलसें ॥५॥ बालपणीं मुलांचे मन। ईश्वराकडे घेईल वळण। तरी ईश्वर प्राप्ती जाण। सहजरित्या होईल ॥६॥ वृद्धपणीं व्रतोपवास। अर्चन श्रवण मननास। करितां ईश्वर प्राप्ती खास। सुदुर्लभ असें पाहीं ॥७॥ यासाठीं भागवती। भगवद्भक्त प्रल्हादोक्ती। कौमारे आचरें त्प्राज्ञो। धर्मान्भागवता निह ॥८॥ ब्रह्मचर्याश्रमापासून। नित्य कर्म वेदाध्ययन। अवश्य करी जो ब्राह्मण। त्या ईश्वरीं भक्ती जडे ॥९॥ कर्म करितां यथाविधी। होतसे चित्त शुद्धी। त्या योगें सात्विक बुद्धी। अंतःकरणी उपजतसे ॥१०॥ अनायासें साधन। मग होय आत्मज्ञान। ऐंसे आत्मज्ञानपूर्ण। कवणा लाधलें म्हणसी ॥११॥ तरी ऐक सांगतो आतां। पुरातन सुरस कथा। सह्याद्रि पश्चिमेस ख्याता। सुंदरवाडी राजधानी ॥१२॥ तेथनि समीप बांदे ग्राम। त्यांत सुसील धार्मिक परम। गौड ब्राह्मण उत्तम। राहिला होतां कुलकर्णी ॥१३॥ सोहिरोबा अंबिये

नामक। कर्मनिष्ठ देवभक्त देख। त्या ज्ञान गुरु भेटला एक। पूर्व सुकृतें करुनिया ॥१४॥ कुळाचा वसूल करूनी। धनथैल्या भरूनी। पोंचवाया नृप सदनीं। सेवकापाशीं देतसें ॥१५॥ अत्यंज सेवकानें तें धन। घेऊनि जातां मार्गि जाण। संध्याकाळ पाहून। तस्कर त्यांना गांठिती ॥१६॥ अनेक तस्कर जमूनि। थैल्या घेती हिरावूनी। अंत्यजवळ तेक्षणी। न चले मागें परतले ॥१७॥ कुळकर्ण्या सांगती सेवक। तस्करानीं लुटलें देख। धन थैल्या सकळीक। हिरावूनि घेतल्या ॥१८॥ इकडे राज दरबारीं। ग्राम वसूल वेळेवरी। न पोचता झडकरी। घरीं दूत पातलें ॥१९॥ राजदूत म्हणती सोहिरोबासी। कां न पाठविलें धनासी। नृपे पाचारिलें तुम्हासी। राजद्वारीं सत्वर चला ॥२०॥ ऐकूनि दूताचें वचन। सोहिरोबा म्हणती जाण। येतो भोजन सारुन। घडीबरी थांबावे ।२१॥ मग देव पूजा करूनि। भोजन केले तत्क्षणीं। राजदूता संगे घेऊनी। आले सुंदर-वाडींत ॥२२॥ खेम सावंत उपनांवाचा। धन लोभी नृप तेथीचा। राजकर्ता ते काळींचा। सोहिरोबासी पुसतसें ॥२३॥ तुम्ही वसुलाचें धन। कां, न पाठविलें पूर्ण। ते सांगती वर्तमान। तस्करांचे ते वेळी ॥२४॥ नृप म्हणे ते समयीं। तें आम्हीं नेणो कांहीं। धन न भरितां पाही। शिक्षा भोगणें लागले ॥२५॥ तत्काळ सोहिरोबासी। शिक्षा करावया परियेसी। आज्ञापिलें सेवकांसी। विचार मनीं न करितां ॥२६॥ सोहिरोबाच्या पोटावरी। जडशिळा ठेविली सत्वरी। ते पाहुनी नरनारी। अंतरीं होती दुःखित ॥२७॥ परी तो भूप निर्दय। म्हणे धनाची करी सोय। जरी करिसी हयगय। तुजदंडीन याहुनी ॥२८॥

इतुकें होतसें भाषण। तो एकाएकीं भिंतीतून। अग्नी ज्वाला पसरती दारुण। पाहुनी नृप गडबडला ॥२९॥ म्हणे हे काहीं विचित्र। न लागतां क्षणमात्र। सोडावें कुळकर्ण्या फक्त। परी धन न सोडावें ॥३०॥ मग त्याच्या उदरावरी। शिळा ठेविली होती भारी। ती काढिती झडकरी। सेवका हातूनि तत्क्षणीं ॥३१॥ सोहिरोबा म्हणती नृपासी। ह्या अग्नी ज्वाळा परियेसी। निघाल्या भिंतीतुनी पाहसी। या व्यर्थ आतां न जाती।।३२॥ निश्चयें प्राण तुझा। किंवा घेतील माझा। त्यांना नच रंक राजा। बळी घेतील अवश्य ॥३३॥ मग नृपाज्ञा घेऊन। सोहिरोबा आले परतून। घरांतील वस्तू विकून। भर करिती धनाची ॥३४॥ राजद्वारीं पोचविती। म्हणती संसारी विपत्ती। नाहीं अणुमात्र सुख निश्चिती। पुरे पुरे हा संसार ॥३५॥ एके दिनीं वाडीस। सरकारी काम खास। सोहिरोबा निघती जावयास। नित्य कर्म करुनियां ॥३६॥ स्त्रिये लागीं वदती। मी जातो वाडी प्रती। उपहारा देई मजप्रती। कांहातरी लवलाही ॥३७॥ ती म्हणे देऊं काय। घरांत ठेविलें काय। पाहतां आपुली सोय। काय कमविलें आजवरी ॥३८॥ अंगावरी फुटका मणी। नाहीं राहिला येक्षणीं। काय तोंड दाखऊं जनीं। लाज कैशीं न वाटे ॥३९॥ मज मागतां उपहार। मनीं न करितां विचारा। जाणे असेल राज द्वारा। चालते व्हावे तरी खुशाल ॥४०॥ स्त्रियेचे कठोर भाषण। ऐकूनि त्याचें अंतःकरण। पश्चात्ताप पावलें जाण। म्हणे पुरे ही यातना ॥४१॥ घरीं तरी ही स्थिती। राजसेवा करिता चित्तीं। खेद होतो मजप्रती। यासी काय करावें ॥४२॥ स्त्री पाहती आपुली सोय। पैशार्थ करी हाय

हाय। नृप सेवेवीण उपाय। नाहीं पोट भरावया ॥४३॥ आजवरी या देहासी। झिजविले अहर्निशीं। कुटुंब भरणासाठीं कशीं। नाना कार्यें संपादिली ॥४४॥ स्वस्थपणें परमेशाची। पूजा कराया घडीची। फुरसत न मिळें साची। राजा सेवेची नड असे ॥४५॥ तरीही कुटूंब शेवा। राज सेवाही पुरे देवा। आतां दे प्रेम ठेवा। त्वत्‌भक्ती करावया ॥४६॥ इतुकें बोलून स्वमनीं। मातेपाशीं आले झणी। म्हणती उपहारा देये क्षणीं। राज द्वारीं जाणें असे ॥४७॥ तिनें घरांत जाऊन। पिकलें फणस आणून। दिधला सोहिरोबासी जाण। उपहारा कारणें ॥४८॥ तो घेऊनी बरोबरी। वाडीस निघाला झडकरी। मार्गांत ऐन दुपारीं। क्षुधा लागली अनिवार ॥४९॥ मग जळाशय पाहुनी। स्नान करी तत्क्षणीं। निर्जन एकांत स्थानीं। ईश चिंतन करीतसें ॥५०॥ तो फोडून फणस। गरे काढी सावकास। चिंतूनि इष्ट देवतेस। नैवेद्य दाखवी तयाचा ॥५१॥ तों त्या अवसरी। गर्द झाडींत एक सरी। शब्द झाला उच्चस्वरीं। बाबा हमकू कुच देता है ॥५२॥ ती वाणी ऐकूनी श्रवणीं। ते म्हणती आपुलें मनीं। येथें नव्हते मनुष्य कोणी। आवाज कोठूनि जाहला ॥५३॥ म्हणूनि सभोंवतीं पाहती। तो तेज फांकले अंगावरती। ऐंशा पुरुषाविलोकिती। अकस्मात त्या स्थानीं ॥५४॥ तो फणस उचलूनी। पुढें ठेविती तत्क्षणीं। भावे प्रणाम करुनी। समीप उभे राहिलें ॥५५॥ त्या पुरुषें त्यांतील गरे। सेवन केलें आनंदभरे। प्रसाद म्हणूनी स्वकरें। चार दिलें सोहिरोबासी ॥५६॥ तें खातांची तत्क्षणीं। ज्ञान जोत पेटली अंतःकरणीं। अज्ञान तिमीर निरसूनी। स्वयं प्रकाश

उजळला ॥५७॥ दिव्य पुरुषें निजकर। ठेविला पुनरुतत्शिरावर अशिर्वाद दिधला सत्वर। समाधी लागली तत्क्षणीं ॥५८॥ समाधीतूनि पनुरुत्थान। होतां पहाती चहूंकडे जाण। न दिसें पुरुष गुप्त होऊन। गेला ऐंसे वाटलें ॥५९॥ तो पुरुष गैबीनाथ। तया करावया सनाथ। पातला आनंदें तेथे। सत्पात्री ज्ञान द्यावया ॥६०॥ सोहिरोबा सत्पात्र पाहून। तया देऊनी ज्ञान नयन। दाविलें गुप्त स्वरुप धन। ब्रह्म भांडारीचे तत्क्षणीं ॥६१॥ रंका मिळतां द्रव्य राशी। जैसा आनंद परियेसी। गुप्तधन मिळतां तयासी। ब्रह्मानंद जाहला ॥६२॥ ब्रह्मानंदे उन्मत्त। होतां तुच्छ झालें वित्त। मन प्रपंची होतें सक्त। ते अनासक्त जाहलें ॥६३॥ त्या आनंदा चढला कैफ। तनू प्रीति गेली आपोआप। म्हणती सद्गुरु मायबाप। प्रतापवंत भेटला ॥६४॥ मग राजद्वारीं जाऊनी। सांगती नृपा लागूनी तुमच्या सेवे लागुनी। राजीनामा देतसे ॥६५॥ ही दऊत लेखणी। हातीं न धरी आजपासुनी। सांगतो निश्चये करुनी। बोल माझें अवधारा ॥६६॥ नृपानें सोहिरोबास। दिधला होता त्रास। त्या पापें नृपास। सोडिलें नाहीं सर्वथा ॥६७॥ पुढें तो भ्रमिष्ठ होऊनी। दारुच्या पोत्यावर बसूनी। स्वकरें अग्नी लाऊनि। भस्म होऊनी गेला जाणा ॥६८॥ सोहिरोबा बांदे ग्रामीं आले। तो विपरीत वर्तलें। मातेनें त्यांना विलोकिलें। मग तीशांत जाहली ॥६९॥ पुढील सर्व विधान। सुते केले सावधान। मनीं करुन ईशध्यान। खेद सर्व विसर्जिला ॥७०॥ मग निघती तीर्थाटणा। स्नुषेसी सांगती तेक्षणा। आतां आम्ही येतो जाणा। ईश भजनीं काळक्रमी ॥७१॥ ऐकूनि श्वशूर वचन। स्नुषेचे दुःखें श्रवती

नयन। म्हणे माझें पुत्रदोन। आजारी बहू दिवसाचें ॥७२॥ त्यांच्याकडे कृपावलोकन। करुनी पहा मी दीन। मज जांता टाकून। सर्व शून्य भासतें ॥७३॥ ऐकूनि स्नुषेच्या वचना। ते करिती ईश प्रार्थना। म्हणे देवा जगज्जीवना। या दीनाकडे पहा कीं ॥७४॥ तुजवरी आज पर्यंत। घातलें नाहीं संकट। परी आजी विनवीत। युग्म पुत्र रोगी हे ॥७५॥ त्यांना निरोगी करावें। एवढें वचन मानावें। ऐंसे प्रार्थिता देवें। कृपा केली त्यावरी ॥७६॥ रोग विकार जाऊनी। आरोग्य पावलें तत्क्षणीं। मग आपण तीर्थाटणी। जावया शीघ्र निघाले ॥७७॥ समागमे सोहिरोबाची। विधवा स्वसानिघे साची। पादचारी फिरत तैंसेची। अवंतिका क्षेत्रीं येती ॥७८॥ तेथून मार्ग क्रमित। गालव पुरायेत। तेथें नृप नांदत। महादजी शिंदे म्हणूनी ॥७९॥ त्याचा सेनापती रणधीर। जिवबादादा महावीर। सारस्वत गौड ब्राह्मण साचार। तेणें तयासी पाहिलें ॥८०॥ हा स्वज्ञातीय गृहस्थ। त्याचा मान व्हावा दरबारांत। म्हणूनि त्याचा वृत्तांत। नृपाप्रती कळविला ॥८१॥ तेणें तया सन्मान। देऊनी केलें पाचारण। आपुल्या दरबारी नं येऊन। निज कवित्व दाखवी ॥८२॥ आपुली व्हावी संभावना। बहूंधन मिळावें जाणा। ऐंशा आशेनें पंडित नाना। मान देती कवित्वा ॥८३॥ परी स्वरुप धन यथार्थ। ज्या गवसलें निश्चित। त्यांना क्षणभंगूर वित्त। नसें किंमत तयाची ॥८४॥ सोहिरोबा सांगती नृपासी। कवित्व कला तूं जाणसी। परी प्रसाद गोडी नेणसी। तरी तें वृथा कवित्व ॥८५॥ आंत नसतां लवण। रुची न दे कालवण। तेवीं त्व कवित्व जाण। प्रसाद्रा वीण व्यर्थची ॥८६॥ ऐकूनि

तयाचें वचन। नृपमनीं। होई खिन्न। मोहरा पुतळया भरून। सुवर्ण ताट पुढें ठेवी ॥८७॥ म्हणे हे करावें ग्रहण। सोहिरोबा वदती पाहून। तूं म्हणविसी आपणा कारण। श्रीमान राजा म्हणूनी ॥८८॥ तरी मी ही राजा छत्रपती। तुज समान अनेक नृपती। माझ्या पाया लागती। हें निश्चिती नेणसी ॥८९॥ अरे क्षणभंगूर वैभवांत। गुंतलासी तूं यथार्थ। मातें कां गुंतविसी व्यर्थ। अनर्थ कां ही करितोसी ॥९०॥ मग तेथूनि निघती। अवंतिका क्षेत्री येती। जगद्धोरार्थ रचिती। ग्रंथ सिद्धांत संहिता ॥९१॥ दुजा महदनूभवेश्वरी। जैंसी कां, ते ज्ञानेश्वरी। तिचा अक्षय बोधपरी। पदें ही रचिली अनेक ॥९२॥ सर्व प्राकृत जनासी। लाविती सन्मार्गासी। उपदेश करुनि परियेसी। उद्धार करिती तयांचा।।९३॥ ग्रंथ सोहिरोबाची वरदवाणी। ती सर्व ठेविली उतरुनी। अवसर जाणूनि। तत् भगीनीनें ॥९४॥ म्हणूनीच ती सांप्रत काळीं मुमुक्षांना मिळाली। सूज्ञ होती माऊली। यास्तव झटली परमार्था ॥९५॥ त्यानीं बहुतेक पदा अंती। निजगुरुचें नाम निश्चिती। घातलें असे जे पाहाती। त्यांना त्यांचे कर्तव्य कळे ॥९६॥ पदांती निजनाम। नंतर गैबीनाथ उत्तम। ऐसें श्रीगुरुंचे नाम। घातलें असे तयांनी ॥९७॥ यांचे काव्य आत्महितार्थ। जे साधाया झटती परमार्थ। ज्यांना आत्मज्ञान यथार्थ। व्हावा ऐंसा हेतू एसे ॥९८॥ त्यांना योग्य पहावया। इतरां ते होयवायां। मूर्खापुढें वाचूनिया। उपयोग काय गीतेचा ॥९९॥ सोहिरोबा मार्ग क्रमित। येत असतां उज्जनींत। मार्गीं उतरलें धर्म शाळेंत। निशीं समय क्रमावया ॥१००॥ त्याच धर्म शाळेंत। विठ्ठलाचार्य पंडित। वेश्येसह

येऊनी तेथ। रात्रौ क्रिडा आरंभिली।१। आचार्य बहु जाणता। परी जातसें अधःपाता। हें पाहूनि त्यांच्या चित्ता। खेद वाटला अनिवार॥२॥ म्हणती वेश्येचा संग। करुनि पंडित झाला दंग। तरीयासी सत्संग। करुनि दिला पाहिजे॥३॥ सोहिरोबांची विरक्ती। तेणें गैबीनाथा झाली स्फूर्ति। तयां निबिड वनीं एकांती। पूर्ण प्रसाद ओपिला॥४॥ हे या अध्यायीं निरुपण। केलें असे परिपूर्ण। पुढील कथानुसंधान। ऐका चित्त देऊनी॥५॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। अष्टविंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेवदत्त॥

* * *

## ॥ अध्याय एकोणतिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ सत्पुरुषाचें चरित्र। जरी श्रवणीं पडे पवित्र। तरी तें होय इहपरत्र। कल्याण कारक जीवासी ॥१॥ सोहिरोबा करिती विचार। हा पंडित असे साचार। ऐसें पंडित उदात्त विचार। बोलूनि मात्र दाखविती ॥२॥ अध्यात्मिक प्रतिपादन। करुनि विद्वत्ता दाखविती पूर्ण। परी त्यांचे मन। लोभाकडे बहू असे ॥३॥ त्यांना प्रापंचिक जनाची। स्तुती प्रिय फारची। ऐहिक भोगावरी यांची। आसक्ती असे अत्यंत ॥४॥ जैसे गृध्रपक्षीं नभांत। उडती परी त्यांचे चित्त। मांस गोळा पाहण्यांत। सर्व थैव असते लोलुप ॥५॥ साधूला साजतील। ऐंसे अमोलिक यांचे बोल। परी सर्व होती फोल। यांचे आचरण पाहतां ॥६॥ मग पंडिता उद्देशून। सन्मार्ग दर्शन पूर्ण। पांच पदे रचूनी आपण। म्हणती राग रागिणींत ॥७॥ त्यांच्या पद समूहांत। ही पांचही असती ख्यांत। ऐकूनि तो पंडित। खवळूनि गेला अधिकची ॥८॥ सोहिरोबा समाधिस्त असतां। निशीं समईं अवचिता। त्यांनी उचलूनि तत्वतां। कूपा माजीं ढकलिती ॥९॥ आपण निद्रा करिती स्वस्थ। म्हणती वृथा माजवूनि प्रस्थ। उपदेश करीत मस्त। घोरा अनर्थ करुंनिया ॥१०॥ सोहिरोबा समाधींतून। पावते झाले उत्थान। तो कूपा माजीं आसन। पाहूनि विचार करिताती ॥११॥ म्हणती बरवें हें स्थान। पंडितानें आम्हा लागून। दिधलें उपदेश ऐकून। ऐसा एकांत फार बरा ॥१२॥ कूपातील जळ देवता। पंचारती घेऊनी तत्वतां। ओवाळिती सोहिरोबा नाथा। म्हणती धन्य भाग्य आमुचें ॥१३॥

योगी राजांचे दर्शन। घडले आम्हा लागून। दर्शनें झालों पावन। सोनियाचा दिन उगवला ।।१४।। योगाभ्यासें सोहिरोबा नाथ। कुपांत असती स्वस्थ। देवतांनी स्वागत। केले त्यांचे तया ठायीं ।।१५।। मग योग सामर्थ्यें करून। बाहेर येती न लागतां क्षण। अकस्मांत तया पाहून। विठ्ठल शास्त्री विस्मित ।।१६।। म्हणे आम्ही उभयतांनीं। कुपांत दिलें ढकलूनी। हा जिवंत कसा अजूनी। बाहेर कोणी काढला ।।१७।। हानो हे सामान्य नर। दिसतो सिद्धयोगेश्वर। याचें पाय धरावें सत्वर। उद्धार कर्ता हा दिसें ।।१८।। सिद्धांता माजीं दोनवर्ग। एक घेती सत्योपभोग। दुसरे स्वतः सत्योपभोग। भोगूनि अन्यासही देती ।।१९।। तैसा दिसतो हा सिद्ध। स्वतः होऊनी शुद्ध बुद्ध। इतरांताराया प्रसिद्ध। तीर्थाटण मिषें फिरतसें ।।२०।। ऐसा मनीं करूनि विचार। सोहिरोबासी सत्वर। करी साष्टांग नमस्कार। म्हणे मी अनंत अपराधी ।।२१।। क्षमा करावें अपराध। महाराज आपण शुद्ध बुद्ध। हा दास असे मतिमंद। पावन करावा कृपेनें ।।२२।। कूपांत दिले ढकलून। समर्थांनी केलें सहन। आतां दासासी पावन। करुनि घ्यावें तात्काळीं ।।२३।। ऐकूनिया करुणा वाणी। त्यावरी अनुग्रह करुनी। ज्ञान दिधलें तत्क्षणीं। सोहिरोबानाथें ते समयीं ।।२४।। येणेपरी अनेक जन। भजनीं लागलें जाण। ते गृहस्थाश्रमीं सामान्य। परी योगिराज झाले सत्कृपें ।।२५।। नाथा माजीं मच्छेंद्रनाथ। त्यचा शिष्य गोरखनाथ। त्यांचा निर्देश गैबीनाथ। सोहिरोबानीं केला असे ।।२६।। गैबी म्हणजे गहाळ झालेला। ठावनाहीं माता पितयाला। म्हणूनि गैबी नाथनामाला। पावलें गोरक्षनाथ ।।२७।। द्विज

स्त्रियेचा पाहुनी भाव। पुत्रप्राप्ती होण्यास्तव। मच्छिंद्रनाथे केले लाघव। विभूती अर्पिली तिज प्रती ॥२८॥ ती न भक्षितां त्यजिली। गलिच्छ जागीं टाकिलीं वर्षे द्वादश लोटली। तो मच्छिंद्रनाथ पातलें ॥२९॥ द्विज स्त्रियेसी विचारिती। तों विपरीत ऐकिली कृती। त्याग केला निश्चिती। ती जागाविलो किती ॥३०॥ आव बेटा म्हणूनी हांकारित। तों दिव्य पुत्र अकस्मात। रक्षेंतूनि बाहेर येत। म्हणूनि गोरक्षनाथ नाम पावे ॥३१॥ संपूर्ण वृत्त सांगतां। विस्तारेल बहुकथा। यास्तव संक्षेपता। केलें असे कथन हें ॥३२॥ नवनाथांत नांव असे। खालील श्लोकीं दिसें। पाहतां विमल मानसें। श्रोतें जना कळेल ॥३३॥ श्लोक गोरक्ष जालंदर चर्पटाश्च अड्बंग कान्हीप मच्छिंद्राद्याः। चौरंगिरेवाणच भर्त्रि संज्ञोभूम्यां बभूवुर्नवनाथ सिद्धाः ॥१। तें हे नवनाथ प्रख्यांत। भूवरी असती विचरत। सत्पात्र पाहूनी कृतार्थ। करिती जना कारणें ॥३५॥ सोहिरोबासी सत्पात्र पाहुनी। आपुल्या मेळीं मिळवूनी। घेतलें कृपा करुनी। म्हणूनी प्रख्यात जाहलें ॥३६॥ योगी सोहिरोबानाथ। सोहिरा केला रुक्मिणीकांत। त्याच्या भाग्या नाहीं अंत। ऐसें यथार्थ जाणावें ॥३७॥ मग ते सोहिरोबानाथ। उत्तर पंथा क्रमित। गेले बदरिकाश्रमांत। सिद्धाश्रमीं गुप्त होती ॥३८॥ ऐशीं महाराज समस्तां। सांगती सोहिरोबाची कथा। म्हणती सामान्य गृहस्था। योगिराज पदलाधलें। इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचितें। एकोन त्रिंशोध्याय गोड हा ॥ श्रीकृष्णार्पण मस्तु ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

## ॥ अध्याय तिसावा ॥

श्रीगणेशाय नमः॥ श्री गुरुभ्यो नमः॥ होतां सद्गुरु वरदान। प्राप्त होय ब्रह्मज्ञान। मग तो पुरुष जगमान्य। होईल यांत नवल काय॥१॥ स्वामी म्हणती द्विज पुत्रासी। विहित कर्में परियेसी। करुनि तोषविलें परमेश्वरासी। सोहिरोबानीं जाणपां॥२॥ तेणें चित्त शुद्धीं जाहली। पूर्व सुकृतें कामा आली। दैवें सद्गुरुची भेट झाली। प्रपंच परमार्थ साधला॥३॥ मानवी गुरु पवित्र। श्रवणीं सांगतसे मंत्र। परी दैवी गुरुतेज विचित्र। शिष्यात्म्या माजीं घालिती॥४॥ तेणें तात्काळ ज्ञान प्राप्त। होऊनी तो जीव मुक्त। अनासक्तपणें वर्तत। आयुर्दाय असे तों वरी॥५॥ ऐंशी द्विज पुत्रानें। महाराजांच्या मुखानें। कथा ऐकूनि नियमानें। योग्य कर्मे आदरिलीं॥६॥ शात्रोक्त यथा पद्धती। स्वामी जैसें आज्ञापिती। मनीं धरुनी भावभक्ती। तैसा आचार करीतसे॥७॥ मग ते निघती तेथूनी। पुनश्च सांगती तया लागुनी। दांभीक आचार करुनी। जगाला फसवूं नकोस॥८॥ स्वतःची फसवणूक। येणें होतसे देख। यास्तव सांगतों ऐक। आदरपूर्वक स्वीकारी॥९॥ शिक्षण मनोवृत्ती। आत्महितार्थ योग्य होती। मनः सरोवरीं उचंबळती। विवेक युक्त होऊनी॥१०॥ तेंच खरे शिक्षण। षोडश मनोवृत्त्या जाण। यांचा विकास व्हावा पूर्ण। आचरण व्हावें यथार्थ॥११॥ व्हाया आचरण सिद्धी। सत्वृत्तीची गरज

आधीं। जोवरी स्वार्थबुद्धीं। तावत्परमार्थ असाध्य ॥१२॥ इंद्रियाचा आणि शक्तीचा। तैसाचि जाण बुद्धीचा। आस्थापूर्वक उपयोग साचा। अवश्य केला पाहिजे ॥१३॥ यज्ञ दानादिक धर्म। किंवा करणें सत्कर्म। याच द्वीपी घडे उत्तम। अन्यत्र शर्म भोगणें ॥१४॥ असें जाणूनि सादर। नित्य कर्म करीनर। पापें वारूनी सत्वर। जाई पार भवाधीच्या ॥१५॥ सादरें करी प्रातःस्नान। यथाकाळीं संध्या वंदन। पंचयज्ञ आचरून। राहे तो न, बद्ध होय ॥१६॥ कर्माकर्म विकर्म। जाणावें ह्याचें वर्म। तोचि सनातन धर्म। शरम घडे त्या योगें ॥१७॥ षड्शास्त्रेंही जाणिली। परी कर्माची हे किल्ली। जंववरी हातीं न आली। तव शिणविली त्रीकरणें ॥१८॥ यथोक्त कर्में करुन। जे करिती ईश्वरार्पण। दंभासूयादि सोडून। तेचि जाण मोक्षभागी ॥१९॥ यज्ञपूर्तेष्ठ ज्ञान। जपतपानुष्ठान। सफळ होय भाविका जाण। श्रीगुरु वचन पाळितां ॥२०॥ दावी गुरु शात्राधारे। ते श्रद्धेनें जो आचरे। तो नर भवाब्धीतरे। हेंचि खरें मुख्य वर्म ॥२१॥ कर्माची गती गहन। दुर्लभ हा नर जन्म। सर्वेंद्रियनिधान। पुण्यवंता मिळे क्वचित ॥२२॥ त्यामध्यें विप्र जाती। मिळतां सायास होती। होणे विद्वान सुमती। हे तो अतीपुण्यफळ ॥२३॥ जन्मा येता ब्राह्मण। सूर्य करी गोदान। म्हणूनि थोर ब्राह्मण। करी उद्धरण लोकांचे ॥२४॥ एक शिल्पज्ञ पूर्विंचा। पुढें तया राजाचा। जन्म लाभला

मग साचा। झाला विप्रपुत्र तो ॥२५॥ गर्भी येता गर्भादानादी। क्रिया घडल्या यथाविधी। मातेला दुःख न दे कधीं। सुवेळीं सुधी जन्मला ॥२६॥ पिता त्याचें जातकर्म। करी प्रेमेंदान धर्म। करुनिया नामकर्म। देवशर्मा म्हणती तया ॥२७॥ स्वरुपें सौम्य दिसत। प्रकृतीनें असे शांत। लोकांची मनें तो कांत। रमवी अश्रांत सुखीं तो ॥२८॥ यथाकालीं चौल करुन। केलें मौंजी बंधन। मग करी वेदाध्ययन। घाली विनामन खेळाकडे ॥२९॥ संध्यावंदन अग्नी कार्या। करी गुरुची सपर्या। धर्मेंपाळी ब्रह्मचर्या। धरी औदार्या स्वभावें ॥३०॥ संहिता पदक्रम। अंगे शास्त्रें यथाक्रम। पढला ज्या न हो भ्रम। सफल श्रम तयाचें ॥३१॥ सार्थ विद्या मिळवून। व्रता चरण करुन। गुरुला दक्षणा देऊन। समावर्तन करी तो ॥३२॥ बुद्धीं, रुप, शील संपन्न। पाहूनी कन्या कुलीन। तिशीं विवाह करुन। गृह्याचरण करीतो ॥३३॥ वेद शास्त्रार्थ तत्वज्ञ। करी नित्य पंच यज्ञ। विशेषतः जपयज्ञ। करी प्राज्ञ दैवयोगें ॥३४॥ समयीं स्नान संध्या वंदन। होम जप यज्ञ पठण। करी गुरु सुश्रूषण। भगवद्भजन प्रेमभरें ॥३५॥ कर्मिं अभिमान न करी। फळाची इच्छा नच धरी। निर्ममत्वें वागे घरीं। उदासीना परी सर्वथा ॥३६॥ आगंतुक साधन। करी यज्ञदानाध्ययन। प्रतिग्रह याजनाध्यापन। यांही जीवन करीतसे ॥३७॥ ईश्वरोद्देशें कर्म करितां। चित्ताये शुद्धता। प्रतिग्रहा तो सोडी ज्ञाता। तपस्तेजहर्ता जो ॥३८॥ होता

ईश्वरीं आवडी। याजनाध्यापना सोडी। भिक्षेची धरी आवडी। सोडी गोडी विषयांची ॥३९॥ शम दम तप शौच। क्षांति आर्जव ज्ञान साच। अस्तिक्य विज्ञान हेंच। स्वाभाविक ब्रह्म कर्म ॥४०॥ हें प्रकृती वशें मिळालें। कामादिक पळाले। मीपण ही गळालें। उत्तरोत्तर विप्राचें ॥४१॥ कर्में झालें मनशुची। श्रवणाची लागली रुची। समाप्ती गृहस्थाश्रमाची। करुनि वनी राहिला ॥४२॥ शीतोष्ण सहन करी। ध्याननिष्ठ अंतरीं। श्रीहरीचें चिंतन करी। न धरी योगक्षेमवांच्छा ॥४३॥ असा महाव्रत होवोनी। सर्व संन्यास करुनी। गुरुपदिष्ठ चिंतनीं। निशिदिनीं निमग्न हो ॥४४॥ श्रवणें संशय भावना। मननें असं भावना। ध्यानें विपरीत भावना। निमाल्या मनपासून ॥४५॥ करुनिया योग केला प्रतिबंधभंग। वासना क्षयमनोभंग। ज्ञानयोग मिळवी जो ॥४६॥ बोध वैराग्य उपरती। पूर्णपणें जेथें वसती। त्या लागी किं करी मुक्ती। हे उक्ती सत्य असें। ॥४७॥ असा जीवन्मुक्त। विप्र झाला ईश भक्त। प्रारब्ध भोगूनी असक्त। विदेह मुक्त झाला तो ॥४८॥ शास्त्र तें शासन करी। ईश वाक्य तें हो कां क्षुद्र जरी। विश्वास ठेवितां त्यावरी। ये गती बरी अनुक्रमें ॥४९॥ कर्तावीर्य अर्जूनासी। ऐशीं कथा परियेसी। श्रीदत्तात्रेय प्रेमभावेंसी। सांप्रती ती कथिली येथें ॥५०॥ सत्पात्रीं द्यावें दान। जे असती गुण संपन्न। सदा चरणीं सुशील जाण। मग अध्यायनाध्यापनीं ॥५१॥ ज्यांनीं सोडिलें

स्वहित। जनहित तेची स्वहित। मानूनि जन कल्याणार्थ। अहर्निश झटत असती ॥५२॥ जो धीर उदार गंभीर। ज्यांनीं ब्रह्मचर्य अंगिकार। केला असे त्यजूनी संसार। जे पूज्य वंद्य आचार्य ॥५३॥ त्याना योग्य उपायन। देऊनी जावें शरण। प्रसन्न होतां त्यांचे मन। ज्ञानप्राप्ती तात्काळ ॥५४॥ अपंग व्यथित वृद्धदीन। त्यांच्या निर्वाहो सोय जाण। लाविली पाहिजे झटून। अवश्य तुमेचं कर्तव्य हें ॥५५॥ ऐसें करितां वर्तन। ज्ञान प्रकाशें मन। होईल निश्चयें प्रकाशमान। सुस्वभाव साध्य होईल ॥५६॥ गवसेल सद्गतीची वाट। त्यांचा संसार बिन बोभाट। चालवी वैकुंठपीठ। तदधीन होऊनिया ॥५७॥ सुस्वभावे ज्ञान। सदाचार शीलाधीन। नीतिधर्म प्रेम ज्ञान। अंगभूत सदाचाराच्या ॥५८॥ येणें मनभूमी शुद्ध। सद्वासना उपजे प्रसिद्ध। प्रथम जो जीव बद्ध। तोची मुक्त होतसें ॥५९॥ ऐसें संबोधुनी निघालें। बढवाई ग्रामीं आले। चातुर्मास रेखा तटीं राहिलें। खेडी घाटा वरी जाण ॥६०॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृते। गोपाळबुवा विरचिते। त्रिंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु। श्रीगुरुदेवदत्त ॥

* * *

## ॥ अध्याय एकतिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ स्वामींनीं द्विजसुता प्रती। वर्णिली सोहिऱ्याची स्थिती। ऐकूनि तो यथा पद्धती। आचार करुं लागला ॥१॥ ऐका पुढील कथा सुरस। रेवातिरीं चातुर्मास। शके अठराशें अठ्ठावीस। सालीं बढवाईत झाला ॥२॥ आधींच रेवातीर उत्तम। तेथें स्वामीचा मुक्काम। तेणें ते आनंदधाम। झाले सकळ भक्तांसी ॥३॥ चोहोंकडे गेली वार्ता। भक्त जमूं लागले तत्वतां। स्वामीं दर्शनें सार्थकता। व्हावी म्हणती जन्माची ॥४॥ इंदूर गालवपूर गुजराथ। कानपूर सारंगपूर ब्रह्मावर्त। दक्षिण प्रांतातून भक्त। दर्शनार्थ पातलें ॥५॥ नरसोहून आलें अनेक। नृसिंहवाडीचें कित्येक। जालवण, देयास, धारचे कैक। दर्शनार्थ पातलें ॥६॥ वेत्रवती तीराचें। किती गंगा तटाकीचे। किती यमुना तीराचे। निर्मला तीरचे कित्येक ॥७॥ क्षिप्रा किनारीचें येती। कृष्णा तटाकीचें किती। रेवातीरचें धावती। दर्शनार्थ स्वामींच्या ॥८॥ कितीतापी तटीं राहती। कित्येक गोदातटीं नांदती। कयाधू किनारीचें किती। आले स्वामी दर्शना ॥९॥ पुत्रकामीं धनकामीं। आरोग्य कामीं मोक्षकामीं। कित्येक ते सरस्वती कामी। त्या आनंदधामीं पातलें ॥१०॥ नानाविध देशांतून। जन येती दर्शना लागून। तूर्ण पूर्ण काम होऊन। मनीं संतोष मानिती ॥११॥ सखाराम शास्त्री इंदूरचे। हणमंत शास्त्री हिंगोलीचे। नाना शास्त्री ब्रह्मवर्ताचे। पातलें स्वामी दर्शना ॥१२॥ गुजराथेंतून गांडाबुवा। ब्रह्मावर्तांतून गोपाळबुवा। स्वामींचे बंधु सीताराम बुवा। हे ही तेथें पातलें ॥१३॥ कोणी पुण्य

पत्तनाहूनी आले। कोणी मुंबापुरीहूनी पातलें। ऐसें अनेक भक्त भले। पातलें स्वामी दर्शना ॥१४॥ त्यांची नांवे सांगतां। विस्तारेल बहूकथा। स्वामी भक्त असंख्याता। संक्षेपे बोलिलो जाणा ॥१५॥ जे कां असती विरक्त। ते तीर्थाटण करीत। असती जे कां गृहस्थ। ते नांदती प्रपंचीं ॥१६॥ नित्य होतसे समाराधना। एक ही दीन न जाई सुना। स्वामींची पूजा करिती जाणा। प्रेमभावे करुनी ॥१७॥ प्रेमें देवही होतो वश। मग तत्सदृश सत्पुरुष। कां बरें न होईल वश। प्रेम पाशे करुनी ॥१८॥ प्रातःकाळीं स्नान सारुनी। उपनिषद्भाष्यद्विजांलागुनी। सांगती अर्थही समजावूनी। एक प्रहर पर्यंत ॥१९॥ नंतर अनेक भक्त हस्ते। पूजा घेतील स्वस्थ चित्तें। माध्यान्ह स्नान करुनि मठाते। येती फलाहार करावया ॥२०॥ चातुर्मास वरी फलाहार। श्रीगुरु करीत होते साचार। माध्यान्हीं स्वयंपाक तयार। करिती नारीनर मिळूनिया ॥२१॥ महाराज फलाहारा बैसतां। विप्र भोजना बैसती तत्वता। आराम करिती भोजन होता। एक तास पर्यंत ॥२२॥ नंतर कोणी सांगती पुराण। कोणी पुसती कामनीक प्रश्न। एक तास झाल्यावरी जाण। महाराज पुराण सांगती ॥२३॥ सायंकाळ झाल्यावरी। संध्येस्तव नर्मदेवरी। जाती स्वामी बरोबरी। जमूनी अनेक विप्र जाणा ॥२४॥ तेथूनी येतां मठस्थानीं। कांही स्तोत्र पाठ होऊनी। नंतर द्विजमुलें जमूनी। भजन करिती स्वामीपुढें ॥२५॥ त्यांचे ते बोबडे मंजुळ। भजन ऐकत बसती सकळ। मग प्रौढ मंडळी तत्काळ। भजन करावया येतसे ॥२६॥ गायन नृत्य भजन करिती। महाराज भावे ऐकती। एक प्रहर होतां निश्चिती। कीर्तन

सांगती करावया ॥२७॥ महाराजांचें आज्ञा वचन। ऐकूनि कोणी करिती कीर्तन। ते संपतांची प्रसाद होऊन। सकळ जन निद्रा करिती ॥२८॥ चातुर्मास दिनचर्या ऐंशी। सांगितली श्रोत्यांसी। पुढील कथा विस्तारेसी। सांगतो ऐका एकचित्तें ॥२९॥ सायंकाळीं एके दिवशीं। एक ब्राह्मण येऊनी परियेसी। विनवीतसे स्वामींसी। म्हणे दर्शनार्थ येणें असें ॥३०॥ तो होता कारभारी। संस्थानिकाचा अवधारी। धन्यासी घेऊनी बरोबरी। दर्शनार्थ आला होता ॥३१॥ ऐकूनी तयाची विनंती। महाराज तया सांगती। वेड्याच्या दर्शनें निष्पत्ती। काय बरें होतसें ॥३२॥ हे सर्व जमले वेडे। आमुच्या दर्शनार्थ बापुडे। तुम्हीं त्यांच्या बरोबर रोकडे। व्यर्थ मूढ होता कां ॥३३॥ हा ही त्या माजीं वेडा एक। याच्या दर्शनें काय सार्थक। आपापल्या ठाईं देख। आनंदानें रहावें ॥३४॥ तैंशीच इंदुराधीपतीची राणी। आपुल्या सेवकां पाठवूनी। स्वामींसी विनंती करी कळवूनी। म्हणे मी दर्शनार्थ येतसे ॥३५॥ तरी आपुल्या जवळ कोणी। मनुष्य नसावा ये क्षणीं। त्या सेवका स्वामीनीं। सांगितले काय ते ऐका ॥३६॥ आमुच्या जवळ या ठाईं। एक क्षणही ऐसा नाहीं। कीं मनुष्य नाहीं कोणीही। येणेतरी अवश्य यावें ॥३७॥ निस्पृहतेचे ऐकूनी शब्द। सकळ जन होती स्तब्ध। तो सेवकही झाला निःशब्द। जाऊनी सांगे तियेसी ॥३८॥ निस्पृहासी राजा रंक। दोघे सारिखेची देख। देवा भावाची लागली भूक। तैसीच सत्पुरुषाची जाणा ॥३९॥ देव भुकेला भावाचा। तैसा संत भूकेला प्रेमाचा। जेथें ठाव नसे प्रेमभावाचा। तेथे संत देव विन्मुख ॥४०॥ मग तो असो

नृपती। किंवा असो छत्रपती। जेथें प्रेमभावाची वस्ती। तेथें श्रीपती तिष्ठतसे ॥४१॥ जेथें सर्व व्यवहार। चालती प्रेमतत्वा नुसार। तेथें आनंदाला पारावार। नाहीं नाहीं सर्वथा ॥४२॥ तयाचा देव पाठीराखा। होऊनी अखंड राहे देखा। अंत नाही त्याच्या सुखा। नाहीं यशालाही उणे तेथें ॥४३॥ जेथे ईश्वरी प्रेम तत्वाचा। ईश्वरी बुद्धींतील प्रकाशाचा। ईश्वरी प्राणांतील आनंदाचा। प्रत्यक्ष लाभ घडतसे ॥४४॥ त्या प्रेमानें ओतप्रोत। भरलेल्या वातावरणांत। सर्व व्यवहार प्रफुल्लीत। मनें चालत आसती पैं ॥४५॥ तेंचि होय वैकुंठ भुवन। यास्तव प्रेम रसे अंतःकरण। झालें पाहिजे परिपूर्ण। तरींच उद्धार होईल ॥४६॥ ज्याच्या मनीं लक्ष्मींचा। गर्व नसे अधिकाराचा। तो गुरु भक्ती सकाचा। संत जनीं मानिलासे ॥४७॥ जया न साधे गुरुभक्ती। तया कायसी ईश्वर भक्ती। तयाची न होय आत्मोन्नती। आत्मोन्नतीस साधन प्रेम ॥४८॥ निस्सीम निर्मल सत्य प्रेम। संतापाशीं राहे उत्तम। ते कमवावया प्रथम। शिक्षण घ्यावें त्यांचे जवळीं ॥४९॥ मनुष्याच्या अंतःकरणांत। प्रेम असावें ओतप्रोत। तरी तया लाभ अमित। व्यवहारी घडतसें ॥५०॥ लाभाचा अथवा सुखाचा। संबंध नसता स्वतःचा। प्राणीमात्रीं प्रेमळ साचा। त्याचेंचि प्रेम सर्वोत्तम ॥५१॥ त्या प्रेम रसाला पाहून। भक्त भ्रमर येती धांवून। नलगे द्यावया आमंत्रण। नलगे पाचारण करावया ॥५२॥ पाहिजे त्या भ्रमरानें यावे। प्रेममधूला यथेच्छ सेवावें। आनंद करावा जीवेभावे। नलगे पुसावें कोणासी ॥५३॥

जया मोठेपणाचा अभिमान। तया तो अप्राप्त जाण। भ्रमरा मंकरंद सेवन। दुर्दरा चिरलची उरे पै ॥५४॥ कमळ असो दूरी। महा गंभीर सरोवरीं। तरी पराग सेविजे भ्रमरीं। तैसा गिरी कंदरीं संत वसे ॥५५॥ किंवा वसो अरंण्यांत। जे कां असती प्रेमळ भक्त। ते धाऊनी येती अकस्मात। अमंत्रणाचें काज काय ॥५६॥ मधु सेवनार्थ येतो जाण। ऐसें भ्रमर काय आपण। कळविती कमळा लागून। मधुपाहून धांव घेती ॥५७॥ किंवा मधूसेवावया। यावें काय तुमच्या ठांया। ऐंसा कमळासी प्रश्न वाया। करिती काय भ्रमर ते ॥५८॥ त्यांना साधणें स्वहित। यास्तव कमळ पाहूनि येत। धांवती मधुसेवनार्थ। तैसा जया परमार्थ साधणें ॥५९॥ तेणे संपत्तीचा गर्व। सोडूनि द्यावा प्रथम सर्व। मोठेपण सांडूनि निगर्व। होऊनी संता शरण जावें ॥६०॥ जगासी धाकुटें व्हावें। मग उच्च पदवी पोंचावें। अभिमानें दूर कां रहावें। संतजना पासुनी ॥६१॥ ज्यावरी न होय संतकृपा। त्यावरी कैंची ईश कृपा। जरी केलें नाना जपतपा। तरी संतकृपेवीण व्यर्थ ॥६२॥ संत कृपा कमवावी। तेणें ईशकृपा बरवी। होतसें प्राप्त उच्चपदवी। मोक्ष श्रीवरावी तेणें मग ॥६३॥ मोक्ष श्रीयेसी वरुन। गृहस्थाश्रम करावा जाण। तोचि गृहस्थ धन्य धन्य। गृहस्थाश्रम धन्य त्याचा ॥६४॥ संत जनाचा आदर। जाणली पाहिजे कदर। जरी देवाचा झाला अव्हेर। तरी सज्जनाचा न

करावा ॥६५॥ सज्जनाचा आव्हेर करितां। ईश्वर दुरावेल तत्वतां। ईश्वर दुरावला असतां। संतकृपें प्राप्त होय ॥६६॥ ऐसें जाणूनिया वर्म। संत जनांसी प्रथम। शरण जावें हें उत्तम। तेणें पुरुषोत्तम जोडतसे ॥६७॥ त्रिभुवनाचा जो श्रीमंत। तो संताच्या हृदयांत। संत वाक्या मानदेत। यास्तव ते श्रीमान् जाणावें ॥६८॥ ते जरी दिसती भिकारी। भिक्षा मागती दारोदारी। परी त्यांची कोण पावे सरी। श्रीहरी आप्त जयाचा ॥६९॥ तेचि खरें भाग्यवान। वैराग्य श्रीसंपन्न। तेथें लक्ष्मीसी पुसे कोण। कायसा मान तियेचा ॥७०॥ संत जनाच्या दरबारीं। लक्ष्मीची नाहीं थोरी। लक्ष्मीवानाची मातब्बरी। अणुमात्र तया भासेना ॥७१॥ वैराग्यश्रियेनें जो युक्त। त्याशींच संत दरबारांत। मान मिळे लक्ष्मीकांत। तोहि तयां मानितसे ॥७२॥ जे चंचल लक्ष्मीनें श्रीमंत। त्यासी मान देती लक्ष्मीसुत। परीते मायेच्या तडाख्यांत। सांपडले असती ॥७३॥ हे नेणती अज्ञानी। भाग्यवान म्हणती जनीं। त्यांच्या सम दरिद्री कोणी। नाहीं त्रिभुवनीं सर्वथा ॥७४॥ असो तेथ द्विजा घरीं। स्वामी भिक्षार्थ गेले दुपारीं। नारायण म्हणतां द्वारीं। आली ब्राह्मणी बाहेर ॥७५॥ पाहुनिया स्वामीसी। वदे आपुल्या परिचारकासी। भिक्षा घाली स्वामीसी। उत्तमप्रकारे वाढुनी ॥७६॥ पानावरी सर्व यथार्थ। वाढूनि भिक्षा घाली त्वरित। या बिचाऱ्या ऐसे पदार्थ। प्राप्त होणे दुर्घट ॥७७॥ ऐसें बाईचें ऐकूनि वचन।

स्वामी करिती हास्य वदन। ती नेणें आपुलें अज्ञान। लक्ष्मी मदे करूनिया ॥७८॥ साधूला ओळखती साधू। भोंदूला जाणती भोंदू। कैंसे जाणे मतिमंदू। साधूवर्य जनासी ॥७९॥ एके दिवशीं निशीं समयीं। भजन झाल्यावरी सकळही। जन निद्रिस्त जाहलें लवलाहीं। तो विचित्र वर्तलें ऐका ॥८०॥ नाना शास्त्री देव नामक। ब्रह्मावर्ताहूनी ब्राह्मण एक। स्वामी दर्शनार्थ देख। आला होता तये स्थानीं ॥८१॥ तयासी वांती सुरुं झाली। मंडळीं निद्रिस्त होती जवळी। तयासी पुसो लागली। महाराजही जागे झालें ॥८२॥ त्या शास्त्र्या होतसे वांती। जाणूनि स्वामी देवा प्रार्थिती। हे बाल गोपाल असती। जमले दर्शनार्थ येथें ॥८३॥ यांना आपापल्या ठायीं। सुखरुप पोंचवावें पाही। चातुर्मास संपता क्षण भरही। न राहीन मी येथें ॥८४॥ त्या शास्त्र्या महामारीचा। विकार झाला जाणुनी साचा। औषध देऊनी प्रतीकार त्याचा। करिती तात्पुर्ता महाराज ॥८५॥ श्रीदत्तकृपे करुनी। तो आरोग्य पावला ते क्षणीं। भाद्रपद पौर्णिमे दिनीं। चातुर्मास संपला ॥८६॥ तेथील तहशीलदार सारस्वत। गौड ब्राह्मण प्रख्यात। महाराजा राहवूनी घेत। म्हणे भिक्षा करुनि निघावें ॥८७॥ मग विनंतीस मान देऊनी महाराज राहिलें त्या दिनी। सीमोलंघन करुनी। आले मठस्थानीं पुन्हां ॥८८॥ शिष्यांसह भिक्षा करुनी। तेथूनी निघालें दुजेदिनीं। नावेंमध्ये बैसूनी। येती नर्मदा पैलतीरीं ॥८९॥ विस्तीर्थ ऐंशा चार

नावा। श्रुंगारिल्या तेधवा। भाग्यवानें सोहळा पहावा। येरां कैसा दिसे तो ॥९०॥ एका नौकेंत बैसले महाराज। भोवती वेष्टींत शिष्य समाज। अन्य नावे माजी भक्त राज। बैसले असती अनेक ॥९१॥ गुरु नामाचा जयजयकार। करीती प्रेमे वारंवार। उल्हासें गाती नारीनर। तो सुख सोहळा कोण वर्णि ॥९२॥ पातले नर्मदेच्या पैलतिरीं। महाराजा सहित झडकरी। तेथूनी अर्धा योजन दूरी। सनावद ग्रामीं पातलें ॥९३॥ तेय स्थानीं दुजें दिनीं। शिष्यांसह भिक्षा करुनी। राहिलें मुक्काम करुनी। आग्रहास्तव भक्तांच्या ॥९४॥ तेथे नृसिंहवाडीचा पूजारी। नरुआण्णा नामक निर्धारी। महाराजासी नमस्कारी। परोपरी विनवीतसें ॥९५॥ म्हणे मी स्वामी सवें। वाडीपर्यंत असावें। सदा सहवासा रहावें। ऐसें वाटे अहर्निशीं ॥९६॥ हा माझा मनोरथ। पुरविणार स्वामी समर्थ। त्यासी महाराज सांगती व्यर्थ। दुरा ह करुं नका ॥९७॥ आम्हां सांगे चालणें। कैंसे होईल खाणेंपिणें। पायीं प्रवास करणें। योग्य नोहे सर्वथा ॥९८॥ गाडीमाजी बैसून। श्री वाडीस करा गमन। येणेंपरी नाना शास्त्र्यां लागून। महाराज सांगती तेधवां ॥९९॥ म्हणती सत्वर जाई ब्रह्मावर्ता। मध्यें रमूं नको सर्वथा। आम्हां वाडीस जाणें आतां। कृष्णा पंचगंगा तटीं ॥१००॥ त्यांच्या आज्ञेनुसार। नरु आण्णा पूजारी सत्वर गाडींतून आले साचार। नृसिंह क्षेत्रां निजगेहीं ॥१॥ चार पांच दिवसांनीं। इहलोक सोडिला

त्यांनी। प्रत्यय आला सर्वांलागूनी। स्वामी वदले तयाचा॥२॥ तेणेंपरी नाना शास्त्रीं। पोंचले ब्रह्मावर्त क्षेत्रीं। महामारीच्याच विकारे रात्रीं। सोडिते झाले इहलोक॥३॥ आपापल्या स्थानीं। निजदेह सोडिले त्यांनीं। स्वामी वचना मानूनी। शेवटीं सद्गती पावले॥१०४॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृते। गोपाळबुवा विरचिते। एक त्रिंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु।
॥श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय बत्तिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ स्वामी वासुदेवानंद। त्यांचे चरित्र आगाध। केवि वर्णूं शकेमंद। परी यथामती वर्णितसे ॥१॥ सनावद ग्रामाहूनि निघाले। पुढें अरण्यपंथें चालिलें। आडवाटेनें एकले। आले एका ग्रामांत ॥२॥ तेंथें असे ब्राह्मण कुलकर्णी। तेणें स्वामींस पाहुनी। म्हणे एकटेंच वनांतूनी। जातांपरी मार्ग चुकला ॥३॥ हें असे निर्जन वन। यांतूनि करितां मार्गक्रमण। धारिष्ट नकरा आपण। गाडींतून मार्ग क्रमावा ॥४॥ हें अरण्य क्रमिल्यावरी। मार्ग चालावा पादचारी। परी या वनांतूनि जाणें अवधारी। सुखकारक न होय ॥५॥ मी पैसे देतो आपणांते। गाडींत बैसूनिया वनातें। आक्रमावें योग्य तुम्हां तें। वाटतें आम्हा स्वामीया ॥६॥ त्याचें ऐकूनिया वचन। स्वामी म्हणती तया जाण। जरी घोरांदर असें वन। तरी गमन करणें अवश्य ॥७॥ गाडीमध्यें बसून। निर्जन वन क्रमून। जावें तुम्ही सांगतां जाण। परी तें योग्य नोहेची ॥८॥ निर्जन वनांतूनी निश्चिती। पायीं पंथ आक्रमिती। तों एक पुरुषा प्रती। देखिलें त्या अरण्यांत ॥९॥ तो पुरुष म्हणे स्वामीसी। तूं एकटा वनीं मार्ग चुकसी। तुला जाणें कोण्या स्थळासी। तें प्रथम मजसी सांगावें ॥१०॥ ऐंसे हिंदूस्थानीं भाषेंत। तो स्वामीसी बोलत। तो महाराष्ट्र भाषेंत। महाराज वदती तयासी ॥११॥ परस्परांची प्रश्नोत्तरें। बहुत झाली येणें प्रकारें। महाराजांचे बोलणें सारे। ऐकूनि तो पुरुष म्हणे ॥१२॥ मला ही याच मार्गानें। परगांवीं अवश्य जाणें। येई माझ्या संगतीनें। दावीन तुजवन पंथ ॥१३॥ म्हणोनि तो

स्वामीसी। घेऊनिया सहवासासी। पंथ आक्रमी शीघ्र गतीसी। आणूनि पोंचवी ग्रामांत ॥१४॥ म्हणे या ग्रामांत माधुकरी। मागूनिया भोजन करी। दुपारची वेळ झाली झडकरी। स्नान करी या जलाशयीं ॥१५॥ ऐसें सांगूनि गुप्त झाला। महाराज म्हणती ते वेळां। हा सामान्य पुरुष दिसला। परी वंदनीय होता कीं ॥१६॥ मग महाराज गांवांत गेले। तेथें जन पुसूं लागलें। म्हणती आगमन कोठूनी झालें। महाराजांचें या ग्रामीं ॥१७॥ ते सांगती जनांसी। मागील ग्रामांहूनि परियेसी। निघालो होतो पादचारेसी। प्रातःकाळीं एकलाची ॥१८॥ येथें आलो या समयीं। ऐकूनि विस्मित झाले सकळही। म्हणती त्या ग्रामांहुनी याठायीं। या समयीं कैंसे आला ॥१९॥ तो तरी एक दिवसाचा। मार्ग पूर्ता असूनी साचा। तुम्हांसी दीड प्रहराचा। कैसा झाला सांगा हो ॥२०॥ मार्ग न चुकतां यास्थानीं। कैसें आला तुम्हां कोणी। वाटाड्या भेटला कीं पायांनीं। तुम्हां संगे येणारा ॥२१॥ मग सविस्तर वर्तमान। सांगतां स्वामींनीं जाण। आश्चर्य पावले सकळ जन। विचित्र वर्तलें आणिक ऐका ॥२२॥ तेथूनि निघती महाराज। तों निर्जन स्थळीं तेजःपुंज। बाल पुरुषा पाहूनि चोज। वाटलें त्यांना ते वेळीं ॥२३॥ त्यानें स्वामीसी पाहून। बोलाविलें हांक मारून। झोळींतून भाकरी काढून। भक्षावया देतसें ॥२४॥ महाराज म्हणती तयासी। मि विप्रगृहीं भिक्षेंसी। मागूनि करितों भोजनासी। न सेवी अन्न इतरांचे ॥२५॥ तो वदे स्वामी लागूनी। द्वैतभाव न जाय अजूनी। ते उत्तर देती तत्क्षणीं। इच्छा श्रीगुरु दत्ताची ॥२६॥ श्रीची आज्ञा प्रमाण। आज्ञेनुसार करणें वर्तन। आणीकही बरेंच प्रश्न। विचारिलें स्वामीशी ॥२७॥ प्रश्नोत्तरें होऊनी तो ही गुप्त झाला

तत्क्षणीं। स्वामीं म्हणती आपुलें मनीं। हा दिव्य पुरुष असावा ॥२८॥ तेथूनि या मार्गक्रमिती। तापी किनारीं येती। पाहूनि ब्राह्मण वस्ती। भिक्षा करिती तयेवेळीं ॥२९॥ दुसरी भिक्षा मार्गांत। करिती पंढरी क्षेत्रांत। सनावदेहूनी भाद्रपद वद्यांत। चतुर्थिला निघालें ॥३०॥ ते अश्विन वद्य षष्ठी दिनीं। पातले श्रीनृसिंह भुवनीं। मार्गी तीन भिक्षा करूनी। आले कृष्णा तटाकीं ॥३१॥ बाकीचे दिवस प्रवासांत। उपासी क्रमिती पंथ। ऐंसे त्यांचें कडक व्रत। किती म्हणूनी वर्णावें ॥३२॥ महाराज आले पाहुनी। सकळ नारीनर तत्क्षणीं। आनंदती नृसिंहभुवनीं। दर्शनार्थ पातलें ॥३३॥ श्रीपादुकेला करुनी वंदन। ब्रह्मानंद मठीं येऊन। मुक्काम करिती जाण। कुशल वर्तमान पुसती ॥३४॥ स्वामी आगमनाची। वार्ता फांकता तत्काळची। तेथ असंख्य जनाची। गर्दी जमूं लागली ॥३५॥ नित्य हजारों लोक। दर्शनार्थ येती देख। त्या माजीं कामनीक। अनेक जन असती पै ॥३६॥ सर्वां सुगमोपाय वदती। परमार्थ पथ दाखविती। शांत चित्तें काळ क्रमिती। गुरुपद हृदयीं स्मरुनिया ॥३७॥ संगम घाटीं सायंकाळीं। संध्या सारूनि भक्तमेळी। आचार्य शतश्लोकी ते वेळीं। कृष्णा लहरी ही ऐकविती ॥३८॥ शिबिकारुढ देव दर्शन। करुनी मठीं येती जाण। नंतर होतसें भजन। कीर्तन नृत्य कोणी करिती ॥३९॥ असो पाहूनी अवसर। ते पूजाऱ्यांना वदती सत्वर। तुमच्या वडिलांचा आचार। ध्यानीं आणूनी वर्तावें ॥४०॥ ऐंसे पूजाऱ्याना सांगती। ते ऐकूनिया निश्चिती। त्यांतील एक म्हणे ऐंसे यती। कितीक येती या स्थानीं ॥४१॥ आम्हीं कोणाचें ऐकावें। सर्वही सिद्ध स्वभावें। प्रत्येकांचे नवे नवे। ऐकतो कोण उपदेश ॥४२॥ एसें उपदेश ऐकून। होईल

काय निष्पन्न। हे संसार त्याग करुन। दुसऱ्या तैसें शिकविती ।।४३ ।। त्याचें उन्मत्त भाषण। तन्मित्रां पसंत पडून। तेही डोलविती मान। म्हणती योग्य बोलीला ।।४४ ।। साधू पुरुषांचें वचन। वेदाज्ञे सम प्रमाण। मानिलें पाहिजे जाण। परी ते अज्ञानी नेणती ।।४५ ।। संदेश कळवाया जाण। संत मुख ईश्वरा साधन। सन्मुखें जें भाषण। ती वेदाज्ञा जाणावी ।।४६ ।। जे असती भाविक नर। ते सज्जनांचा नामोच्चार। ध्यानीं घेऊनीं साचार। तर ती हा भवसिंधू ।।४७ ।। दुष्ट नष्ट मतिनंद। करिती साधूचा उच्छेद। भोगिती दुःख आगाध। इहपरत्रीं निश्चयें ।।४८ ।। संत वाक्याचा अपमान। करुं शके ऐसा कोण। तपोनिधी दुर्वासें जाण। अंबऋषी धिक्कारिली ।।४९ ।। तेणें पाठी लागें सुदर्शन। पळतां पळतां पावला शीण। शेवटीं त्या भक्तां शरण। येतां निर्विघ्न जाहला ।।५० ।। संत जनांसी छळितां। किंवा अपमान करितां। ईश्वर कोपे तत्वतां। हें निर्धारें जाणावें ।।५१ ।। संत सोहिरोबा नाथ। त्याचा छल नृप करित। अग्निज्वाले त्वरित। निधन पावे तत्काळ ।।५२ ।। सत्पुरुषा जाऊनि शरण। कृपा संपादावी पूर्ण। आशिर्वाद घ्यावा जाण। कल्याण होतसें जन्माचें ।।५३ ।। धन्य धन्य ते जन। ज्यावरी संत कृपा असे पूर्ण। त्यांचे समान भाग्यवान। नाहीं त्रिभुवनीं शोधितां ।।५४ ।। संत द्रोही जो कां नर। तयासी अधोगती साचार। यास्तव त्याचा अंगिकार। न करावा विचारी पुरुषे ।।५५ ।। इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचितें। द्वात्रिंशोध्याय गोड हा ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।। श्रीगुरुदेवदत्त ।।

## ॥ अध्याय तेहतिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ जया सद्गुरु प्रसन्न। तया नरा काय न्यून। ब्रह्मा विष्णू त्रिनयन। हेही नमन त्या करिती ॥१ ॥ मागील अध्यायीं निरुपण। स्वामी बोधिती पूजाऱ्यां जाण। परी बोध वचनें न मानून। तिरस्कार करिती ते ॥२ ॥ असों कांहीं ग्रामस्थ द्विज। म्हणती हा कैचा महाराज। याची परिक्षा अवश्य आज। पाहिली पाहिजे सत्वर ॥३ ॥ मग त्यांतील एक भला। महाबळ नामक उठला। म्हणे मी एक क्षणाला। परिक्षा करीन स्वामीची ॥४ ॥ तो गणेश वाडीचा रहाणार। परिक्षा करावया तत्पर। नृसिंहवाडीस ये सत्वर। कुबुद्धि मनीं धरुनिया ॥५ ॥ सायंकाळीं स्नानार्थ। महाराज कृष्णेवरी असतां त्वरित। हाता चिंध्या गुंडाळित। स्वामी लागी नमस्कारी ॥६ ॥ हात बहु दुखतसें। ठणकूनि फुटाया पहातसे। बरवा होईल ऐसें। सांगा मज औषध ॥७ ॥ ठणका लागला भारी। स्वामी कृपा होय जरी। माझें दुःख कांहीं तरी। निश्चये हरेल वाटतें ॥८ ॥ करुणा वचन ऐकून। भूतदया प्रमाण। तें सांगती औषध जाण। हातासी उगाळून लावावया ॥९ ॥ तो येऊन मंडळींत। म्हणे परिक्षा केली यथार्थ। स्वामी एवढेंही न जाणत। सत्यासत्य त्या न कळे ॥१० ॥ चिंध्या गुंडाळुनी हातासी। गेलो परिक्षार्थ त्यापाशीं। मज औषध सांगे परियेसी। उगाळुनी लावाया ॥११ ॥ सत्यासत्य भाषण। तों कांहींच नेणें जाण। भूत भविष्य वर्तमान। जना सांगतो म्हणताती ॥१२ ॥ याच्या दर्शनासी नित्य। हजारों लोक जमती सत्य। हा तरी सामान्य

मर्त्य। आम्हा सारिखाची असे ॥१३॥ हें काय माजविलें ढोंग। घेऊनी संन्याशाचें सोंग। त्याचें रंगले न अंतरंग। मज वाटते निश्चये ॥१४॥ ऐसें बहू प्रकारें। यथेच्छ बोलिला अविचारे। त्याचे मित्रही ते सारें। भाषण ऐकूनी हांसती ॥१५॥ परी त्यांने थट्टा केली। ती देवा न मानली। महारोग व्यथा झाली। त्याच्या त्याच हातासी ॥१६॥ सत्पुरुषाची करितां थट्टा। तेणें होतसें आपुला तोटा। इहलोकीं लागे बट्टा। तो नर देव द्वेष्ठा जाणावा ॥१७॥ देवासी दृढ अभिमान। भक्तांचा असे जाण। म्हणूनि त्यांचे घट्ट चरण। धरणें हेचिं उचित ॥१८॥ तो घांबरला मानसीं। धांवत आला स्वामीपाशी। म्हणे अपराधी सर्वस्वी। कृपा करावी मजवरी ॥१९॥ हात चालिला सडत। दावूनि वारंवार विनवीत। म्हणे अपराधी अनंत। माझा अंत न पहावा ॥२०॥ स्वामी म्हणती तयासी। औषध सांगितलें तुजसी। तूं थट्टा केलीसी। मी ती स्वप्नीं नेणेची ॥२१॥ कपट ठेवूनी अंतरीं। थट्टा केलीस म्हणसी तरी। तत्फळ भोगाया अधिकारी। तुझा तूंची अससी पै ॥२२॥ आतां शरण जाई देवासी। तत्कृपा होय परियेसी। तरी रोग हटेल निश्चयेसी। आम्हा विनवीसी कासया ॥२३॥ सज्जन छलक दुर्जना। भोगाव्या लागती यातना। न चुकती भोगिल्या विना। म्हणोनी सावध रहावें ॥२४॥ संतद्वेष्टा गुरु द्वेष्टा। जो नर जाणा देव द्वेष्ठा। ऐंशाचा संग करितां बट्टा। भल्या भल्यासी लागला ॥२५॥ असे वद्य दशमी दिनीं। स्वामींसी समाधी लागूनि। दृष्टांत झाला तत्क्षणीं। रामेश्वर रस्ता धरी ऐसा ॥२६॥ तो पूजाऱ्यांशी सांगूनि। महाराज म्हणती तेथूनी। आज भिक्षा करुनी।

अवश्य निघालें पाहिजे ॥२७॥ तें ऐकूनिया भाषण। पूजारी म्हणती आपण। अनायसें घरीं चालून। आली कामधेनू जातसें ॥२८॥ यासी काय उपाय। आम्हांतारक श्रीचें पाय। म्हणूनी पादुकेवरी कृष्ण तोय। संततधारा धरिती पै ॥२९॥ आरंभिती रुद्राभिषेक। स्वामीसी समाधी लागली देख। तेथें भक्त जमले अनेक। समाधी दर्शन करावया ॥३०॥ सायंकाळीं पुनरुत्थान। झालें महाराजांचें जाण। तेव्हां जे जनाकडे पाहून। हास्य वदनें विचारिती ॥३१॥ तुम्हीं सर्वांनीं भोजन। केले कीं नाहीं सांगा जाण। ऐकूनी म्हणती भक्तजन। कैंसे भोजन करावें ॥३२॥ स्वामीची भिक्षा न होतां। आम्हीं न सेवूं अन्न सर्वथा। त्यामाजीं तेथूनि आतां। स्वामी निघाले जावया ॥३३॥ यांचें आम्हां होतें दुःख। म्हणोनी श्रीस रुद्राभिषेक। आरंभिला असें देख। कैंसे भोजन करावे ॥३४॥ आमुची एक असे विनंती। पुन्हां दृष्टांत होई तों निश्चिती। महाराजांनीं आम्हां प्रती। सोडूनि न जाणें सर्वथा ॥३५॥ मंडळींचे ऐकूनि वचन। स्वामी वदती भाषण। देवा शिणविता व्यर्थ जाण। संतत धारा धरूनिया ॥३६॥ नैवेद्या वीण देवासी। भिक्षा न होय परियेसी। सर्वांनीं आपुल्या गृहासी। जाऊनी भोजन करावें ॥३७॥ व्यर्थ कां राहातां उपाशी। भोजन करा आनंदेसी। जे जे होईल परियेसी। मग पाहतां येईल ॥३८॥ या परी सर्वां सांगूनी। फलहार करावया लागूनी। जाती आपुल्या स्थानीं। सकळ शिष्या सहित ॥३९॥ याच रात्रीं दृष्टांतीं। श्रीदत्त त्यांना सांगती। पुन्हः आज्ञा होई तो निश्चिती। येथेंचि वास करावा ॥४०॥ झालेला श्रीदृष्टांत। स्वामीं सर्वांशी सांगत। ऐकूनि पूजारी आनंदित।

झालें तैसें भक्तजन ॥४१ ॥ मग संतत धारेची शांती। व्हावया ब्राह्मण भोजन करिती। देवासी नैवेद्य अर्पिती। भिक्षा करिती स्वामीसी ॥४२ ॥ येथें एक द्विज याचक। स्वामीसी विनवी तसे देख। म्हणे भवत् हस्तें एक। शुभकारक श्लोक मिळावा ॥४३ ॥ त्याच्या याचनें वरुनी। सर्व तो भद्र श्लोक रचूनी। स्वामी देती त्या लागूनी। तो श्रोते जनीं ऐकावा ॥४४ ॥ श्लोक- सा कारता तारकासा कापि सा रर सापिका। रसायमे मेयसार तारमेययमेरता ॥४५ ॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। त्रयत्रिंशोध्याय गोड हा ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

* * *

## ॥ अध्याय चौतिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ पुढें काय वर्तलें। विस्तारूनी सांगा वाहिलें। श्रोतें म्हणती धन्य केलें। ऐकविलें श्रीगुरु चरित्र ॥१॥ विचित्र वर्तली कथा। ती सविस्तर सांगतों आतां। करुनिया एकाग्र चित्ता। ऐका तुम्हीं भक्तजन ॥२॥ एकदां दीपावलीच्या दिनीं। देवांसह स्वामी लागूनी। अभ्यंग घातलें पुजाऱ्यांनीं। अत्याग्रहे करुनिया ॥३॥ तै महाराज लघुशंके जातां। रक्त पडे अवचिता। शिष्यांच्या नजरे येतां। महाराजांना विचारिती ॥४॥ महाराजांचें स्नान। झालें उष्ण जलें म्हणून। ऐका विकार उत्पन्न। झाला कीं काय न कळें ॥५॥ तें सांगतीं सकळांसी। दृष्टांत झाला जो आम्हासी। तो सांगतों ऐका तुम्हांसी। दोष असे पुजाऱ्यांचा ॥६॥ नित्य उष्ण जलें स्नाना। घालिती श्रीपादुकेंसी जाण। तें देवा न होई सहन। हें तयां कळवाया ॥७॥ या देहाला विकार। उत्पन्न झालासें साचार। या नलगे औषधोपचार। आपोआप शमेल ॥८॥ श्री स्नानाचा बंदोबस्त। होतां विकार क्षणांत। परि हरेल हें निश्चित। ऐकूनि विस्मित पूजारी ॥९॥ मग पुजारी देवापुढें जमून। प्रार्थना करिती श्रीफल ठेऊन। अपराधी बालकें अनन्य शरण। श्रीनीं क्षमा करावी ॥१०॥ आम्हां हस्तें इतःपर। सेवा होईल यथाचार। परी स्वामींचा विकार। नष्ट व्हावा आतांची ॥११॥ ऐशीं प्रार्थना करितां। विकार गेला तत्वतां। संतोष वाटला चित्तां। आश्चर्य करिती सकळही ॥१२॥ दत्त नाम जय जयकार। करिती साष्टांग नमस्कार। म्हणती देवभक्त भिन्न शरीर। परी अंतर नसेची ॥१३॥

वाडीहूनी समीप एक। संस्थान कुरुंदवाड नामक। तेथें अधिपती ब्राम्हण देख। भक्त झाला स्वामींचा ॥१४॥ एके दिवशीं तयासी। वांती सुरूं झाली परियेसी। रक्त वमन बहूंवसी। होऊं लागले वारंवार ॥१५॥ औषधोपचार केले नाना। परी वमन बंद होईना। तो निज सेवकांना। स्वामीपाशीं पाठवी ॥१६॥ ते आपुल्या धन्याची स्थिती। त्यांना साद्यंत कळविती। महाराज कांहीं गोळ्या देती। तया सेवन करावया ॥१७॥ सांगती कराया गो प्रदान। तेणें विकार बंद होऊन। जाहले आरोग्य तत्क्षण। चरणीं भक्ती जडली सें ॥१८॥ मंत्रें तीर्थे द्विजे देवे। दैवज्ञे भेषजे गुरौ। यादृशी भावनां कुर्यात्। सिद्धिर्भवती तादृषी ॥१९॥ त्या नृसिंहवाडींत। एक पिशाच्च बाधेची स्त्री येत। ब्रह्मराक्षस बाधा होत। वारंवार तिजलागीं ॥२०॥ तिच्या सवें माता पिता। अहर्निश शरणार्थ असतां। तिला वात रुपें तत्वतां। ब्रह्म राक्षस उडवीतसें ॥२१॥ भोंवतीं बैसल्या मंडळीला। दिसेनासें करुनि क्षणाला। जातसे घेऊनी त्या स्त्रियेला। तो राक्षस वात रुपें ॥२२॥ घेऊनी जाई उडवूनि। भलतें ठायीं नेऊनि। टाकी बेशुद्ध करुनी। ऐंसा त्रास देतसें ॥२३॥ ती शुद्धीवर आल्यावरी। मार्ग शोधीत येतसें घरीं। माता पितर घाबरीं। होती ही स्थिती पाहूनी ॥२४॥ एके दिनीं दुपारीं। मंडळीं बैसली असतां सारी। स्त्रीस उडविलें क्षणा माझारीं। ब्रह्मराक्षसें वात रुपें ॥२५॥ तिचे आईबाप घाबरून। येती स्वामीपांशी धांवून। सांगती सर्व वर्तमान। म्हणती कृपा करा कन्येवरी ॥२६॥ त्यांना स्वामी सांगती। ब्रह्मराक्षस बाधा निश्चिती। तो दश दिशां प्रती। फिरवीतसे तिजलागीं ॥२७॥ ती बाई

तुम्हांला। न सांपडे या समयाला। ब्रह्म राक्षसे तिजला। न सोडिलें अद्यापी ॥२८॥ पश्चिम दिशेचे धोरण। राखूनि शोध करा जाण। सायंकाळ पर्यंत आढळून। येईल तुम्हां निश्चयें ॥२९॥ तिचें कांहीं नुकसान। न होय राक्षसा पासून। घाबरुं नका चित्तीं जाण। ऐसें अश्वासन दीधलें ॥३०॥ ते विनविती स्वामी। वदा कांही उपाय नामी। चरणा अनन्य शरण आम्हीं। आलो कृपा करावी ॥३१॥ महाराज त्यांना सांगती। पूर्व जन्म संबंध निश्चिती। सोडवूं जातां न सुटती। यासी उपाय कायसा ॥३२॥ असो सांगतो उपाय। तुमच्या हस्ते सांग होय। तरी कन्येचा अपाय। गुरु प्रसादे परिहरे ॥३३॥ म्हणूनी माता पित्यासी। यंत्र देती परियेसी। मुलीच्या गळयांत बांधावयासी। पीडा परिहार व्हावया ॥३४॥ त्यानीं तें यंत्र नेऊनी। कन्या कंठीं बांधिलें तत्क्षणीं। तेणें पीडा हरूनी। गेली अल्प काळांत ॥३५॥ ऐशा जन कामना। पूर्ण झाल्या त्या स्थाना। तेणें स्वामींच्या दर्शना। कामनीक जन धांवती ॥३६॥ कथन करुनि सदुपाय। द्विज कन्येचा वारिला अपाय। ह्या कथा वर्णनीं अध्याय। पूर्ण केला असे हा ॥३७॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। चतुःत्रिंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ।। अध्याय पस्तिसावा ।।

।। श्रीगणेशाय नमः ।। श्री गुरुभ्यो नमः ।। गुरु कल्पतरू तळवटीं। जो विश्रांती घ्यावयासाठीं। बैसला तो भवतापे कष्टी। न होय जाणा कधींही ।।१ ।। एकेदिनी पुजारी मिळूनि। वाडीसमीप मोळा स्थानीं। वन भोजना लागूनी। जाती स्वामी सहित ।।२ ।। तेथें भोजन झाल्यावरी। भक्त मंडळी बैसली सारी। मग पुराणावसरीं। स्वामीही श्रवणा बैसले ।।३ ।। पुराण कवीश्वर सांगती। तया माजीं निश्चिती। ते श्रोत्यासी कथिती। स्वामी श्रीदत्त अवतार पूर्ण ।।४ ।। भविष्योत्तर पुराणांत। लिहिलें असें जे प्रख्यात। दत्तावतार तीन निश्चित। कलि युगांत होतील ।।५ ।। त्यावरुनी सांगतो तुम्हांसी। श्रीपाद वल्लभ नाम एकासी। नृसिंह सरस्वति दुजियासी। सर्वां ठाऊक हे असें ।।६ ।। श्रीगुरु चरित्रीं त्यांचे वर्णन। तृतीय नामाभिधान। परिव्राजकाचार्य परमहंस जाण। श्रीवासुदेवानंद सरस्वती ।।७ ।। कलौयुग सहस्त्रेषु शंकरोवत रिष्यति। ततः पंचशते वर्षे भवेत्। श्रीपाद वल्लभः। ततः सार्ध शते वर्षे श्रीनृसिंह सरस्वती ।।८ ।। तोहा श्रीदत्त साक्षांत। आमुच्यापुढें असे नांदत। यासी जे भजती भक्त। ते भवबंध मुक्त होती ।।९ ।। ऐसें कवीश्वर भाषण। ऐकूनि महाराज बोलती जाण। तो अवतार अझून। होणार असे निश्चयें ।।१० ।। मजवरी आपोआप। कां करितां मिथ्योरोप येणें सत्याचा होई लोप। व्यर्थ अनर्थ कर नये ।।११ ।। ऐंसे स्वामींचें वचन। ऐकूनि स्तब्ध पूजारी जाण। आनंदें काल क्रमण। करुनी येती गृहासी ।।१२ ।। स्वामी भक्त जनांसहित। येतें झाले मठांत। कांहीं दिवसांनीं दृष्टांत।

जाहला पुनरपी तयांना ॥१३॥ सेतु बंध रामेश्वरी। चालता हो झडकरी। आज्ञा मानूनि त्या अवसरीं। निघालें स्वामी तेथुनी ॥१४॥ कुरुंदवाड संस्थानिक। मार्गक्रमण पाहुनी देख। हात जोडूनी म्हणती एक। विनंती असे चरणासी ॥१५॥ महाराजांनीं उपेक्षा। न करितां आमुची भिक्षा। स्वीकारावी नाहीं पेक्षां। उदास होईल हा दास ॥१६॥ त्याची मान्य करुनि विनंती। कुरुंदवाड घाडीं वस्ती। करुनि भिक्षेस ग्रामीं जाती। शिष्यांसहीत ते दिनीं ॥१७॥ भोजना बैसल्या द्विजपंक्ती। स्वामी कृपेनें पाहती। हास्य वदनें तोषविती। सकळां देती आनंद ॥१८॥ भोजन करुनि होती तृप्त। स्वामी म्हणती आतां स्वस्थ। रहा सुखें प्रपंचीं नांदत। श्रीदत्त चरणा चिंतुनी ॥१९॥ आम्हां जाणे असे दूर। सेतु बंधरामेश्वर। म्हणूनी निघती सत्वर। शांतवूनी सर्वांसी ॥२०॥ तेथूनि पुढें निघती। वेदगंगा तटीं येती। तिची स्तुती करिती। ती ऐका श्रोतेजन ॥२१॥ वेदगंगे नमस्तेमे वेदगंगे भवत्यघं। हर तत्वं विधि श्रीश हरतत्वं प्रकाशय ॥२२॥ हिरण्यकेशी नदी तिरीं। पुढती येती निर्धारी। स्तुती करिती चतुरीं। ऐकावी एकाग्रचित्तें ॥२३॥ हिरण्यकेश्याः कम पाश्य मेघ। हिरण्यकेश्या यदचोक्त तत्वं। आदित्य वर्णं तद वेक्षणार्हे। मादित्यवन्मां विदधातु शुद्धं ॥२४॥ तेथूनि बेळगांवा येती। एक निशीं क्रमूनि निघती। शृंगपुरी येऊनी वस्ती। करिती केंगेरी ग्रामीं ॥२५॥ याचि ग्रामीं चिदंबर। नामक एक सत्पुरुष थोर। अवतरुनी नारी नर। लाविते झाले भक्ति मार्गा ॥३६॥ जणूं त्या पुनरुज्जीवन। आणायातें लक्षूनि भुवन। महाराज पातलें जाण। पाहूनि जन सुखावलें ॥२७॥ जन ऐकतां दर्शनार्थ।

पातले त्या माजीं एक गृहस्थ। रामचंद्र बालकृष्ण कामत। जो कां शांत सज्जन ॥२८॥ प्रापंचिक व्यवहारी। असे परि परमार्थ विचारी। भक्ती प्रेम पुरस्सरीं। बैसला स्वामी संनिध ॥२९॥ विनये पुसे कर जोडून। स्वामी माझा एक प्रश्न। निजमुखें उत्तर श्रवण। करितां समाधान होईल ॥३०॥ सुलभ साध्य प्रापंचिका। भक्ति कोणती असे देखा। सगुण कीं निर्गुण विशेखा। ही आशंका फेडावी ॥३१॥ ऐकूनि तयाचा प्रश्न। स्वामी करिती हास्य वदन। सोडोनिया मित भाषण। जाहले प्रसन्न कथावया ॥३२॥ तयालागीं प्रेमें वदती। तुझ्या प्रश्ने आनंद अती। जाहला सांगतो तुजप्रती। एकाग्र चित्तें ऐकापां ॥३३॥ जे कां देहाभिमानी नर। प्रपंची असती तत्पर। परमार्थाचा विचार। क्षण भरही न करिती ॥३४॥ ऐशीया नराप्रती। लावाया भक्तिमार्गा युक्ती। योजिली पाहिजे सगुण भक्ती। जी कां संतानीं वर्णिली ॥३५॥ तिचें सुलभ जाण। नित्य नाम लाखोली जाण। इष्टदेवता नाम स्मरण। करुनि अर्पण करावी ॥३६॥ नाम स्मरणाचा प्रकार। गुरुमुखें घेऊनी साचार। जप करावा परिकर। श्रीगुरुपदीं प्रेम असावे ॥३७॥ श्रीगुरु आज्ञा पाळुनी। नाममात्रा संभाळुनी। पथ्यही करावे निशी दिनीं। तरीच सज्जनीं मान्य होय ॥३८॥ मीठ मिरची काम क्रोध। यांचा नसावा संबंध। लोभ अहंकार प्रसिद्ध। आंबट स्वादन घ्यावा ॥३९॥ आशा मनशा तेलकट। यांचा येऊंद्यावा वीट। क्षमा दया पोळी चोखट। सांभाळुनी सेविजे ॥३९॥ जरी सकाम नाम स्मरण। तरी तें कोड पुरवूनी जाण। निष्काम करील अंत:करण। देईल निर्वाणपद अंती ॥४०॥ जितुकी नाममंत्राक्षरें।

तितुका लक्ष जप निर्धारें। शुचिष्मंत सुविचारें। भोजनापूर्वि करावा ॥४१॥ जपसंख्या होता पूर्ण। तद्दशांश करणें मार्जन। तद्दशांश होम अवदान। तर्पण तद्दांश करावें ॥४२॥ ब्राह्मण भोजन तद्दांश। यथा शक्त्या दक्षिणेस। देऊनिया सद्विप्रांस। तोषवितां कार्य सिद्धीं ॥४३॥ निष्काम जप महत्त्व। तुज सांगतों यथास्थित। करुनिया एकाग्र चित्त। परिसे भक्ता गुणवंता ॥४४॥ येतां जातां बसतां उठतां। आसनीं शयनीं धंदा करितां। जपसंख्या मात्र होतां। मंत्र देवतां प्रसन्न हो ॥४५॥ अथवा मंत्राची अक्षरें। कीतीही असोत बारे। बारा कोटी जपे निर्धारें। सगुण साक्षात्कार पाविजे ॥४६॥ होतां एक कोटी जपपूर्ण। शुद्ध होय तनुस्थान। रजतमो गुण नाश होऊन। सत्वगुण वृधीं पावेल ॥४७॥ नाश होईल रोग बिजांचा। कल्पना प्रवाह घटे साचा। स्वप्नीं देवमूर्तिचा। साधुसंताचा दर्शन लाभ ॥४८॥ तेणें चरिती संभाषण। होऊं लागतसें जाण। ऐसा अनुभव येतां पूर्ण। सत्व वृद्धीं जाणावी ॥४९॥ होतां जप कोटी दोन। धनस्थान कुटुंबस्थान। म्हणती तें शुद्ध होऊन। धन प्राप्ती होतसें ॥५०॥ ऋण असल्या ऋणमुक्त। कुटुंब व्यक्ति वियुक्त। असल्या होईल ऐक्यत्व। कौटुंबिक सौख्य वृद्धी ॥५१॥ होता जप कोटी तीन। सहज स्थान भ्रातृस्थान। तैसेंच पराक्रम स्थान। शुद्ध होय जाणावें ॥५२॥ बंधु बंधुमाजीं द्वेश। असल्या तो जाऊनि निःशेष। प्रेमवृद्धीं होय खास। सहजची हस्तें कार्यसिद्धीं ॥५३॥ चार कोटी जपे पूर्णं। होतें शुद्ध सुहृदस्थान। मातृस्थान सुखस्थान। मन सुख संपन्न होय ॥५४॥ शारिरीक मानसीक। आघात बंद होती देख। पुत्रस्थान

विद्यास्थान ऐक। पांच कोटींत शुद्ध होय ॥५५॥ पुत्रांचे अनुकूल वर्तन। बुद्धी प्रगल्भ होय जाण। इष्ट विद्येमाजीं संपन्न। धारणा शक्ती वाढेल ॥५६॥ सहा कोटी जपे पूर्ण। शत्रुस्थान रोगस्थान। शुद्ध होतसें जाण। त्याचें लक्षण सांगतो ॥५७॥ अंतरीं वसती षड्वैरी। असती बाह्य व्यवहारी। ते मित्रत्वें निर्धारी। वागतील जाणावें ॥५८॥ असाध्य रोग नाश। होतसें जाणा निःशेष। सात कोटी जपे विशेष। जाया स्थान शुद्ध होय ॥५९॥ अविवाहिता विवाह इच्छा। झाल्या ती न करितां पृच्छा। पूर्ण होऊनि स्त्री सौख्या। पावेल ऐसें जाणावें ॥६०॥ होतां आठकोटी जपपूर्ण। मृत्यू स्थान गंडांतर स्थान। शुद्ध होऊनि जाती टळून। अकाल मृत्यू अपमृत्यू ॥६१॥ नवव्या कोटी माजीं ऐक। धर्मस्थान शुद्धीकारक। सगुण साक्षात्कार देख। होय मंत्र देवतेचा ॥६२॥ हा आनंद अवर्णणीय। ज्या लाभे तो जाणे सोय। येरा कैसेंनि प्राप्त होय। काय क्लेशी पापिया ॥६३॥ दहा कोटी जप होतां। कर्म पितृस्थान शुद्धता। दुष्कर्मां ठायीं अलिप्तता। सत्कर्मिंच प्रेमवृद्धी ॥६४॥ बैसल्या ठायींच संत दर्शन। होतसें आपोआप जाण। अकरा कोटी जपे पूर्ण। लाभस्थान शुद्धी होय ॥६५॥ तेणें पूर्ण सत्वगुण वृद्धी। होय प्राप्त रिद्धीसिद्धी। परी मुमुक्षूची बुद्धी। त्यांच्या नादीं न लागावी ॥६६॥ जप होतां बारा कोटी। व्ययस्थान शुद्धी गोमटी। स्वप्नींवा प्रत्यक्ष चोखटी। गुर्वनुग्रहें कृतार्थता ॥६७॥ अविद्या म्हणजे कल्पना। त्रिविध तापा जन्म मरणा। कारण जीचीं रुपें नाना। असती जाणा घातुक ॥६८॥ स्वरुप साक्षात्कार प्रतिबंधक। लयविक्षेप वृत्त्या देख। निद्रा चंचलता रुपें ऐक।

कल्पनेचीच असती ॥६९॥ या कल्पना सुसरीची मिठी। सुटाया एवढी आटाआटी। करील जो योगी हट्टी। तोचि शेवटीं धन्य होय ॥७०॥ तयाचाचि सत्य संकल्प। येर ते बापुडे विकल्प। तयालाची निर्विकल्प। स्वरुपानंद प्राप्त होय ॥७१॥ कल्पनेने वाढती रोग। कल्पनेनें वाढती भोग। कल्पनेनें स्त्री संयोग। सुखरुप भासविला ॥७२॥ कल्पनेनें परमार्थ। तुच्छ करुनि विषय स्वार्थ। दाविला जो कां अनर्थ। जेथें सार्थकता कांहीं नसे ॥७३॥ हें अवघे ब्रह्मांड। कल्पनेनेंच थोतांड। इचें ठेचणें तोंड। गुर्वनुग्रह संपादुनी ॥७४॥ या कल्पनेनें प्रचंड। रचिलें असे कुभांड। गुर्वनुग्रहें इचे बंड। अवघ-मोडूनि टाकावें ॥७५॥ येणें परी कल्पना प्रवाह। बंद होतां निःसंदेह। आरोग्य निर्भय स्थिती सह। मनःशुद्धीं होतसें ॥७६॥ रोग बीजें मनीं शिरुन। अंगी आणि ती भिन्नेपण। तेणें रोगं वृद्धीं होऊन। देहा क्षीणता येतसें ॥७७॥ परी मनःशुद्धी होतां। निर्भय स्थिती आरोग्यता। सहजची प्राप्त होय तत्वतां। हा मनःशुद्धी प्रभाव ॥७८॥ संकल्प विकल्पात्मक मन। हें ओढाळ गुरु जाण। याच्या गळां एक बंधन। बांधावें लागे अवश्य ॥७९॥ नाम जप संख्या गणना। गळीं बांधावा लोढणा। तयाच्या ध्यासें जाणा। तन्मयता वाढेल ॥८०॥ येणेंरीती नामानुष्ठान। होता हरे चिंता दैन्य। द्वादश स्थानें शुद्ध होऊन। गुर्वनुग्रहें कृतार्थता ॥८१॥ वेदांती ज्या सप्तम भूमिका। कथिल्या असती विशेखा। शुभेच्छा विचारणा देखा। तनु मानसा सत्वा पत्ती ॥८२॥ पांचवी ती आसंसक्ती। या नाम जपें शीघ्र गती। नामयोगी ओलांडिती। हें निश्चिती जाणावें ॥॥८३॥ पदार्था भाविनी

सहावी। सातवी तूर्यगा जाणावी। गुर्वनुग्रहें ओलांडावी। स्थिती साधावी जीवन्मुक्त ॥८४॥ ऐशी ही नाममात्रा। सेवी त्या सुख इह परत्रा। वरकड पापिया विचित्रा। अणुमात्रही न पचेची ॥८५॥ या नाम मात्रेचें पथ्य। पुनश्च सांगतों यथा तथ्य। चित्ताचें करुनि स्वास्थ्य। ऐके नाम महात्म्य हें ॥८६॥ तुझ्या प्रश्नें करुन। परोपकार होईल जाण। या लागीं तुज लागून। कथितो नामधारका ॥८७॥ जया हें सुलभ साधन। आवडें नाम संकीर्तन। तेणें निंदास्तुती विचारण। सोडूनि देणें अवश्य ॥८८॥ शिवादि करुनि देवतां। माजीं पहावें भगवंता। वंदावें साधू महंता। चालत्या बोलत्या देवासी ॥८९॥ देवमूर्तिं करावी परती। चालती बोलती संतमूर्तिं। घरा आलिया आधीं आरती। करुनि प्रीतीनें सेविजे ॥९०॥ साधूच्या नामे दंभ। जेणे वाढविला लौकिक कोंब। तत्संगतीचा लोभ। नाम धारकें न धरावा ॥९१॥ अंध श्रद्धा नसावी। गुरुची अवज्ञा न करावी। श्री गुरुचरणीं निष्ठा असावी। एरवीं नाम सिद्धी न होय ॥९२॥ गुरु नाम सिद्धीचा दाता। गुरु परब्रह्म देवता। माता पित्याहूनि विशिष्ठता। गुरु सत्ता अतुलची ॥९३॥ वेद अथवा वेदानुगत। शास्त्रनिंदा जो करित। तया नाम सिद्धी शापित। हें निश्चित जाणावें ॥९४॥ मुखें घेऊनी हरिनाम। हाते करी नीचकर्म। तो अधमाहूनी अधम। पापी तत्सम अन्य नसें ॥९५॥ या हरि नामाचें तुळण। अन्य शुभ कर्मा समान। करील तो दोषी जाण। होईल नामापराधी ॥९६॥ जो कां असे श्रद्धा शून्य। तया नामोपदेश जाण। देणें हें विद्वन्मान्य। नाहीं नाहीं त्रिवाचा ॥९७॥ श्रद्धाहीना नामोपदेश। देतां नाम अपराधीं

विशेष। होईल देतां घेतां खास। होतां अवज्ञा नामाची ॥९८॥ ऐसें न व्हावें अपराध। यास्तव असावें सावध। नातरी नामदेवता क्रोध। होईल खेद प्राप्तची ॥९९॥ या दोषांचे विवरण। तुज संक्षेपें केलें कथन। ऐसें पथ्य सांभाळून। नाममात्रा सेवावी ॥१००॥ येणेंपरी त्या गृहस्था। नाम महत्व स्वामींनीं कथितां। तो होऊनी सावचित्ता। नाम योग्यता जाणता हो ॥१०१॥ तयानें धरिलें नाम व्रत। संबोधिलें जन असंख्यात। जे कां असती प्रपंचासक्त। ते ही व्रतस्थ जाहलें ॥१०२॥ तया स्थानीं चिदंबर स्तोत्र। स्वामींनीं रचिलें पवित्र। नित्य पाठें इह परत्र। सुख सर्वत्र पाविजे ॥१०३॥ ते श्रोते जनास्तव। सादर करितों अभिनव। ज्याच्या पठणें उमाधव। शिवप्रद होईल ॥१०४॥ अथ स्तोत्र प्रारंभः - शिवः स्वयंभूमितलेऽवतीर्णः। स्वयंसुधर्मः खलुयेनचीर्णः। वशी द्वि भार्योऽप्य भव द्विदीर्ण। रागो यदिष्टैस्तु भवोपितीर्णः ॥१॥ चिदंबराख्यो भुवि दीक्षितोयः। सदाज्य तासादित सिंधुतोयः। दंभादि हीनान् भजकान्प्रपन्ना- न तारयद्वै विपदा विपन्नान् ॥२॥ बभूवयोऽलौकिक कर्मकर्ता। भर्ता द्विजानां खल गर्वहर्ता। र रक्षधर्म सहराव तारो। मुरगोड पुर्यांच विहार्युदारः ॥३॥ अथ स्तोत्र आष्टकः। तापत्रयानें अति तापलों शिवा। विश्रांति कोठें न मिळे उमाधवा। भवाब्धि नावा तव पाद हे हरा। तारी मला तूंचि चिदंबरेश्वरा ॥१॥ हा काम रुड्लोभ दवाग्नि पेटला। तत्छांति कर्ता मजला न भेटला। कृपाघना हा निववी महेश्वरा। तारी मला तूंचि चिदंबरेश्वरा ॥२॥ देवा अहंता ममता पिसाळल्या। ह्या शाकिनी डाकिनी अंगि झोंबल्या। हा लोभ वेताळ गिळेल कीं हरा ॥

तारी० ॥३ ॥ नको नको हा भव जाच साच तूं। विभुक्ति हेतू वर काढिहात तूं। धरूनि माझा सदया परमेश्वरा। तारी० ॥४॥ मी पातकी केवळ मंद बुद्धिहा। महांमती तूंचि उदार पापहा। माझ्या शिरीं तूं धरि हात शंकरा। तारी० ॥५ ॥ इति स्तोत्राष्ठक संपूर्ण। स्तुती करुनि येणेंपरी। स्वामी निघालें सत्वरी। समीप पर्वता माझारीं। सुगल ऋषी स्थान पवित्र ॥१०५ ॥ पहाती गुर्लहसूर ग्राम। मलप्रभा तटीं उत्तम। आठ दिवस करिती मुक्काम। कैवल्याश्रमी स्वामी आग्रहें ॥१०६ ॥ पुढील कथेचा विस्तार। श्रोतीं ऐकावा सादर। श्रीगुरु कथा पीयूषधार। शिष्य चतुरें सेविजे ॥१०७ ॥ या अध्यायी नाम महिमा कथिलासें अनुपमा। ज्याच्या नियमें भक्तोत्तमा। परमागती लाधेल ॥१०८ ॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। नाम महात्म्य कथनं नाम। पंचत्रिंशोध्याय गोड हा ॥ श्रीकृष्णार्पण मस्तु ॥श्रीगुरुदेव दत्त ॥

* * *

## ॥ अध्याय छत्तिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ श्रीगुरुचरित्रपरम पावन। भावे करितां श्रवण पठण। होऊनिया अघनाशन। अंती सद्गती मानवा दे ॥१ ॥ या गुर्लहसूर ग्रामीं। मलप्रभा स्तुती करिती स्वामी। ती ऐकतां चित्त आरामी। होईल नामी निश्चयें ॥२ ॥ मला पहा महासिंधुः सर्व जन्मा मला पहा। हरतु त्रिविधं पापंतापंच त्रिविधंमम ॥३ ॥ तेथूनि पुढें निघालें। यल्लमा अंबास्थानीं आले। लिंगायत पूजारी आनंदले । दर्शनें धालें स्वामींच्या ॥३ ॥ सालामाजीं उत्सव दिवशीं। जो पूजा थाट अंबेसी। तोच त्या दिनीं परियेसी। करिती स्वामी आगमनार्थ ॥४ ॥ मग आले घटप्रभेसी। स्नान करुनि भावेसी। स्तुती केली परियेसी। ती ही येथें सांगतो ॥५ ॥ घटप्रभांबुमे कुर्यात्सद्यो हेम घटप्रभां। उपलब्धि येतो भूम्न उपलब्धिर्भविष्यति ॥६ ॥ पुढें मार्ग क्रमितां। विश्वामित्री नामें सरिता। पाही स्नान करितां। सद्गती दाइनि जी ॥७ ॥ विश्वामित्र्याः करोत्वंभो विश्वामित्र्या ऋचोदितां। प्रचोदनां सतिदृढां हित्वाकर्म प्रचोदनाम ॥८ ॥ मग मार्गक्रमित। तुंगभद्रा संगमी येत। तेथेंही स्तुती करित। हरिहर क्षेत्र पहाती ॥९ ॥ भद्रया राजतेवीच्या तुंगाया सहभद्रया। तुंगभद्राधुनी सामां तुंगभद्राश्रितां क्रियात् ॥१० ॥ तेथूनि पंपासरीं स्नान। करुनि ऋष्यमुक पाहून। किष्किंधेवरून। स्वामी कार्तिका पातलें ॥११ ॥ तेथें केलिसे स्तुती। ती ही ऐका निश्चिती। भावें गातां अघसंहर्ती। होईल कुमार प्रसादें ॥१२ ॥ अथ कार्तिक स्वामी स्तोत्रः - दक्षिणे हस्तेन गदांद धानः। क्रौंचे नवामेन सुसावधानः। सशुक्र जोनोवतु

कार्तिकेयः। षाण्मातुरः सांबसुतोयजेयः ॥१३॥ षट्शिराद्वादश करो द्विगुणोऽत्रिज एव किं। सोंबासुतो द्विह स्तोत्र सुब्रह्मण्यो मयेक्षितः ॥१४॥ हत्वाबलात्संपदमाश्वदैवीं। पुष्णासि गोपायित विश्वदेवी। सुपूजित स्त्वं सुमनः स्वभक्त। गते नमस्तेस्तु सदा विरक्त ॥१५॥ विशेषतस्त्वांभुवि दक्षिणात्या। भजंति भक्त्या परयाऽजतेषां। अनुग्रहार्थं द्विभुजस्वरुपं। प्रकाश्यचा स्सेदिशि दक्षिणस्यां ॥१६॥ स्त्री संगती दुर्गती रेवसाक्षात्। इत्थं समाख्या पयितुं वधूनां। संस्पर्ष गंधोपिसुदूर तस्ते। समुझ्झितो देवपदे नमस्ते ॥१७॥ स्वस्मिन्नंबा स्नेहलतां वितता मपितां क्षणात्। मायामयीं निरस्या जो विजहार नमामितं। ।१८॥ एकांत सेवन मपि स्वामिनं त्वोपत स्थिरे। एकांत भक्ता यच्चित्ते नैव कामोद्गतिः स्थिरे ॥१९॥ स्वामिन्तारक जित्सर्व लोककारक शक्ति धृक। अंबासुत नमस्तेस्तु प्रसीद परिपाहिनः ॥२०॥ योगापेक्षा मेनते दर्शनार्थं नामक्षामे भावि पूज्योद्भवार्थं। भक्तयाभूयाद्दर्शनं ते कदापि-स्यात्सफल्यं जन्मनोमेत तोपि ॥२१॥ स्मर्तृगामी कलौयौबां तनयोद्विशयो मतः। चक्रेद्मर्थी तस्यनुतिं वासुदेव सरस्वती ॥२२॥ कार्तिक स्वामीचें स्तोत्र। येणेपरी करुनिया पवित्र। बाहुदा सरिता यत्र। तिरीं पातलें तियेच्या ॥२३॥ सदा नीरालघुतला सदानीराग कृज्जला। बाहुदाख्यावतुमुनि। बाहुदास्मातियं धुनी ॥२४॥ येणेपरीस्तुती। करुनि करतोया तटीं येती। तिचेंही स्तोत्र गाती। तें ऐका भाविक हो ॥२५॥ प्रायशोवहतिया करतोया। शुष्यती हन जला करतोया। पावनी बहुसुखा करतोया। पातु साधनिचयात्करतोया ॥२६॥ करतोये सदातोये बहुशोज्येपुराऽभये। दोषायेमे कृतास्तेषां सर्वेषांत्वं भवांत कृत ॥२७॥

ययाछिन्नो बाहुर्ऋषय इहदत्तोहिद यया। नदीसेयं माया मय भय लया नित्य विजया। अपायान्मां पायात् सतत निरपायामृत पयाः। सदा तोयापेया जयति करतोयाघ विलया ॥२८॥ मग भार्गव क्षेत्रांत। येती पथ आक्रमित। भार्गवाची स्तुती करित। ती यतार्थश्रवण करा ॥२९॥ भार्गवी बाहुदा योगे। भार्गवं क्षेत्र मुत्तमम्। वरीवर्तिक्षितौयत्र तत्रेश्वर गदाधरौ ॥३०॥ परि पिपालयिषुर्ज गतस्थितीं। महति यत्रतुशेषधरे स्थितिं। हरिरजोव्यकरोत्तत आहृता। सरिदसो भृगुणाप्यघभी ह्यता ॥३१॥ स्वमातृहत्या कलुषाश्रयाश। दंदह्यमानो भृगुनंदनो भूत। रामः प्रशांतो लघयिष्यतात्र। भुवो भरंते नवलंचलब्धं ॥३२॥ प्रविष्ट मात्रस्य नरस्यतीर्थं। दंदह्यमानानि महांत्यघानि। प्रयातिनाशं जय तिष्टवंद्यं। श्रीभार्गव क्षेत्र मिहान वद्यं ॥३३॥ पुढें श्रीरंग दर्शन करुन। स्वामी निघाले जाण। श्रीशैलमल्लिकार्जुन। ज्योतिर्लिंग पहाती ॥३४॥ तेथूनि व्यंकटगिरीसी। येऊनि नमिती श्रीव्यंकटेशासी। स्तुती करिती परियेसी। ती ऐका भाविकहो ॥३५॥ व्येंह्मव्ययं पाप वाच्यमे तत्कटतिवेंकटः। कटते र्नार्श नार्थत्वात्पपहा वेंकटेश्वरः। ।३६॥ परिपिपालयी षुर्जगत स्थितीं। यउच कारह शेषधरे स्थितिं। द्रुतविलंबित गेन मयाक्षितः। सखलुवेंकट ईश्वर ईक्षितः ॥३७॥ येणेपरी ती स्तुती। करुनि शिवकांची पाहती। तेथेंही स्तोत्र गाती। तें पुढती कथियेलें ॥३८॥ जंबुद्वीपे भारताख्येत्र वर्षे। हर्षेणास्थाद्याभागे व्यमर्षे। प्रत्यक्ष श्रीकालहस्तीश संज्ञः। शंभुर्यत्रा गोपिकैलास संज्ञः ॥३९॥ सुवर्ण मुख्यासरितो विदूरे। प्रासाद आस्ते सतियाम्यतीरे। न गोपित द्दक्षिण तोस्त्यदूरे।

यास्मिन्निवासोस्ति सदास्मरारे ॥४० ॥ यया गौरी शतेधामक्ष्माधरे शिव राजते। राजते तद्व दत्रापि राजते देव राजते ॥४१ ॥ कैलास शैलादव तीर्थभक्ति। प्रियोत्रयोस्थात्सगणः सशक्ति। यः काल हस्तींद्र हरिः पाया। छ्री काल हस्तीश्वर अश्व पायात् ॥४२ ॥ येत्क्षेत्र दृष्ट्यापिन रस्य तापाः। सद्योविनश्यं त्यखिलाः सपापः। यःकाल हस्तीं० ॥४३ ॥ दुर्दैवदैन्या द्यखिलं प्रकामं। निवार्ययः पूर यतिस्वकामं। यः काल हस्तीं० ॥४४ ॥ जागर्ति यो भक्त हिताय नित्यं। वरंच भक्ताय ददाति नित्यं। यःकाल हस्तीं० ॥४५ ॥ महिमेद गिहास्य सो भव। स्त्वमजा जावरणां त को भव। भव शंकर किंकरार्तिहन्। ह्रदिमे तिष्ठ सदा स्वजुर्तिहन् ॥४६ ॥ कांचीपुरी महंमन्ये कांचिदे कांदिवि भोकलां। विकला अपिय द्योगात्सकलात्मत्वमा भजन् ॥४७ ॥ कांची यथा हि वस्त्रोर्ध्वयुवते राजतेकटौ। कांची तथाब्धि वस्त्राया वस्त्रं प्रांते विराजते ॥४८ ॥ पंचमी मुक्त पुर्येषा पंचमी योग भूखि। पंचता तस्यन पुनः पंचतात्रास्य जन्मिनः ॥४९ ॥ शिव विष्णूपुरी कांची कांचि च्चित्तां हरेन्न किं। नकिंचिदपियदृष्ट्या पापंतिष्ठति देहिनाम् ॥५० ॥ वाराणसी ह्यदक्काशी पापराशी विनाशिनी। तथा दक्षिण काशीयं मुक्तिद्वारनपावृता ॥५१ ॥ अतिवेगवती यमवाच्यां। वेगवती सरिदत्रहिकांच्यां। सति वेगवती गुरुगीता। वेग वदतीं चिद्मात्मनि कुर्यात् ॥५२ ॥ एकाम्र केशा भिधभूमिलिंगं। काम्यक्ष्यभीष्टार्थ दमात्मलिंगं। सपद्य विद्या वरणं निरस्य। प्रदर्शयत्वात्मनिमे चिरस्या। वरदरा खरावित दुर्हृदं। वरदराज मुपाश्रित सद्धृदं। वरदरारिकरं प्रणमाम्यजं। वरदरांत करं तमधोक्षजं ॥५३ ॥ परिहृतं विनतातिर्वारित स्वीयजूर्ति। भुंवन

रुचिर मूर्तिर्भक्त कामप्रपूर्ति। जयति वरद राजो भक्त चित्तानुवर्ती। निजभजक पतिर्दिङ्‌ मालिनी यस्य कितीः॥५४॥ शिवविष्णू कांचीपुरी। मोक्षदाइनी बरी। पाहुनी वेद गिरीवरी। पक्षीतीर्था पातले॥५५॥ यत्रशंखाभिदं तीर्थं यंत्रवेद गिरिर्महान्। भक्त वत्सल ईशश्च पक्षितीर्थं तदुत्तमं॥५६॥ विधेःसुतौ शंभुशापाद्विधेः कंकत्वमे त्यतौ। भक्त दत्तं गृण्हतों भोभक्त मन्वह मत्रहि॥५७॥ प्रांशुवेद गिरेः शीर्षेनिषेव्य ब्रह्मचर्यतः। शिवमात्मानमिवयः पश्येत्सगति मान्पुयात्॥५८॥ तेथूनिया पिनकिनी नदीतीरा लागीं येऊनी। अरुणाचलेश्वरा वंदुनी। स्तुती करिती तेधवां॥५९॥ कांच्या अवाच्या मघह्रत्धुनी यास्तिपयस्विनी। वाराहि दक्षिणाचापि पुना त्स्त्वस्माप्निना किनी॥६०॥ काश्यांमुक्तिर्मरणा दरुणाख्यस्या चलस्यतु स्मरणात्। अरुणाचलेश संज्ञं तेजोलिंगं स्मरेत्तदा मरणात्॥६१॥ द्विधेह संभूय धुनी पिनाकिनी। द्विधेव रौद्रीहितनुः पिनाकिनी। द्विधा तनोरुत्तर तोपिचैको। यस्या प्रवाहः प्रववाह लोकः॥६२॥ प्राहोत्तरांतत्र पिनाकिनीयां। स्वतीर गां संव सथान्पुनानी॥६२॥ अस्याः परो दक्षिणतः प्रवाहो। नाना नदी युक्प्रववाह सेयं। लोकस्तुतायाम्य पिनाकिनीती। स्वयंहिया सागर माविवेश॥६४॥ मनाक्सा धनार्ति विनापापहंत्री। पुनाना पिनाना जनाघाधिहत्री। अनायास तोया पिना क्यात्पिदात्री। पुनात्व हसोनः पिनाकिन्येवित्री॥६५॥ अरुणा चलतः कांच्या अपिदक्षिण दिक्स्थिता। चिदंबरस्य कावेर्या अप्युदक्थापुर्तुंमां॥६६॥ चैत्री पौर्णिमेस। क्षौर करावयास। पिनाकिनी तीरास। स्वामीराज पातले॥६७॥ परी बुडी मारुन। स्नान करण्याजोगें जाण। जल नसे म्हणून।

विचार करिती मानसीं ॥६८॥ तदा स्वामींस म्हणती विप्र। तुम्हा स्नाना पुर्ताक्षिप्र। खळगाखणितो क्षणमात्र। न लागतां सरिज्जलीं ॥६९॥ आपण क्षौर करावें। स्नान करुनि स्वभावें। उदईक भिक्षेसी सारावें। गमन करावे नंतर ॥७०॥ ऐशा ऐकूनि विप्रवचना। क्षौर करुनिया जाणा। उतरले नदींत स्नाना। तों चमत्कार जाहला ॥७१॥ गंगेस अल्प असतां नीर। अकस्मांत आला पूर। हृदयापर्यंत भरपूर। वाढलें सरिज्जल तेव्हां ॥७२॥ जोंवरी स्वामी स्नानार्थ। उभे असती जलांत। मात्र तावत्काळ पर्यंत। यथास्थित पूर होताचि ॥७३॥ त्यावेळीं स्वामींनीं देख। जो केला असें श्लोक। श्रोते तुम्हीं भाविक। एकाग्र चित्तें तो ऐका ॥७४॥ याधिमास वशाचौत्र्यां कृत क्षौरस्य मेल्पका। स्नापनाय क्षणात् वृद्धा सात्धासेव्या पिनाकिनी ॥७५॥ तेथूनि निघाले स्वामी। चिदंबर क्षेत्रधामी। स्तुती करिती निष्कामी। श्रीचिदंबराची ॥७६॥ चिदंबरस्य चिंतानो जाड्यं हृत्वाव्यदर्शयत्। सर्व व्यापक तांतच्च चिंतनीयं चिदंबरं ॥७७॥ उदयास्त मया भावात्सति चित्स्वा प्रभाद्वया। अंबराभां सुखातच्च चिंतनीयं चिदंबरं ॥७८॥ पायादंवर लिंगं नोय चिदंबर नामकं। शेषशाई प्रभृति पुंदोषहारिसुरावृतं ॥७९॥ सुखं नित्यं निरुत्कर्षं भूमैव निरुपाधिकं। स्वरुप मेवयतच्च चिंतनीयं चिंदबरं ॥८०॥ कावेरी निम्नगा वारिल हरी पाप हारिणी। तारिणी पापिनामे नां भजेहं पाप हारिणीरीं ॥८१॥ स्वसा कृष्णा नद्या स्त्रि जगद न वद्या मित गुण। स्वसाराद्या वद्या मखिलमल पद्यामति घृणा। नृणां गोप्त्र्या छाद्यादरम् मृतपद्यां हितकरीं। व्यधात्सा कावेरी सरिदवतुनः पुण्य लहरी ॥८२॥

उदी चीस्थागंगापृथुतर तरंगातिकपटा। न्भटान्याम्या नुच्चैदरकर गिराया यतिहि। इयं कावेरी तुप्रसभ मपितानं तिकगता। न्निवर्त्य स्वर्लोकं नयति निजलोकं श्रुतिमता ॥८३॥ अतोजल्पं जल्पं सरिदमृत कल्पं तवयश। स्तटे भ्रामं भ्रामं तवखलु निकामं शुचियशः। मुदा मजां मज्जं तव पयसि जन्माद्यक हरं। सदा स्मारं स्मारं तव भवह माहात्म्यम वरं ॥८४॥ अये कावेरी त्वत्तट समटनादेव मनिशं। नये कालंमेलं तव किल जलं पुण्य धुनिशं। तटेश्वेतारण्य प्रभृतिवर काशी सदृषणम्। महाक्षेत्राण्यन्या न्यपितव जयंत्याधिविलये ॥८५॥ कावेरी सिंधो ननुदीन बंधो। कारुण्य सिंधो भवघोर सिंधोः। मांतार यत्वं पतितो ग्रतस्ते। नचाप्यु पेक्षार्हति साध्विनस्ते ॥८६॥ पतितो द्धरणाय साध्विचे दवतार स्तव भूतले नचेत्। पतितंहि समुद्धरिष्यसि। स्वजनुस्त्वं विफलं करिष्यसि ॥८७॥ कृच्छ्रादिकव्रत मिहा चरणीय मग्रे। नेष्येथसद्गतिमिति छ्वसंचे तदग्रे। वच्मि प्रसह्य खलु सह्य सुते पुनासि। त्वंसद्य इत्यृषि वचो विमत्तं करोषि ॥८८॥ दीक्षागृहीता जगरी गरीयसी। यद्रोधसि श्रीगुरुणा रुणांभसा। कायाध वायापि विदर्पिता स्तुवत्। कावेरि कांता खलु वासुदेव सन् ॥८९॥ या चिदंबर क्षेत्रीं। विप्रएक षट्शास्त्री। नांदत असे सस्त्री। स्वामीप्रती नमस्कारी ॥९०॥ व्युत्पत्तीचा अभिमान। तदंगीं वसे परिपूर्ण। स्वामी वदती तया जाण। येणें ईशप्राप्ती नोहे ॥९१॥ इहा मूत्रफल विराग। नोहे व्युत्पत्ती बळें चांग। अंतरंग भक्ती अव्यंग। असतां श्रीरंग लाभतो ॥९२॥ जो लीन सर्वांभूती। तया भगवंताची प्राप्ती। एरवीं काय थोडे असती। नरवेद शास्त्रज्ञ ॥९३॥ ते अभिमान

भारवाही। वागविती ओझे खरही। आत्मज्ञाला पाहीं। न गमती सूज्ञाते ॥९४॥ सामान्य भाविक जन देवा घेती वश करुन। जया पोटी अभिमान। त्याईश प्राप्ती दुर्लभ ॥९५॥ कृष्णा गंगा संगमीं। भाव ठेऊन अंतर्यामीं। श्रीगुरु चरित्र वाचीकामीं। किंवा श्रवण करी जो ॥९६॥ त्यानिश्चये श्रीदृष्टांत। होय पूर्ण मनोरथ। भावेचि कार्य सिद्धी होत। परी अभिमान्या भाव कैचा ॥९७॥ असो चिदंबर दर्शन। करुनि श्वेतारण्यांतून। अस्ता चलावरुन। क्षेत्र उदया चल पाहती ॥९८॥ मग येती कुंभकोणी। क्वचित्काळ वास करुनी। श्रीरंगनाथा वंदुनी। जंबुकेश्वरा पातले ॥९९॥ मधुरा मीनाक्षी। दर्शन करुनी नवग्रहासी। तेथूनि येती परियेसी। सेतु बंध रामेश्वरीं ॥१००॥ धनुष्यतीर्थ अनुपम। जेथें समुद्र संगम। स्नान करुनि मुक्काम करिती एक रात्र तेथें ॥१०१॥ त्रिदिन रामेश्वरीं। वास करिती तितुक्या अवसरीं। तंजावराहूनि सत्वरीं। भक्त तेथें पातलें ॥१०२॥ कर संपूट जोडून। स्वामीसविनविती जाण। तंजावरीं चातुर्मास पूर्ण। व्हावा ऐंसें वाटतें ॥१०३॥ त्यांच्या वचना मान देती। एकूणतीस योजनें मिती। तंजावर असतां येती। बारावे दिवशीं त्या नगरीं ॥१०४॥ विमलांबादेवीचें। मंदीर पाहुनी स्वामींचे। मन रमले साचें। चातुर्मास वास करिती ॥१०५॥ अठराशे एकोणतीस। सालीं हा चातुर्मास। झाला कावेरी तटास। अत्यानंदें स्वामीच्या ॥१०६॥ त्यांची पाहूनि विद्वत्ता। तपस्तेज निरभिमानिता। जन म्हणती तत्वतां। अवतारी पुरुष वाटतें ॥१०७॥ एरवीं ऐंसें नियम।

आश्रमोचित कर्म। होणें दुर्लभ परम। ऐसें मनीं भाविती ॥१०८॥ या तंजावरांत। उमरेड ग्रामस्थ। खेडवाळ द्विज येत। दर्शनार्थ स्वामींच्या ॥१०९॥ नामदेव शंकर त्रिवाडी। स्वामीपुढें हस्त जोडी। नमस्कारी घडोघडी। विनये विनंती करीतसें ॥११०॥ म्हणे बंधूसी दुःसंगती। लागली असे निश्चिती। धनव्यय भलतें रिती। आजवरी करीतसे ॥१११॥ नानापरी समजाविलें। परी तो न ऐके भले। कृपेनें ताळ्यावरी आणिलें। पाहिजे तया स्वामिनीं ॥११२॥ स्वामीं यंत्र लिहूनि देती। पूजाया भावें सांगती। सुबुद्धि उपजेल चित्तीं। खंती न करी मानसी ॥११३॥ तेणें परी तो आचरितां। भक्ती उपजली त्याचें चित्तां। दुःसंग सोडूनि सर्वथा। भक्त झाला स्वामींचा ॥११४॥ दर्शनार्थ येती जे जन। त्यांची सेवाकरी जाण। सत्संगतीचें महिमान। फळलें तया तत्वतां ॥११५॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृते। गोपाळबुवा विरचिते। षट्त्रिंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेवदत्त॥

* * *

## ॥ अध्याय सदतिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ सद्गुरु माऊली दयाळ। शिष्याची धरुनी कळकळ। ज्ञानामृत पाजूनि विमळ। अचलधाम देतसें ॥१॥ तंजावरी अवधूत। नामें एक भाविक भक्त। आग्रहे स्वामीस म्हणत। भिक्षा करा मद्‌गृहीं ॥२॥ चातुर्मास होतां समाप्त। सत्य मंगल स्थानाप्रत। दोन दिवस राहूनि तेथ। कोटीलिंग क्षेत्रीं पातलें ॥३॥ कावेरी तटीं ईरोड ग्राम। तत्समीप क्षेत्र उत्तम। श्रीरंगपट्टण नाम। विष्णू स्थान शेषशाई ॥४॥ श्रुंगेरी मठाधिपती शिवाभिनव नृसिंह भारती। ईरोडग्रामीं स्वामी प्रती। अश्विन वद्य त्रयोदशीस भेटले ॥५॥ महाराजांस शंकराचार्य। म्हणती तुम्हीं वंदनीय। तुम्हां समान न होय। अन्य नरधर्मा चरणीं ॥६॥ आपुलें नामाभिधान। बहुमुखें केले श्रवण। परिसाक्षाद्दर्शन। आम्हां आज जाहलें ॥७॥ आपण असा सिद्ध पुरुष। अटण करितां अहिर्निश। सनातन धर्मोपदेश। शिक्षण द्यावे जनासी ॥८॥ येणें परी आचार्य वचन। स्वामींनीं मान्य करून। त्यांची स्तुती केली जाण। तैशीच शारदा अंबेची ॥९॥ ती श्रोत्यास्तव सांग। येथें लिहिली असे चांग। सरस्वति अनुराग। श्रवण पठणें होईल ॥१०॥ भद्रया राज तेवीच्या तुंगया सहभद्रया। तुंगभद्रा धुनी सामां तुंगभद्रा श्रयं क्रियात् ॥११॥ तत्तीरे शारदापीठं ततो गुरु परंपरा। अस्माकं तदधिष्ठात्रीं शारदांबा मुदा नुमः ॥१२॥ हृद्वक्षः स्थित विद्रुमाधिक मदात्री शस्यया स्फुर्तिदा। माला पुस्तक पद्म भृच्च वरदाया सर्व भाषास्पदा। या शंख स्फटिकर्क्षनाथ विशदासा शारदा सर्वदा। प्रीता

तिष्ठतु मन्मुखे सु वरदा वाग्जा डयदा सर्वदा ॥१३॥ यस्या स्त्रीणिगुहागता निहिपदा नेकंत्व ने केडितं। स्तोतुं तानिम मेडितां वुधकुलं जातंतरां व्रीडितं। ब्रह्माद्या अपिदेवता नहि विदुर्यस्याः परं क्रीडितं। प्रारब्धात्रनुतिर्मये वरुरुणा शार्दूल विक्रीडितं ॥१४॥ यद्धस्ते कमलंच तत्र कमलालीला विहारी हरि स्तस्याः सन्निकटेस्य नाभिकमले स्याल्लोक मूले विधिः। वेदा भेदभिदो मुखेषुच विधेर्येस्व प्रमाणा नृणां। तेभ्यो यज्ञ विधिस्ततो मरगणा जीवंतिसा पातुमां ॥१५॥ अयिसर्वगुहा स्थिते जिते। मयिते पांग दृगस्तु पूजिते। त्वदृते नहि वागधीश्वरी। व्यवहारो पिपरा वरेश्वरी ॥१६॥ त्रिषष्ठि वर्णा शुग युक्पराया। भूत्वाथपश्यं त्यभिधाथमध्या। स्थान प्रयत्नादि वशान्मुखेच। या वैखरीति प्रणमामितांत्वां ॥१७॥ नमो नमस्तेस्तु महा सरस्वति। प्रसीद मात र्जगतो महस्वति। परेशिवा ग्वादिनि देवि भास्वति। प्रकाशके तेस्तु नमोयशस्वति ॥१८॥ त्वं ब्रह्मयो निरपरा शारदेसि परावरा। स्वभक्त चित्त सदने प्रसीद मति चेतने ॥१९॥ सरस्वति स्तुति मिमां वासुदेव सरस्वति। व्यधाद्य मनुज ग्राह नरसिंह सरस्वती ॥२०॥ शास्त्रयोन्य खिल वाग्वि शारदा। शारदाब्ज वदनाहि शारदा। यातदीय वरपीठ भाग्गुरु। प्रार्थनाय मम गीर तोद्धता ॥२१॥ श्रीसच्चिदानंद नृसिंह भारती। संप्रार्थनार्थापि ममाल्प भारती। दत्त पसादेन समेधिता द्रुतं। भवत्वतो भात्यपिसत्य तद्रुतं ॥२२॥ आरती :- देव शिवाभिनव श्रीसच्चित्स्वानंद। नृसिंहभारति यतिवर जय भूमानंद।धृ०॥ भवतो नवमे वर्षे हर्षेण विरक्तः। परिव्राज्यं व्रत्वाचार्यां घ्रप नुरक्तः। प्राक्संसार वशाद्यो भूच्छिव गुरु भक्त। स्त्यक्ता सुरभावो भूच्छ्रवणाद्या सक्तः ॥१॥ नृणां जीवानां सिबंधंहत्वायः। भायांस्वानु

भवे भूत्निरतोगयमायः। ख्यातो नृसिंह भारत्य भिदोपिनृकायः। यति सार्वभौमपीठारुढो स्मृत कायः ॥२ ॥ यो लोक संग्रहार्थ स्वाश्रम कर्म जप। प्रवचन शौचेंद्रिय निग्रह शमसत्य तपः। आश्रित आस्ते शस्ते प्राक्शंकर पीठे। यति वासुदेव नमितो जयति समस्करिपः ॥३ ॥ परंपरया भवच्छात्र पदवीं प्राप्तस्य भवतां कृपात्र भूतस्येयं बालोक्तिर्भवच्चरण न लिनेषु सुतरां समुल्ल सत्व भिवादनंच ॥२३ ॥ आतां आचार्यांनीं। श्लोक पाठविले लिहूनि। ते श्रोत्यांलागूनि। कथितों ऐका एक चित्तें ॥२४ ॥ श्लोक - त्वांच्छाधिकेष्ट फलदान निबद्ध दीक्षा। वाकू चातुरी विधुत्त केलि कुलाभिमाना। वागीश विष्णु भवपूजित पादपद्मा। वाक्जा यदास्तु भवतां वचसां सवित्री ॥१ ॥ शृंगाद्रिवास निरता वर तुंगभद्रा। तीर प्रचार रसिका कलिकल्मषघ्नी। कीलाल जात भवमोद सुखाब्धिराका। वाक्जायदा॰ ॥२ ॥ कल्याण शैलघनुषः सहजा कृपाब्धि। हस्तांबुजात्त कज पुस्तक कीर माला। पप्रोद्भवादि मवृषाळिरुपात्त देहा। वाक्जायदा॰ ॥३ ॥ वैराग्यदान निरतान तमस्करीशा। भोगिंद्र गर्व विनिवारण दक्षवेणी। आन्मायशीर्षततिगेय निजाप दाना। वाक्जा यदा॰ ॥४ ॥ आर्या :- स्वात्मानंद निमग्न स्वांतां प्रकरोतु संततं कृपया। यदुनंदन सुखवाणीं वाणी वीणा लसत्करां भोजा ॥५ ॥ (यदुनंदनवासुदेव = आनंदवाणी = सरस्वति,) " ठाईं ठाईं स्तुती केली। स्वामींनीं तीर्थक्षेत्र स्थळीं। श्रोतें हो आतां श्रवण केली। पुढील कथा अवधारा ॥२५ ॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। सप्तत्रिंशोध्याय गोड हा ॥ श्रीकृष्णार्पण मस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥

## ।। अध्याय अडतिसावा ।।

।। श्रीगणेशाय नमः ।। श्री गुरुभ्यो नमः ।। अनुग्रह नसे श्रीगुरुचा। तरी व्यर्थ जन्म नराचा। अत एव श्रीगुरु प्राप्तीचा। प्रयत्न पुरुषे करावा ।।१ ।। असो स्वामी महाराजासी। सत्य मंगलस्थानासी। श्रीदत्तदृष्टांतीं परियेसी। आज्ञापिती अवधारा ।।२ ।। ग्रामों ग्रामीं पुढें येथून। मारिका आजार दारुण। यास्तव कावेरीतटीं जाण। र रहावें काळ क्रमित ।।३ ।। अश्विन वद्य अमावास्येसी। श्रीसांगती स्वामीसी। ती आज्ञा मानूनि परियेसी। कावेरी तीरा हाती ।।४ ।। मग भवानी कावेरी संगमीं। चामराज पुराहूनि स्वामी। आले भवानी नामक ग्रामीं। कार्तिक शुद्ध एकादशीस ।।५ ।। आचार्यांनीं जें कथिलें। स्वामी लागीं वाहिलें। धर्म शिक्षण पाहिजें दिलें। तुम्हां सम सत्पुरुषांनीं ।।६ ।। तेव्हां पासूनि विशेष। स्वामी करिती उपदेश। धर्माविरुद्ध आचार त्यास। समीप येऊं न देती ।।७ ।। समयीं क्रोधही दाविती। भाविक अंतरीं जाणती। पुत्र वात्सल्य माते चित्तीं। असेत त्कल्याणार्थ ।।८ ।। परी जे असती निंदक। ते म्हणती स्वामी दांभिक। क्रोधी असूनिया देख। साधू म्हणवी आपणां ।।९ ।। जन सत्य वर्म नेणती। म्हणूनीच ऐसें म्हणती। स्वहित सोडूनि निश्चिती। परहितार्थ झटे जो ।।१० ।। तो जरी क्रोधी म्हणावा। तरी महर्षीनीं देवा दानवा। क्रोधे करुनि शाप द्यावा। हें तयांना अनुचीत ।।११ ।। त्यांच्या शीला लागीं बट्टा। लागला असें तो करंटा। महापापी तो आपुला तोटा। आपणचि करीतसें ।।१२ ।। त्यांनीं जे शाप दिलें। ते परहितार्थ भले। तो शाप नव्हती शिक्षण

दिलें। मूढजन हितार्थ ॥१३॥ कोणा लक्ष्मी अभिमान। होतां त्यांना शापून। सर्वांभूतीं केलें लीन। हे अकल्याण कैचें म्हणावें ॥१४॥ परपीडक राक्षस। त्यां शाप देऊनी विशेष। पूर्ण परोपकारीं खास। केलें शाप काय हा ॥१५॥ कोणी महापातकी। जातसें घोर नरकीं। शाप देऊनि एकाएकीं। तयासी उद्धरिलें ॥१६॥ ऐशिया क्रोधी म्हणेल। तो स्वहित अंतरेल। अकल्याण होईल। यांत काय विचारावें ॥१७॥ संतातें नसे स्वार्थ। ते जगद्धोरार्थ। असती स्वच्छंदें विचरत। ब्रह्मानंदीं निमग्नते ॥१८॥ स्वयें भोगूनि स्वानंद। अन्या द्यावया तत्स्वाद। साम, दाम, दंड, भेद। उपायातें योजिती ॥१९॥ त्यांचें हृदय कोमल। निर्मळ जेवीं गंगा जल। परी मूढ जनां केवळ। विपरीत भासते ॥२०॥ यास्तव विचार पूर्ता करणें। सत्संगा आदरणें। येर झारा चुकविणें। जन्म मरणांच्या ॥२१॥ असो गुंटूर जिल्हयांत ग्राम। अमरावती ज्याचें नाम। तेथें येऊन मुक्काम। करुनि एकदिन क्रमिती ॥२२॥ तेथ लक्ष्मण शास्त्री नामक। भक्त पातलासें एक। कर संपुट जोडूनि देख। विनवीतसें स्वामीसी ॥२३॥ म्हणे पुत्राच्या नासिकें माजी जाण। उद्भवलासें एक व्रण। त्याच विकारें कन्याही त्रासून। गेलीसें दीन होऊनि ॥२४॥ स्वामी राज उपाय सांगती। तरी बरवें होईल निश्चिती। ऐसें वाटतें माझे चित्तीं। तरी स्वामींनीं कृपा करावी ॥२५॥ त्या पुत्र कन्येच्या रोगातें। नष्ट कराया वाकेरीचें भाते। योजूनियां देती स्वहस्तें। म्हणती उगाळुनी लावावें ॥२६॥ तेणेंपरी तो उपाय करतां। पुत्र कन्येची काया तत्वतां। आरोग्य पावली पाहुनी चित्ता। आनंद झाला तयाच्या ॥२७॥ नंतर अमरावतीहूनि।

स्वामी आले सिद्धभुवनीं। नेल्लर नगरीं समाधी स्थानीं। सदाशिवेंद्र परमहंस ।।२८ ।। दर्शन करुनि क्वचित्काळ। राहिले तों श्रीवाडीत तयेवेळ। मारिका आजारें कल्लोळ। मांडिला जन घाबरलें ।।२९ ।। तत्शमनार्थ पूजारी। स्वामींस पत्र झडकरी। लिहून कळविती नेल्लुरीं। पाहूनि प्रार्थिती श्रीदत्ताते ।।३० ।। म्हणती बालकांचें रक्षण। व्हावयासी उपाय कवण। कथितां लिहून कळवीन। श्रीच्या आज्ञेनुसार ।।३१ ।। तै स्वामीस दृष्टांतीं श्रीदत्त। म्हणती नको पडूं मध्यस्थ। कर्मानुसार यथार्थ। भोग भोगणें जनांसी ।।३२ ।। त्यांनीं समजावें म्हणून। बहुत वेळां तुज कडून। त्यांना आज्ञापिलें जाण। परीते नायकती ।।३३ ।। म्हणून मी हा योग्य उपाव। योजिलासें यास्तव। तुज कां वाटे कींव। अशा खल जनांची ।।३४ ।। यापरीश्रीचें वचन। स्वामीं दृषांतीं जाणून। श्रीवाडीस पत्र लिहून। पूजाऱ्यांस कळविती ।।३५ ।। श्रीचा कोप तुम्हांवर। झाला असें निर्धार। तरी करणें स्थलांतर। सदाचरणें वागावें ।।३६ ।। तरीच तुमचें होय कल्याण। ऐंसे कळवुनिया जाण। मार्गक्रमित आपण। आले कृष्णा तटाकीं ।।३७ ।। श्रीशैल्य पर्वत यात्रा। तत्समीपची पवित्र। मुक्तेश्वर नामक क्षेत्र। पाहूनि वास करिती ।।३८ ।। शके अठराशेंतीस। सालीं या स्थळास। चातुर्मास करुनि वास। पूर्ण केला या स्थळीं ।।३९ ।। हा राजधानी ग्राम। तैलंगी विप्रगृहें उत्तम। असती धार्मिक परम। भाषा तैलंगी द्राविडी ।।४० ।। संस्कृत भाषा भिज्ञ। विप्रस्त्रियाहि प्राज्ञ। कर्मिष्ठ चतुर आणि सूज्ञ। वसती तेथें घरोघरीं ।।४१ ।। पाहुनी स्वामी तपस्तेज। भजूं लागल्या सहज। म्हणती संत चरण रज। दुर्लभया

संसारीं ॥४२॥ येथें केली कृष्णा स्तुती। ती भाविक श्रोत्यांप्रतीं। श्रवण पठणें निश्चिती। अघ हारिणी होईल ॥४३॥ कृष्णानः पातु तृष्णा हर मधुर रसा चिद्रसा सार साक्षी। साक्षी भूतान तानां निखिल मलहराया हरानंतमूर्तिः। जूर्तिघ्नी भीति निघ्नी सकलहि तरता तारतम्य व्यतीता। तीता वाक् चित्तमार्गं जगति गतिदय त्ख्याती रेषा विशेषा ॥१॥ कृष्णा वेणी सतत तरुणी वीक्षिता मध्य निवृद्योषावेषा सुषमवपुषा भासमाना समाना। माना तीता पिखलु भजतां दृष्यतां यातिमाता। माता पादे रित उपरि परिक्रांति वार्ता मयहि ॥२॥ तव गुण गणं वारंवारं सुधारुचिरं चिरं। भगवति सतिस्मारंस्मारं परंत्व वरं वरं। नलषति मतिः सारं सारं विचार्य परावरं। लषति मइतो दूरं दूरं प्रदर्शयतं परं ॥३॥ कृष्णे कृष्ण तनो मनोहर कथे नाथेश्वरी प्रार्थये। दत्तं दत्तपदं प्रदर्शय परं नातोवरं त्वर्थये। अन्यं योटतिते तटे नट इवा ने कांगधारी हरिः। संसाराररिंदमः शमपरः साक्षाद्य आत्मापरः ॥४॥ प्रत्यक्प्रवाहित स्वह्रुत्सुमहत्सुदेव। उद्यन्स्वयं हरति हार्द तमः सएव। तीरे भ्रमत्यनु दिनं तव भाव गम्य। स्तंदर्श याद्य कृपय प्यूनु पाधिगम्यं ॥५॥ चातुर्मास होतां पूर्ण। स्वामी निघाले तेथून। दृष्टांतीं श्रीदत्त जाण। आज्ञापिती स्वामीसी ॥४४॥ अश्विन वद्य आमावास्या दिनीं। तूळ राशीस विषुव पर्वणीं। कृष्णा सिंधू संगमीं स्नान करुनि। आले असतां महाराज ॥४५॥ दहा कोस मार्ग क्रमितां। श्रीदत्त सांगती दृष्टांता। सप्न गोदावरीकडे जा आतां। तेथूनिया सत्वर ॥४६॥ मान्य करुनि दृष्टांत। येती नागेश क्षेत्रांत। संन्यास मठीं राहूनि तेथ। पेड कल्ला पल्ली ग्रामीं येती ॥४७॥ जिल्हा कृष्णा

मच्छली बंदर। समीप देवी तालुका सुंदर। तया माजीं हा ग्राम साचार। श्रोत्यांस्तव कथियेला ॥४८॥ तया ग्रामीं दोन दिवस। राहूनिया सप्त गोदावरीस। येती श्रीच्या दृष्टांतास। मानूनिया झडकरी ॥४९॥ सप्त गोदावरीचें स्नान। करूनि पुढें करिती गमन। अनेक जनां लागीं दर्शन। देऊनि पावन करिती पैं ॥५०॥ या देशांत संन्याशासीं। जन मानिती बहुवसी। तेणें गमन कराया परियेसी। न होय मना सारिखें ॥५१॥ कार्तिक वद्य षष्ठी दिनीं। स्वामी महाराजां लागुनी। दृष्टांतीं आज्ञापिलें श्रीनीं। तें श्रोते हो श्रवण करा ॥५२॥ काश्मीरचा रस्ता धरून। तिकडें करावें गमन। ऐसा श्रीदृष्टांत ऐकून। प्रार्थना करिती महाराज ॥५३॥ म्हणती कोण जाणार। तेथ कोण नेणार। जिकडे हा देह ठेवणें विचार। असेल तिकडे ठेवावा ॥५४॥ जैसे गंगानुजा तंतुका। आपण नेऊनि ठेविलें देखा। तेणें परी ह्यालाहीं एका। वाटेल तेथें ठेवावें ॥५५॥ ऐसें प्रार्थितां महाराज। पुन्हः चार घटिकेनें श्रीगुरुराज। म्हणती गौड देश तो यास्तव सहज। अनमान करिसी तेथ जाया ॥५६॥ जाती वर्णा श्रमादिक। कोठें राहिलें आतां देख। ऐसा श्रीदृष्टांत चोख। ऐकूनि स्तब्ध राहती ॥॥५७॥ असो पुढें काकिनाडा नगर। तेथूनि कांहीं सेंदूर। देवालय पाहुनी सुंदर। वास करिती क्वचित्काळ ॥५८॥ तयास्थानीं एके दिनीं। बैसले समाधी लावुनी। श्रीवाडींतील पूजारी त्यास्थानीं। स्वामी संन्निध असती पैं ॥५९॥ तों स्वामीं देही दत्त आवेश। होऊनी बोलती पूजाऱ्यांस। अनेक वेळां तुम्हांस आज्ञापिलें असें मी ॥६०॥ याच्या चिद्वारें खास। परी न मानितां आज्ञेस। आतां याला काश्मिरास।

पाठवूनि देतो मीं ॥६१॥ ऐकूनि सकळ पूजारी। विनविती परोपरी। अज्ञ बालकांवरी। कृपा करणें म्हणताती ॥६२॥ श्री आज्ञा जैशी होय। तैसें वागूं हा निश्चय। न होईल अंतराय। सेवें माजीं सद्गुरूच्या ॥६३॥ मग देह स्थितीवरी स्वामी। येती तों तया धामीं। ब्रह्मानंद नामक स्वामी। त्याच्या दर्शनार्थ पातलें ॥६४॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिते। अष्टत्रिंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय एकोणचाळिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्री गुरुभ्यो नमः॥ मागील अध्यायीं निरुपण। ब्रह्मानंदयति जाण। भेटती स्वामी लागून। काकी नाडा नगरांत॥१॥ ते विद्वान प्रेमळ देख। पाहतां सदा हास्यमुख। शोध करिती स्थानें अनेक। स्वामी दर्शन व्हावया॥२॥ गांठ पडली अवचित। बोलती तेव्हां प्रेमयुक्त। येऊनि मत्स्थाना प्रत। स्वामींनीं पावन करावें॥३॥ राजमहेंद्री आचार्य मठांत। श्रीपादुकास्थापणें बेत। केलासें मी निश्चित। तरी कृपा करावी॥४॥ त्यांचें शुद्ध अंतःकरण। आणि आनंदीं स्वभाव पाहूनी। राजमहेंद्रीस जाण। तत्समागमें स्वामी जाती॥५॥ श्रीगुरु दत्त पादुका। तैशाच महाराजांच्या देखा। अठराशें तीस शका। माजीं माघ पौर्णिमेसी॥६॥ सुमुहूर्त पाहून। ब्रह्मानंद यती जाण। प्राण प्रतिष्ठा करून। आचार्य मठांत स्थापिती॥७॥ त्याच दिनीं देवालयीं। आली एक स्त्री लवलाही। पिशाच्च बाधा तिला पाहीं। नाचूं लागे तें समयीं॥८॥ पिशाच्च पीडा परिहारक। मंत्र सांगूनिया देख। बाधा हरिती तेणें अनेक। लोक भजनीं लागलें॥९॥ फाल्गुन मासा पर्यंत। महाराज वास करिती तेथ। निज बंधुसह मार्गक्रमित। निघालें पुढें जावया॥१०॥ आले सत्वर परियेसी। पीठापुरीं पूर्वदेशीं। श्रीदत्तावतार यांच ठायांसी। झाला नरहरी नामक॥११॥ श्रीदर्शन करुनि सत्वर। येती लक्षूनि कृष्णा तीर। क्षौर करावयाचा विचार। ग्राम मार्ग पुसती जना॥१२॥ दाखविणें ग्रामपथ। तो सोडूनि ग्रामस्थ। थट्टा करिती समस्त। म्हणती यती कां झालासी॥१३॥ सोडूनिया

घरदार। कां फिरसी दारोदार। तुझा गांव ठाव साचार। नाम सांग आम्हांसी ॥१४॥ ग्रामस्थांची ऐशी स्थिती। पाहूनि स्वामी विचारिती। उदईक क्षौरकरणें चित्तीं। परी तें निश्चिती न होय ॥१५॥ येऊनिया कृष्णातिरीं क्षौर समय टळेल जरी। तें पुनश्च निर्धारीं। न करीन कधीं ही ॥१६॥ ऐसा संकल्प करुन। कृष्णा तिरातें लक्षून। स्वामी मार्ग क्रमण। करीत आले तटाकीं ॥१७॥ श्रीकृष्णेची करुनि स्तुती। तेथेंचि शयन करिती। निशी समयीं दृष्टांतीं। कृष्णा देवी सांगत ॥१८॥ क्षौराचें सर्व सामान। सिद्ध असें तुजलागीं जाण। गुप्त झाली ऐसें बोलून। स्वामी होती जागृत ॥१९॥ तों आश्चर्य जाहलें। थट्टा करीत होते वहिलें। तेचि ग्रामस्थ पातलें। नापिता सह तेथेंची ॥२०॥ क्षौर सामान घेऊन। म्हणती स्वामींसी नमून। आम्ही आपुली थट्टा जाण। केली अधिकार नेणुनी ॥२१॥ कृष्णा देवीनें ग्रामस्थांसी। देऊनिया दृष्टांतेसी। आज्ञापिलें परियेसी। क्षौर सिद्धतां करावया ॥२२॥ यास्तव सामुग्री सकळ। घेऊनि आले स्वामी-जवळ। एरवी प्रपंचा सक्त केवळ। मंदमती खास तें ॥२३॥ मग स्वामी कृष्णातिरीं। क्षौर सारुनि निर्धारीं। आलें गोदावरी किनारीं। स्तुती करिती तियेची ॥३४॥ वासुदेव महेशात्मा कृष्णावेणीधुनी स्वसा। स्वसाराद्या जनोद्धर्त्रिपुत्री सह्यस्य गौतमी ॥२५॥ सुरर्षि वंद्या भुवनेन वद्या। याद्यात नद्याश्रित दोषहंत्री। देवेनया कृत्रिम गोवधोत्थ। दोषाप्यनुत्यैमुनये प्रदत्ता ॥२६॥ वार्युत्तमंये प्रपिबंतिमर्त्याः। यस्या सकृतेपि भवंतिमर्त्याः। नंदंत्वं उर्ध्वयदौप्लवेन। नरादृढे नेव सवप्लवेन ॥२७॥ आर्या :- दर्शण मात्रेण मुदा गतिदा

गोदावरी वरी वर्ति। समवति भीतिदायद्रोधसि मुक्तिः सती नरीनर्ति ॥२८॥ रम्ये वसता मसता मपियत्तीरे हिसागतीर्भवती। स्वच्छंतरुर्ध्वरेतो योगिमुनीनां हियागतिर्भवती ॥२९॥ तीव्रताप प्रशमनी। सापुनातु महाधुनी। मुनीड्या धर्मजननी। पावनी नोघनाशिनी ॥३०॥ कुवुर नामक ग्राम। गोदातटीं असें उत्तम। स्थळ पावन परम। पाहूनी वास करिती ॥३१॥ तेथें एक गृहस्थ। विद्वान शास्त्री प्रख्यांत। निपूण राजभाषेंत। दर्शनार्थ पातला ॥३२॥ नमूनिया स्वामीसी। म्हणे माझ्या स्नुषेसी। तेणें परी कन्येसी। विकार असे वाताचा ॥३३॥ तत्शमन व्हावया। स्वामी सांगतील उपाया। यास्तव आलो या ठाया। चुकेल अपाय म्हणूनी ॥३४॥ पाहूनि कन्या स्नुषेसी। स्वामी म्हणती तयासी। तुम्हीं जाणतां कीं परियेसी। मनुष्य पिशाच्च संबंध ॥३५॥ या तुमच्या कन्येसी। तेणें परी स्नुषेसी। पिशाच्च पीडा परियेसी। यास्तव ऐशी स्थिती असे ॥३६॥ तेव्हां तो स्वामीस म्हणे। मी कांहीं हा संबंध नेणे। जैसें होईल सांगणें। तेणें परी वागेन ॥३७॥ करुनि औषधोपचार। मी थकलों परी विकार। जाईनाचिसाचार। ऐकूनि स्वामी त्या वदती ॥३८॥ तुम्हां सांगतों उपाय चित्तीं धरुनि भाव। आचरितां श्रीगुरुराव। कृपा करील निश्चयें ॥३९॥ तो वदे जेणें परी। स्वामी सांगतील निर्धारीं। वागेन तेणेंपरी। भाव अंतरीं धरुनी ॥४०॥ मग स्वामीं स्वहस्तें। लिहून देती मंत्रातें। म्हणती या मंत्र जपातें। करितां पीडा हरेल ॥४१॥ त्याच्या आज्ञेनुसार जप आरंभी सत्वर। अल्प काळांत साचार। पिशाच्चें बोलूं लागली ॥४२॥ हें पाहूनि तो गृहस्थ। झाला आश्चर्य चकित। म्हणे मंत्र सिद्धी

निश्चित। फळली आजी वाटतें ॥४३॥ स्वामीपाशीं येऊन। सांगे तें वर्तमान। ते त्या सांगती जाण। पाचारा त्यांना येथेंची ॥४४॥ तो कन्या स्नुषेंसी। आणि सत्वर स्वामी पाशीं। तें पुसती पिशाच्चासी। काय मागणें तुमचें असें ॥४५॥ पिशाच्च वदती स्वामियां। इच्छित पाहिजें खावया। देतां आम्हां या समयां। ठायीं जाऊं आपुल्या ॥४६॥ स्वामी गृहस्था सांगती। यांच्या वासना निश्चिती। पूर्ण करितां तुम्हांप्रती। पुनश्च बाधा न होय ॥४७॥ स्वामी निरोप ऐकून। पिशाच्च भक्ष पूर्ण। देतां पीडा निवारण। झाली तत्काळ पाहती ॥४८॥ हें पाहूनि तो गृहस्थ। झाला आनंदभरित। कन्या स्नुषा नांदत। उत्तम स्थिती माझारी ॥४९॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचितें। नवत्रिंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय चालिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ श्रीगुरुचरित्र चिंतामणी। नितांत सुखाची खाणी। कथानक जो मनीं आणी। तो निर्वाण मुक्तची ॥१॥ कुवूर ग्रामीं श्रीदत्त। देऊनिया दृष्टांत। स्वामीसीं आज्ञापित। काशिमरा जाई म्हणोनी ॥२॥ परीं वाडींतील पूजारी। आग्रह करोनि परोपरी। स्वामीस म्हणती अवधारी। श्रीवाडीस चलावें ॥३॥ अत्याग्रह पाहून। कुवूर ग्रामांहून। ते वाडीपंथा लक्षून। मार्गक्रमण आरंभिती ॥४॥ ग्रामापासूनि कोस। येऊनि करिती मुक्कामास। तों निशीं समयीं विशेष। आश्चर्य वर्तलें तें ऐका ॥५॥ पाय धरलें चालवेना। गमना गमन शक्ती जाणा। खुंटली पाहूनि प्रार्थना। करिती श्रीदत्तात्रयांची ॥६॥ मग श्रीचरणीं अनुष्ठान। करावयास्तव जाण। वाडीतील पूजाऱ्यां लिहून। कळविती तैसें ते करिती ॥७॥ तेणें पायासी आरोग्य। होऊनिया ते गमना योग्य। जाहलें असतां सवेग। तेथूनिया निघालें ॥८॥ मग उत्तर पंथ लक्षून। करिती मार्गक्रमण। अनेक जनां पावन। करिती निजदर्शनें ॥९॥ सरिता जी वाईन गंगा। स्नानें पावन करिती जगा। धरूनिया स्वानुरागा। स्वामी येतीतत्तीरीं ॥१०॥ पवनी नामक क्षेत्र। देखतें झालें पवित्र। परिवारेसी नांदती विप्र। पाहूनि तेथ राहती ॥११॥ अठराशें एकतीस। सालीं चातुर्मास वास। करुनिया स्थळांस। स्वामी पावन करिती पैं ॥१२॥ ग्रामांतील जन। रहावयासी स्थान। न देती यास्तव जाण। आलें बाह्य प्रदेशीं ॥१३॥ मुरलीधराचें देऊळ। पाहुनिया निर्मळ। रहावया योग्य स्थळ। वास करिती

तेथेंची ॥१४॥ भिक्षेस्तव ग्रामीं जातां। समयीं न मिळें अव्यवस्था। न कळे स्वामी कदर ग्रामस्थां। उन्मत्तपणें वर्तती ॥१५॥ नेणूनि यती अधिकार। निंदा करिती साचार। परी जे असंख्य नारीनर। स्वामी दर्शना पातलें ॥१६॥ भावें करिती सद्गुरु पूजा। इष्ट हेतू सिद्धी काजा। संतर्पणीं अमित द्विजा। आनंद होऊं लागला ॥१७॥ कोणी सांगती पुराण। कोणी कीर्तन भजन। कोणी करिती गायन। संपादण्या स्वामीकृपा ॥१८॥ सोसूनि शारिरीक कष्ट। कोणी करिती पाक इष्ट। धरूनि भाव एकनिष्ट। स्वामींपदाब्ज सेविती ॥१९॥ धन्य धन्य तें जन। यत्कायें सस्तेवन। घडे अहर्निश जाण। पावन त्रीजगीं सत्यतें ॥२०॥ मकरंद सेवनीं भृंग। जेवीं सदारहे दंग। तेवीं श्रीगुरु पद सेवनी गुंग। होऊनि भक्त राहती ॥२१॥ हें पाहूनि ग्रामस्थ। झालें आश्चर्य भरित। संत महिमा अद्भुत। म्हणूनि नमिती स्वामीसी ॥२२॥ तया ग्रामीं विप्र धनिक। स्वामीसी विनयपूर्वक। बोलें दासाकरे देख। सेवाधर्म घड़ावा ॥२३॥ स्वामी म्हणती तयासी। आवश्यकता नसे आम्हांसी। भक्त मंडळी बहुवसी। तत्प्रीत्यर्थ रहावतसे ॥२४॥ ऐसें स्वामी वचन। ऐकूनि मनीं विप्र खिन्न। झालापरी कांहीं दिन। गेल्यावरी पुनश्च ॥२५॥ स्वामी प्रती विनंती। करीतसें एकांती। शब्दही न बोलती। तत्संबंधी विप्रातें ॥२६॥ पुन्हः कांहीं दिन जातां। मध्यस्थ ठेवूनि स्वामी भक्ता। तो प्रार्थना करी तत्वतां। सेवाध्यावया निजकरें।।२७॥ तत्पूर्ण सेवेच्छा पाहून। स्वामी निजभक्ता लागून। म्हणती त्याला सेवा जाण। उदक भरण्या सांगावें ॥२८॥ इतुकें स्वामी वचन। ऐकूनि तो ब्राह्मण। म्हणे आजिचा सुदीन।

संतसेवा घडेल ॥२९॥ पाणी भरावयाचा घडा। गृहीं जरी रेडा गाडा। तरी सत्सेवेचा ओढा। धरुनिया राहिला ॥३०॥ स्वयें घारगीं घेई करी। पुत्रस्नुषेच्याही शिरीं। देऊनिया जलभरी। वाईन गंगेचें तेवेळीं ॥३१॥ सहस्त्र पात्रांपूर्ते। जल भरूनी स्वहस्तें। स्वामी जवळीं आनंदचित्तें। येऊनिया नमस्करी ॥३२॥ म्हणें आतां कृपा करणें। दास वचना साह्य होणें। मत्पुत्रा अनुग्रह देणें। कामना पूर्ण करावी ॥३३॥ मग स्वामी संतोषून। पुत्रा अनुग्रह देऊन। करिते झालें पावन। कृपावलोकनें करूनी ॥३४॥ जरी व्हावा संत प्रसाद। सेवा करणें निर्विवाद। तरीच स्वरुप रस स्वाद। मेवा अगाध प्राप्त होय ॥३५॥ या पवनी क्षेत्र धामीं। स्वामी दर्शन कामीं। विप्रभक्त सत्पथगामीं। वाडीहूनि पातला ॥३६॥ प्रथम तयानें आदरें। स्वामीस पुसिलें पत्रद्वारें। भवद्दर्शन निर्धारें। घ्यावें माझ्या मनीं असें ॥३७॥ स्वामी तया आज्ञापिती। तेथें येतां पुढती। दर्शन घडे तुम्हां प्रती। यास्तव येथें न येणें ॥३८॥ तो आज्ञा न माननि। दर्शनार्थ गेला त्या स्थानीं। तो विषम ज्वरें गांठूनि। आजारी जाहला ॥३९॥ स्वमन आपणां साक्षी। आलें जाणा तल्लक्षीं श्रीगुरुदेव आमुचा पक्षी। परी आज्ञा मोडिली ॥४०॥ तेणेंचि हा ज्वर। आला वाटे निर्धार। स्वामीसी विनवी कर। संपुट जोडूनिया ॥४१॥ म्हणें कृपावलोकन। करणें भक्तावरी जाण। आपुली आज्ञा न मानून। आलों क्षमा करावी ॥४२॥ तया वैद्ये निरोपिलें। ज्वरे तुम्हा गाठिलें। चाळीस दीन वाहिलें। दुःख भोगिलें पाहिजें ॥४३॥ चाळीस दिवस साचार। अंगीं राहिला ज्वर। ऐकूनि विप्र फार। घाबरा होय अंतरीं ॥४४॥ स्वामीस

म्हणे कृपानिधी। मी खास मंदधी। उपजे विपरीत बुद्धी। विनाश काळ येतांची ॥४५॥ म्हणती विप्रां लागूनी। घाबरूं नको मनीं। कां जासी भांबावूनि। श्रीदत्ततीर्थ सेवन करीं ॥४६॥ म्हणूनि स्वहस्ते तया। तीर्थ देती सेवावया। सर्वांगाला लावावया। अंगारा दीधला ॥४७॥ तीर्थ अंगारा सेवन। करितां तत्शरीरा जाण। निशीं समयीं घाम येऊन। आरोग्य संपन्न जाहला ॥४८॥ मग चातुर्मास समाप्ती। होई तों तेथ वस्ती। करी स्वामी आज्ञें निश्चिती। आनंदें काळ क्रमित ॥४९॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचितें। चत्वारिंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय एकेचाळिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ सद्गुरुचा वरद हस्त। ज्याच्या शिरीं पडला यथार्थ। तो वंद्य झाला त्रिभुवनांत। यांत नवल कोणतें ॥१॥ या वाईन गंगातिरीं। स्वामी दर्शना नरनारी। यात्रा मिळाली भारी। कोण गणित करील ॥२॥ महारुद्र लघुरुद्र। अभिषेक करिती भक्तवृंद। गुरुस्वामी चरणार विंद। सेव्य मानूनि ईशापरी ॥३॥ सहस्त्रावरी संतर्पण। नित्य होतसें जाण। ईश्वरीं सामर्थ्या वीण। ऐशा गोष्टी न घडती ॥४॥ अवतारी पुरुषाघरीं। रिद्धीसिद्धी दासीपरी। राबती न पुसे कोणी जरी। सेवा करावया कारणें ॥५॥ जो जना पुढें कर। पसरीतसें निरंतर। तो लक्ष्मीचा किंकर। म्हणती सूज्ञ तयासी ॥६॥ नर करणीं करुन। जो स्वयें झाला नारायण। रमेला त्याचें दास्यत्व जाण। करणें लागे सर्वथा ॥७॥ याचा साक्षांत अनुभव। जना दाविती स्वामीराव। ज्याच्या मनीं भक्तीभाव। त्यासीच हें वर्म कळें ॥८॥ मासद्वय पर्यंत। पक्वान्न भोजन बेत। इतुका खर्च भागूनि तेथ। द्रव्य बहुत उरलेंची ॥९॥ ते वाडींतील जनां। कित्येक पुराणिका जाणा। कीर्तनकार बुवांना। वांटून दिधलें स्वामीनीं ॥१०॥ खण सुवासिनीसी। दक्षिणा वांटिती विप्रांसी। येणें प्रकारें परियेसी। व्यय करिती द्रव्याचा ॥११॥ वाईन गंगा स्तोत्र। स्वामींनीं केलें पवित्र। भाविकास्तव मात्र। लिहिलें असे या ठायीं ॥१२॥

वैन्यार्तिहा भया सिंधुः पातुपाप विनाशिनी। दैन्याधि हा दया सिंधुर्जंतु पाप विनाशिनी ॥१३॥

वैनाख्य भक्ते न समा हृतेयं। वैन्यानदी यद्यश ईशमेयं। ध्येयं महद्भिः कविभिश्चगेयं।

पेयंपयोस्याः प्रपुनातु सेयं ॥१४॥ अयेवैन्येधन्ये सुकृति जनमान्ये जयमहा। रयेज्जन्येदैन्येति ह्लदसी वदान्यत्व मघहा। महाभंगेगंगेवनृ दुरित भंगेह भवती। सतीमत्रोमर्त्योपियद मृतपाने न भवती ॥१५॥ वैनाख्य गंगे जन ताप भंगे। प्रसीदमे देविमहा तरंगे। पुनीहिमां सागसमार्तबंधो। बंधोच्छि देते सरिते नमोस्तु ॥१६॥ वैन्य दैन्ये हते नमोस्तु सरिते वेनाह्लते सन्मते। सर्वं मानसि कंच वाचिक मघं द्राक्कायिकं मेहर। बाह्याभ्यंतर शुद्धिकृत्व मसियत्तन्मेब दुर्वासना। मुन्मूल्यार्पयपाप ताप शमनी श्रीदेवी सद्वासनां ॥१७॥ वेणुवाद नरतांच्यु तांचिता। यापुरी पुरजितापिरंजिता। संती यत्र विबुधा अनेकशः। संती विप्र सदनानी भूरिशः ॥१८॥ तस्यां पद्मावती पुर्णां वैन्यासंज्ञा महाधुनी। मधुनिरा विजयते जयते ज्यो यशः प्रदा ॥१९॥ या परी स्तोत्र करून। चातुर्मास होता पूर्ण। स्वामी निघालें तेथून। आज्ञेनुसार श्रीदत्ताच्या ॥२०॥ वाडी पथ लक्षून। करितां मार्गक्रमण। पाहती मातापूर स्थान। श्रीरेणुका देवीचें ॥२१॥ माहूरगडी जाऊन। करिती श्रीदत्त दर्शन। कयाधु तंटा येऊन। हिंगोली ग्रामीं राहती ॥२२॥ तेथूनिया सत्वरीं। पाहती क्षेत्र पंढरी। माघ मासा माझारीं। श्रीवाडीस पातलें ॥२३॥ स्वामीचें होतां दर्शन। आनंदलें ग्रामस्थ जन। अनेक भक्तजन। आले दर्शन हेतूनें ॥२४॥ विद्वान कामिक भाविक। पारमार्थिक किती एक। एसें भक्त अनेक। स्वामी दर्शना पातलें ॥२५॥ पवनी निवासी गृहस्थ। श्रीवाडीस पाठविती अर्थ। स्वाहाकार प्रीत्यर्थ। खर्चावया कारणें ॥२६॥ त्या द्रव्याचा व्यय। स्वाहाकारा प्रीत्यर्थ होय। दशदीन यथा योग्य। संतर्पण जाहलें ॥२७॥ चैत्र

मासीं उत्सव होत। नारायण स्वामी पुण्यतिथ। ते दिनीं स्वयें अर्थ। कुमार शिक्षेचा सांगती ॥२८॥ हा लहानसा ग्रंथ। कुमार शिक्षणार्थ। स्वामींनी रचिला यथार्थ। कुमार गिरींवरी जाणा ॥२९॥ वृद्ध शिक्षा युवा शिक्षा। स्त्री शिक्षा कुमार शिक्षा। ग्रंथ रचिलें अपेक्षा। किमपी मनीं न धरितां ॥३०॥ केवळ जन कल्याणार्थ। संस्कृत प्राकृत ग्रंथ। स्वामींनी लिहीलें यथार्थ। निजस्वार्थ सोडुनी ॥३१॥ ग्रंथीक ज्वराची सांथ। दिसूं लागतां वाडींत। रुद्राभिषेक करवीत। पुजाऱ्या करवीं श्रीपदीं ॥३२॥ अमळनेरकर बुवा। शिष्यवृंदसवे बरवा। धरूनी मनीं प्रेमभावा। येती श्रीदर्शना त्या स्थळीं ॥३३॥ स्वामीचें करुनि दर्शन। शिष्यांसह भजन। आरंभिलें तो रंग जाण। अपूर्व झाला त्या ठायीं ॥३४॥ त्यांना देऊनिया योग्य मान। श्रीफळ प्रसाद अर्पून। शिष्य वृंदांसही सत्कारून। आनंदविती प्रेमानें ॥३५॥ निपाणी समीप रामतीर्थ। स्थान निवासी श्रीवाडीत। आजरेकर बुवा ख्यात। पातले स्वामी दर्शना ॥३६॥ हें निस्सीम मारुती भक्त। यांचें तेजही अद्भुत। तैसेंची पाहतां सामर्थ्य। विलक्षण असें जाणा ॥३७॥ शापानुग्रह समर्थ। असती हे विख्यात। स्वामीची व त्यांची संगत। बाल्यावस्थे पासुनी ॥३८॥ ऐसें अनेक जन। दर्शनार्थ येती जाण। सत्पुरुषांचें महिमान। किती म्हणून वर्णावें ॥३९॥ वैशाख वद्य बिजेसी। स्वामी वंदुनी श्रीपदासी। सायंकाळ समयासी। मार्गक्रमिती तेथुनी ॥४०॥ कृष्णातिरीं उत्तम। टाकळी नामक ग्राम। पाहुनी करिती मुक्काम। शिष्यांसह ते वेळीं ॥४१॥ तेथूनि पुढें निघालें। घटप्रभातिरीं पातलें। गुर्ल हसूर ग्रामीं आलें। चिदंबर

मठीं राहती ॥४२॥ कैवल्याश्रम नामक। मठींयती नांदे भाविक। शांताश्रम स्वामींचें देख। शिष्य असती हे जाणा ॥४३॥ स्वामीसी सन्मानूनि। म्हणती या मठस्थानीं। कांहीं काळ वास करूनि। पावन करणें आम्हासी ॥४४॥ तद्वचना मानदेती। क्वचित्काळ मठीं राहती। ब्राह्मण संतर्पण मिती। चारशें वरी जाहली ॥४५॥ येथें बाबा गर्दे नामक। विप्र पातलें दर्शना देख। स्वामीवरी रचूनि श्लोक। म्हणती भोजन समयासी ॥४६॥ नित्य होतसें भजन। पुराण कीर्तन श्रवण। स्वामींच्या वास्तव्यें करून। आनंद जनां अंतरीं ॥४७॥ मग तेथूनि निघाले। धारवाड शहरीं आले। श्रीदत्त मंदिरीं राहिलें। एक दिन पर्यंत ॥४८॥ शिष्यां सांगतीं आतां। तुम्हीं येथूनि मागें परता। आज्ञेसी मानूनि तत्वतां। ते माघारें परतलें ॥४९॥ तुंगभद्रा तीरालक्षूनि। स्वामी निघालें तेथूनि। अगडी ग्रामी येऊनी। वास करिती एक रात्र ॥५०॥ पुढें क्रमितां पंथ। तुंगभद्रा तीरीं त्वरित। हावनूर ग्रामीं येत। ब्राह्मण वस्ती पाहुनी ॥५१॥ अठराशें बत्तीस सालीं। चातुर्मास यास्थळीं। निवास करिती सुवेळीं जगद्धोरा यतिराज ॥५२॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचितें। एकचत्वारिंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥ ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु॥

* * *

## ॥ अध्याय बेचाळिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ पुढें वर्तली जी कथा। ती सांगतसें आतां। श्रोते ऐकावी सावचित्ता। श्रीगुरुचरित्र अती गोड ॥१॥ स्वामीनीं तुंगभद्रातिरीं। वस्ती केली हावनुरी। राहिले रम्य मंदिरीं। त्रिपुरांतकेश्वराच्या ॥२॥ तेथें केली ईशस्तुती। ती ऐका एकाग्रचित्तीं। श्रवण पठण जे करिती। शिव त्यांचे होतसें ॥३॥ तापत्रयानें अतितापलों शिवा। विश्रांती कोठें न मिळे उमाधवा। भवाब्धिनावा तव पाद हे हरा। तारी मला तूं त्रिपुरांतकेश्वरा ॥४॥ हा कामरुड्लोभ दवाग्नि पेटला। तच्छांति कर्ता मजला न भेटला। कृपाघना हा निवावी महेश्वरा। तारी० ॥५॥ देवा अहतां ममता पिसाळल्या। ह्या शकिनी डाकिनी अंगि झोंबल्या। हा लोभ वेताळ गिळेल कीं हरा। तारी० ॥६॥ नको नको हा भव जाच साच तूं। विमुक्ति हेतू वर काढि हात तूं। धरूनि माझा सदया परमेश्वरा तारी० ॥७॥ मी पातकी केवळ मंद बुद्धिहा। महामती तूंचि उदार पापहा। माझ्या शिरीं तूं धरि हात शंकरा। तारी० ॥८॥ ग्रामीं भिक्षा करुनि। राहाती एकांत स्थानीं। गोरक्षक मुलांनीं। थट्टा त्यांची आरंभिली ॥९॥ स्वामी करिती उपदेश। ऐकूनि हासती विशेष। तो गुरुपौर्णिमा दिवस। त्याठायीं पातला ॥१०॥ व्यास पूजा शास्त्रोक्त। स्वामी करिती मंत्रोक्त। पाहूनि विप्र समस्त। आश्चर्य चकित जाहलें ॥११॥ म्हणती यती असामान्य। दिसतसें विद्वन्मान्य। भाविकां वदान्य। असें खास हा जाणा ॥१२॥ मग साष्टांगें नमिती। भिक्षेसी आदर करिती। म्हणती आम्हीं मंदमती।

अधिकार नेणो स्वामींचा ॥१३॥ असो निजगुरु वासस्थान। शोधीत होतें भक्तजन। त्यांत गोपाळबुवा जाण। आला तें स्थान जाणुनी ॥१४॥ श्रावण द्विताया इंदुवार। दिनीं पातला सत्वर। श्रीगुरुदर्शनें साचार। आनंदित जाहला ॥१५॥ म्हणें हें एकांत स्थान। बरवें काढिलें शोधून। स्वामीनीं केलें पावन। मजदर्शन देऊनि ॥१६॥ निशीं समयींतो भजन। आरंभीतसें जाण। विप्रपुत्र ग्रामस्थ जन। श्ररणाबैसूं लागलें ॥१७॥ प्रथम द्विज पुत्र भले। तत्सवें भजनीं लागलें। आरती मंत्रपुष्प वाहिलें। करिती भावें स्वामीसीं ॥१८॥ ग्रामस्थ विप्र स्त्रियां। सर्वां प्रसाद वांटाया। पदार्थ ताटीं भरूनिया। सवें आणिती मंदिरीं ॥१९॥ स्वामीही प्रेमें भजन। ऐकती तेणें जन। जमूं लागलें जाण। निशी समयीं मंदिरीं ॥२०॥ तेथें भाषा कानडी। परी भजनाची आवडी। उत्पन्न जाहली गोडी। तेणें वेडावली सर्व ॥२१॥ स्वामी आज्ञा होतां जाण। गोपाळबुवा करी कीर्तन। दिवसें दिवस श्रवण। होऊं लागलें ग्रामस्थां ॥२२॥ तो शोध करीत तेथ। पातलें कांहीं स्वामी भक्त। उत्साह वाढला बहुत। समस्त भजनीं लागलें ॥२३॥ एके दिनीं गोपाळबुवा। स्वामीस म्हणें बरवा। भजन सप्ताह करावा। ऐसें येते मानसीं ॥२४॥ स्वामी जैसें आज्ञापिती। तैसें करीन निश्चिती। ते म्हणती तयाप्रती। येथ सप्ताह न होय ॥२५॥ जरी इच्छा अंतरीं। अहोरात्र भजन करी। श्रीगुरु वाक्य येणेंपरी। मानवलें तयांसी ॥२६॥ ग्रामस्थ द्विजां पाचारून। आरंभिलें भजन। अहोरात्र करूनि जाण। प्रातःकाळीं पूर्ण केलें ॥२७॥ करावया भजन सांगतां। स्वामीसी म्हणे मम चित्ता। ग्रामीं शुक्ल भिक्षा सर्वथा।

करावी ऐसें वाटतें ॥२८॥ ऐसें ऐकूनि भाषण। ते करिती हास्य वदन। ही वार्ता ग्रामीं जाण। कळली सकळ जनांसी ॥२९॥ वाजंत्री जन सत्वर। पातलें तेथ जोडूनि कर। येऊं म्हणती घरोघर। तुम्हां सवें भिक्षेसी ॥३०॥ एवढी विनंती मानावी। आमुच्या हस्तें सेवा घ्यावी। गोपाळनाथें बरवी। भिक्षामग आरंभिली ॥३१॥ इकडे स्वामी विप्रजना। देती आमंत्रण भोजना। आइती करिती जाणा। समस्त भक्त मिळूनि ॥३२॥ दिगंबरा दिगंबरा। श्रीपादवल्लभ दिगंबरा। ऐशिया नाम गजरा। माजीं भिक्षा मागती ॥३३॥ ग्रामस्थ जना आनंद। सामुग्री जमली आगाध। पाक करुनि नानाविध। पंक्ती बैसती भोजना ॥३४॥ संतर्पणाची मिती। पांच शतें झाली ख्याती। सकळ जन तृप्त होती। अन्नप्रसादें करुनि ॥३५॥ रात्रौ होतसें अनुदीन। माध्यान्हीं पर्यंत भजन। मंत्रपुष्प प्रसाद होऊन। मग जन गृहीं जाती ॥३६॥ रात्रीं भजन समयीं। एक ग्रहस्थ आला पाही। स्वामी दर्शन लवलाही। घेईन म्हणे जनासी ॥३७॥ हानगल तालुक्यांत। शेषगीर नामख्यात। तेथूनि हा गृहस्थ। आला असें दर्शना ॥३८॥ सवे विधवा भगिनीसी। घेऊनि आला परियेसी। विनवीतसें स्वामीसी। कृपा करणें म्हणूनि ॥३९॥ सांगे ह्या मद्भगीनीची। आठवर्षां पासूनि साचीं। खुंटली गती चरणाची। कैसींइची स्थिती होय ॥४०॥ स्वामी तियेसी पाहती। कमंडलु जल अंगीं शिंपिती। तो ती होय बोलती। जातो जातो म्हणूनि ॥४१॥ पिशाच्चाचा संचार। होऊनि बोलें सत्वर। पाहती हा चमत्कार। नारीनर समस्त ॥४२॥ तूं कोठील अससी कोण। तयासी विचारिती जन।

त्यांची प्रश्नोंत्तरें देऊन। पिशाच्च स्तब्ध होतसें ॥४३॥ स्वामी म्हणती तयासी। तूं जासी कीं राहसी। ते म्हणतसें यतीसी। सद्गती मिळतां जाईन ॥४४॥ मग पिशाच्चा आज्ञापिती। प्राप्त होईल सद्गती। आतां न राही निश्चिती। झाडासी दे सोडूनि ॥४५॥ आज्ञा मानूनि पिशाच्च। मुक्ती घेईं तेथेंच। बाईचा नष्ट झाला जाच। महिमा संतकृपेचा ॥४६॥ चरण चाली चालत। तीगृहीं गेली त्वरित। कीर्ति वाढली बहुत। जन दर्शना लोटलें ॥४७॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचितें। द्विचत्वारिंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय त्रेचाळिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ श्रीगुरु हा पंचानन। यापुढें भव गजा पुसें कोण। त्याचा पाड कायसा जाण। जनन मरण भय निवारी ॥१॥ चातुर्मास होतां पूर्ण। स्वामीं तुंगभद्रातिरीं जाण। गळग नाथईशस्थान। तेथ जाती भक्तांग्रहे ॥२॥ चिकपा शास्त्रीं प्रेमळ। भक्त वसे देख। स्वामी पदींमनःपूर्वक। भाव असे जयाचा ॥३॥ तेणें शिष्यांसह स्वामीस। भिक्षा केली बहुवस। तुंगभद्रावर्धा संगमास। येती श्रीदत्त दर्शना ॥४॥ पुनश्च हावनूर ग्रामीं। आले जनाग्रहें स्वामी। तूळ राशीस गुरु नामी। योग आला पाहुनी ॥५॥ तुंगभद्रेचें स्नान। शिष्यांसह करुन। विप्रस्त्रियासी खण। वांटिती स्वामी स्वेच्छेनें ॥६॥ रेशमी उपरणी हरिदासा। प्रसाद देती खासा। शिशु असती सहवासा। त्या श्रीफळें आर्पिती ॥७॥ तुंगभद्रा वर्धा संगमी। श्रीदत्त दर्शनें तुष्ट स्वामी। तेथ धावा केलासें नामी। लिहितो भक्ता कारणें ॥८॥ (चाल-पाळण्याची) उद्धरि गुरुराया अनसूया तनया दत्तात्रेया ॥धृ॥ जो अनसूयेच्या भावाला भुलुनी तत्सुत झाला। दत्तात्रेय अशा नामाला मिरवी वंद्य सुरांला। तो तूं मुनिवर्या निजपायां स्मरतां वारिसी माया ॥९॥ जो माहूर पुरीं शयन करी सह्याद्रीच्या शिखरीं। निवसें गंगेचें स्नान करी भिक्षा कोल्हापुरी। स्मरतां दर्शन दे वरिभया तो तूं आगम गेया ॥१०॥ तो तूं वांझेसी सुतदेसी सौभाग्या वाढविसी। मरतां प्रेतासी जीवविसी सद्वर दानादेसी। यास्तव बासुदेव तव पायां धरी त्या तारी सदया ॥११॥ तुंगभद्रेचे स्तोत्र। केलेसें परम पवित्र। श्रवणें

पठणें तिळमात्र। अघनुरें जयाच्या ॥१२॥ तुंगा तुंग तरंग वेग सुभागा गंगा समा निम्नगा। रोगां ताव तुसह्य संज्ञित नगा ज्जतापि पूर्वाब्धीगा। रागाद्यंतर दोष हृद्वर भगा वागादि मार्गातिगा। योगादिष्ट सुसिद्धि दाहत भगा स्वंगा सुवेगा पगा ॥१३॥ स्वसा कृष्णावेणी सरित उतवेणी वसुमणी। प्रभापूत क्षोणी चकित वर वाणी सुसरणी। अशेषाघ श्रेणी सहृद खिल मनोद्धांत तरणी। दृढास्वर्नि: श्रेणिर्जयति धरणी वस्त्ररमणी ॥१४॥ दृढंबध्वाक्षिप्ता भव जल निधौ भद्र विधुता भ्रमच्चिता: त्रस्ता उपगत सुपोता अपिगता: अधोधस्ता न्भ्रांतान्परम कृपया वीक्ष्य तरणी:। स्वयं तुंगा गंगा भवद शुभ भंगाघ हरिणी ॥१५॥ वर्धा समर्धा मिलि तात्र पूर्वतो। भद्रा कुमुद्वत्यपि वारुणित:। तन्मध्य देशेखिल पाप हारिणी। व्यालोकी तुंगा खिल पाप ताप हारिणी ॥१६॥ भद्रया राजते कीर्त्याया तुंगासह भद्रया। संनिधिंसा करोत्वेतं श्रीदत्त लघुसंनिधं ॥१७॥ गंगा स्नानं तुंगा पानं। भीमातीरे स्यानुष्ठानं। लक्ष्मी पुर्याभिक्षादानं। कृष्णातीरे चानुष्ठानं ॥१८॥ सिंहाख्यादौ निद्रास्थानं। सेवायस्य प्रीत्याध्यानं। सद्भक्तायाक्षय्यंदानं। श्रीदत्तस्यास्यास्तुध्यानं ॥१९॥ स्वामीची भजनी प्रीती। प्रेमळ कीर्तनी भक्ती। प्रेमें ऐकत बैसती। अर्चन करिती श्रीदत्ताचें ॥२०॥ येणेंपरी स्तुती। करुनि मार्ग क्रमिती। उदकट्टी ग्रामीं येती। मठीं राहती एक दिन ॥२१॥ तेथूनि राणी बेन्नूर ग्राम। पाहूनि तीन कोसावरी उत्तम। सरस्वती पूजा उत्तम। करूनि श्रृंगेरीस येती ॥२२॥ पक्षवरी तेथ राहून। शिमोगा, शिरसी पाहून। येती क्षेत्र गोकर्ण। महाबळेश्वर प्रख्यांत ॥२३॥ त्या

पश्चिम समुद्र तीरीं। क्रमिती दीन चारीं। शिष्यांसह झडकरी। कृष्णातिरीं पातलें ॥२४॥ मार्गीं दीपावळीसण। तें समयीं स्वामीनीं जाण। पद व अभंग दोन। रचिले असती ते ऐका ॥२५॥ अभंग प्रारंभः - सासुर्वासी बाळी आलिया दिवाळी। गुरु मायेजवळी आली त्रस्त। हंबरडा फोडूनि माये पुढें रडे। म्हणें दुःखीं पडे सासुर्वासी। सासु दुष्ट बुद्धि मोह तो सासरा। याही मज थारा नाहीं दील्हा। तामस अहंकार रागीट भ्रतार। त्यां करवीं मार देती नित्य। कामादिक दीर चावटची क्रूर। याहींदिला मार पदोपदीं। कल्पना जाऊ हे बोटे मोडिताहे। तृष्णा नणंदुली हे टवळी द्वाड। लावालावी करुन सर्वही गांजीती। मज नच देती शांति वस्त्र। मारुनिति तीक्षा बांगड्या वाढविती। ग्रास ही न देती स्वानंदाचा। श्रद्धा भक्ती शेजे कडे दृष्टी देतां। धरूनिया हाता ओढितीहे। कर कर दांत खाती माझेवर। तूंही समाचार नच घेसी। मेले किंवा आहे हेही तुझ्या मनीं। आले न म्हणूनि हो व्याकूळ। आतां तुझें पायीं जीव देते ठार। पुरें येरझार या जन्माची ॥ पद प्रारंभः - गुरु माता सांगतसे ऐक मुली आतां। आला आज दीपवाळी सण बरवा मोठा ॥धृ०॥ लावी अंगी नित्या नित्य वस्तु विवेकाचें। उटणे मग राग मळ जातिल तव तनूचें ॥२६॥ झगझगीतचि हें अमोल्य पाडिन ज्ें शोकी। शांति वसन तूं नेसून शोभसी या लोकीं ॥२७॥ भूतदया आणि क्षमा भूषण लेवून। शोभवी हें आत्मरुप भूषित होऊन ॥२८॥ करीं धरीं हे सोज्वळ मती सोन्याचें ताट। अंतरीं धरी ज्ञानेंद्रिय रत्नदीप थाट ॥२९॥ तीन तनू लिंबलोण उतरूनि त्यजी दूरी। ईश्वर गुरु आत्मबंधु

चिंतुनी अंतरीं ॥३० ॥ घे सोहंभावे ती सोज्वळ आरती। ओवाळी एक भक्तीभावानें निगुती ॥३१ ॥ ओवाळणी घे तूंही दिव्य अमोलिक। कुटस्थ प्रत्यगात्म साक्षिआनलीक ॥३२ ॥ रात्रंदिन जातां येतां निजतां हीं बसतां। अनुभवीं तूं साक्षिपणें संसत त्या आतां ॥३३ ॥ तो आत्मा सच्चित्सुख तुजहुनी नचभिन्न। तूं ही तयांहूनि कधीही नससी हो भिन्न ॥३४ ॥ कृष्णा तिरीं क्षेत्र उत्तम। गलगली नामक ग्राम। स्वामी करिती मुक्काम। दोन महिनें पर्यंत ॥३५ ॥ तेथें सत्संगे जाण। संहितेचे तीन। पव मानाचें सात पूर्ण। विप्र करिती स्वाहाकार ॥३६ ॥ तैसेंच दोन रुद्राचें। स्वाहाकार करिती साचे। ग्रामस्थ विप्रांचें। प्रेम जडलें स्वामी पदीं ॥३७ ॥ वैष्णव विप्र ग्रामस्थ। द्वैत मती प्रख्यात। स्वामीपाशीं आले वादार्थ। अद्वैत मता संबंधी ॥३८ ॥ परी निजमत साचार। व्यक्त करुनि सत्वर। त्यांना केलें निरुत्तर। स्वामीं रायें ते वेळीं ॥३९ ॥ तेथूनि पुढें निघती जैनापुरग्रामीं येती। श्रीदत्त मंदिरीं राहती। तेथें करिती श्रीस्तुती ॥४० ॥ दत्तात्रेयं महात्मानं वरदं भक्त वत्सलम्। प्रपनार्ति हरंवंदे स्मर्तृग्रामी समावतु ॥४१ ॥ दीनबंधुं कृपा सिंधुं सर्व कारणकारणम्। सर्वरक्षा करंवंदे। स्मर्तृ० ॥४२ ॥ शरणागत दीनार्त। परित्राण परायणम्। नारायणं विभुंवंदे। स्मर्तृ० ॥४३ ॥ सर्वानर्थ हरं देवं सर्व मंगल मंगलम्। सर्वक्लेश हरंवंदे। स्मर्तृ० ॥४४ ॥ ब्रह्मण्यं धर्म तत्वज्ञं। भक्त कीर्ति विवर्धनम्। भक्ता भीष्ट प्रदं वंदे। स्मर्तृ० ॥४५ ॥ शोषणं पाप पंकस्य दीपनं ज्ञानतेजसः। ताप प्रशमनं वंदे। स्मर्तृ० ॥४६ ॥ सर्व रोग प्रशमनं। सर्व पीडा निवारणं। आपदुद्धरणं वंदे स्मर्तृ० ॥४७ ॥

जन्म संसार बंधघ्नं स्वरुपानंद दायकम्। निःश्रेयस प्रदंवंदे। स्मर्तृ० ॥४८॥ जयलाभ यशः कामदातुर्दत्त स्यय: स्तवम्। भोगमोक्ष प्रदस्येमं। प्रपठेत्सकृती भवेत्॥४९॥ पुढें जी कथा वर्तली। ती विस्तारें असें वर्णिली। या अध्यायीं कथिली। भाविक श्रोतें जनांसी ॥५०॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचितें। त्रिचत्वारिंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय चवेचाळिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ श्रीगुरु हा चतुरानन। करुनि घ्यावया प्रसन्न। तया अर्पूनि तनमन। काळक्रमावा स्वानंदे ॥१ ॥ कृष्णा तिरीं स्वामीं। गलगली मुक्कामीं। श्रीदत्तात्रय तोषद नामी। पद रजिलें तें ऐका ॥२ ॥ दत्तात्रेय विभो। प्रभो हे दत्तात्रेय विभो ॥धृ० ॥ परात्पर विद्यादायक बोधक। ज्ञापक तूं शंभो ॥३ ॥ तूं परिपालक तूं मति चालक। तारक तूंचि विभो ॥४ ॥ लडिवाळ आमुचा स्वार्थ मनाचा। पूरवी तूंचि विभो ॥५ ॥ वासुदेवोक्तीनें मज सद्गती। होई तूंचि विभो ॥६ ॥ येथें स्वामींनीं कृष्णा आरती। केली ती श्रोतियां प्रती। कथितों एथ निश्चिती। एकाग्र चित्तें ऐकावी ॥७ ॥ आरती प्रारंभः - आरती ओवाळी श्रीकृष्णे। तुजला वारित तृष्णे ॥धृ० ॥ जी पातक वार्ता नच उरवी। सेवक कामा पुरवी। त्रिभुवनी सत्कीर्ती जी मिरवी। भजतां दैन्या नुरवीं। बरवी गती दे जी। ती कृष्णे तूंचि परिहृत तृष्णे ॥८ ॥ जीच्या उभय तटीं। अपरिमीत। तीर्थे असती शस्त। स्नानें पानें जी पुनीत। करिते ऐंशी मात। व्यासें वर्णियली ती कृष्णे। तूंचि प्रशमित तृष्णें ॥९ ॥ अपार तव महिमा। नच सीमा। लागे ती तूं परमा। पुरविसी निज कामा। निज नामा। घेतां देसी धामा। म्हणुनि वासुदेव। श्रीकृष्णे। तुजला प्रार्थि अनुष्णे ॥१० ॥ ही स्तोत्रें पदें श्रवण। भावें करितां पठण। तयाचें होय कल्याण। ऐसें वरदान स्वामींचें ॥११ ॥ सत्पुरुषाचें वरदान। जया प्राप्त होय जाण। तया श्रीदत्त भगवान मानदेतसें आदरें ॥१२ ॥ असो मग मार्ग क्रमित।

कृष्णातिरीं कुरव पुरव प्रख्यांत। येती तेथें त्वरित। सुक्षेत्र पाहुनी ॥१३॥ जे सांप्रत उत्तम। पावलें कुरुगड्डी नाम। करिती चातुर्मास मुक्काम। अठराशें छत्तीस सालीं।।१४॥ कृष्णा गंगा परिपूर्ण। उभय बाजूं वाहे जाण। मध्यें हें असे स्थान। श्रीचरण शोभती जेथें॥१५॥ स्थान समीप गव्हर। पाहूनि रम्य मनोहर। स्वामी राहती सत्वर। वार्ता कळली भक्त जनां॥१६॥ दर्शनार्थ नारीनर। येते झालें सत्वर। करिती नाना प्रकार। अन्न सिद्धीं संतर्पणीं॥१७॥ गुहेवरील ईश देवालया। माजीं आन्हिक सारावया। स्वामी बैसती एकांत ठायां। तों विप्र एक पातला॥१८॥ दूधगंगा तटींग्राम। असें कारदगे नाम। तेथील रहिवासी परम। भाविक शेष नामक॥१९॥ भारद्वाज गोत्रोत्पन्न। विनये स्वामीसी करी प्रश्न। म्हणे म्हाराजांनीं उपोषण। काल किमर्थ केलें होतें॥२०।। स्वामी म्हणती तयासी। पुजाऱ्यांची घरें या स्थानासी। अवघी तीनची परियेसी। त्यागृहीं परवां भिक्षा केली।२१॥ काल पुनश्च त्यांचें घरीं। भिक्षा करुं आपण जरी। तरी शास्त्र नियमानुसारी। दोष असें सर्वथा॥२२॥ त्यावीण भिक्षेस्तव विप्र घर। येथ एकही नसे साचार। यास्तव उपोषण निर्धार। केला होतां काल आम्हीं॥२३॥ परी श्रीपाद राज आपणा। येऊनि ब्रह्मचारी वेषें या स्थाना। गीर्वाण भाषेंत बोधूनि जाणा। पुसती उपोषण कां करिसी॥२४॥ येथ येऊनि उपोषण। करावया काय कारण। रजक भक्तानें ही भूमि जाण। मदर्पण केलीसें भक्तीनें॥२५॥ नैवेद्य नंदादिपा करितां। मज अर्पिली त्यांने स्वतः। मिळे अन्न पूजाऱ्यां समस्तां। त्या माझारीं तुज सांगतों॥२६॥ त्यांच्या

घरीं वारंवार। भिक्षा करितां तुज साचार। दोष न बाधेल निर्धार। नित्य भिक्षाकरीत जा॥२७॥ श्रीपाद स्वामींचें आज्ञापन। येणेंपरी महाराज जाण। सांगता ते करूनि श्रवण। ब्राह्मण आश्चर्य करी मनीं॥२८॥ म्हणे एवढा भक्ताभिमान। वहातसें श्रीपादराव जाण। आम्हीं मतिमंद महिमान। नेणतसो प्रपंच्या सक्तीनें॥२९॥ असो स्वामीं एके दिनीं। भिक्षा ठेविती आणूनि। द्विज पंक्ती भोजना लागूनि। बैसाया अवधी म्हणूनिया॥३०॥ सिद्ध होतां स्वयंपाक। पात्रें वाढिली अनेक। भिक्षा झोळी घेऊनि देख। स्वामी पात्रावरी बैसती॥३१॥ झोळी उघडती स्वहस्तें। तों काळ वृश्चिके करांगली तें। दंशिले पाहूनि मंडळींते। म्हणती बैसा भोजना॥३२॥ आपणा असे अवधी। वृश्चिक दंशे जाहली उपाधी। भक्त म्हणती आम्हीं आधीं। भोजन कैसें करावें॥३३॥ जैं स्वामी भोजना बैसती। तेव्हांच आम्हीं बसूं निश्चिती। अवेळ झाला तरी खंती। नसे चित्तीं आम्हांसी॥३४॥ येणेपरी भक्त वचना। ऐकूनि स्वामी करिती भाषणा। ऐसें असें तरी आतांचि जाणा। भोजनास्तव बसा सर्व॥३५॥ हें वृश्चिक दंश दुःख। ठेवितां येईल बाजूस देख। म्हणूनि झोळींतील अन्न चोख। पात्रीं सर्वही वाढिती॥३६॥ करांगुली वेगळी करुन। चार बोटानें सेविती अन्न। जरी वृश्चिक वीष दारुण। तरी साक्षित्वें पाहती॥३७॥ पंक्ती बैसल्या भोजना। जेऊनि तृप्त होती जाणा। देह प्रारब्ध भोग नाना। साक्षित्वें स्वामीं भोगिती॥३८॥ त्याच दिवशीं सायंकळीं। मृतप्राय सर्पदंशे झालेली। एक विप्र स्त्री त्यांचे जवळीं। भक्त मंडळी आणिती॥३९॥ तिजवरी मंत्र घालून।

करूनि कृपावलोकन। उठविती न लागतां क्षण। पाहूनि जन विस्मीत॥४०॥ एके दिनीं कोणी ब्राह्मण। मृत काळी चिमणी आणून। निज हस्तावरी ठेवी जाण। ऐसें स्वामीं स्वप्न पाहती॥४१॥ त्याचा ते निषेध करिती। तो. तो ब्राह्मण वेद निश्चिती। एक मृत चिमणी तुमच्या हातीं। ठेवितां आम्हां धिक्कारितां॥४२॥ ऐशा मृत चिमण्या किती। नित्य आमुच्या मस्तकीं पडती। त्याची तुम्हां नसे खंती। आम्हीं काय करावें सांगा॥४३॥ स्वामी येती दुजे दनीं। देवालयीं स्नान सारुनि। तो प्रत्यक्ष मृत काळी चिमणी। देवावरी पडलेली पहती॥४४॥ स्वप्नध्यानीं आणिती। मृतपक्षीं काढूनि टाकिती। देवालयां सत्वर गती। करिती द्वार व्यवस्था॥४५॥ देवालयीं चिमण्याचें स्थान। तेथें वट वागुळें येऊन। द्वेषे घेती त्यांचा प्राण। तेणें त्या मृत होऊनि पडती॥४६॥ परीतया होतां द्वार। तो अनर्थ चुकला साचार। आणिक कथा सविस्तर। ऐका श्रोतें सांगतों॥४७॥ आषाढ शुद्ध एकादशी दिनीं। एक शुद्रीण स्वप्नीं येऊनि। बोले महाराजा लागूनि। मी उपोषित असें म्हणूनिया॥४८॥ ते पुसती तियेसी। तूं कोण या ठायासी। ती वदतसें स्वामीसी। कृष्णादेवी मी असें॥४९॥ पुनश्च स्वामी वदती तीस। ऐसा कां आपुला वेष। कृष्णा देवी म्हणे स्वामीस। येथ शूद्रीण स्वरुपे नांदतें॥५०॥ उपोषित असें मज खावयास। द्यावें आपण या समयास। प्रतिवर्षिं दशहारीं जेवावयास। आपण मज वाढितां॥५१॥ परी साल मजकुरीं। तें न वाढिलें दशहारीं। तैं पासूनि मीं निर्धारीं। उपोषित असें निश्चयें॥५२॥ तरी मज या ठायां। वाढ मज जेवावया। स्वामी वदती

द्यावया। आम्हां जवळीं काय आहे ॥५३॥ आम्ही तापशी संन्याशी। किमर्थ मागतां आम्हांपासी। देवी म्हणें तुम्हांपासीं। सर्व काहीं असे जाणा ॥५४॥ जरी तुम्हांपाशीं नाहीं। तरी मी दावितें लवलाही। त्या ठायीचें घेऊनि पाहीं। आम्हां भोजना वाढावें ॥५५॥ स्वामी म्हणती तुमचे तुम्हा। देतां लाभ काय आम्हां। त्यात कोणती दान सीमा। सांगा बरे दात्याची ॥५६॥ देवी म्हणे अैसें जरी। हरबऱ्याची डाळ तरी। आम्हा खावया द्या निर्धारीं। तुम्हां अशक्य हे नसें ॥५७॥ ऐसें ऐकूनि देवी वचन। स्वामी वदती तिज लागून। गुरु पौर्णिमा दिन। निकट तरी आला असें ॥५८॥ चार दिवसाची अवधी। राहिली असे मधीं। भक्त मंडळीं येता आधीं। इच्छित अर्पिन आपुलें ॥५९॥ ऐकतां ऐसें स्वामी वचन। कृष्णा देवी गुप्त होय जाण। येतां गुरु पौर्णिमा दिन। भक्त दर्शना पातलें ॥६०॥ ते दिनीं व्यास पूजा। संतर्पण होय द्विजां। कृष्णादेवी काजा। स्वामी समस्तां सांगती ॥६१॥ हरबऱ्याची डाळ भिजत। घाला म्हणूनि आज्ञापित। व्यास पुजेचें सामान समस्तं। होतें शिल्लक नानापरी ॥६२॥ गुरु पौर्णिमेच्या मुख्य दिनीं। श्रीगाणगाभुवनाहूनि। डाक मार्गे कुरव पुरस्थानीं। भक्त एक पुष्पें पाठवी ॥६३॥ तया झाला श्रीदृष्टांत। मी प्रत्यक्ष असें कुरव पुरांत। चातुर्मासास्तव वास करित। तरी पुष्पें तेथें पाठवी ॥६४॥ यास्तव तो पुष्पें अनेक। गुरु पूजेस्तव पाठवी देख। तीं कृष्णा देवीसी प्रेमपूर्वक। अर्पूनि पूजा करिती स्वामी ॥६५॥ समीप ग्रामांतील शूद्र मंडळी। पाचारुनि तयेवेळीं। हरबऱ्यांची डाळ वांटिली। सकळी कांसी यथेच्छ ॥६६॥ तेणें ते

ग्रामस्थ शूद्र। तोषलें जाणा समग्र। दत्त नाम सर्वतो भद्र। जयजयकारें गर्जती ॥६७॥ त्या कुरवपुरस्थानीं। अन्नही शूद्रां लागूनि। यथेच्छ वाढिती संतर्पणी। जे कां सिद्ध हो तसें ॥६८॥ तेणें कृष्णादेवी संतोषली। जी शूद्रिणी वेषें तयास्थळीं। वास करितसें वहिली। हें वर्म अन्य नेणती ॥६९॥ जेष्ट दशहार समयीं। स्वामी सन्निध करिती कांहीं। भक्त जमूनि उत्सव पाही। कृष्णा देवी प्रीत्यर्थ ॥७०॥ स्वामीही कृष्णातीरीं। वास करिती दशहारी। ऐसा नियम होतां परी। तो ह्या वर्षी न होय ॥७१॥ त्या सालीं दशहारी स्वामी। असती मुरगोड ग्रामीं। मलप्रभातट मुक्कामीं। तेणें उत्सव न होय ॥७२॥ या कारणें स्वामी रायापाशीं। कृष्णा देवीनें परियेसी। केली भोजन याचना ऐशीं। स्वांगे येऊनि यास्थानीं ॥७३॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचितें। चतुःचत्वारिंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय पंचेचाळिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ सद्गुरु कृपामेघ जल। ज्या शिष्य क्षेत्रीं पडलें विपुल। तेथ ज्ञान धान्या झाला सुकाळ। आत्मस्वरुप धन दुष्काळ हरे ॥१ ॥ पुढील कथानुसंधान। स्वामी शेषनामक ब्राह्मण। तद्भावनेनुरुप जाण। देती पद्य व्यंकट रमणाचें ॥२ ॥ ते श्रोतें जना कारण। लिहीलें असे येथे जाण। हें नित्य करितां पठण। श्रीव्यंकट रमण तोषें ॥३ ॥ पद प्रारंभः - लक्ष्मी रमणा विपद्धुरणा। करुणापूर्णा त्रास निवारणा। व्यंकट रमणा त्रिभुवन कारणा। भाविक शरणा। नमुं तव चरणां।धृ० ॥ शेषाचल कृतवासा दासा। वारूनि त्रासा तारि नारायणा। पद्मावती मती शरणा मरणा वारूनि चरणाश्रय दे अरणा ॥१ ॥ मंदस्मित वरहासा दासा द्धारा मारा व्युतभा पूर्णा। कौस्तुभभुषणा जितखर दुषणा। पातक शोषणा त्रिभुवन पोषणा ॥२ ॥ जय व्यंकटेशा वारिदुराशा जय लक्ष्मीशा तुजवीण कवणा। धुंडू शरणा तूंचि परायणा। तारि नारायणा दृढ धरूं चरणा ॥३३ ॥ महाराजांनीं जे जे ग्रंथ। जीं जीं पदें स्तोत्रें असंख्यांत। रचिली जगद्धोरार्थ। ती अवघी पसंत श्रीदत्ता ॥७ ॥ ती जो भावें गाईल। श्रवण पठण करील। तया श्रीदत्त सद्गती देईल। ऐसें वरदान स्वामींचें ॥८ ॥ असो रायचूर शहर समीप। तेथूनि धान्य अमूप। आणिती भक्त आपोआप। भिक्षा करिती स्वामीसी ॥९ ॥ भक्त जनोद्धारार्थ। स्वामी राज स्वतः। शरीर भाष्य गीतार्था। सांगती प्रातःकाळीं जाणा ॥१० ॥ या स्थानीं स्नान समयीं। एका गृहस्थाची पाही। द्रव्यथैली लवलाही। एका बाईनें

चोरिली ॥११॥ ते येऊनि स्वामीसी। म्हणे स्नान समयासी। द्रव्यथैली चोरिसी। गेली आतां काय करुं॥१२॥ ऐकूनि तयाचें वचन। स्वामीं म्हणती हास्य वदन। अनेक पिशाच्चें जाण। श्रीपाद स्वामीं दरबारीं॥१३॥ त्यातींल एक पिशाच्च। सोडितां ते संकोच। न धरील सहजच। चोर धरील क्षण मात्रें॥१४॥ स्वामी वचन ऐकूनि। बाई घाबरली मनीं। म्हणें केली तस्कर करणीं। परीक्षमा करावी॥१५॥ असो श्रीची पूजा पद्धती। तेथील पूजाऱ्यां प्रती। स्वामींराज सांगूनि देती। व्यवस्था करिती ज़ागेची॥१६॥ स्वामी महाराजांचा वास। असतां तेथें पूजाऱ्यांस। द्रव्य मिळे बहुवस। महा पूजेचें मिषें जाणा॥१७॥ रायचूर नगरीं भक्त। त्यातें स्वामी निजमत। दर्शविती यथोचित। तेथें व्यवस्था करावया॥१८॥ मग श्रीचें करिती स्तोत्र। जे पतितातें पवित्र। करी श्रवण पठणें मात्र। इह परत्र सुखदची॥१९॥ स्तोत्र प्रारंभः। श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव। श्रीदत्तास्मान्पाहिदेवाधिदेव। भावग्राह्य क्लेश हारिन्सुकीर्ते। घोरात्कष्टादुद्धरा स्मा-न्नमस्ते॥१॥ त्वं नो माता त्वंपिता प्तोधि पस्त्वं। त्राता योगक्षेम कृत्सद गुरुस्त्वम्। त्वं सर्वस्वं नो प्रभोविश्व मूर्ते। घोरात्कष्टा०॥२॥ पापं तापं व्याधिमाधिंच दैन्यं। भीतिंक्लेशं त्वं हरा शुत्वं दन्यम्। त्रातारंनो वीक्षईशास्त जूर्ते। घोरात्कष्टा०॥३॥ नान्य स्त्राता नापिदाता न भर्ता। त्वत्तोदेव त्वं शरण्यो कहर्ता। कुर्वात्रेयानुग्रहं पूर्ण राते। घोरात्कष्टा०॥४॥ धर्मे प्रीतिं सन्मतिं देव भक्तिम्। सत्संगाप्तिं देहि भुक्तिच मुक्तिम्। भावा सक्ति चाखिला नन्दमूर्ते। घोरात्कष्टा०॥५॥ श्लोक पंचक मेदद्यो। लोकमंगल वर्दनम्। प्रपठेन्नियतो

क्त्यास श्रीदत्त प्रियोभवेत् ॥६॥ स्तोत्र समाप्तः। स्तुती करुनि येणेंपरी। कुरव पुराहूनि सत्वरी। दीपावली झाल्यावरी। स्वामी निघतें जाहलें ॥२६॥ ज्योतिर्लिंग प्रख्यांत। नामें परळी वेद्यनाथ। तेथ येऊनि रहात। भाविक भक्ताग्रहेंची ॥२७॥ देशपांडे उपनामक। नांदे नेथ विप्रधनिक स्वाहाकार करी देख। असतां स्वामीं वास जाणा ॥२८॥ तेथूनि गोदातिरीं येती। राजूर ग्रामाप्रती। दर्शनार्थ भक्त जमती। होय संहिता स्वाहाकार।।२९॥ यवन जिल्हा अधिकारी। स्वामी दर्शना सत्वरीं। पातलें ते अवसरी। कर जोडूनि विनविती ॥३०॥ जैसी स्वामी आज्ञा जाण। तैसेंच वागूं हे प्रमाण। ऐकूनि त्यांचे भाषण। संबोधिती यतिराज ॥३१॥ प्रजा पालनीं दक्ष। असावें मन निरपेक्ष। स्वपर धर्म पक्ष। समान न्यायें राखावा ॥३२॥ या राजूर ग्रामीं। स्वामी दर्शन कामीं। भक्त सत्पथगामीं। जमले लक्ष मितीवरी ॥३३॥ लक्षूनि स्वामी निवास ठाय। हंपी विरुपाक्ष मठाचार्य। परमहंस यतिवर्य। विद्या शंकर भारती ॥३४॥ दर्शनार्थ पातलें देख। समीप टाकळीचे एक। ग्रामस्थ गायत्री उपासक। दाजी महाराज या नामें ॥३५॥ तेही स्वामी दर्शन। घ्यावें हा हेतू धरून। आले त्या ग्रामीं जाण। आनंद होय सकळिका ॥३६॥ आचार्य शिष्यांप्रती। स्वकीय कृतवेदपाद स्तुती। समस्तातें वांटिती। निज हस्तें स्वामीराज ॥३७॥ ऐंसे अष्टदिन तेथ। राहूनि आक्रमिती पंथ। उटी नामक ग्रामीं येत। भक्ताग्रहें करूनि ॥३८॥ तेथें गणपती भक्त। गोविंद बुवा नामेंख्यात। स्वाहाकार करित। कया धुतिरीं मग येती ॥३९॥ इंगोलीची भक्त मंडळी। उत्सव करिती ते वेळीं। सद्गुरु

दर्शनें धाली। सुखावली अंतरों ॥४०॥ पांच दिवस मुक्काम। करुनि घेती विराम। दुर्लभ सत्समागम। परी भाविका लाभतसें ॥४१॥ किल्ल्यावरी दौलताबादीं। जनार्दन स्वामी समाधी। दर्शन घेऊनि आधीं। वेरूळ घृष्णेश्वरीं आले ॥४२॥ हे प्रख्यांत जोतिर्लिंग। पहाती मग आक्रमिती मार्ग। चाळीसागांवी सवेग। निघती भिक्षा करुनि ॥४३॥ तापी गंगा स्नान करुन। खेडीघाटीं आलें जाण। हें चातुर्मास वासस्थान। स्वामी भक्त बहुत येथें ॥४४॥ म्हणती दर्शनें पावन। जाहलों आजिचा सुदीन। एक दिन तेथें काळक्रमून। मार्गक्रमण आरंभिती ॥४५॥ समागमें अनेक भक्त। आनंदे निघालें त्वरित। चिखलदा ग्रामीं येत। चातुर्मास वास करिती ॥४६॥ रेवातिरीं सुस्थलीं। अठराशें चौतीस सालीं। विप्र भक्त मंडळीं। आनंदले स्वामी दर्शनें ॥४७॥ पवित्र सच्चरण धुली। ज्या नरा लाधली। त्याची चित्त शुद्धीं झाली। तो पावन होय निर्धारें ॥४८॥ ऐसा सज्जन संग। उन्नती कारक चांग। असे जरी अमोघ। परी दुर्लभ खास तो ॥४९॥ भवत्कृपा व्हावी। तरी संत संगती करावी। लाधे कृतार्थता एरवीं। व्यर्थ जीवित नराचें ॥५०॥ सत्संगे अंतःकरण। पवित्र होय जाण। मग प्रेम भावे करून। शरण जावें श्रीहरीसी ॥५१॥ प्रेमभावें प्रभूला शरण। गेला त्याचेचि जितेपण। इहपर लोकीं धन्य। झालें जीवन भाविका ॥५२॥ असो या चिखलदा ग्रामीं। एक दर्शन कामी। गृहस्थ येऊनि स्वामी। प्रती विनंती करितसे ॥५३॥ म्हणे ममांतः करणीं। ईश भक्ती जेणें गुणी। उपजेल ऐशी करणीं। कृपा करूनि सांगावी ॥५४॥ स्वामी

सांगती सत्संग। करितां भक्ती अंकूर चांग। उपजेल मनीं अव्यंग। त्यासी जीवन घालावें ॥५५ ॥ भक्ती प्रति पादक ग्रंथ। ज्ञानेश्वरी भागवत। श्रवण करावें सतत। त्याचें मनन करावें ॥५६ ॥ ऐशिया ग्रंथ श्रवणाचें। तेणें परी मननाचे। जीवन शिंपीता साचें। भक्ती अंकूर बुद्धी होय ॥५७ ॥ ब्रह्मऋषी नारदमुनी। भगद्भक्ताग्रगणी। भक्ती सूत्रांत लिहूनि। ठेविती कायतें ऐका ॥५८ ॥ भक्ती शास्त्र मनन यानीं। तद्द बोधकर कर्म करणीं। याणी प्रेमें करुनि। भक्तीबुद्धींस्तव जाण ॥५९ ॥ हरी प्रेम पोषक। ग्रंथ वारंवार अनेक। वाचावें मनःपूर्वक। त्याचें मनन करावें ॥६० ॥ प्रभू प्रेम विकास। होईल जेणें खास। करणें ऐंशाच कर्मास। मुमुक्षुनें प्रेमभावें ॥६१ ॥ देव ज्या कर्मे जोडे। तें जाहले जरी थोडें। तरी तेणें पाऊल पडे। शनैः शनैः प्रभुनिकट ॥६२ ॥ देव प्राप्तीस्तव अधर्म। घडला तरी मुख शर्म। लाधतां कायसें कर्म। वर्म तुच्छ त्या पुढें ॥६३ ॥ श्रीकृष्ण प्राप्तीस्तव। गोपीनीं पती गौरव। न करितां सर्व। गृहपुत्र, धन त्यागिलें ॥६४ ।। बिभीषणें बंधूसी। भरतानें मातेसी। त्यागुनी पित्याशीं। प्रल्हादें देवा जोडिलें ॥६५ ॥ स्वामी म्हणती त्या गृहस्था। जरी देव प्राप्तीची आस्था। घेई शिकवण सर्वथा। येणें भव व्यथा हरेल ॥६६ ॥ या स्थानीं अनेक। जमले भक्त भाविक। संतर्पण होतसें देख। नित्य नियमें करूनि ॥६७ ॥ बढवाणी संस्थान। समीपची असें जाण। लोक सत्कीर्ती ऐकून।

दर्शनार्थ नित्ययेती ।।६८ ।। देवासमान स्वामी शेवा। करिती धरूनि सद्भावा। सेविती प्रसाद मेवा। प्रपंच हेवा करुनि ।।६९ ।। गालवपुराहूनि येथ। सरदार स्त्री नामांकित। पातली स्वामी दर्शनार्थ। सामान्य वेषें करुनि ।।७० ।। निरभीमान पाहून। स्वामी तीस बोलती जाण। अंगी असावें नम्रपण। तरीच थोरपण पाविजें।।७१ ।। होतां चातुर्मास पूर्ण। नर्मदा तीर लक्षून। स्वामी मार्गस्थ झालें जाण। तों नवल वर्तले ।।७२ ।। इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचितें। पंचचत्वारिंशोध्याय गोड हा ।। श्रीकृष्णार्पण मस्तु ।। श्रीगुरुदेवदत्त ।।

* * *

## ॥ अध्याय शेहेचाळिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ शुद्धाचारें वर्तता नर। प्रसन्न तया गुरुवर। तस्मात धरूनि आदर। सदाचार राखावा ॥१ ॥ हृदयीं करिता गुरु स्मरण। तेणें होय अघनिरसन। मनुजें करूनि शुद्ध मन। श्रीगुरु पदीं निष्ठा ठेवावीं ॥२ ॥ बहू शिष्य समर्थाजवळ। निष्ठेचें अल्पची बळ। एक कल्याण केवळ। प्रिय झाला रामदासा ॥३ ॥ समर्थ्ये दास बोध केला। तो कल्याणें प्रथम लिहीला। कल्याण प्रदसर्वां झाला। प्रत्यय सकळां येतसें ॥४ ॥ कल्याणे कल्याण साधिलें। जगीं नांव भलें झालें। इतर शिष्य बहु आले। परी व्यर्थ करणीं तयांची ॥५ ॥ दृढतर भाव असल्यावीण। सर्व व्यवसाय शीण। म्हणूनि गुरु भक्ती करण्या प्रवीण। नरे सर्वदा असावें ॥६ ॥ गद्य, पद्य कवन रचिलें। सुवर्णालंकार घातलें। श्रीगुरु प्रसादावीण न भले। जना तोषद घडेना ॥७ ॥ श्रीगुरु प्रसादा वीण काम। तो केवळ जाणावा श्रम। व्यर्थ अंतरीं धरितां श्रम। आराम पद त्या कैचें ॥८ ॥ अनुग्रह नसे गुरुचा। तरी व्यर्थ जन्म नराचा। अतएव गुरु प्राप्तीचा। प्रयत्न पुरुषें करावा ॥९ ॥ आधीं प्रपंच करावा। परी गुरु ओळखावा तरीच त्याच्या नांवा। धन्यता ये त्रिभुवनीं ॥१० ॥ मागील अध्यायीं कथा। चिखलद्याहूनि तत्वतां। स्वामी आक्रमिती पंथा। ती सविस्तर सांगतों ॥११ ॥ लागलें घोरांधर वन। विंध्याद्रीचें जाण। करावया मार्गक्रमण। पाऊल वाटही न मिळे ॥१२ ॥ ऐशा समयीं भिल्ल एक। स्वामीपाशीं येऊनि देख। पुसें विनयपूर्वक। क्यां जाऊंच्छें म्हणूनि ॥१३ ॥ गुजराथीं

भाषेंत। पुसतां त्या स्वामी बोलत। जाणें असे आम्हां प्रत। नर्मदा तटीं म्हणूनि ॥१४॥ आव मेरा साथे वचन। ऐसें बोले भिल्ल जाण। महाराज तया मागून। मार्गक्रमिती दूरवरी ॥१५॥ सामु मंदीर छे तां जांव। ऐसें बोलूनि मंदीर ठाव। दाविता त्या स्वामीराव। पुसती तूं कोण अससी ॥१६॥ तो न देतां प्रश्नोत्तर। गमन करी सत्वर। तया बोलती यतीवर। तुज आण श्रीगुरुची ॥१७॥ सांगे प्रथम त्वंन्नामा। मग जाईं निजधामा। तो म्हणे अश्वत्थामा। म्हणती ज्या तो मी असें ॥१८॥ राहतो या रेवातिरीं। ऐसें बोलूनि ते अवसरीं। गुप्त झाला झडकरी। आश्चर्य वाटलें स्वामीसी ॥१९॥ तयानें जे देऊळ। दाखविलें ते निर्मळ। गरुडेश्वर स्थान केवळ। तेथ तत्काळ पातलें ॥२०॥ उष्णकाळ चैत्रमासीं। स्वामी आले त्या ठायासी। वार्ता कळली भक्त जनांसी। म्हणती आजिचा सुदीन ॥२१॥ गांडा बुवा भक्त थोर। दर्शनार्थ आला सत्वर। तया बोलती गुरुवर। चालता होई येथुनी ॥२२॥ देणें असेल त्रास। तरीच रहा या ठायास। अन्यथा ये समयास। चालता होई येथुनी ॥२३॥ तो सद्गुरुस म्हणे। त्रास होतो या देहानें। तरी येथ किमर्थ राहणें। भवद्आज्ञेसी न मोडी ॥२४॥ जन्म मरणाचा त्रास। होतसें ह्या जीवास। उपाधी कारक देह खास। कृपावलोकनें पहावा ॥२५॥ जरी होईल कृपेक्षण। दासाचें होईल कल्याण। सद्गुरु माऊलीवीण। तारक कोण आम्हांसी ॥२६॥ त्यासी बोलती स्वामी। सुरवें रहा निजग्रामीं। साधन अहर्निशी यामीं। करी अंतर्यामा पासुनी ॥२७॥ मग संपादुनी आशिर्वाद। वंदूनि श्रीगुरु पदारविंद। येतसें ग्रामीं स्वच्छंद।

भृगू क्षेत्रीं रेवातटीं ॥२८ ॥ श्रीगुरु पदाब्जध्यान। सद्गुरु नामस्मरण। गुरु पदिष्ठ साधन। करीत काळ कंठीतसें ॥२९ ॥ त्या विंध्याद्री उपवनांत। दर्शनें व्हाया कृतार्थ। जमूं लागलें स्वामी भक्त। त्याचें गणीत कोण करी ॥३० ॥ पातला वर्षाकाळ। पवित्र तें रम्य स्थळ। चातुर्मास काळ। क्रमिती श्रीगुरु तेथेंची ॥३१ ॥ अठराशें पस्तीस सालीं। यतिराये या स्थली। श्रीगरुडेश्वर देऊळीं। रेवातटीं वास केला ॥३२ ॥ जेथे राहती सज्जन। तें होय आनंद भुवन। जे वेळीं होय सद्दर्शन। तो पर्वकाळ जाणावा ॥३३ ॥ जे समयीं संतजन। गृहाप्रती येती जाण। दसरा दिवाळी सण। ते दिनीं जाणावा ॥३४ ॥ आषाढी एकादशी दिनीं। यात्रा समय जाणूनि। अवघे दर्शना लागूनि। धांवती पंढरीनाथाच्या ॥३५ ॥ पंढरी हेंची भू वैकुंठ। मानूनिया सर्वश्रेष्ठ। नमस्कारिती वैकुंठ पीठ। त्याहूनि वरिष्ठ संत हो ॥३६ ॥ ज्या ठायीं यांची वस्ती। हरी भजनें निश्चिती। हे तेंचि वैकुंठ करिती। ऐसा संत महिमा जाणा ॥३७ ॥ जेथ स्वामींनीं केली वस्ती। त्या गरुडेश्वरी निश्चिती। अवघीं वीस गृहे असती। अधिकारी यांची मिळूनि ॥३८ ॥ परी सन्निवासें त्या स्थाना। होऊं लागली समाराधना। अष्टशतावरी जाणा। नित्य पक्वाना सहित ॥३९ ॥ पर्जन्य पडे बहुत। नर्मदेस पूर अत्यंत। आलासें तेणें ग्रामस्थ। जनां संकट पडलें पैं ॥४० ॥ स्वामीसी म्हणती समस्त। या पुरें हानी निश्चित। कृपावलोकनें त्वरित। तोषवावें आम्हांसी ॥४१ ॥ ऐकूनिया भक्त वचना। ते करिती हास्य वदन। हातीं दंड घेऊनि जाणा। नर्मदे समीप पातलें ॥४२ ॥ म्हणती मातेपूर प्रचंड। येणें हानी होय उदंड। आतां पुरे करी दंड।

सुखवी भक्त वृंदातें ॥४३॥ ऐसें वदून तत्काळ। करधृत दंडेजल। स्पर्श करितां नवल। अपूर्व जाहलें तेधवां ॥४४॥ माजला होता कल्लोळ। परी ओसरूं लागलें जळ। जन आनंदले सकळ। स्वामी चरणीं लागती ॥४५॥ म्हणती आपुलालें चित्तीं। हा अवतारी दिसेंयती। दंड स्पर्षतांची निगुती। जळकेवीं वोसरें ॥४६॥ असो ऐसा चमत्कार। पहाती अवघें नारीनर। स्वामीं चरणीं मन स्थिर। करिती प्रेमभक्तींनें ॥४७॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचितें। षट्चत्वारिंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय सत्तेचाळिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ श्रीगुरुज्ञानाचें आगर। श्रीगुरु धैर्याचे डोंगर। श्रीगुरु आत्मसुख सागर। शिष्यास्तव उचबळें ॥१॥ श्रीगरुडेश्वरीं स्वामीसाठीं। बांधिती स्वतंत्र पर्णकुटी। भक्त जनांची दाटी। होतसें त्या मठांत ॥२॥ प्रातःकाळीं स्नान सारूनि। समीप नारदेश्वर स्थानीं। उपनिषादार्थ द्विजां लागूनि। स्वमुखें श्रवण करविती ॥३॥ माध्यान्ही गुर्जर विप्र। दुधांमाजीं करुनि पवित्र। आणिती साळीची भाकर। निर्वाहा पूर्ति ताकासवें ॥४॥ खाऊनिया काळ क्रमिती। भोजनार्थ विप्र पंक्ती। बैसतां पूर्ववत् न येती। न देती मंत्रोपदेश ॥५॥ भक्त मेळीं बैसून। पूर्ववत् भजन श्रवण। न करिती तेणं खिन्न। मन नैष्ठिक भक्तांचे ॥६॥ जे निष्कामीं निजभक्त। तया स्वामी आज्ञापित। ठायींच करुनि एक चित्त। श्रीदत्तभजन करित जा ॥७॥ असो स्वामी दर्शनार्थ। श्रीगरुडेश्वरीं गोपाळनाथ। पातला असतां भक्त। समस्त तया म्हणती ॥८॥ तुम्हीं कासया आलेती। त्रास देण्यां स्वामीप्रती। कळेल तुमची भक्ती। जाता सन्निध स्वामींच्या ॥९॥ तयांचे साशंकित मन। अंतरीं म्हणे ऐसें भाषण। कां करिती हे भक्त जन। न कळे आज्ञापन श्रीगुरुचें ॥१०॥ मग तो श्रीगुरु दर्शन। कराया गेला तत्क्षण। चरण वंदी कर जोडून। स्वामी सन्निध उभा राहे ॥११॥ तया पाहतां तत्काळ। स्वामीं पुसतीं क्षेम कुशल। ऐशी पद्धत निर्मळ। परी ती येथ न पाहें ॥१२॥ आपुल्या चित्तीं विचारी। काय दोष घडला करीं। जेणें श्रीगुरु माऊली निर्धारी। मूकवत् राहे पाहुनी ॥१३॥

घेऊनिया चरण तीर्थ। स्वस्थाना गेला गोपाळनाथ। म्हणे महाराजांनी येथ। कां हे विपरीत मांडिलें ॥१४॥ भक्त भजनी अनावड। सद्भक्तांची ना चाड। प्रापंचिकाचें लाड। समीप ठेऊनि कां करिती ॥१५॥ न कळे काय असे हेतू। निष्कामी भक्त प्रेमतंतू। तोडावया पहाती परंतु। योग्य न हे सद्गुरुसी ॥१६॥ इतुकें तया मनींयेता। स्वामी पातलें अवचिता। उभा राहे जोडूनि हस्ता। श्री गुरु मूर्तिसी नमस्कारीं ॥१७॥ ते पुसती तयासी। येथ केव्हां आलासी। ऐकूनि श्रीगुरु वचनासी। तया आनंद जाहला ॥१८॥ म्हणे मी आलो काल। दर्शन घेतलें तत्काळ। स्वामींचें लक्ष तयेवेळ। मजकडे कां नसावें। ॥१९॥ येणेंपरी प्रश्नोत्तर। होऊनि ते सत्वर। मठीं येती साचार। सायंकाळ समयासी ॥२०॥ स्वामी नाम उच्चारून। निशीं समयीं तो भोजन। करीतसें मठीं येऊन। तयासी ते खुणाविती ॥२१॥ निजनाम घेऊन। न करावें भजन। त्यांचे इच्छेसी जाणून। तो श्रीदत्त भजन करी ॥२२॥ परी पूर्वींप्रमाणें स्वामीं। भक्तजन कामी। अदत्त चित्त श्रीदत्त नामीं। स्वयें निमग्न अंतरीं ॥२३॥ तेणें भक्त जनांस। भजनीं न उल्हास। तेथें गोपाळबुवास। खेद अंतरीं वाटतसें ॥२४॥ चित्तीं म्हणे आजवरी। स्वामीनीं कष्ट केलें भारी। जगद्धोरार्थपरी। आतां उपसंहारी मन दिसें ॥२५॥ वाटे स्वच्छंदे दिगंबर। राहूनि करणें संचार। किंवा मौन व्रत निर्धार। आदरावें वाटतें ॥२६॥ किवा काश्मीर देशांत। मानूनि श्रीदृष्टांत। जाणें असे निश्चित। मनोगत त्यांचे ना कळे ॥२७॥ असो दशदीन तेथ। क्रमूनि गोपाळनाथ। स्वामीसी प्रार्थना करित। कृपादृष्टी असावी ॥२८॥ दासाचें स्मरण।

असावें स्वामीस जाण। ते पुसती तया लागून। राहसी आतां कोणे स्थळीं ॥२९॥ म्हणे कृष्णा गंगातिरीं। रहातसें निर्धारीं। श्रीगुरुपदाब्ज अंतरीं। ध्याऊनि काळ क्रमितसें ॥३०॥ ते म्हणती तया लागून। एकांत स्थानीं बैसून। भावें करावें श्रीदत्त भजन। निर्वाणद साधन हेंची ॥३१॥ मग तो गुरुपद वंदून। निघतां झाला तेथून। आला भृगूक्षेत्रीं जाण। भडोच नगरीं रेवातटीं ॥३२॥ तेथ गांडाबुवा भक्त। तैसेंची गुर्जर विप्र बहुत। परिवारेंसी नांदत। असती भाविक प्रेमळ ॥३३॥ ते म्हणती आम्हां भजन। कराया शिकवावें जाण। स्वामींकृत पदें पूर्ण। छंदताल युक्त पैं ॥३४॥ त्यांचें वचन ऐकून। तेथ क्वचित्काल राहून। त्यांना ताल युक्त भजन। शिक्षण दे यथा पद्धती ॥३५॥ गुर्जर विप्र समस्त। निघाले स्वामी दर्शनार्थ। गोपाळनाथा म्हणत। समागमे चलावें ॥३६॥ गुरु भक्त समागम। तन्निष्काम प्रेम। पुनश्च दर्शन काम। धरुनि चित्तीं तो निघे ॥३७॥ पातला श्रीगरुडेश्वरीं। तया भक्त मंडळी सारी। म्हणे पुनरपी सत्वरीं। आला तुम्हीं किमर्थ ॥३८॥ महाराज म्हणत होते। केवीं न भेटतां आम्हा तें। गमन केलें गोपाळनाथें। तरी क्रोधे गेला कीं ॥३९॥ तो वदे सकळांसी। न भेटतां गेलों परियेसी। यास्तव पुन्हः या ठायासी। पातलो श्रीगुरुदर्शना ॥४०॥ स्वामी भाषण हेतू। वेगळाचि होता परंतु। गुरुभक्तीचा प्रेमतंतू। वाढतां होय परोक्षें ॥४१॥ समीप निज समाधी काळ। जाणूनि स्वामी प्रेमळ। भक्तां सद्बोध वचनामृत रसाळ। पाजीत होतें ॥४२॥ हे कोणीही नेणती वर्म। परी व्हाया शिष्य शर्म। महाराजांनीं गुरु धर्म। पाळाया नियम केला ॥४३॥ सद्भक्तां वचने बोधप्रद।

सांगती करुनि विषद। स्वतः राहूनि शुद्धबुद्ध। निर्वाणद पथ दाविती ॥४४॥ नवरत्न माला बरवी। स्वामींनीं रचिली नवी। ती श्रोत्यांसी व्हाया ठावी। येथ अवघी लिहिलीसे ॥४५॥ अथ नवरत्नमाला प्रारंभः। हा देह दृश्य जड अन्नविकार माता। ताता स्त्रवीर्यज अमंगळ जीव जाता। प्रेतान पाहती नहा ममरुप भूत। कूटस्थमी तरि सदोदित साक्षिभूत ॥१॥ त्वङ्मांस लोहित शिरास्थि समूह देह। ज्या आंतश्लेष्म मळमूत्रची मोहगेह। हे होय नष्ट जडबुद्धुदसे अनंत। कूटस्थ० ॥२॥ माया विनिर्मित पदार्थ समान देह। जो बिंदूमात्र असतां हिवि मोहगेह। वाढे क्षणोक्षणीं विलक्षण निश्चितांत। कूटस्थ० ॥३॥ पाण्यावरील लहरी येती जशा तशा ह्या। देहावरी सतत येती दशाअशा ह्या। बाल्यादिशेखि कृमिविड्भसितांत कांत। कूटस्थ० ॥४॥ यद्राक्षणार्थ करिताति कुकृत्य दुष्ट। जो षड्रसान्न परिपोषित होयिपुष्ट। येथेंचि तो पडतसे उघडा अनंत। कूटस्थ० ॥५॥ वर्णाश्रमादिक सुखादिक यन्निमित्त। संबंधरुप भय कर्महि यन्निमित्त। तो हाचि अन्नमय कोश जयासि अंत।कूटस्थ० ॥६॥ हा प्राण त्यामधिं सदोदित खेळताहे। जो इंद्रियां कवळुनी ममरुप नोहे। हेही अचेतनचि चेतन मी प्रशांत। कूटस्थ० ॥७॥ जे चंचल क्षण भरी नवसें विकारी। तें होय हें मनन मीं कधिंही विकारी। खद्योत तुल्य प्रतितीहि नमी प्रदीप्त। कूटस्थ० ॥८॥ हा जात येत असतो जगिं लिंग देह। अज्ञान कारण नूनच तीनदेह। माझें स्वरुप अज अक्रिय मी अनंत। कूटस्थ० ॥९॥ कर्ता नमी प्रत्यग भिन्न आत्मा। भोक्तान मी अद्वय सच्चिदात्मा। हें ज्ञात व्हाया नवरत्न माला। हे कंठिंघाला

हरिहेहि काला ॥१० ॥ जो कर्म फळ देवारी स्मरतां कष्ट उद्धारी। भजतां त्या दत्तदेवापदीं हे अर्पिली नवा ॥११ ॥ इति नवरत्नमाला समाप्त:। या अध्यायीं महाराजांनी। दंड स्पर्शतांचि तत्क्षणीं। नर्मदेसी शांतवुनी। भक्तजना सुखविलें ॥५७ ॥ ही कथा वर्णिली सुरस। पुढें वर्तलें जे विशेष। श्रोते ऐका सावकाश। पावन श्रीगुरु चरित्र ॥५८ ॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचितें। सप्तचत्वारिंशोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु॥ श्रीसद्गुरु वासुदेवार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय अठ्ठेचाळिसावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ व्हावया स्वरुप ज्ञान। नवरत्नमाला गुंफून। आत्मानात्मविचार प्रकर्ण। रचिलें स्वामींनीं ते ऐका ॥१ ॥ शिष्य होई सावधान। करुनिया एकाग्र मन। परियेसे कथितो आत्मज्ञान। जेणें अज्ञान निरसें हें ॥२ ॥ बाहेर नेत्र लावून। जें पाहसि तेंचि स्वप्न। व्यर्थ तयासी भुलून। आयुष्य खर्चून मरुं नके ॥३ ॥ पृथ्वी आप तेज वात। आकाश जाण पंचभूत। मायाशक्तीस्वर निर्मित। त्रिगुण युक्त असतीं हीं ॥४ ॥ प्रत्येकाचे अर्ध अर्ध भाग। करुनि अर्धांचें चार चार भाग। सोडोनि आपुला भाग। इतरार्ध भाग युक्त केले ॥५ ॥ ह्या पंची करणें जाण। ब्रह्मांड चौदा भुवन। चारी जीव खाणी आणि अन्न। करी निर्माण ईश्वर ॥६ ॥ हे विक्षेप नांवाची। ईश्वर शक्ती होय साची। वेदीं संज्ञा असे ईची। व्यावहारीक सत्य ॥७ ॥ जीवदेहीं रिघून। अहंकार तादात्म्य पावून। त्या द्वारा शरीर व्यापून। नेत्रीं राहून द्वैत पाहे ॥८ ॥ तें हें सर्व स्वप्न जाण। का जांसी याला भुलून। अजूनि होई सावधान। स्वरुपानु संधान ठेवी तूं ॥९ ॥ तूं म्हणसीं हें प्रत्यक्ष। मी पाहतो समक्ष। तरी तुज समाधी दक्ष। देईल साक्ष उलटचि ॥१० ॥ जैसा भिकारी जागेपणीं। स्वप्नी महाराज होवूनि। राज्यकरी संपदा भोगूनी। पुन्हः जागेपणीं भिकारी हा ॥११ ॥ मग ते राज्य आठवून। मी राज्यभ्रष्ट झालों म्हणून। तो करी कीं रोदन। तेवीं जाण संसार हा ॥१२ ॥ स्वप्नीं मद्यमांस भक्षिती। चांडाळीसीं रमती। ते प्रायश्चित घेती। जागेपणीं कीं ॥१३ ॥ कोणी एक

आपुला। जागेपणीं मेला। स्वप्नीं तोचि भेटला। हर्ष झाला अपार ॥१४॥ स्वप्नी कोणी स्वजन। मेला असें पाहून। रडत रडत जागा होऊन। त्या पाहून नच रडे ॥१५॥ कोणी भुके निजती। स्वप्नीं पोटभर जेविती। जागे होतां मागुती। तृप्त होती कीं तेणें ॥१६॥ स्वप्नी जें दिसें शुभ। जागेपणीं ते हो अशुभ। जागेपणी जे अशुभ। स्वप्नीं तें शुभ कधींही ॥१७॥ कधीं लग्न सोहळा पाहती। जागेपणीं कीं साच मानिती। स्वप्नी सर्प व्याघ्र पाहती। उठोनी पळती सत्य तें कीं ॥१८॥ क्षणमात्र निजती। मास लोटले पाहती। त्या गोष्टी साच होती। जागेपणीं कीं ॥१९॥ अतिसूक्ष्म नाडींत। हत्ती घोडें दिसती अमित। ते मानील कीं बुद्धिमंत। साच म्हणोनि ॥२०॥ तेवीं हा प्रपंच। न मानावा साच। जाणावा हा असत्यच। काळत्रयीं ॥२१॥ जें जें येथें ये घडोन। तें तें सर्व मिथ्या जाण। सर्व व्यापार सोडून। स्वरुपानु संधान करी तूं ॥२२॥ स्वरुपानुसंधान। व्हाया किजे मनः शोधन। देवगुरु सेवन। सदाचरण अनासक्तें ॥२३॥ हे हीं मिथ्या जसें स्वप्न। असें न मानो तुझें मन। जेवीं कित्येक स्वप्न। सत्य होय जागृतींत ॥२४॥ स्वप्नीं मंत्र उपदेशिला। तो जागेपणें सत्य झाला। स्वप्नीं देवे प्रसाद दिधला। जागृतीं झाला तोचि सत्य ॥२५॥ ऐसें अनुभव हजार। लोकीं आले साचार। स्वप्नाध्यायीं हा विचार। सारासार केला बा ॥२६॥ हा मी येथें जन्मलों। हा मी अमुक वाढलों। स्त्रीपुत्र संपत्ति युक्त झालों। मी झालों दैवबाणा ॥२७॥ ऐसें शुभाशुभ स्वप्न पहात। नानापरी बोरळत। स्वयें न हो जागृत। देव गुरु प्रसादा विना ॥२८॥ हा जीव असा

बोरळता। कनवाळू श्रुती माता। उपदेशी तत्वतां। त्याचा अधिकार जाणुनी ॥२९॥ जरी परमार्थी पराङ्मुख। तया कर्म मार्ग चोख। निष्कामपणे देख। श्रुतीसम्यक् बोलतसें ॥३०॥ जरीं कर्मी असोन। चंचळ असे अंतःकरण। तया उपासना सांगून। परमार्थीं लावी श्रुती ॥३१॥ जरी नित्यानित्य विचारून। इहभोगा दे सोडून। शम दमादी साधून। मुमुक्षु होऊन तळतळे ॥३२॥ तया ज्ञान व्हावें म्हणून। श्रवण आणि मनन। तयाचें निदिध्यासन। श्रुती सांगून बोधकरी ॥३३॥ हें जाणावें शुभस्वप्न। संसार जाणावा दुःस्वप्न। तेथें क्षणमात्र ही मन। सूज्ञ जन न धरिती ॥३४॥ तेव्हां तूं जागृत व्हावें म्हणून। संसार हें दुःस्वप्न। दे सर्वथा सोडून। ज्ञान जोडून कृतार्थ हो ॥३५॥ स्वधर्माचे आचरण। देवपूजा व्रतदान। फलाची इच्छा सोडून। करितां मन शुद्ध होय ॥३६॥ काया वाचा मनें करुन। न दुखवावें प्राणी जन। हिचें नाम अहिंसा जाण। ही आदरुन धरावी ॥३७॥ जे पाहिलें ऐकिलें जाण। तेंचि कीजे भाषण। जें यथार्थ कथन। हें सत्य जाण तारक ॥३८॥ पुढें अथवा माधारी। कोणाची ही न किजे चोरी। हेंचि अस्तेय अवधारी। हें अंतरीं आदरावी ॥३९॥ परिग्रह म्हणजे सांठा। तो करी सर्वथा तोटा। तो सांडणें तत्वतां। अपरिग्रह म्हणती योगी ॥४०॥ एका ग्रहस्था वांचून। काया वाचा मनें करून। द्यावें मैथून सोडून। हेंचि जाण ब्रह्मचर्य ॥४१॥ अहिंसा सत्य अस्तेय। अपरिग्रह ब्रह्मचर्य। हे पंचक यम होय। सेविजे निर्मायपणें हें ॥४२॥ स्वधर्मानुष्ठान हेंचि तप। स्वाध्याय म्हणजे गुरुमंत्र जप। मानसीं करितां अमूप। फळ तात्काळ मिळतसें ॥४३॥

मृज्जलानें बाह्य शौच। ईश्वरध्यानें आंतर शौच। ईश्वर प्रणीधान साच। सर्व करणें ईश्वरार्पण ॥४४॥ परिमित निद्रा आहार। हे होत नियम साचार। हें पाळावे सादर। वारंवार अभ्यासानें ॥४५॥ मृदु आसन घालून। समासन ठेवून। एकांतीं बसून। सगुणेश्वरध्यान करावें ॥४६॥ हृदय कमळ अधोवदन। तें करावे ऊर्ध्व वदन। सोहंमंत्र उच्चारून। प्रफुल्लित तें भाविजें ॥४७॥ त्यामध्यें विराजमान। रत्नजडित सिंहासन। त्यावरीं सगुण मूर्तिचे ध्यान। कीजे मन स्थिरवून ॥४८॥ पायाच्या तळव्यापासून। एका एका अंगाचे ध्यान। करावें लक्ष लावून। तें स्थिर होतां पुढें ध्यावें ॥४९॥ एवं मस्तकापर्यंत। संपूर्ण मूर्तीं चित्तांत। भरून घ्यावी सतत। स्थिरवून चित्त भावानें ॥५०॥ दुसऱ्या विषया आठवून। जरी सुटेल तें ध्यान। तरी पुन्हः मुळापासून। करावें चिंतन सावधानें ॥५१॥ मुख सुहास्य चिंतून। हास्य मात्र मनीं घ्यावें भरून। तोच मी परमानंद म्हणून। निश्चित चिंतन करावें ॥५२॥ जागृती स्वप्न निद्रा साक्षी। निर्विकारें वृत्ती लक्षी। तींनी देहा जो निरिक्षी। तो मी त्वं पदार्थ लक्ष्यार्थ ॥५३॥ स्थूल देह अन्नमय कोश। लिंगदेहीं तीन कोश। प्राणमय मनोमय विज्ञान मय। आनंदमय कारण देहीं ॥५४॥ ह्या पंचकोशाहून। मी वेगळा म्हणून। ह्यांचे धर्म मजला न। कळात्रयीं ॥५५॥ हा देह मी नोहे देख। मी नोहे कोणाचालेक। स्त्री पुरुष नपुंसक। काळत्रयीं मी नोहें ॥५६॥ मी नोहे कोणाचा संबंधी। नसे मला धर्माधर्म उपाधी। न स्पर्शे आधिव्याधि। काळत्रयीं ॥५७॥ नसे मला वर्णाश्रमादि। न शिवे मलाशीतोष्णादि। नसे मला जन्म-

मरणादि। षड्विकार रहित मी ।।५८।। नाम गोत्र नसें मला। रूपवर्ण नसे मला। मग आकार संस्कार कैंचा आला। सर्वदेवाचे विकार ।।५९।। धनक्षेत्र गृहाराम। नसे मला कुळधर्म। येथें कैचें आलें शर्म। नाहींच वर्म मजलागी ।।६०।। अन्नमय कोश विकार। हे मला नसती साचार। यांचा द्रष्टामीयाहूनि पर। निर्विकार निरामय ।।६१।। नाहीं भूक मला। न शिवे तहान मला। सबल दुर्बल न मी मला। देणें घेणें कांहींच ।।६२।। न मी बहिरा आंधळा। न मी नपुंसक पांगळा। हा दोष सगळा। प्राणमय कोशावरी ।।६३।। मी नोहे प्राणमय कोश। त्याचा द्रष्टा निर्दोष। नित्य तृप्त निर्विशेष। समरसेसी।।६४।। न शिवे मला वाग्जाल। नाहीं मला संकल्प। नाहीं मला विकल्प। न मी व्याकूल संशयानें ।।६५।। सुख दुःख क्षोभ। नाहीं नाहीं शोकभय लोभ। काम क्रोध मद दंभ। मोहमद भेद खेद ।।६६।। हर्ष विषाद मत्सर। न मला हे मनावर। विराजती मी तरी दूर। मनाहूनी ।।६७।। मी नोहे सुबुद्ध। मी नोहे दुर्बद्ध। नोहे ऊहापोह विद्ध। नोहे बुद्ध विशुद्ध मी ।।६८।। मी नोहे अवधानी। मी नोहे मानी। मी नोहे खंडज्ञानी। विज्ञान मयाचा साक्षी मी ।।६९।। म्हणोनि कर्तृत्वादिक। नसे मला हें अध्यासिक। विज्ञाना होनी मी पृथक्। आहे चिदेक रस मी हा ।।७०।। मी स्वयं प्रकाशमान। सूर्या समान भासमान। कैंचे मला अज्ञान। नाहीं आवरण विक्षेप ।।७१।। प्रिय मोद प्रमोद। माझे ठायी हा न भेद। म्हणोनि नसे मजला खेद। मी स्वच्छंद स्वतः सिद्ध ।।७२।। स्मृति विस्मृति न मला। हे धर्म असती त्याला। आनंदमय म्हणती ज्याला। आनंद विकार जीव मी न ।।७३।। अतएव न भोक्तृत्वादिक। मी अद्वितीय एक। पंचकोशाहून पृथक्।

परात्पर ॥७४ ॥ हा समुदाय। दृश्य हा ही मी न होय। याचा साक्षी मी तुरीय। स्वसंवेद्य निष्फल ॥७५ ॥ जो हा मी त्वंपदलक्ष्यार्थ। तोचि तो तत्पद लक्ष्यार्थ। तो अद्वयानंद अखंडार्थ। प्रत्यक भिन्न परमात्मा ॥७६ ॥ मठ उपाधीनें मठाकाश। घट उपाधीनें घटाकाश। दो उपाधीचा होता नाश। होतां आकाश एक जेवीं ॥७७ ॥ जेवीं मायोपाधीनें आत्मा शिव। अविद्योपाधीनें अनात्मा जीव। दोन्ही उपाधी जातां स्वयमेव। परात्मा परब्रह्ममी ॥७८ ॥ अज्ञानोपाधिकिंचिज्ञ जीव। मायोपाधि सर्वज्ञ शिव। दो उपाधीचा होतां अभाव। ना जीव ना शिव परमात्मा ॥७९ ॥ मायेनें जो परोक्ष। अज्ञानानें प्रत्यक्ष। अज्ञान माया जातां अपरोक्ष। तो मी प्रत्यक्ष निर्विकार ॥८० ॥ त्या उलट्या वृक्षीं। जीवशीव हें दोन पक्षी। जीवकर्म फळ भक्षी। शिवनिरिक्षी साक्षिपणें ॥८१ ॥ संपलें ते फळ भक्षण। आतां राहिलें साक्षीपण। निरसलें साक्ष्य संपूर्ण। ही आहे खूण स्वयंवेद्य ॥८२ ॥ असें मी सच्चिदानंद। नित्य शुद्धबुद्ध निर्भेद। नित्य मुक्त परमानंद। अनंत वेद वेद्य मी ॥८३ ॥ असें निरंतर चिंतन। करावें स्थिरवूनिया मन। दृढ होतां अनुसंधान। सिद्ध होई ॥८४ ॥ दुष्ट भावना नष्ट होती। ध्यानीं स्थिर होईमती। सहज ये समाधि स्थिती। अभ्यास पद्धती आदरितां ॥८५ ॥ अभ्यास काळातिरिक्त काळीं। बाह्य व्यवहार करते वेळीं। ममाहंतेची होळी। करीत असावें उदासी ॥८६ ॥ देह हा कर्माधिष्ठान। अहंकार कर्ता जाण। इंद्रियगण करण। पंचप्राण चेष्टा हेतू ॥८७ ॥ श्रोत्रादि इंद्रियांच्या। दिगादि देवतांचा। मेळणी त्रिविध कर्माचा। मग उगम होय ॥८८ ॥ कायेनें होतें तें कायिक। वाचेचें कर्म वाचिक। मनाचें कर्म मानसिक। त्रिविध कर्म हें जाण ॥८९ ॥

पांच हेतूनि ही तीन। कर्मे होती अनुदीन। येथें जीव नसून। म्हणे अध्यासून मी कर्ता ॥९० ॥ जें घडे पुण्यपाप। त्याचा अहंकारे घेई लेप। अंगीं लावूनी मग ताप। ये तो कल्पांती ही न चुके ॥९१ ॥ जे अहंपणा धरून। कर्मेंलिप्त होती जन। त्या ये फळें तीन। इष्टानिष्ट आणि मिश्र ॥९२ ॥ पुण्याचें इष्टफळ। मिळे स्वर्ग सुख केवळ। पुण्य संपतां तात्काळ। अधःपात होतसें ॥९३ ॥ पापफळ अनिष्ठ। नरक वास उत्कट। तिर्यग्योनी महाकष्ट। शीत वातोष्ण युक्तची ॥९४ ॥ पापपुण्य समान। मिश्रफळ दे जनन। सुखदुःख मिश्रित जाण। मनुष्यत्व भूलोकीं ॥९५ ॥ नरक स्वर्ग मोक्षाचे। येथें तीन मार्ग लोकाचें। जे जन सात्विक साचे। ते ह्याचें वर्म जाणती ॥९६ ॥ काम क्रोध लोभादिक। जे आदरती अविवेक। त्यांना घडे पातक। केवळ नरकवासी ते ॥९७ ॥ शास्त्रोक्त न करिती। निषिद्धातें आदरती। त्यांना ये अधोगती। मग मुक्ती कैंची त्यांना ॥९८ ॥ फलाभिलाष धरून। जे करिती पुण्याचरण। ते स्वर्गी गेले जरी जाण। संसार भ्रमण न चुकेची ॥९९ ॥ म्हणोनि कामादिक त्यजून। घ्यावीं इंद्रियें आवरून। मन करुन समाधान। प्रेमें भजावें ईश्वरा ॥१०० ॥ सर्वभूतीं तो जाणून। सर्वां द्यावें अभयदान। हेंचि तयाचें पूजन। पुन्हः जनननच दे जें ॥१०१ ॥ ईश्वर प्रसादें स्वानु संधान। लागें तें तोडी भवबंधन। हें मानव जन्माचें सार्थक जाण। तो कृपण हें नकरी जो ॥१०२ ॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचितें। अष्टचत्वारिंशोध्याय गोड हा ॥ श्रीकृष्णार्पण मस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥

## ॥ अध्याय एकोणपन्नासावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ सद्गुरु जाणा सुकर्णधार। शिष्या देऊनि ज्ञान सार। पोंचवी भवाब्धिपार। उपकार कर्ता न अन्य असा ॥१॥ आत्मानात्म विचार प्रकर्णाचा। उत्तरभाग स्वामींनीं साचा। रचिलासें उद्धाराचा। मार्ग दावाया भक्त जना ॥२॥ श्रीदत्तात्रय गुरुचे गुरू। स्वभक्तांचें कल्पतरूं। वंदूनि भावाब्धि तारूं। वेदांत निरोपितो स्वल्प ॥३॥ गुरुवीण नोहे ज्ञान। ऐसें श्रुतीचें वचन। हें मानूनि निरुपण। करितों गुरु शिष्य संवादे ॥४॥ शिष्य गुरुसी पुसतसें। ही सृष्टी कोण करितसें। किंवा स्वभावें होतसें। संशय होतसे हा फेडा ॥५॥ गुरु म्हणे समाधान। एकाग्र करुनिया मन। परिसें करितो निरुपण। वेद प्रमाण घेवोनि ॥६॥ श्वासापरी अनायासानें। वेद कथिला ईश्वरानें। त्याला पौरुषेय म्हणणें। न साजे अन्या धारापरी ॥७॥ संहिता ब्राह्मण अरण। ही तिन्हीही मिळोन। हा वेद अंगे जाण। शिक्षादिक सहाची ॥८॥ कर्म उपासना ज्ञान। तीन कांडें वेदांची जाण। स्मृति इतिहास पुराण। वेदाधारें पसरले ॥९॥ त्या स्वतः प्रमाण वेदाचे। मत हें ऐक तूं साचें। हें ठाणें समाधानाचे। सत्य त्रिवाचे बोलतो ॥१०॥ जीगारा केलेली माती। तिचे पुढें घडे होती। घड्या पूर्वि जी माती। मध्यें अंती 'तीच एक ॥११॥ सृष्टी पूर्वि विश्वहेंच। अद्वितीय ब्रह्म एकच। नामरुप हीं नव्हतीच। जिव्हा मन नसल्यामुळें ॥१२॥ शिष्या तुझ्या समजुतीस। पूर्वी ह्या काळ बाधकास। बोलिलों परी तेव्हां खास। काळ न द्वैतास दाविणार ॥१३॥ निर्विकारा न घडे सर्जन। मायेस

हिताचे ग्रहण। करिता नये द्वैतपण। शक्ति जाण अवस्तु माया॥१४॥ शक्ति शक्तिमंता अभेद। मिथ्या प्रति बिंबेनभेद। नये चंद्रा निर्विवाद। मायेनें भेद न तसा ब्रह्मा॥१५॥ जे उपाधीनें भासें। ते उपाधी नासतां नासे। त्याणें द्वैत येईल कसे। खऱ्या स्वरुपा॥१६॥ जे अनिर्वचनीय शक्ति। ती वेदांती माया म्हणती। असे ब्रह्माधीन ती। तेणें अद्वैत येत नसे॥१७॥ त्या माया शक्तीयुक्त। ब्रह्म हो अव्याकृत। हे जगद्बीज अव्यक्त। त्रिगुणात्मक होतसे॥१८॥ त्यापासूनि शब्दयुक्त आकाश। त्यापासून वायूस शब्दस्पर्श। त्यापासून अग्नी खास। शब्द स्पर्शरुप गुणें॥१९॥ सशब्द स्पर्शरुप रस। जल उपजे त्या पासाव खास। सशब्द स्पर्श रुप रस। गंधभूमी॥२०॥ कारण गुण कार्या येती। तसे माया गुण पंचभूती। म्हणूनि त्रिगुणात्मक होती। पंचभूतें तीं मायीक॥२१॥ प्रत्येकाचे सत्वांशे करुन। श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा घ्राण। पंचज्ञानेंद्रिय होतीं जाण। अंतःकरण सत्वांशैक्यानें॥२२॥ निर्विकल्प अंतःकरण। संकल्पात्मक मन। निश्चयात्मक बुद्धी जाण। अनुसंधान रुपीं चित्त॥२३॥ अहंकार मी पण। हे पंच विध अंतःकरण। प्रत्येक रजांशानें जाण। कर्मेंद्रियें पांचही॥२४॥ वाचा हस्त पाद। लिंग आणि गुद। रजों शैकें प्राण भेद। पंच तयांचे वृत्तीनें॥२५॥ यांचे देवता विषय। एक ब्रह्मचि स्वयें होय। प्राणेंद्रियांतः करण समुदाय। लिंग शरीर होय सूक्ष्म॥२६॥ पंच भूताचे दोन दोन भाग। एका एका अर्धाचे चार भाग। करोनि दुसऱ्या अर्धांशीं योग। करिता होय पंचीकरण॥२७॥ ह्या पंची कृता पासून उद्भिज। स्वेद जांडज जारज। होती चौदा लोक

विराज। सर्व एक मिळोन ॥२८॥ ह्या चारी देहांत। जीवरुपे ब्रह्मरिघत। कर्तृत्व भोक्तृत्व पावत। मोक्षापर्यंत द्वैत भावे ॥२९॥ श्रीदत्त। जाग्रत्स्वप्न सुषुप्ति। दैनंदिन व्यवहार म्हणती। जन्म घेणें हें वेदांती। म्हणती जन्मांतर स्वीकार ॥३०॥ हा जीवाचा संसार। ईश्वर सृष्टीवर। अहंता ममतादि व्यवहार। हे प्रातिभासिक जीवसृष्टी ॥३१॥ पारमार्थीक ब्रह्मावर। ईशसृष्टी अनिवार। हा व्यवहारीक संसार। ईश्वराचा ॥३२॥ हे सर्वही द्वैत। निवारिजे होवूनि अद्वैत। तरीच होय सदोदीत। सच्चिदानंद नि जांगें ॥३३॥ सर्वाधिष्ठान ब्रह्मजे धवा। विवेके कळे तेधवा। करोनि द्वैता भावा। होय सच्चिदानंद नि जांगें ॥३४॥ ब्रह्मचि सर्वाधिष्ठान। तेचि उत्पत्ती स्थिती लय कारण। म्हणोनि त्या एकाचे ज्ञान। होताच सर्वज्ञान होतसे ॥३५॥ अत एव वेदांत मत। सिद्धीकरी अद्वैत। तार्किका दिकांचा सिद्धांत। घेतां अद्वैत साधेना ॥३६॥ प्रकृती पुरुष विवेक। तत्व विचार करितां चोख। मोक्ष होतो हालेख। सांख्याचा एकत्व न दावी ॥३७॥ पुरुष हा उदासीन। प्रकृती जगत्कारण। प्रतिशरीरीं भोक्ता जीव भिन्न। जगत्सत्य जाण हें साख्य मत ॥३८॥ स्वये प्रकृती जड असोन। ती केवी करील जगदुत्पादन। न चालतीचे तनावीण। अचेतन रथादिक ॥३९॥ तूं म्हणशील स्तनांतून। दूध वाहे अचेतन। जळही स्वयें जातें वाहून। हें ही जाण ईश्वरेच्छा ॥४०॥ तीन गुण समान। हे सांख्य प्रकृती प्रधान। तया नसता प्रेरक चेतन। केवी गुण विभाग होईल ॥४१॥ गाईचे पोटीं तृण। दुग्ध होतें तेवीं प्रधान। जगदाकार होऊन। स्वयमेव राहे म्हणसी जरी ॥४२॥ तरी हे ही न घडेल।

तृण खाईल बैल। त्याचे दुग्धाकीं होईल। तसे न होईल प्रकृती जगत्॥४३॥ जसा स्वयें आंधळा। चालवी डोळस पांगुळा। तेवी पुरुष प्रकृतीला। चालवी म्हणो तरी न घडो॥४४॥ ऐसा जन उपदेश। आत्मानात्म विचाराभ्यास। प्रकरण वर्णनीं विशेष। स्वामींनी केला या अध्यायीं॥४५॥ तैशीच चित्त सब्दोध नक्षत्रमाला। बोधप्रद मुमुक्षुला। स्वामी रचिती या ठायाला। ती ऐकावी श्रोतें जनीं॥४६॥ कुसंग श्रये बास्वयें आत्मघात। तुवां सत्य केला कुशीला खचीत। अध:पात येईल मत्ता स्वचित्ता। त्वरें आदरें तूं स्मरे नित्य दत्ता॥१॥ भला लाधला हा तुला श्रेष्ठ देह। परी ठेविला व्यर्थ तूं येथमोह। अहंकार योगें घडेघात चित्ता। त्वरें॰॥२॥ अहंकार योगे घडे कर्तृत्वादि। अहंकार योगें घडे भोक्तृतादि। अहंकार योगें ममत्वादि चित्ता। त्वरें॰॥३॥ अहंकार हा आत्मा हा खालि नेतो। अहंकार हा ज्ञान हा ऊर्ध्व नेतो। अहंकार सोडूनि दे शीघ्र चित्ता। त्वरें॰॥४॥ अहंकार योगें घडे कोप ताप। अहंकार योगें घडे पाप लेप। अहंकार योगें जगीं घातचित्ता। त्वरें॰॥५॥ अहंकार हा धर्म हा शत्रु आहे। अहंकार हा पाप हा मित्र आहे। अहंकार सात्वीक हो मित्र चित्ता। त्वरें॰॥६॥ अहंकार हा बोलिजे त्रि प्रकार। अहंकार हा बंध दे द्वि प्रकार। तयाचा करी तूं प्रती कारचित्ता। त्वरे॰॥७॥ शरिरादिकी जो अहंकार थोर। अती घोर तोची तमाचा विकार। भ्रमालस्य तंद्रादि देतोचि चित्ता। त्वरें॰॥८॥ सदा क्रोध लोभ प्रयत्नादि दे जो॥ सदा पातकोत्पत्ति येथें करी जो। तया राजसा सर्वथा सोडिचित्ता।त्वरे॰॥९॥ तुला लाधलें हें भले मुक्ति पर्व। परी अंतरीं तूं

धरिसीच गर्व। तुझे षड्रिपू घातकी होति चित्ता। त्वरें० ॥१०॥ तुला खंडिती मुंडिती याम्यदूत। तुला दंडिती फाडिती होसी भूत। प्रभूत्त श्रमेंकष्टता कोण त्राता। त्वरें० ॥११॥ दुराशा धरूनी तुवां पाप केलें। तयाच्या नियोगें तुला जन्म आलें। असें पूढती पूढती होय चित्ता। त्वरें० ॥१२॥ सुत स्त्री स्व माझे असें हें ममत्व। तसे मांसपिंडावरी ही अहंत्व। तुवां ठेविल्यानें तुला दुःखचित्ता। त्वरें० ॥१३॥ कुणाचें सुत स्त्री कुणाची विचारी। कुणाचें धन क्षेत्र होई विचारी। विचारांति मिथ्याचि हो सर्व चित्ता। त्वतें० ॥१४॥ ममत्वें सुतादीकहे आदरावे। जयानें तयानें भ्रमानें मरावें। पुढें हीं तसें होतसे खास चित्ता। त्वरें० ॥१५॥ तुला या भ्रमें सद्गती लोकीं हो कीं। नको आदरुं प्रेमसंबंध लोकीं। सुख स्वप्न व तुच्छ हें सोड चित्ता। त्वरे० ॥१६॥ नको मान पूजेची लोकांत इच्छा। प्रतिष्ठाहि विष्ठा समानाचि तुच्छा। न पृच्छा करीं व्यर्थं तूं लोकिं चित्ता। त्वरें० ॥१७॥ सुविद्वान्धनी मी गुणी मानि मोठा। असा तूं न ठेवी वृथा गर्व ताठा। नमी सर्व भूतासि होलीन चित्तां। त्वरे० ॥१८॥ नको होवूं तूं लोक निंदेस पात्र। नको लोक निंदा करूं होसुपात्र। पवित्र प्रभूच्या कृपेला सुचित्ता। त्वरें० ॥१९॥ जनीं निंद्यतें सोडितां योग्यता ये। जनीं वंद्यतें सेवितां योग्यता ये। जनीं वंद्यता तूंन इच्छी सुचित्ता।त्वरें० ॥२०॥ सदा संगती दुर्जनाची त्य जावीं। सदा संगती सज्जनाची धरावी। धरावी गुरु सेवनीं प्रीति चित्ता। त्वरें० ॥२१॥ सदा सत्ववृत्ती धरोनि असावें। सदा

सात्विका मार्जि यत्नें बसावें। बसावें न त्या स्त्रैण पंक्तीस चित्ता। त्वरें० ॥२२॥ भ्रमालस्य निद्रादिकाते त्यजावें। हरी कीर्तनी प्रेम निःसीम व्हावें। मनीं आळवावे हरीला सुचित्ता। त्वरें० ॥२३॥ कथा कीर्तनीं अंगि रोमांच यावे। गळा दाटुनी नेत्र दोनी गळावे। पळावें वपुर्भा न भावेंचिचित्ता। त्वरें० ॥२४॥ असें सात्विक प्रेम येतां अहंता। गळे तैं टळे सर्व संसार चिंता। हरीच्या प्रसादें मिळे मुक्ति चित्ता। त्वरे० ॥२५॥ गुरुदेव हे एक मानूनि भक्ती। तयाची करी त्या करी येई मुक्ती। सुयुक्ति अशी ही धरी नित्य चित्ता। त्वरें० ॥२६॥ असी चित्तसद्बोध नक्षत्र माला। गळा घालिती ते न भीतील काळा। बळांमुक्ति घालील रत्नाचि माळा। गळां त्यांचिया जीन पाहील वेळा ॥२७॥ येणेंपरी उपदेश पर। मुमुक्षुस्तव ज्ञानसार। नक्षत्रमाला साचार। रचिती स्वामी ते ठायीं ॥७४॥ असो नित्य नवे भक्त। येती स्वामी दर्शनार्थ। त्या विंध्याद्रि उपवनांत। अगणित होय संतर्पण ॥७५॥ जें अन्न लक्ष्मीवान् गृहीं। अप्राप्त नैमित्तिक समयीं। तें नित्य सेविती या ठायी। नवलाई वैराग्य भाग्याची ॥७६॥ एके दिनीं स्वामी दर्शना। पातली एक स्त्री जाणा। श्रीफळ देऊनि उपायना। भावें नमन करितसें ॥७७॥ उपायन समयीं ती। दक्षिणे बद्दल चित्तीं। म्हणे महाराजा पुढती। अर्धमुद्रिका ठेवावी ॥७८॥ समीप होती बहुत नाणीं। अर्धमुद्रिका समजूनी। त्यांतील एक मोहोर चुकूनी। स्वामी पुढें ठे-

वतसे ॥७९॥ पंधरा रुपयाची मोहोर। पुढें ठेविली साचार। बाई शंकली मनीं थोर पाहूनि स्वामी बोलती ॥८०॥ ती घेऊनि जा बाई। म्हणूनि श्रीफल लवलाही। प्रसाद देती तीस पाही। परी ती मोहोर घेईना ॥८१॥ म्हणे जी स्वामीपदीं अर्पण। ती मी घेऊं कीं कारण। प्रसाद श्रीफळ घेऊन। गृहीं आणून फोडीतसे ॥८२॥ तो मोहोर श्रीफळातूनी। बाहेर पडली तत्क्षणीं। आश्चर्य पावली मनीं। म्हणे माझी मज मिळाली ॥८३॥ इतुक्यांत एक गृहस्थ। आला स्वामी दर्शनार्थ। हस्त जोडूनि प्रश्न करित। कर संपूट जोडुनी ॥८४॥ म्हणे भक्ती व ज्ञान। हें परस्पर असें कीं भिन्न। ज्ञानें भक्ती होय उत्पन्न। कीं भक्तीनें ज्ञानोत्पत्ती ॥८५॥ ऐकूनि तयाचा प्रश्न। स्वामी म्हणती तया लागून। नांगरिता उत्तम जमीन। पिका बद्दल शंका नको ॥८६॥ जेवीं स्वार्थ कर्में। आपण करितों नियमें। वर्णाश्रमोचित कर्में। तैशींच करणें परियेसा ॥८७॥ ती प्रेमपूर्वक ब्रह्मार्पण। करावीं निष्काम होऊन। तरींच ती भक्ती जाण। वैराग्या पुत्रा प्रसवें ॥८८॥ वैराग्योदरी ज्ञान। होतसें तात्काळ उत्पन्न। भगवद्गीते माजीं जाण। चार भक्ती प्रकार कथिलें ॥८९॥ ते भक्त कामनारुपानें। परी ज्या कामना त्यागबाणें। तोचि पराभक्तीनें। भक्त झाला भगवंताचा ॥९०॥ ऐसें स्वामीचें वचन। ऐकूनि तो गृहस्थ जाण। पुनश्च हस्त जोडून। प्रार्थीतसें अवधारा ॥९१॥ म्हणे मी आज पर्यंत। कवडी मोलानें व्यर्थ।

आयुष्य वेंचिलें प्रपंचा सक्त। होऊनिया महाराजा ॥९२॥ सद्गुरुचें झालें दर्शन। आतां करणें पावन। चतुर्थाश्रम देऊन। मज लागीं स्वामीया ॥९३॥ तद्वचन ऐकूनि हास्य वक्त्र। ते म्हणती शरीर क्षेत्र। करणें नांगरुनी पवित्र। गायत्री पुनश्चरणानें ॥९४॥ मग स्वतः तुम्हा आश्रम। घेतां येईल उत्तम। पुरश्चरण प्रथम। करा शास्त्रोक्त पद्धती ॥९५॥ महाराजांचा मनोदय। जाणूनि पुन्हः सविनय। म्हणे दासाचा भाग्योदय। नाम मंत्रोपदेशे व्हावा ॥९६॥ ऐकूनि त्याची विनंती। हरिनाम मंत्रोपदेशिती। आनंद झाला तच्चित्तीं। श्रीगुरु मूर्तीसी नमस्कारीं ॥९७॥ असो अनेक भक्त जन। स्वामी दर्शनें होती पावन। श्रीगरुडेश्वर सिद्ध स्थान। चातुर्मास पुण्यकालीं ॥९८॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचिती। पंचाशतमोध्याय गोड हा॥ श्रीकृष्णार्पण मस्तु। श्रीसद्गुरु वासुदेवार्पण मस्तु। ॐ तत्सत् ब्रह्मार्पण मस्तु॥ श्रीगुरुदेव दत्त॥

* * *

## ॥ अध्याय पन्नासावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ श्रीगुरु चरित्र अती गोड। श्रवण मात्रें मनीचे कोड। पुरे जया मोक्षाची चाड। लाधे अखंड तयासी ॥१ ॥ स्वामी समीपची वारूळांतूनि। वास्तव्य जया स्थानीं। विकट सर्प बाहेर येऊनि। फिरतां जन घाबरलें ॥२ ॥ जाहली एकचि धांदल। गाळण उडाली पळापळ। सुरुं होय तात्काळ। स्वामी मठा बाहेर येती ॥३ ॥ त्याच्या अंगावरून। निज हस्त फिरवून। म्हणती तया अवेळीं जाण। बाहेर कां आलासी ॥४ ॥ या समयीं बाहेर। पाहूनि तुज नारी नर। घाबरलें असती साचार। निजागारीं जाईकसा ॥५ ॥ ऐकूनि तयांचें वचन। तो वारूळांत गेला तत्क्षण। हा चमत्कार पाहून। आश्चर्य वाटलें सकळिकां ॥६ ॥ ज्याचें शुद्ध चित्त। त्या अरि मित्र सम होत। व्याघ्र सर्पही लीन होत। तया नरा पाहुनी ॥७ ॥ ऐसें श्रीगुरु चरित्र अपार। वर्णितां शिणें भूधर। तेथें मंदमती पामर। केवीं वर्णूं शकें जाणा ॥८ ॥ श्रीगरुडेश्वर क्षेत्रधामीं। एक संवत्सर स्वामी। राहिले असतां सत्पथ गामीं। जन दर्शना येत असती ॥९ ॥ स्वामी शरीरीं विकार। उद्भवला साचार। जया म्हणती अतिसार। सौच समयीं रक्त पडे ॥१० ॥ अनेक भवदव संतप्त। जन कामना करूनि तृप्त। स्वामी कष्ट भोगित। देह प्रारब्धानुसारें ॥११ ॥ हें वर्तमान श्रीवाडीस। कळतां पुजाऱ्यांनी श्रीस। संततधार अभिषेक

विशेष। स्वामी आरोग्यार्थ आरंभिला ॥१२॥ परि स्वामीनीं पत्रद्वारें। त्यांना कळविलें निर्धारें। येणें कांहीं न होय बरें। किमर्थ श्रीस त्रासवितां ॥१३॥ स्वमुखें म्हणती भक्तांसी। आतां येथूनि अन्य स्थळासी। जाणे नाहीं निश्चयेसी। येथेंचि वास करुं आम्हीं ॥१४॥ या वचनाचा अर्थ। कोणालाही यथार्थ। कळला नाहीं निश्चित। यातचि संकेतार्थ होतां ॥१५॥ दिवसें दिवस शरीर। होऊं लागले क्षीण फार। परी नित्य नेम साचार। ढळला नाहीं कधींही ॥१६॥ स्वतः कधी कधीं भजन। करिती प्रेमपूर्वक जाण। त्यांची म्हणण्याची अष्टकें जाण। श्रवण करितों श्रोतियांसी ॥१७॥ भावें नमू श्रीगुरुच्या पदांसी। भजनी हें अष्टक परियेसीं। आवडते होतें महाराजांसी। तैंसेच पद सांगतों ॥१८॥ तुजलामी शरण श्रीपादराज। हें करुणारस भरित आवाज। काढूनि गाती स्वामी राज। श्रीदत्त मूर्ती पुढें ॥१९॥ तुकारामाचेही अभंग। गाती प्रेमपूर्वक सांग। तयांचा भजन रंग। दुर्लभ असें पहावया ॥२०॥ स्वतः कर्मनिष्ट असूनि। मन श्रीदत्त उपासनीं। तैसेंच पूर्ण आत्मज्ञानी। इतरां दुर्लभ ऐशीं स्थिती ॥२१॥ कर्मिष्ठानें पाहतां स्वामींसी। पूर्ण कर्मिष्ठ भासती त्यासी। देवभक्तें पाहतां परियेसी। दिसती पूर्ण श्रीदत्तभक्त ॥२२॥ स्वमुखें सांगती सकळांसी। कित्येक समयीं परियेसी। अन्य न कांहीं आपणापाशीं। श्रीदत्त नामा वांचुनी ॥२३॥ ऐशीं दत्त नाम स्मरण भक्ती। स्वामीपाशी पूर्ण होती। तेणें आत्माज्ञानें ही वस्ती। चित्तीं केली तयांच्या ॥२४॥ तेणें ते पूर्ण आत्मज्ञानी। आत्मज्ञाला येती दिसूनि। ह्या तिन्हीं स्थितीची मिळवणी। एके स्थानीं होणे दुर्घट ॥२५॥ जेथ

अती कर्मठता। तेथ भक्तीची शून्यता। जेथ भक्तीची विपुलता। तेथ कर्मकांड कोण पुसें ॥२६ ॥ जेथ ज्ञानाची बडबड। तेथ भक्ती असणें हे अवघड। परी स्वामीपाशीं होती सांगड। कर्मभक्ती ज्ञानाची ॥२७ ॥ विध्युक्त कर्म करणें। ईश भजनीं सादर राहणें। आत्म स्वरुपानुसंधान ठेवणें। ऐशीं शिकवण द्यावया ॥२८ ॥ स्वयें विध्युक्त कर्मे करिती। श्रीदत्त भजनीं सादर होती। आत्मज्ञान ही कथिती। पुराण पद्धतीं नुरुप ॥२९ ॥ असों स्वामींचे शरीर अशक्त। झालें पाहूनि अनेक भक्त। येती नित्य दर्शनार्थ। यथोचित सेवा करिती ॥३० ॥ ऐसें क्रमितां कांहीं दिन। पाहूनियां उत्तरायण। विचार करिती जाण। देह विसर्जन करावया ॥३१ ॥ नृसिंहवाडीचें आप्पा शास्त्रीं। वास करिती श्रीगरुडेश्वर क्षेत्रीं। तयाना पाचारिती रात्रीं। म्हणती कोणीतरी प्रयोग ॥३२ ॥ केला दिसें या शरिरीं। परी तो भोगूं अवधारी। आमुची प्रीती देहावरी। नाहीं निर्धारी सांगतों ॥३३ ॥ तुम्हीं यास्तव यत्न न करा। हा शरीर भोग अवधारा। शंकराचार्यांनीं ही सारा। भोगिला असें तद्वत ॥३४ ॥ आम्हींही भोगूं खास। तुमचें स्वस्थ असूंदे मानस। नाहीं आतां देहाची आस। भगवत्पदांस ध्यात जा ॥३५ ॥ राजमहेंद्रीचें ब्रह्मानंद यती। स्वामी सन्निध वसती। त्यांना समीप पाचारिती। सांगती श्रीदत्त नाम घ्यावयां ॥३६ ॥ सांगूनिया येणेंपरी। जेष्ठ आमावस्या होतां पुरी। सायांकाळीं मंगळवारी। दशघटी निशीं झालिया ॥३७ ॥ अठराशें छत्तीस शकाद्ब। उत्तरायण पक्ष शुद्ध। आर्द्रा नक्षत्र प्रसिद्ध। सुसमय साधुनी ॥३८ ॥ नर्मदा तीरीं नामीं। पूर्वरात्रीं स्वामी। श्रीगरुडेश्वर क्षेत्र धामीं। अखंड समाधी साधिती ॥३९ ॥

सद्गुरुनीं देह उपाधी। सोडूनि अखंड समाधी। घेतली जाणूनि भक्तवृंदी। विकळता पातली ॥४० ॥ कोणालाही कळूं न देतां। सद्गुरु समाधिस्त अवचिता। झाले पाहूनि भक्त चित्तां। विकळता पातली ॥४१ ॥ अवघ्या आठ वर्षांतच। परमार्थरुप प्रपंच। करुनि स्वामिंनीं तत्संकोच। केला एका एकीं जाणुनी ॥४२ ॥ भक्तजन अत्यंत। होतें झालें दुःखीत। स्वामी शिष्य असंख्यात। तळमळती वार्ता ऐकूनि ॥४३ ।. परी जे जे प्रेमळ भक्त। तयाना स्वामी दृष्टांत। देऊनि स्वप्न सांगत। कोती बुद्धी न धरा मनीं ॥४४ ॥ मद्देह तुमच्या दृष्टीं आड। झाला तरी मी अखंड। व्यापक असें भजनीं आवड। धरा मनीचें कोड पुरेल ॥४५ ॥ भक्त जनातें तळमळ। लागली पाहूनि तत्काळ। त्यांची धरूनि कळकळ। गुज सांगे श्रीगुरु माऊली ॥४६ ॥ सगुण रुपें साचार। अनेक भक्ताचा उद्धार। करुनिया सद्गुरु वर। निर्गुण रुप स्वीकारिती ॥४७ ॥ सद्गुरु परब्रह्म साक्षात्। चराचरी ओतप्रोत। भरूनि राहिला निश्चित। जगदाकारे नटलासें ॥४८ ॥ परी असंभावना। तैशींच विपरीत भावना। आड येतसें तेणें जाणा। उणेपणा साक्षात्कारा ॥४९ ॥ यास्तव सद्गुरू भजन। तल्लिलेचें श्रवण। तैंसेच तत्गुण कीर्तन। नरे करितां अत्यादरें ॥५० ॥ करितां तन्मंत्र जपा। नलगे करावया तपा। निश्चये होय सद्गुरु कृपा । येणें सोपामुक्ति पंथ ॥५१ ॥ हेंचि मुख्य वर्म। व्हावयानिज शर्म। भाविका लागीं उत्तम। सुगम असें जाणावें ॥५२ ॥ श्रीगुरुचरित्र अपार। यथामती वर्णिलें साचार। त्यांच्याच कृपे विस्तार। झाला येथवरी ग्रंथाचा ॥५३ ॥ त्या वासुदेव सद्गुरुपदीं। काया वाचा सहित बुद्धीं। अर्पूनि गोपाळ

मंदधी। लीन होऊनि नमस्कारी ॥५४॥ माझें कुळीचें कुळदैवत। श्रीमंगेश महालक्ष्मी ख्यात। तिजला वंदूनि आतां। ग्रंथ संपूर्ण करितसें ॥५५॥ ऋग्वेदीची शाकल शाखा। अश्वलायन सूत्र देखा। कौंडण्य गोत्र ऐका। उपनाम देखा राजाध्यक्ष ॥५६॥ आमुचिता वंशास। पंडित पदवी असे खास। रत्नाकर सिंधूतिरीं विशेष। रत्नागिरी शहरा माजीं ॥५७॥ सोलगांव जया नाम। तोंच जाणा निवास ग्राम। त्या ग्राम देवतेसी प्रणाम। करुनि ग्रंथ पूर्ण करितों ॥५८॥ तोचि हा सद्गुरुचा ग्रंथ। श्रीवासुदेवानंद सरस्वति दत्त। यांचे पट्ट शिष्य श्रीनृसिंह सरस्वति प्रख्यात। हे सर्वां विदित असें ॥५९॥ ह्या गुरु शिष्य सद्गुरुचें चरणीं। तैसेंच मम कुल दैवत जाणी। श्रीलक्ष्मी व्यंकटेश दत्त चरणीं। विनवीतसें परियेसा ॥६०॥ हा गणेश लक्ष्मी तनय दत्तात्रय। आपण पदरीं घेतला वारिला अपाय। ही सेवा मान्य कराल हा निश्चय। धरूनि लोटांगण घालीतसें ॥६१॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वति चरित्रामृतें। गोपाळबुवा विरचितें। पंचशतमोध्याय गोड हा ॥ श्रीकृष्णार्पण मस्तु। श्री सद्गुरुनाथार्पण मस्तु ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

* * *

## ॥ अध्याय एक्कावनावा ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ अपार गुरुचें चरित्र। वर्णू न शके चतुर्वत्क्र। यथामती तावन्मात्र। तत्प्रसादेची निरोपिलें ॥१ ॥ आतां अवतरणिकासार। कथिली असें साचार। प्रथमाध्यायीं श्रीगुरु वर। जन्मले गणेश विप्रगृहीं ॥२ ॥ होऊनि वेद संपन्न। विप्राचारें वर्तन। करीत असतां अनुदीन। नृप कुलोत्पन्न स्त्रीयेईं ॥३ ॥ तत्पिशाच्च पीडा हरण। करिती दुसऱ्या अध्यायीं जाण। तिसऱ्या अध्यायीं गृहस्थ होऊन। श्रीदत्त दर्शन होय ती कथा ॥४ ॥ चौथें अध्यायीं मातुल सुत। झाला पाहुनि मृत। त्या कृपा दृष्टीनें उठवीत। करिती शांतवन विप्राचें ॥५ ॥ पांचवें अध्यायीं कथा। श्रीदत्तें आज्ञापिता। निघाली जावया उत्तर पंथा। मातेलागीं वांदुनी ॥६ ॥ सहावें अध्यायीं मातेसी। कथा सांगितली परियेसी। चोवीस गुरु यदूसी। जे अवधूतें कथियेलें ॥७ ॥ तें सर्व निरुपण। नवव्या अध्याया पर्यंत जाण। स्त्री सह स्मार्ताग्नी घेऊन। आले नृसिंह वाडीला ॥८ ॥ स्त्री होवूनि प्रसूत। पुत्र झाला परीमृत। होय अल्प काळेंची तेथ। समाधिस्त होती गोविंद यती ॥९ ॥ त्याचा देह संस्कार करूनि। आलें करवीर क्षेत्रास्थानीं। श्रीमहालक्ष्मीसी वंदुनी। पंढरी क्षेत्रां पातलें ॥१० ॥ ती कथा दहाव्या अध्यायीं। वानप्रस्थाश्रमीं होती पाहीं। स्त्री समागमें लवलाहीं। गोदावरी तिरीं आलें ॥११ ॥ गंगाखेड ग्रामीं रहाती। स्त्रीप्रश्न करी एकांती। तीस कथा सांगती। मुरली आख्यान समग्र ॥१२ ॥ तेथें तीस सद्गती। देऊनिया चतुर्थाश्रमीं होती। अकराव्या बाराव्यांत पूर्ती। कथा असें ही

जाणा ॥१३॥ तेराव्या अध्यायीं कथा जाण। नारायणानंद यती पासून। करिती दंड धारण। अवंतिका क्षेत्रां माझारीं ॥१४॥ मार्गीं नवज्वर भोगिती। अन्नपूर्णा बाईची प्रपंच स्थिती। ह्या कथाही निश्चिती। असती तेराव्या अध्यायीं ॥१५॥ चौदाव्या अध्यायीं। अवंतिका क्षेत्रीं पाहीं। श्रीगुरु समीप शिक्षण कांहीं। घेती चतुर्थाश्रमाचें ॥१६॥ चातुर्मास करुनी वस्ती। जनामाजीं मिरविती। वासुदेवानंद सरस्वति। नामाभिधान आपुलें ॥१७॥ आले तेथूनि क्षिप्रातिरीं। महत्तपूर ग्रामांतरी। राहरी चातुर्मासवरी। अज्ञान दवडिती विप्राचें ॥१८॥ सांगती ब्रह्मनिष्ठ स्थिती। सारंगपुरातें येती। धनिक विप्रा श्रीदत्तमूर्ती। देऊनी जालवणास आले ॥१९॥ गंगातटीं ब्रह्मावर्त। क्षेत्रीं चातुर्मास रहात। मग हरिद्वारा येत। जगद्धोरार्थ विचरती ॥२०॥ तेथेंही चातुर्मास करुनि। निघती जावया बदरीवनीं। ह्या सविस्तर कथा वर्णनीं। चौदाव्या अध्यायीं पूर्ण। बदरिकाश्रमांतील यात्रा। करूनि ब्रह्मावर्त क्षेत्रा। माजी येऊनि विप्रां। सदूपदेशें तोषविती ॥२२॥ तेथ कानपुराहूनि। त्यांच्या दर्शना लागूनि। विप्र येऊनी करी विनवणी। कन्या विवाह संबंधी ॥२३॥ त्याच ठाया ब्रह्मचारी। आला पाहूनि ते अवसरीं। त्या सांगती अवधारी। कन्या वरी म्हणूनिया ॥२४॥ पंधराव्या अध्यायीं ही कथा। रोगी विप्राये ब्रह्मावर्ता। घेतां स्वामीं पदतीर्थ व्यथाहरे तयाची ॥२५॥ येती ब्रह्माणी घाटावरी। पुनर्विवाही नोवरि। पाहूनि विप्रा ते अवसरी। धर्म तत्व उपदेशिती ॥२६॥ ही कथा सोळाव्या अध्यायीं। तेथूनि चिखलद्या येती पाही। श्रीदत्त दृष्टांत होय लवलाही। अभ्यंग घाली म्हणूनि ॥२७॥

गुप्त होई दत्तमूर्ती। तीस प्रार्थूनि आणिती। श्रीची आज्ञा मानिती। येती तिलकवाडा ग्रामीं ॥२८॥ यात्रा करीत रेवातिरीं। पातले द्वारका क्षेत्रीं। राहूनि चातुर्मासवरी। राजकोट नगरीं येती ॥२९॥ तेथूनि आलेसिद्ध पुरी। ब्रह्मचार्‍यांसी ते अवसरी। सद्व्रती देऊनि अवधारी। जनासदुपदेश करिती ॥३०॥ पाहूनि दुर्व्यसनी भक्त। कृपा कटाक्षें त्या प्रत। सद्व्यसनीं अल्प काळांत। केले सत्राव्या अध्यायीं ॥३१॥ गुरु सेवेसी राहती तत्पर। वैद्य पायाचा रोग सत्वर। बरा केला साचार। अठराव्या अध्यायीं ॥३२॥ काल सर्प दंश करित। हरण करूनि तद्विषदंत। आले ब्रह्मावर्त क्षेत्रांत। एकोणीसाव्या अध्यायीं ॥३३॥ बहूकवित्व करुन। जना भजनीं लावून। शिष्या आतूर संन्यास जाण। देती विसाव्या अध्यातीं ॥३४॥ रुईचा चीक नेत्रीं भरून। क्रोधें घेतसे ब्राह्मण। त्यानिज कृपे दृष्टी जाण। देती एकविसाव्यांत ॥३५॥ ब्रह्मावर्ताहूनि निघती। दिक्षित स्वामीसी समजाविती। श्रीवाडी प्रती येती। उपदेशिती संन्यासी तत्व ॥३६॥ ह्या बाविसाव्या अध्यांयात। कथा असती विस्तृत। श्रीदत्ताज्ञेवरूनि दंड देत। दिक्षित स्वामी प्रती जाणा ॥३७॥ वंध्यादोष निरसनार्थ। विप्रहस्त जोडुनी प्रार्थित। प्रसाद श्रीफळ तत्स्त्रीसदेत। कन्या प्रसावली ती जाणा ॥३८॥ तेविसाव्या अध्यायीं ही कथा। पिशाच्च वृत्तीच्या वैजनाथा। पाचारूनि तत् द्रव्यानें ग्रामस्थां। अन्न संतर्पणें तोषविलें ॥३९॥ हें निरुपण चोविसाव्या अध्यायीं। श्रीवाडीहूनि लवलाही। निघून गाणगग्रामीं पाही। येती श्रीदत्त दर्शना ॥४०॥ तेथूनि नरसीं ग्रामीं वास। करुनि क्रमिती चातुर्मास। मग यात्रा मिषें

ब्रह्मावर्तास। हिंडत आले काशीसी ॥४१॥ श्रीकाशी निवासी जना। देऊनिया निज दर्शना। त्रिदिन राहूनि क्षेत्र स्थाना। तोषविती पंचविसाव्या अध्यायीं ॥४२॥ पुनश्च येऊनी ब्रह्मावर्ती। गोपाळ बुवासी अनुग्रह देती। मग चमत्कार भक्तांप्रती। दाविती सव्विसाव्या अध्यायीं ॥४३॥ इंदूरवासी विप्र भक्तां। सांगूनि गायत्री भाष्यार्था। पाहती ॐकारेश्वरी येतां। आचारहीन द्विज पुत्रां ॥४४॥ त्या ब्रह्मकर्म शिकविती। धर्मोपदेश करिती। ही सत्ताविसाव्यांत निश्चिती। कथा असे अवधारा ॥४५॥ ब्रह्मकर्म करितां भक्ती। उपजली सोहिरोबाचें चित्ती। गोरखनाथ ज्ञान देती। अठ्ठाविसाव्यांत ती कथा ॥४६॥ सोहिरोबासी निसींकाळीं। विठ्ठलाचार्य कुपांत ढकली। परी बाहेर येती प्रातःकाळीं। पाहतां विनवी कर जोडूनि ॥४७॥ तया उपदेश करुनि। सन्मार्गा लाविती झणी। गोरक्षकथा निरुपणीं। एकूण तिसाव्या अध्यायीं पूर्ण ॥४८॥ कर्माची महती सांगती। श्रीदत्तगुरु निश्चिती। जी कथीली कार्तवीर्याप्रती। तिसाव्या अध्यायीं ती कथा ॥४९॥ तेथूनी रेवातिरीं येती। बढवाई समीप वस्ती। चातुर्मासवरी करिती। भक्तां तोषविती दर्शनें ॥५०॥ नाना शास्त्र्यासी निजस्थानीं। पोंचवूनि सद्गती तत्क्षणीं। देती पूजाऱ्या लागूनि। पाठवूनि श्रीवाडीस ॥५१॥ एकतिसाव्या अध्यायीं। कथा सविस्तर असें पाहीं। मग मार्गक्रमीत लवलाहीं। नृसिंहवाडीस पातले ॥५२॥ ही बत्तीसाव्यांत कथा। परिक्षा पहावया तत्वतां। द्विज एक झाला येता। चिंध्या गुंडाळूनि हातासी ॥५३॥ तेहत्तीसाव्या अध्यायांत। ती कथा असे विस्तृत। अत्युष्ण जलें ताप होत। श्रीदत्त दृष्टांती सांगती ॥५४॥ एका

विप्रकन्येप्रती। यंत्र देऊनि निश्चिती। ब्रह्मराक्षस पीडा हरिती। कथा ती चौतीसाव्यांत ॥५५॥ मोळा स्थानीं जाती भोजना। नाम महात्म्य भाविक ब्राह्मणा। कथूनि तीर्थक्षेत्र स्थाना। जातां नाना स्तुती करिती ॥५६॥ येती भार्गव क्षेत्रांत। ही कथा पस्तीसाव्यांत। सेतूबंध रामेश्वरीं येत। तंजावरी चातुर्मास करिती ॥५७॥ तेथ खेडवाळ द्विज येत। त्याच्या बंधूसी सन्मार्गा लावित। ही कथा छत्तीसाव्यांत। असे विस्तृत वर्णिली ॥५८॥ ईरोड ग्रामीं शंकराचार्य। भेटती तेणें अवर्णनीय। आनंद परस्परा होय। स्तुती स्तोत्र गाती जाणा ॥५९॥ सदतिसाव्या अध्यायीं। ती कथा वर्णिली पाहीं। कृष्णा तटीं लवलाहीं। मुक्त्यालयी क्षेत्रीं येते झाले ॥६०॥ चातुर्मास करुनि वास। कृष्णा स्तोत्र करिती विशेष। स्नान सप्त गोदावरीस। करुनि काकिनाडा नगरा येती ॥६१॥ ही अडतिसाव्या अध्यायांत। कथा वर्णिली निश्चित। येती राजमहेंद्रींत। ब्रह्मानंदयती आग्रहें ॥६२॥ कृष्णातिरीं क्षौर प्रकार। घडला ती कथा सविस्तर। गोदावरी तीरीं कुवूर। ग्रामीं सत्वर पातले ॥६३॥ तेथें एक शास्त्री येऊनि। म्हणे स्नुषेलाव कन्ये लागूनि। वात विकार असे स्वामींनीं। कृपा करणें मजवरी ॥६४॥ तया सांगती मंत्र जप। करितां पिशाच्च। आपोआप। बोलूं लागता निरोप। देती तया जावया एकूण चाळिसाव्या अध्यायीं ॥६५॥ ह्या सुरस कथा पाही। उत्तर पंथा काश्मिरा जाई। तेथूनिया लवलाहीं। ऐंशी श्रीदत्ताज्ञा होतसें ॥६६॥ येती वाईन गंगातीरी। पवनीस चातुर्मासावरी। राहती तेथ विप्र नवज्वरी। विकळ झाला पाहुनी ॥६७॥ देऊनी तीर्थ अंगारा। आरोग्य देती तत्शरीरा। अनुग्रह

धनिक द्विजवरा। चालिसाव्या अध्यायीं देती ॥६८॥ वाईन गंगा स्तोत्र करुनी। शिष्यांसह निघती तेथुनी। येती कृष्णा गंगा संगम स्थानीं। एके चालिसाव्या अध्यायीं ॥६९॥ तुंगभद्रातीरीं हावनूर। ग्रामीं चातुर्मास साचार। करुनि त्रिपुरांतकेश्वर स्तोत्र। जना भजनीं लाविती ॥७०॥ ही कथा बेचाळिसाव्यांत। होऊनिया मार्गस्थ। श्रृंगेरीस वास्तव्य करित। अल्प काळ पर्यंत ॥७१॥ तेथूनि गोकर्ण महाबळेश्वर। दर्शन करुनि कृष्णातीर। लक्षूनि गलगली जैनापूर। वास करिती मास वरी ॥७२॥ ही त्रेचाळिसाव्यांत कथा। येती कुरवपुरीं तत्वतां। चातुर्मास वास करितां। भक्त दर्शना पातलें ॥७३॥ श्रीकृष्णाशूद्रीण वेषें। याचना करी भोजनोद्देशें। उपवास करितां गिर्वाण भाषेमाजीं श्रीपाद उपदेशिती ॥७४॥ अंगुलीस वृश्चीकदंश। झाला परी भक्त मानस। जाणूनि करिती भोजनांस। स्वयें साक्षित्वें राहुनी ॥७५॥ ह्या कथा चवेचाळीसाव्यांत। स्त्री एक चोरी करीत। शेष नामक विप्र याचित। त्या व्यंकट रमण पद्य देती ॥७६॥ श्रीपादस्तोत्र करुनि त्वरित। परळी वैद्यनाथीं येत। स्वाहाकार करिती ग्रामस्थ। राजूर ग्रामीं क्वचित्काळ ॥७७॥ राहूनि हिंगोलीस येती। भक्तजनां आनंद देती। कांहीं दिवस करुनि वस्ती। दौलताबादीं पातलें ॥७८॥ जनार्दन स्वामीं समाधी दर्शन। करुनि वेरुळ घृष्णेश्वरीं जाण। येती नर्मदा तीर लक्षून। चिखलदा ग्रामीं रहाती ॥७९॥ भक्ती उपजेल कवणेंरिती। द्विज प्रश्न करी एकांती। त्या योग्य प्रकारें बोधिती। पंचेचाळीसाव्या अध्यायीं ॥८०॥ चातुर्मास चिखलद्यांस। करुनि येती श्रीगरुडेश्वरास। भिल्ल रुपें अश्वत्थामा विशेष। मार्ग येऊनि दाखवीतसें ॥८१॥

नर्मदेला पूर प्रचंड। येतां स्पर्शतांची दंड। सुखविती भक्तवृंद। शेहेचाळीसाव्या अध्यायीं ॥८२॥ गोपाळनाथें विपरीत स्थिती। देखूनि विचार करीचित्तीं। त्या भजन कराया सांगती। रचिती नवरत्नमाला ॥८३॥ सत्तेचाळीसाव्या अध्यायीं। ह्या कथा असती पाहीं। अठ्ठेचाळिसाव्या अध्यायीं। आत्मानात्मविचार प्रकर्ण ॥८४॥ त्याचाची उत्तरभाग। एकूण पन्नासाव्या अध्यायीं चांग। वर्णिला असें स्वामीनीं सांग। भक्त जनोद्धारार्थ ॥८५॥ चित्त सद्बोध नक्षत्र माला। चमत्कार दाखविती विप्र स्त्रीला। फोडितां प्रसाद श्रीफळाला। सुवर्ण मोहोर बाहेर पडे ॥८६॥ भक्ती संबंधी प्रश्न। करीतसें विप्र जाण। ही कथा संपूर्ण। असे पन्नासाव्या अध्यायीं ॥८७॥ सर्प वारुळातूनि येतां बाहेर। जन घाबरले समग्र। अभेद्य स्थिती प्रकार। दाखविती तया कुरवाळुनी ॥८८॥ आपापल्या ठायांस। पाठविती बोधूनि भक्तांस। साक्षित्वें देहीं भोगिती क्लेश। सामान्य नरा समान ॥८९॥ दर्शना पातलें भक्त अनेक। त्यांना उपदेशूनि मनःपूर्वक। योग्य समय पाहूनि देख। अखंड समाधी साधिती ॥९०॥ वार्ता कळली भक्त जना। चित्तीं विकळ होती जाणा। स्वप्नीं बोधिती तयांना। अंतरीचें गुज सांगुनी ॥९१॥ ऐंसे चित्र विचित्र। लीलायुक्त श्रीगुरु चरित्र। वर्णिलें पन्नास अध्यायीं मात्र। परी चतुर्वक्त्रा पार नकळे ॥९२॥ आतां त्याचेंचि सार। ह्या अवतरणिकेंत समग्र। कथिलें श्रोते जना साचार। या एकावन्नाव्या अध्यायीं ॥९३॥ सप्ताह वाचावयाची पद्धती। सांगतो संक्षेपस्थिती। दिन शुद्धीं पाहूनि शास्त्रोक्तरीती। वाचन आरंभ करावा ॥९४॥ ब्रह्मचर्य मित भाषण। मिताहार मित निद्रा जाण। शुद्धाचार शुद्ध वर्तन। अंतरबाह्य ठेवावें ॥९५॥ गोमय स्थळ सारवून। रंगवल्यादि

शोभा करून। धूप दीप पाजळून। अर्चन करणें भक्तीनें ॥९६ ॥ आठ अध्याय प्रथम दिनीं। सोळाव्यापर्यंत दुजें दिनीं। तेवीस पर्यंत तिसरें दिनीं। वांचूनिया पूर्ण करणें ॥९७ ॥ एकतीस पर्यंत वांचून। चौथें दिवशीं करावें पूर्ण। पाचवें दिनीं जाण। एकूण चाळिसाव्या पर्यंत ॥९८ ॥ सहावें दिवशीं सत्तेचाळीसावा। वांचूनी पूर्ण करावा। सातवें दिवशीं पन्नासावा। अवतरणिकाही वांचावी ॥९९ ॥ संगता प्रीत्यर्थ संतर्पण। विप्रां भोजन दक्षिणा देऊन। तोषवावें यथाशक्ती जाण। ऐशीं सप्ताह पद्धती ॥१०० ॥ येणेंपरी श्रवण पठण। करितां सद्गुरू माउली जाण। तोषूनि मनकामना पूर्ण। पूर्ण करील निश्चयें ॥१०१ ॥ तो सद्गुरु वासुदेव। व्यापूनि असें सर्व ठाव। तच्चरणीं भक्तीभाव। ठेवितां काय दुर्लभ ॥१०२ ॥ सद्गुरुनीं निजलीला। येथवरी वर्णवूनि भला। अनाथ गोपाळ सनाथ केला। मनीचा हेतू पुरवूनी ॥१०३ ॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती चरित्रामृते। गोपाळबुवा विरचितें। श्री सद्गुरु वासुदेव चरित्र समाप्तः। श्रीमन्न शालीवाहन शके अठराशें छपन्न (१८५६) । भावनाम संवत्सरे। दक्षिणायने। श्रावण मासे। शुद्ध पक्षे। अद्य पंचम्यां तिथौ। सौम्य वासरे। तद्दीनी श्रीगुरु चरित्र। श्रीगणेश लक्ष्मी तनय दत्तात्रयानें (निलजी ठाणे रायबाग इलाखा करवीर) श्रीक्षेत्र करवीर येथें लिहून। श्रीसद्गुरु वासुदेवानंद सरस्वती यांचे चरणीं अर्पिला। व सद्गुरु अशीच दासाची सेवा मान्य करो। श्रीकृष्णार्पण मस्तु।ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु। श्रीगुरुदेवदत्त ॥ हा ग्रंथ पुत्रवत् पालन करणाऱ्यास सद्गुरु त्याचें पूर्ण कल्याण करील। शुभंभवतु। कल्याण मस्तु।।

* * *



मुद्रण तिथी व तारीख - चैत्र शु. प्रतिपदा(पाडवा) शके. १९१७. दि. १ एप्रिल १९९५., स्थळ-कोल्हापूर.